- **माहितीचे मूल्यांकन:** इंटरनेटवर मिळणारी माहितीची सत्यताचे मूल्यांकन करणे.

डिजिटल साक्षरता आणि शिक्षण

डिजिटल साक्षरता आणि शिक्षण एकमेकांशी घट्टपणे जोडलेले आहेत कारण दोन्ही विद्यार्थ्यांच्या ज्ञान आणि कौशल्ये वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. डिजिटल साक्षरता म्हणजे केवळ संगणक वापरणे नव्हे, तर इंटरनेटचा सुरक्षित व प्रभावी वापर, माहिती स्रोतांचा योग्य प्रकारे शोध, विश्लेषण, आणि ते योग्य पद्धतीने सादर करणे ह्याचा समावेश असतो. शिक्षणामध्ये डिजिटल साक्षरतेचा फायदा खालीलप्रमाणे होतो:

1. **ज्ञानाची विस्तृत उपलब्धता**: डिजिटल साक्षरता असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शैक्षणिक संसाधने, जसे की ई-पुस्तके, संशोधन निबंध, आणि शैक्षणिक वेबसाइट्स वापरता येतात. यामुळे त्यांना विश्लेषणात्मक आणि नवीन ज्ञान मिळविण्यात मदत होते.
2. **मल्टीमीडिया शिक्षण अनुभव**: डिजिटल साधनांद्वारे ऑडिओ-व्हिज्युअल शिकवणीतून विषय अधिक सखोल समजला जातो. उदाहरणार्थ, सायन्स मॉडेल्सचे थ्रीडी ॲनिमेशन किंवा ऐतिहासिक घटना व्हिडिओ स्वरूपात पाहता येतात, ज्यामुळे शिक्षण अधिक रोचक व प्रभावी होते.
3. **स्वयं-अभ्यास आणि ई-लर्निंग**: डिजिटल साक्षरतेमुळे विद्यार्थी इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्सवरून अभ्यास करू शकतात. हे त्यांना स्वयंपूर्ण बनवते आणि शिकण्याच्या वेग व शैलीनुसार शिकता येते.
4. **संवाद व सहकार्य कौशल्ये**: डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थी विविध माध्यमांवरून शिक्षक व सहाध्यायींशी संवाद साधू शकतात. तसेच ग्रुप प्रोजेक्ट्ससाठी विविध साधने, जसे की गूगल ड्राईव्ह, स्लॅक, किंवा टीम्स वापरून काम अधिक प्रभावीपणे करता येते.
5. **डेटा सुरक्षितता आणि तंत्रज्ञानाचे ज्ञान**: आजच्या डिजिटल युगात माहिती सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. डिजिटल साक्षरतेमुळे विद्यार्थ्यांना डेटा सुरक्षितता, गोपनीयता, आणि सुरक्षित संकेतशब्द यासंबंधीचे ज्ञान मिळते, जे अत्यंत महत्त्वाचे आहे.
6. **करिअर संधींमध्ये वाढ**: डिजिटल कौशल्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यातील नोकरीसाठी अधिक संधी उपलब्ध होतात, कारण आज जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे.

डिजिटल साक्षरतेमुळे शिक्षण अधिक समृद्ध आणि प्रभावी बनते, तसेच विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवते.

डिजिटल साक्षरता कशी विकसित करायची?

- **ऑनलाइन कोर्स:** अनेक वेबसाइट्स आणि ॲप्सवर मोफत आणि पेड ऑनलाइन कोर्स उपलब्ध आहेत.
- **पुस्तके आणि ब्लॉग:** डिजिटल साक्षरतेशी संबंधित पुस्तके आणि ब्लॉग वाचू शकता.
- **प्रॅक्टिस करा:** जितके अधिक आपण डिजिटल उपकरणांचा उपयोग कराल, तितके अधिक आपली डिजिटल साक्षरता वाढेल.
- **दुसऱ्यांकडून मदत घ्या:** जर तुम्हाला काही समस्या आली तर, कोणत्याही मित्र, कुटुंबातील सदस्य किंवा तज्ञांकडून मदत घेऊ शकता.

निष्कर्ष

डिजिटल साक्षरता आजच्या काळात एक आवश्यक कौशल्य आहे. हे विकसित करण्यासाठी तुम्हाला निरंतर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. डिजिटल साक्षर असल्याने आपण आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात यशस्वी होऊ शकता.

संदर्भ :

1. सप्रे, निलिमा, पाटील, प्रिती, आणि पाटील, ज्योती (२००९). गतिमान शिक्षणासाठी विचारप्रवाह, कोल्हापूर: फडके प्रकाशन.
2. White, J. P. (2015). Digital Literacy Skills for FE Teachers. United
3. Kingdom: SAGE Publications.
4. Digital Literacy for Teachers. (2022). Singapore: Springer Nature Singapore.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

एक देश एक निवडणूक

डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके,
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी

भारतीय घटनेने संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केलेला आहे. देशात खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात यावयाची असेल तर खुल्या आणि स्वच्छ वातावरणात निवडणुका होऊन योग्य व पात्र प्रतिनिधींची निवड होणे आवश्यक असते. लोकशाहीचा कारभार जनतेच्या संमतीतून आणि टिकेतून चालतो. अब्राहम लिंकन यांनी वर्णन केलेली लोकशाही (लोकांचे, लोकांकडून, लोकांकरिता असणारे शासन) प्रत्यक्षात आणण्यासाठी निवडणूक यंत्रणा आवश्यक असते. लोकशाही आणि निवडणुका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतीय घटनेच्या सरनाम्यात 'सार्वभौम... लोकशाही, गणराज्य' असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. भारतीय घटनेने प्रातिनिधिक शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. मध्यवर्ती सरकार व घटक राज्यांची सरकारे यातील प्रतिनिधी निवडणुकीद्वारे निवडले जातात. संसद, विधानसभा यातील प्रतिनिधी जनतेकडून निवडले जातात. भारतीय घटनेने अठरा वर्षे पूर्ण असलेल्या स्त्री-पुरुष नागरिकांना प्रौढ मतदानाचा अधिकार दिलेला आहे. भारतीय नागरिकांना जसा मतदानाचा अधिकार आहे, तसा निवडणूक लढविण्याचा अधिकारही दिलेला आहे. लोकसंख्येचा विचार करून देशात मतदार संघ पाडलेले आहेत. या मतदारसंघातून सार्वत्रिक निवडणुका घेऊन प्रतिनिधींची निवड केली जाते. अर्थात निवडणूक घेणे, मतदार संघ, मतदार याद्या तयार ठेवणे, मतदानाची प्रक्रिया ठरविणे, मतमोजणी करणे अशी निवडणुकीच्या संदर्भातील सर्व कार्ये पार पाडण्यासाठी, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी निवडणूक आयोगाची तरतूद करण्यात आलेली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पंधराव्या भागातील ते 324 328 या कलमात निर्वाचन आयोग, प्रादेशिक मतदार संघ, प्रौढ मताधिकारानुसार मतदार याद्या तयार करणे, लोकसभा आणि विधानसभा यांच्या निवडणुका घेणे, निवडणुकीसंबंधी कायदे करण्याचा संसदेचा अधिकार इत्यादी बाबतच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

भारत हा लोकशाही शासनव्यवस्था असणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. लोकशाहीमध्ये निवडणुकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. निवडणूक प्रक्रियेद्वारे सामान्य मतदार आपले सरकार ठरवत असते. भारत हा बहुधर्मीय, बहुजातीय तसेच सांस्कृतिक विविधता असणारा देश आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेमध्ये या सर्व घटकांचा प्रभाव दिसून येतो. असे असले तरी सुद्धा भारतातील निवडणुका खुल्या वातावरणात झालेल्या आहेत.

भारत देशाचा राज्यकारभार संसदीय लोकशाही पद्धतीने चालतो. प्रातिनिधिक शासन पद्धतीनुसार देशाचा राज्यकारभार राष्ट्रीय, प्रांतीय आणि स्थानिक पातळीवर चाललेला आहे. अगदी ग्रामसभेपासून लोकसभेपर्यंतचा राज्यकारभार लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो. भारतीय निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे. तिचे अधिकार कार्यक्षेत्र राज्यघटनेनुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधान परिषदांच्या निवडणुका घेतल्या जातात. राज्य निवडणूक आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात. केंद्रीय निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग यांची कार्यक्षेत्र वेगळी असली तरी त्यांचे अधिकार समान आहेत. राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा वेगळा स्वतंत्र आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांचा दर्जा केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांच्या दर्जाशी समतुल्य आहे. राज्य निवडणूक आयोगाला जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासन उपलब्ध करून देते. राज्य शासनाला निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे बंधनकारक असते.

भारतीय जनता सार्वभौम आहे. जनतेच्या सार्वभौमत्वाच्या प्रकटीकरणातून लोकशाहीचा उदय होत असतो. भारतातील नागरिक हे लोकशाहीचे मूलभूत घटक आहेत. मतदारांनी प्रकट केलेल्या मतानुसार प्रतिनिधी निवडले जातात. हे प्रतिनिधी लोकशाहीत निर्णय निर्धारणाची भूमिका पार पाडत असतात. भारतीय नागरिक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रतिनिधींच्या निवडणूक प्रक्रियेत आणि निर्णय निर्धारणात सहभागी होतात. भारतीय लोकशाहीत मतदारांचे खरेखुरे प्रतिबिंब उमटत असते. निवडणुका

खुल्या, स्वच्छ वातावरणात होऊन मतदारांना आपल्या मतदानाचा अधिकार निर्भीडपणे बजाविता यावा यासाठी निवडणुकीच्या संदर्भात आचारसंहिता निर्माण केली जाते. मतदार, निवडणूक लढविणारे उमेदवार, राजकीय पक्ष, शासकीय कर्मचारी यांना या आचारसंहितेचे पालन करावे लागते.

भारतात लोकसभा आणि घटक राज्यांच्या विधानसभा निवडणुका तसेच महानगरपालिकांसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका एकत्रित घेण्यासाठी 'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेवर केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर, 2024 मध्ये मंजूरी दिली. सदरचा प्रस्ताव विधेयक स्वरूपात संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आणला जाणार आहे. सदर प्रस्ताव संसदेने मंजूर केला व त्यासाठी आवश्यक त्या घटना दुरुस्त्या संमत झाल्या तर सन 2029 साला पासून देशात एक देश एक निवडणूक ही संकल्पना अंमलात येईल.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर संसदेच्या निवडणुका व राज्य विधानसभेच्या निवडणुका केंद्रीय निवडणूक आयोगामार्फत संचालित केल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगामार्फत घेतल्या जातात. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व संभागृहांची मुदत पाच वर्षाची असून मुदत संपताना निवडणुका घेतल्या जातात. सर्व सभागृहांच्या निवडणुका वेगवेगळ्या वेळी घेतल्याने सतत देशभरात कोणत्या ना कोणत्या निवडणुकीचा कार्यक्रम चालू असतो. प्रचार यंत्रणा, आचारसंहिता यामध्ये राजकीय व प्रशासकीय यंत्रणा सातत्याने गुंतून राहते. या प्रक्रियेचा सामान्य माणसाच्या विकासावर पर्यायाने देशाच्या विकासावर परिणाम होतो. सातत्याने निवडणूकमय वातावरणामुळे विकास कामांमध्ये अडथळे तयार होतात. मुख्य पदावरील राजकीय व्यक्ति, प्रशासकीय अधिकारी यांचा वेगवेगळ्या निवडणुकीतील सहभागामुळे विकास व प्रशासन या बाबींकडे दुर्लक्ष होते. देशातील सर्व निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या तर, शासकीय यंत्रणांवरील सातत्याने येणारा निवडणुकांचा ताण कमी होईल. निवडणुकांवरील शासकीय निधीची बचत होईल. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये वापरले जाणारे राजकीय, प्रशासकीय व सामाजिक मनुष्यबळ देशाच्या विकास प्रक्रियेतही वापरता येईल.

केंद्र सरकारने एकत्रित निवडणुकीबाबत नेमलेल्या कोंविंद समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने स्वीकारला आहे. संसदेत विधेयक मांडले जाईल. त्यानंतर घटना दुरुस्ती झाल्यास सन 2029 सालापासून देशात दर पाच वर्षांनी एकत्रित निवडणुका होऊ शकतात. "एकत्रित निवडणुकी बाबत कोंविंद समितिसमोर 62 राजकीय पक्षांपैकी 47 पक्षांनी आपले मत नोंदविले. भाजपसह 32 राजकीय पक्षांनी एकाचवेळी निवडणुका घेण्यास संमती दर्शविलेली आहे. मनुष्यबळ व संसाधानांचा योग्य वापर, सामाजिक ताळमेळ बसवणे आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी एकाचवेळी निवडणूक घेणे फायदेशीर असल्याचे या पक्षांचे म्हणणे आहे. तर कॉंग्रेससह पंधरा पक्षांनी या प्रस्तावाला विरोध करण्याचे अहवालात नमूद आहे." माजी राष्ट्रपती रामनाथ कोंविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही संकल्पना योग्य असल्याचे स्पष्ट केले आहे.

भारतात लोकसभा व विधानसभा या दोन्ही निवडणुका एकावेळी घेण्याचे अनेक फायदे आहेत. सरकारकडून होणाऱ्या निवडणुक खर्चात यामुळे बचत होणार आहे. राजकीय पक्षांचाही प्रचार कार्याचा खर्च कमी होईल, निवडणुका घेण्याचा प्रशासनाचा ताण कमी होईल, सततच्या निवडणुकांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करावी लागत असल्याने प्रशासनाचे काम ठप्प राहत होते ते या संकल्पनेमुळे होणार नाही. देशात निवडणुका एकाचवेळी झाल्यास त्या अनुकूल वातावरण आणि हवामान पाहून आयोजित करता येतील.

एक देश एक निवडणुकीचे फायदे –

- देशात एकाचवेळी निवडणुका झाल्याने पुन्हा-पुन्हा निवडणुका घेण्याचा प्रशासनावारील ताण कमी होईल.
- निवडणूक खर्चासाठी सातत्याने शासनास करावी लागणारी तरतूद यामध्ये बचत होईल.
- एकाचवेळी निवडणुका झाल्याने पुढील पाच वर्षासाठी सर्व यंत्रणा विकासावर भर देतील.
- सततच्या आचारसंहितेमुळे कामकाजात येणारे अडथळे कमी होतील.
- एकत्रित निवडणुकांमुळे पैसा, मनुष्यबळ यांच्या वापरावर मर्यादा राहतील.
- पाच वर्षात एकदाच निवडणुकीचे वातावरण तयार झाल्याने जनता, प्रशासन व राजकीय पक्ष उत्साहाने सहभागी होतील.

स्थानिक स्वराज्य संस्था –

"लोकसभा विधानसभा निवडणुका एकाचवेळी झाल्यावर शंभर दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची शिफारस कोंविंद समितीने केली आहे. शिफारशींची अंमलबजावणी नीट होते की नाही याची पाहणी करण्यासाठी एक गट स्थापन करण्याची सूचनाही समितीने केली."

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्रित घेतल्याने स्थानिक पातळीवरील सातत्याने होणारा राजकीय संघर्ष कमी होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ही प्रक्रिया मतदार यादी ते मतमोजणी पर्यंत गुंतगुंतीची, वादाची व संघर्षाची असते. एकत्रित निवडणुकांमुळे हा संघर्ष कमी होईल व राजकीय सामाजिक वातावरण सौहार्दपूर्ण राहील. जिल्हा प्रशासन ते स्थानिक प्रशासन हे नेहमी सामान्य माणसाच्या दैनंदिन कामकाजाशी जोडलेले असते. सातत्याने होणाऱ्या निवडणुकांमुळे व त्या अनुषंगिक निवडणूक कामकाजामुळे प्रशासनाचे जनतेच्या कामाकडे दुर्लक्ष होते. सततच्या निवडणूक कामकाजामुळे केंद्रशासन व राज्यशासन यांची विकासकामे व जनताभिमुख धोरणांची अंमलबजावणी याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होते. प्रशासनावारील ताण कमी करून विकास प्रक्रियेला गती देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकत्रित निवडणुका हा चांगला उपक्रम ठरणार आहे.

भारतीय लोकशाहीच्या भक्कम वाटचालीसाठी एक देश एक निवडणूक ही धोरण सहाय्यभूत ठरणार आहे. निवडणूक खर्च, प्रशासनाचा व जनतेचा वेळ, राजकीय पक्षांची धडपड या सर्वांमध्ये बचत होणार आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री, इतर उच्च पदस्थ राजकीय व्यक्ती, प्रशासकीय अधिकारी यांचा वेळ व शक्ती एकत्रित निवडणुकांमुळे विकासाच्या मुख्य प्रवाहात वापरली जाईल. एकत्रित होणाऱ्या निवडणुकांमुळे निवडणुकीचा खर्च, प्रचार दौरे व सभा, राजकीय कार्यकर्ते व प्रशासन यांच्या वेळचा अपव्यय, प्रचारामधील जनतेचा सहभाग यावर सकारात्मक नियंत्रण येणार आहे. एक देश एक निवडणूक या संकल्पनेमुळे स्थिर शासन व गतिमान प्रशासन या धोरणाला बळकटी प्राप्त होईल.

भारताच्या संसदीय लोकशाहीत निर्वाचन आयोगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सार्वत्रिक निवडणुका खुल्या वातावरणात पार पाडून लोकशाही मूल्ये जोपासण्याची महत्त्वाची जबाबदारी निर्वाचन आयोगावर असते. अर्थात त्यासाठी निर्वाचन आयोगाचे कार्य स्वतंत्रपणे, तटस्थतेने चालणे महत्त्वाचे असते. सरकारच्या नियंत्रणापासून निर्वाचन आयोगाचे कार्य स्वतंत्रपणे होणे आवश्यक असते. सत्तारूढ पक्ष, विरोधी पक्ष आणि मतदार यांना विश्वासात घेऊन निर्वाचन आयोगाला निवडणुका घ्याव्या लागतात. निवडणूक आयोगावर कोणत्याही प्रकारचे शासकीय नियंत्रण किंवा दडपण येता कामा नये. घटनेने घालून दिलेला विशिष्ट पद्धती शिवाय निर्वाचन आयुक्ताला त्याच्या पदावरून कमी करता कामा नये. थोडक्यात निर्वाचन आयुक्तला स्वतंत्रपणे, निर्भीडपणे, तटस्थ भूमिकेतून निवडणुका घेता येतील अशी परिस्थिती निर्माण व्हावी लागते. केवळ घटनात्मक तरतुदी करून चालत नाहीत, तर सत्तारूढ पक्षाने निर्वाचन आयुक्तावर दडपण आणता कामा नये. निर्वाचन आयुक्ताने स्वतंत्र न्याय बुद्धीने आणि निष्पक्षपातीपणे आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. निवडणुका खुल्या वातावरणात होण्यासाठी राजकीय पक्षांनी आणि नागरिकांनी निर्वाचन आयोगाला सहकार्य देणे गरजेचे आहे. कारण सार्वत्रिक निवडणुकात अनेक गैरप्रकार घडून येतात. सत्तेचा गैरवापर, पैशाचा गैरवापर, मतांची खरेदी, शासकीय वाहनांचा व प्रचार माध्यमांचा गैरवापर, निवडणुकीसंबंधीच्या नियमांचे उल्लंघन असे गैरप्रकार सार्वत्रिक निवडणुकात आढळून येतात. त्यामुळे निवडणूक आयोगाला खुल्या वातावरणात निवडणुका पार पाडणे अशक्य होते. तेव्हा निर्वाचन आयुक्ताचे अधिकार वाढवले पाहिजेत. राजकीय पक्ष, नागरिक आणि मतदानाच्या प्रक्रियेत काम करणारे कर्मचारी यांनी निर्वाचन आयोगाला योग्य प्रकारे सहकार्य देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एक देश एक निवडणूक ही संकल्पना भारतीय लोकशाहीला पोशाक ठरेल.

संदर्भग्रंथ सूची

1. Austin, Granville – The Indian Constitution, Corner Stone of a Nation.
2. Banerjee A. C. – The Marketing of the Indian Constitution.
3. Jakhar Balram – People, Parliament, Administration.
4. Gehlot N. S. – Election and Electoral Administration in India
5. चंद्रशेखर धर्माधिकारी – भारतीय संविधानाचे अधिष्ठान.

6. प्रा. बी. बी. पाटील – भारतीय शासन आणि राजकारण.
7. प्रा. बी. बी. पाटील – लोकशाही निवडणुका व सुशासन.
8. दैनिक पुण्यनगरी, कोल्हापूर, 19 सप्टेंबर, 2024, पृ. 1.
9. दैनिक लोकमत, कोल्हापूर, 19 सप्टेंबर, 2024, पृ. 1.

इंटरनेट

1. www.electioncommission

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

शिक्षकाला वर्तमानपत्रांचा अध्ययन-अध्यापनामध्ये होणारा उपयोग, त्यासाठी आवश्यक उपक्रम आणि मूल्यमापन

श्रीम. एस. एस. पाटील.
संशोधक विद्यार्थीनी, सहाय्यक प्राध्यापिका,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, गारगोटी .

प्रो. डॉ. पी. एस. देसाई
प्र. प्राचार्य, आचार्य जावडेकर
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

प्रस्तावना

शिक्षणामध्ये वेगवेगळ्या गोष्टींचा वापर केला जातो. आजची शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी जीवन जगण्याची तयारीच करून देत असते. या शिक्षणामध्ये वेगवेगळे उपक्रमासाठी इतर अनेक शाखांचा उपयोग करून घेतला जातो. यामध्ये वर्गाध्यापनात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया उत्तम होण्यासाठी वर्तमानपत्रांचा देखील उपयोग करून घेतला जातो. वर्तमानपत्रे सामान्यतः बातम्या देण्याचे कार्याकरीता वापरली जातात. वर्तमानपत्रामधून दैनंदिन घडामोडी, विविध प्रकारची राजकीय, क्रीडाविषयक, मनोरंजनात्मक, चालू घडामोडींबद्दल, वेगवेगळे निर्णय, समाजामध्ये घडणारे बदल, इतिहास, भौगोलिक घटना अशा अनेक गोष्टींची चर्चा केलेली असते. याबरोबर गुन्हेगारी विश्व, मनोरंजन यावर विशेष भर दिलेला असतो. वर्तमानपत्रामध्ये प्रामुख्याने जाहीराती, नवीन उत्पादने व त्यांचा उपयोग अशा गोष्टीविषयी मथळे, जाहिराती, बातम्या दिलेल्या असतात. वर्तमानपत्रांचा उपयोग शिक्षणातील अध्ययन, अध्यापन प्रक्रिया यासाठी काही वेळा केला जातो. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्राच्या उपयोगामुळे अनेक फायदे होताना दिसतात. वर्तमानपत्रे हे शिक्षणातील एक मौल्यवान शैक्षणिक साधन ठरू शकते.

संशोधन पद्धती-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इ.चा उपयोग करण्यात आला आहे.

उद्दिष्टे

१. वर्तमानपत्रांचे कार्य समजून घेणे.
२. वर्तमानपत्रांचा उपयोग अध्ययनामध्ये कशा पद्धतीने होतो याची माहिती करून घेणे.
३. वर्तमानपत्राचा उपयोग शिक्षकांना वर्गात अध्यापन करताना कशा प्रकारे होतो हे समजून घेणे.

विद्यार्थ्यांसाठी शिक्षकाला अनेक उपक्रम, वर्तमानपत्राच्या सहाय्याने राबवता येणे शक्य आहे. या उपक्रमामध्ये वर्तमानपत्राचे वाचन, त्यावर चर्चा इ. अशा अनेक उपक्रमांतून विद्यार्थ्यांला पुढील प्रमाणे फायदे मिळू शकतात.

- वाचन कौशल्याचे विकसन - ज्यामुळे विद्यार्थ्यांची साक्षरता सुधारेल. वाचनाचे आकलनविषयक सोप्या पद्धतीने कौशल्य वाढवण्यासाठी वर्तमानपत्रे उपयोगी ठरतात. वर्तमानपत्रे ही दैनंदिन जीवनाशी जोडलेली असतात. विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक वर्ग, सामाजिक पर्यावरणातील शब्द, म्हणी, वाक्यप्रचार व घटना यांचा वापर त्याच्यात केलेला असतो.
- विद्यार्थ्याला वर्तमानपत्रातील अग्रलेख, मनोरंजनातील सिनेमा, नाटके, एपिसोडिक सीरियल्स यांच्यावर असणा-या चिंतनात्मक सदरामधून विद्यार्थ्याची चिंतनात्मक विचारप्रक्रिया विकसित होण्यासाठी मदत होते. याबरोबर एखाद्या गोष्टीचा चिकित्सकपणे विचार करणे, विश्लेषण करणे, समुपदेशन करणे, त्यामधून योग्य तो संदेश देणे शक्य होते.
- विद्यार्थ्यांच्यामध्ये समाजाचा एक घटक म्हणून किंवा भावी नागरिक म्हणून शाळा ही एक छोटी प्रतिकृती म्हणून कार्य करते. या संदर्भात नागरी जीवनाविषयीची प्रतिबद्धता, जागरुकता, समाजात असणारी मूल्य आणि विविध समस्या यांचे ज्ञान वर्तमानपत्रांच्या माध्यमातून होत असते.

- विद्यार्थ्यांची भाषा, कला, समाजशास्त्र, अशा विषयांच्याविषयी अद्ययावत ज्ञान हे वर्तमानपत्रांच्या माध्यमातून होत असते.
- वर्तमानपत्रांच्या माध्यमातून सामाजिक माध्यमांची योग्य प्रकारे ओळख होण्याचे कार्य होत असते. याबरोबरच चिकित्सक व चिंतनात्मक विचारांचा विकास अप्रत्यक्षरीत्या होत असतो .
- शैक्षणिक संकल्पना, त्यांचा वास्तविक जगातील अनुप्रयोग हा वर्तमानपत्रांच्या माध्यमातून होत असतो. जसे विनोबा भावे एके ठिकाणी म्हणतात "जीवन व शिक्षण हि वेगवेगळी प्रक्रिया नसून ती एकच प्रक्रिया आहे. जीवन व शिक्षण हे एकत्र झाले पाहिजे". जसे भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला रणभूमीवर ज्ञान दिले, तसेच शिक्षकाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनामध्ये अनेक गोष्टींचे ज्ञान देणे गरजेचे आहे. यासंदर्भात वर्तमानपत्रांचा खूप मौल्यवानरीत्या उपयोग होताना दिसतो.
- वर्तमानपत्रातील अनेक बातम्यांचा उपयोग करून शिक्षक वर्गामध्ये चर्चा, वादविवाद, नाटय़ीकरण, भूमिकापालन अशा वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे ज्ञान देऊ शकतो.

वर्तमानपत्राचा उपयोग करण्यासाठी शिक्षकाने पुढील प्रकारांचा उपयोग करणे उचित ठरते-

१ . **चालू घडामोडी वर चर्चा** - चालू घडामोडी वर चर्चा करणे ही अत्यंत उपयुक्त ठरणारी गोष्ट आहे. कारण विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष घडणाऱ्या गोष्टीविषयी, घटनांविषयी वर्तमानपत्रामधून माहिती मिळत असते. त्याच्यावर चर्चा करून घडलेली घटना उपयुक्त किंवा हानिकारक आहे, तिचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा अनेक संदर्भाने विचार करण्यासाठी चर्चा घडवून आणणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. शैक्षणिक चर्चेचे अनेक प्रकार असू शकतात. उदा. अभ्यासक्रमामध्ये असलेल्या गोष्टीविषयी आलेली एखादी बातमी व त्यावरील चर्चा, यानंतर एखादी अभ्यासक्रमाला पूरक अथवा अभ्यासक्रमेतर बातमी व त्यावर सारासार विवेक बुद्धीने घडवून आणलेली चर्चा याचे अनेक उपयोग विद्यार्थ्यांना होतात. साधारणपणे मुद्द्यांविषयी विश्लेषण, संश्लेषण, चिंतन व विवेक बुद्धीने त्यावर केलेले विवेचन अशा अनेक कौशल्यांच्यावर तो प्रभुत्व प्राप्त करू शकतो. म्हणून चालू घडामोडीवर चर्चा ही उपयुक्त ठरते.

२. **वर्तमानपत्रातील वाचन व त्यावरील आकलन यांचा अभ्यास** - विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील अनेक रकाने, सदरे व मथळे वाचण्यास देऊन त्यावरील आकलन विषयक प्रश्न विचारणे, चर्चा घडवून आणणे, काही उपक्रम देणे हे शैक्षणिक प्रगतीसाठी उत्तम ठरते. कारण वर्तमानपत्रातील भाषा ही त्याच्या दैनंदिन वापरामधील भाषा असते. त्याच्या संदर्भातील अनेक शब्द, म्हणी, वाक्यप्रचार त्यामध्ये आढळतात. त्याच्या सांस्कृतिक, सामाजिक वातावरणाशी निगडित असे वाचन व त्यावरील आकलन याविषयी तो जिज्ञासूपणे व उत्साहाने अध्ययन प्रक्रिया करतो.

३. **शब्द संपत्ती मधील वाढ**- वर्तमानपत्राच्या वाचनामुळे अनेक प्रकारचे शब्द जे त्याने आजपर्यंत वाचलेले असतात परंतु प्रत्यक्षात उपयोगात आणलेले नसतात ते सुद्धा उपयोगात येतात. ते शब्द वापरले गेल्यामुळे त्याचा शब्दसंग्रह मजबूत होतो. त्याची शब्द संपत्ती निष्क्रिय न राहता सक्रिय होते.

४. **संपादकीय अग्रलेख व इतर लेख** -अशा प्रकारचे अग्रलेख व लेखांच्या वाचनामुळे त्याच्या ज्ञानामध्ये भर पडते. एखाद्या गोष्टीविषयी आपले मत मांडताना त्याचे विषयी असणारी तथ्ये, पुरावे यांचे संकलन करणे, संश्लेषण करणे, विश्लेषण करणे, चिंतन करून त्याची मांडणी करण्याचे कौशल्य हे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य विद्यार्थ्यास प्राप्त होते.

५. **वर्तमानपत्र विषयक संशोधने** -विद्यार्थ्याला वर्तमानपत्रांमधून जगामध्ये चालणाऱ्या संशोधनाविषयी माहिती मिळते . विद्यार्थी संशोधन पद्धती, संशोधनासाठी आवश्यक असणारी साधने, संशोधनासाठी आवश्यक गरजा, त्यासाठी लागणारे श्रम, वेळ व संपत्ती इ. विषय विचार करू शकतो. अद्ययावत अशी माहिती संशोधनामुळे त्याला मिळते, जी पाठ्यपुस्तकांमधून मिळणे शक्य नसते. त्यामुळे एक प्रकारे त्याच्या जिज्ञासाचे शमन होते.

६. **चिंतनात्मक विचार निर्भीडपणे मांडणे चे कौशल्य** - विद्यार्थ्याला वर्तमानपत्राच्या वाचनामुळे विविध प्रकारे विचार करण्यास म्हणजेच बहुआयामी पद्धतीने विचार करणे शक्य होते. वेगवेगळ्या पद्धतीने विचार केल्यामुळे योग्य अशा

प्रकारचे मत बनवणे, त्याची योग्य मांडणी करणे व समाजामध्ये जगताना त्या संदर्भात कार्यवाही करणे हे त्याला शक्य होते.

७. **माध्यमांच्या साक्षरते विषयी वर्तमानपत्रामधून ओळख** -विद्यार्थी हा समाजाचा घटक असतो. विविध प्रकारची सामाजिक माध्यमे त्याच्यामध्ये बदल घडवत असतात. समाजाचा घटक म्हणून माध्यमावर त्याची प्रतिक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते. माध्यमांचा योग्य प्रकारे उपयोग करणे, त्यातील सत्या-सत्यता पडताळणी अशा अनेक कौशल्यांचे त्याला ज्ञान प्राप्त होते म्हणजेच माध्यम साक्षरतेचे धडे वर्तमानपत्रामधून आपल्याला विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवता येतात.

८. आंतरशाखीय संबंध -वर्तमानपत्राच्या वाचनामुळे विद्यार्थ्याला तो शिकत असलेले विषय वेगवेगळे नसून हे ज्ञानाचा एक एक भाग आहेत असे लक्षात येते. त्यांची आंतरशाखीय संबंध असल्यामुळे एकमेकांशी वेगवेगळे विषय जोडून समस्या सोडवण्यासाठी त्यांचा उपयोग करणे याचे ज्ञान त्याला प्राप्त होते उदा. इतिहास, विज्ञान, गणित, भूमिती या सर्वांचा उपयोग जीवनातील एखाद्या क्षेत्रामध्ये एकत्रितरित्या करावा लागतो हे त्याला उमजते.

९. चर्चा वादविवाद व प्रेरणादायी लेखन कौशल्य -विद्यार्थ्याला वर्तमानपत्राच्या वाचनातून अनेक प्रेरणादायी लेख मिळतात. एकमेकांच्या विरोधी मते सुद्धा त्याला मांडलेली दिसतात. अनेक विषयांवर, समस्यांवर चर्चा घडवून आणलेल्या दिसतात. या सर्वामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये व सामाजिकीकरणांमध्ये वर्तमानपत्र महत्त्वाची भूमिका निभावते हे या उपक्रमातून त्याच्या लक्षात येते.

१०. शिक्षणाविषयी माहिती - विद्यार्थ्याला वर्तमानपत्रातून सद्य परिस्थितीत चालू असणाऱ्या शिक्षण पद्धतीची इत्यंभूत माहिती मिळते. याबरोबरच त्याला या शिक्षण पद्धतीमध्ये होणारी नवनवीन संशोधने, याबरोबर भविष्यातील संधी व आव्हाने यांची माहिती मिळत असते. त्यामुळे त्याला शिक्षण प्रक्रियेबद्दल अद्ययावत माहिती मिळते आणि हा उपक्रम महत्त्वाचा ठरतो.

एकंदरीत वरील प्रकारचे मार्ग आपल्याला वर्तमानपत्राचा शिक्षण प्रक्रियेमध्ये उपयोग करण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. याबरोबरच प्रत्यक्ष वर्गामध्ये काही उपक्रम पुढीलप्रमाणे राबवता येतील-

- **बातम्यांचे विश्लेषण** - वर्ग अध्यापनामध्ये रोज बातम्यांचा उपयोग करून त्यांचे विश्लेषण करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले तर विद्यार्थ्यांच्या विविध कौशल्यांचा विकास होतो. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक होते.
- **संपादकीय लेखन व अग्रलेख** - वेगवेगळ्या प्रकारचे अग्रलेख, संपादकीय लेख यांचे वाचन केल्यावर समाजात असलेल्या समस्या, वेगवेगळे प्रयोग, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक घडामोडी यांचे ज्ञान, त्यावर सहयोग व संमती असलेली मते व त्याविरोधी मते एकंदरीत विचार करता त्या गोष्टीचा समाजाला असणारा उपयोग, अशा अनेक गोष्टीबरोबर चर्चेमध्ये भाग घेणे, आपली मते मांडणे याविषयीचे असणारे विश्लेषण, संश्लेषण, चिंतन व योग्य मांडणी अशी कौशल्य विद्यार्थ्यास प्राप्त होण्यास मदत होते.
- **लेखाचा सारांश** - एखाद्या लेखाचा सारांश लिहून आणण्यासाठी विद्यार्थ्यांना सांगितले तर वाचन करणे, योग्य प्रकारे त्याचे आकलन करणे, त्याचे विश्लेषण, संश्लेषण करणे व त्याविषयी थोडक्यात म्हणजे कमीत कमी शब्दात अधिकाधिक विचार मांडण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यास मदत होते.
- **व्यंगचित्रे अथवा प्रतिमांचे विश्लेषण** - विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रात येणाऱ्या अनेक प्रतिमा, कार्टून अथवा व्यंगचित्रे यांचे विश्लेषण करायला सांगितल्यानंतर त्याला दैनंदिन घटनांचे, समस्यांचे ज्ञान होते. याबरोबरच वेगवेगळ्या समस्यांविषयी जनजागृती साठी उपयोग होतो. एखाद्या प्रतीकाचा योग्य अर्थ समजून घेण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त होतो.
- **मथळा लेखन** -विद्यार्थ्यांना एखाद्या घडलेल्या घटनेविषयी मथळ्याचे लेखन करावयास सांगितले तर घडलेल्या घटनेविषयी योग्य पद्धतीने विचार करणे, त्यातील महत्त्वाचे मुद्दे टिपणे, कमीत कमी शब्दात मांडणे अशा अनेक भाषाविषयक कौशल्यांचे ज्ञान त्यांना होते.

- **<u>बातम्यांचे शोधन</u>** . -विशिष्ट अशा बातम्या वर्तमानपत्रातून शोधून त्यांचे एकत्रीकरण करणे, त्यावर भाष्य करणे, चर्चा करणे, अद्ययावत ज्ञान प्राप्त करणे अशा गोष्टीमुळे विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र वाचनाची सवय होते व या समाज माध्यमातून समाजाचे खरेखुरे दर्शन घडवून तो एक उत्तम नागरिक होण्यास खऱ्या अर्थाने सुरुवात होते.
- **<u>माध्यम साक्षरता कार्य पत्रिका</u>** -विद्यार्थ्यांना माध्यम साक्षरते विषयी ज्ञान देण्याचे काम अशा उपक्रमांमधून होते. माध्यमांचा उपयोग करून ज्ञान कसे प्राप्त करावे, त्याच्या सत्याबद्दलची शहानिशा कशी करावी, त्यातील कोणत्या गोष्टी घ्याव्यात व कोणत्या टाळाव्यात याचा एक सराव विद्यार्थ्यांना यामधून होतो.
- **<u>वादविवाद विषय</u>** -विद्यार्थ्यांना अनेक ताज्या घटना बद्दल वादविवाद करण्यासाठी विषय दिले तर विद्यार्थी स्वतः व गटामधून वेगवेगळ्या विषयाबद्दल चिंतन करतात, तथ्य व पुरावे शोधतात, त्याच्यावर संशोधन करतात. यामुळे त्यांच्या वादविवाद कौशल्यामध्ये विकसन होते.
- **<u>वर्तमानात घडलेल्या कार्यक्रमाविषयी सादरीकरण करणे</u>** - यामधून विद्यार्थ्यांना बातमी तयार करणे किंवा एखाद्या घटनेचे ज्ञान दुसऱ्यांना देणे विषयीचे कौशल्य प्राप्त होते. आवश्यक व महत्त्वाचे मुद्दे, गरजेच्या घटना या सर्वाबद्दल योग्य व व्यवस्थित मांडणी करण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त होते.
- **वृत्तपत्र निर्माण करणे प्रकल्प** - शाळेमधील किंवा समाजामधील वेगवेगळ्या घटनांच्या विषयी स्वतःच वर्तमानपत्र तयार करण्याचे उपक्रम व प्रकल्प विद्यार्थ्यांना दिले तर विद्यार्थी समाजातील अनेक समस्या, समाजाला आवश्यक असणाऱ्या बातम्या, मनोरंजन, खेळ इ. अनेक गोष्टीबद्दल सतर्क होतो. शालेय अनुभवाबरोबर प्रत्यक्ष समाजातील अनुभवास सामोरा जाऊन त्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये व जीवनाच्या तयारीमध्ये वाढ होताना दिसते. त्यामुळे अशा पद्धतीचे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

या सर्व उपक्रमांचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये वर्गाध्यापनात उपयोग करताना शिक्षकाने साधारणपणे खालील मुद्द्यांचा विचार करावा

१ विद्यार्थ्यांच्या पाठ्य वस्तूशी संबंधित व आकर्षक अशा प्रकारचे लेख निवडावेत.

२ विचार प्रवण करणारे व चर्चा करण्यासाठी प्रोत्साहित करणारे काही मुक्त प्रश्न किंवा विधानांचा वापर वर्ग अध्यापनात करावा.

३ वर्तमानपत्रातील कात्रणे, बातम्या, जाहिराती इत्यादीविषयी योग्य तो संदर्भ व त्याची पार्श्वभूमी यांची माहिती थोडक्यात द्यावी.

४ अभ्यासक्रमांशी संबंध जोडण्यासाठी वर्तमानपत्रातील योग्य त्या आशयाचा उपयोग करावा.

५ गरज असल्यास डिजिटल वर्तमानपत्रे, बातम्या अशा तंत्रज्ञानाचा वापर करून वर्गातील वातावरण आपण मनोरंजक व उत्साही बनवावे.

६ माध्यम साक्षरते विषयी जागृती करून त्या वापरा संदर्भात कौशल्य वाढवावीत.

७ विद्यार्थ्यांच्या सहभागाला व त्यांच्या सहकार्याला प्रोत्साहन द्यावे जेणेकरून वर्गाध्यापन परिणामकारक होईल.

वर्तमानपत्रावर आधारित वर्गाध्यापनाचे परिणाम विषयक मूल्यांकन

वर्तमानपत्रावर आधारित विविध उपक्रम , प्रकल्प , चर्चा ,वादविवाद व व्याख्याने यांच्या उपयोगानंतर मूल्यांकनात संदर्भात पुढील गोष्टींचा उपयोग करता येईल

१. आकलना संदर्भात प्रश्नमंजुषा निर्माण करणे.

२. चिंतनावर आधारित सरावासाठी स्वाध्याय देणे.

३. संपादकीय व इतर लेखांचे लेखन करण्यासाठी उपक्रम देणे.

४. वर्गाध्यापनानंतर सहभागी अथवा गटचर्चा यामार्फत मूल्यांकन करणे.

५. गृहपाठासाठी वेगवेगळे प्रकल्प देणे व त्यांचे सादरीकरण करणे.

६. विविध प्रकारचे माध्यमातून अभिप्राय घेणे याद्वारे त्यांची माध्यम साक्षरता तपासणे.

७. विद्यार्थ्याला मनन व चिंतन करण्यास सांगून स्वयंमूल्यांकनाविषयी प्रोत्साहन देता येईल.

वरील प्रकाराशिवाय इतर मूल्यांकन पद्धतीचा वापर करून शिक्षक वर्ग अध्यापनातील मूल्यांकन तपासू शकतात.

समारोप –

एकंदरीत शैक्षणिक क्षेत्रात वर्तमानपत्राचा समावेश करून शिक्षक त्यांचे अध्यापन आकर्षक, परस्पर संबंधित, परस्पर संवादी असे करून विद्यार्थ्यांना अधिकाधिक अनुभव देऊ शकतात. जे त्यांच्या ज्ञानरचना तयार करण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्यामुळे विद्यार्थी अधिकाधिक ज्ञान घेऊ शकतात व अद्यायावत ज्ञानामुळे २१ व्या शतकातील भारताचे सूज्ञ व जागरूक नागरिक बनू शकतील.

संदर्भ –

1. Susan M. McCormack (2015) "Using Newspapers in the Classroom"
2. Richard R. Rellels (2013) " Newspaper Literacy: A Guide for Teachers "
3. Nancy D. Lester (2012) "Teaching, Reading with Newspapers"
4. Gray S. Stager (2018) "Newspaper- Based Projects for the Classroom"
5. Susan M. McCormack (2016) " Using Newspapers to integrate Curriculum"
6. John Larmer (2015) "Project-based learning with Newspapers"
7. Ernest R. House (2018) " The power of newspaper in the classroom"
8. मनोहर रा. कुलकर्णी, रामदास का. फेगडे, "अनौपचारिक शिक्षण"
9. दिनकर गांगल "माया माध्यमांची"

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगाचा आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास

प्रा. विक्रमसिंह बाबासो राऊत
सहाय्यक प्राध्यापक, भूगोलशास्त्र विभाग,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर 416209
Email Id- rautvikramsinh@gmail.com
प्रा. एस. एन. पाटील
सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, भूगोलशास्त्र विभाग,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र महाविद्यालय गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर 416209
Email Id- sanjaypatilgargoti@gmail.com

प्रस्तावना

"मानव स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या हालचाली अगर प्रयत्न करत असतो त्या क्रिया प्रयत्नांना 'मानवी व्यवसाय म्हणतात किंवा "ज्या हालचाली किंवा प्रयत्न मानवी गरजांची पूर्तता करण्याच्या कामी येत असतात त्या सर्व हालचालींना 'मानवी व्यवसाय' असे म्हणतात.' मानवी गरजांचा अभ्यास केला असता आपणांस भावी गरजांतील वेगळेपणा सहज लक्षात येतो. मानवी गरजा कधी न संपणारी एक प्रक्रिया आहे, असे असले तरी सर्वच मानवी गरजा ह्या सारख्याच स्वरूपाच्या नसतात. मानवी गरजा ह्या निरनिराळ्या असतात व त्यामुळे त्या वेगवेगळ्या गरजांच्या पूर्ततेसाठी मानवाने केलेले प्रयत्नही वेगवेगळे असल्याचे आपणाला आढळून येते. या केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या प्रयत्नातून मानवाचे निरनिराळे व्यवसाय ठरविले जातात. मानवी व्यवसायाचे मुख्यत: चार प्रकारात वर्गीकरण केले जाते. प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी, तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी अशा प्रकारचे विविध व्यवसाय मानव आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी करत असतो. त्याचप्रमाणे बांधकामासाठी लागणाऱ्या विटा बनवण्याचे काम हे वीटभट्टी उद्योगाच्या माध्यमातून होते. वीटभट्टी उद्योग हा परंपरागत व्यवसाय आहे. परंतु आज अलीकडे त्या व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर होत असलेला पाहावयास मिळतो. अशा या वीटभट्टी उद्योगासंदर्भातची सद्यस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी आम्ही शेणगाव गावातील वीट भट्टी उद्योगाची प्रत्यक्ष पाहणी करून, मुलाखती घेऊन माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

उद्दिष्टे:

1. शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगाची आर्थिक सामाजिक स्थिती अभ्यासणे.
2. शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगासमोरील समस्यांचा शोध घेणे.
3. शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगातील समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.


अभ्यास पध्दती

शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी विशिष्ट अभ्यास पध्दती व तंत्राचा वापर करण्यात आला. प्रत्यक्ष निरीक्षणे, मुलाखती व लिखित साहित्यांचे संकलन करण्यात आले. यासाठी विविध अभ्यास पध्दती व तंत्रे यांचा वापर करण्यात आला. जिल्हा सेन्सस, हँडबुक, जनगणना निर्देशांक, हस्तपुस्तिका इत्यादींच्या सहाय्याने माहिती गोळा करण्यात आली. शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगासंदर्भात संपूर्ण माहिती ही शेणगाव गावातील वीट भट्टी उद्योग मालक तसेच कामगार यांची प्रत्यक्ष मुलाखती घेवून आवश्यक त्या माहितीच्या नोंदी घेतल्या. शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगासंदर्भात संपूर्ण

माहिती ही शेणगाव गावातील वीट भट्टी उद्योगास प्रत्यक्ष भेटून आवश्यक त्या माहितीच्या नोंदी घेतल्या. नकाशाच्या आधारे शेणगाव या गावातील वीटभट्टी उद्योगासंदर्भात संपूर्ण माहिती ही घेतली व विश्लेषण करण्यात आले.

अभ्यास क्षेत्र

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड किल्ल्याच्या वायव्येला शेणगाव गावचे स्थान असून ते कोल्हापूरच्या दक्षिणेला ५५ किलोमीटर अंतरावर वेदगंगा नदीच्या डाव्या तीरावर वसलेले गाव आहे. गावाच्या पश्चिमेला सह्याद्री पर्वत आहे. शेणगाव गावची एकूण लोकसंख्या 3177 इतकी आहे. तर गावात 699 कुटुंब राहतात.



भौगोलिक पर्यावरण

दख्खनच्या पठारावरील भुदरगड तालुक्यात शेणगाव गावाचे मध्यवर्ती स्थान आहे. वेदगंगा नदिच्या डाव्या तीरावर शेणगाव गाव वसले आहे. शेणगाव गावच्या प्राकृतिक रचनेचा विचार केल्यास दक्षिणेकडून उत्तरेकडे उताराचा भाग आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडलेल्या शिलारसाच्या संचयनाने निर्माण झालेल्या दख्खनच्या पठाराच्या इतर भूभागाप्रमाणे शेणगाव गावची भूरचना आढळते. सहयाद्री पर्वताच्या पूर्व उतारावर हा भाग भूगर्भशास्त्रीयदृष्ट्या अतिशय मजबूत मानण्यात येतो. या गावातून वेदगंगा नदी वाहते त्यामुळे गावातील शेतीसाठी वर्षभर पाणी पुरवठा केला जातो तसेच पिण्याच्या पाण्याची सोय चांगल्या प्रकारे होते. शेणगाव चे हवामान उष्ण व दमट स्वरूपाचे आहे. पावसाळ्यात पर्जन्याचे प्रमाण अधिक असते. वार्षिक सरासरी १०० ते १५० से.मी. इतके पर्जन्यमान असते. हिवाळ्यात हवामान आल्हाददायक असते. शेणगाव हे गाव वेदगंगा नदीच्यानतीरावर असल्याने हिवाळ्यात जास्त थंडी जाणवते. हिवाळ्यात तापमान थोडे कमी म्हणजे १२ ते १५ सेंटी ग्रेड इतके असते. उन्हाळ्यात हवामान कोरडे व उबदार असते. मार्च ते मे दरम्यान येथील तापमान जास्त असते. मे महिन्यात सरासरी तापमान २५ ते ३५ सेंटी ग्रेडअसते. शेणगाव या गावी दख्खनच्या पठारावर आढळणारी सर्वसाधारण मृदा आढळते. गावात प्रामुख्याने रेगूर मृदा (काळी मृदा) आढळते. वेदगंगा नदीतून शेतीला वर्षभर पाणी पुरवठा होत असल्यामुळे ऊस, भात व भुईमुग इत्यादी पिके घेण्यात येतात. शेणगाव हे गाव वेदगंगा नदीच्या तीरावर वसले आहे. जलसिंचनाव्दारे शेतीसाठी वर्षभर पाणीपुरवठा केला जातो. शेणगाव च्या हद्दीत नेसर्गिक वनस्पती आढळून आली. या गात मोसमी हवामान असल्यामुळे अनेक झाडे व झुडपे आढळतात. गावात प्रामुख्याने मोसमी पानझडी वनस्पती आहेत. निलगिरी, फणस, आंबा, चिंच या झाडांची संख्या जास्त आहे.

शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगाची सद्यस्थिती-

भारतात सध्या १ लाख ५० हजार पेक्षा जास्त विटभट्टया आहेत. भारताचा वीट उत्पादनात जगात दुसरा क्रमांक आहे. तर चीनचा प्रथम क्रमांक आहे. भारतात १ कोटी पेक्षा अधिक लोकांना रोजगाराच्या संधी या उद्योगाने निर्माण करून दिल्या आहेत. महाराष्ट्रात १५ हजार विटभट्ट्या आहेत, तर कोल्हापूर जिल्हयात २५०० वीट भट्ट्या कार्यरत आहेत. भुदरगड तालुक्यात ३०० वीट भट्ट्या आहेत त्यापैकी शेणगाव या गावांमध्ये. १५० इतक्या वीटभट्ट्या कार्यरत आहेत. शेणगाव गावामध्ये वीट भट्टी उद्योगासाठी लागणारा कच्चामाल माती ,लाकूड, कोळसा हा स्थानिक ठिकाणावरून उपलब्ध होतो तसेच शेणगाव गावामध्ये

पारंपारिक पद्धतीने विटांचे उत्पादन केले जाते. यामध्ये यांत्रिकीकरणाचा थोडाफार प्रमाणात वापर केला जातो. या शेणगावातील वीटउद्योगाला लागणारा मजूर पुरवठा हा कर्नाटक राज्यातून विजापूर जिल्ह्यातून होतो. तसेच स्थानिक मजूर ही या वीट उद्योगांमध्ये कामगार म्हणून उपलब्ध होतात. या उद्योगांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग अधिक असतो. प्रामुख्याने या व्यवसायामध्ये गुंतलेले लोक हे बहुतांशी कुंभार समाजातील आहेत.

विटभट्टी व्यवसायासाठी फारशा तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता नाही. हा उद्योग वर्षभरात ६ ते ८ महिने चालतो. शेणगाव गावामध्ये विटभट्टी मालकांच्याही संघटना आहेत . तसेच कामगारांच्याही संघटना नाहीत विटभट्ट्यांना मा. तहसिलदारांकडून परवाना घ्यावा लागतो. काही थोडया यांची लघुउद्योग म्हणून नोंद झालेली आहे. याचा अर्थ रोजगाराच्या दृष्टीने विटभट्टी उद्योग महत्वाचा उद्योग आहे.

वीटभट्टी उद्योगाची आर्थिक स्थिती

वीट उत्पादनाचा खर्च :-

विटभट्टी उद्योग एक पारंपारिक आणि मूलभूत उद्योग आहे. विविध विटभट्टी उद्योजकाच्या मुलाखती घेतल्या असता तसेच विटभट्टी अभ्यास तज्ञांच्या माहिती नुसार प्रत्येक विटेचा सरासरी उत्पादन खर्च रु 4 येतो. विटेची लांबी ६ इंच, रूंदी ४ इंच व जाडी २.५ इंच गृहीत धरून विटांचा खर्च दर्शविण्यात आली आहे..

प्रति विट उत्पादन खर्च

अ.न	खर्चाचा तपशील	खर्चाचे शेकडा प्रमाण
1	इंधन	45 %
2	मजुरी	28%
3	कच्चामाल	15%
4	व्यवस्थापन व कायदेशीर बाबी	6%
5	इतर खर्च नुकसान	6%
	एकूण	100%

वरील प्रकारे विट उत्पादनाचा खर्च विभाजीत करण्यात आला आहे. इंधनावर सर्वाधिक ४५ टक्के खर्च उत्पादकांना करावा लागत आहे. मजूरीचा खर्च उत्पादन खर्चाच्या २८ टक्के आहे. विटभट्टी उद्योगाला लागणा-या कच्च्या मालावरील खर्च १५ टक्के येतो. व्यवस्थापन व कायदेशीर बाबींसाठी ६ टक्के खर्च येतो इतर खर्चाचे प्रमाण ६ टक्के आहे. अशा प्रकारे 4 रू खर्चाची विभागणी होते.

वीटभट्टी कामगारांना मिळणारे उत्पन्न :-

विटभट्टी कामगारांना विटा बनविण्याची मजूरी दर हजार विटा मागे रु ४०० पर्यंत मिळते. तसेच विटभट्टी पर्यंत वाहून नेणे याची मजूरी रु २५० मिळते. तर भट्टीत विट रचने, भाजणे या प्रकारचे काम भटकर करतात. त्यांना दर हजारी रु ५०मिळतात. अशा प्रकारे विटभट्टी कामगारांना विटा तयार करण्यापासून भट्टीत भाजण्यापर्यंतची मजूरी रु ७०० पर्यंत मिळते. दर हजार विटांची किंमत ग्राहकास रू ४०००/- होती. पैकी ७०० रू चे उत्पन्न मजूरीपोटी कामगारांना मिळत होते. यावरून एकूण उत्पादन खर्च काढता येईल. समजा २८ टक्के खर्च मजुरीवर होतो. एक हजार विटांसाठी मजूरी पोटी कामगारांना ७०० मिळत असतील. तर एक हजार विटांच्या १०० टक्के खर्च म्हणजे रु २५०० येतो. याचा अर्थ १००० विटा बनविण्याचा खर्च २५०० रू येतो तर विटभट्टी मालकास रु ४००० रु वजा २५००, १५०० रू दर हजार विटांमागे मिळतात. विटभट्टी मालकास धोका व अनिश्चितता पत्काण्याचा मोबदला रु १५००/- मिळतो. विटभट्टी कामगारांस वर्षातून ६ ते ८ महिने काम मिळते. या काळात एक कुटुंबाने १ लाख विटा बनविल्यास त्यांना रू ७००००/- मजूरी मिळते.

वीटभट्टी कामगारांच्या खर्चाचे विवरण :-

प्रत्येक विटभट्टी कामगाराचे आचार-विचार भिन्न असतात. त्यामुळे खर्चाची दिशा सुध्दा वेगवेगळी असते. विटभट्टी व्यवसायातील बहुसंख्य कामगारांच्या अभ्यासातून त्यांच्या सर्वसाधारण खर्चाचे विवरण पुढील प्रमाणे मांडता येईल.

अ. क्र.	तपशील	शेकडा प्रमाण
१	उपभोग्य खर्च	
	१. जीवनावश्यक वस्तू (अन्नधान्य, कपडे इ.)	२०
	२. चैनीच्या वस्तू (मोटर सायकल, मोबाईल, टी. व्ही. डिश इ.)	२०
	३. सामजिक उपक्रम/प्रवास खर्च	१०
	४. व्यासानावरील खर्च	१०
	५. कर्ज व व्याज परतफेड	२०
	६. इतर खर्च (आजारपण इ)	०५
२	उत्पादक खर्च	
	१. घरबांधणी, दुरुस्ती, प्लॉट खरेदी, मशागत इ.	१०
	२. पूरक व्यवसाय	०५
	एकूण	**१००**

शेणगावातील गावांमधील वीटभट्टी उद्योगाची सामाजिक स्थिती

विटभट्टी कामगारांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास केला असता पुढील संवर्गातील लोक विटभट्टी व्यवसायात गुंतलेले दिसून येतात.

संवर्गनिहाय वर्गवारी

अ.न.	संवर्ग	शेकडा प्रमाण
1	ओपन (खुला)	30
2	अनुसूचित जाती	05
3	अनुसूचित जमाती	00
4	भटक्या व विमुक्त जाती जमाती	05
5	इतर मागासवर्ग कुंभार	60
	एकूण	100

शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगा समोरील समस्या

१) वीटभट्टी व्यवसायात अकुशल कामगार वर्ग आहे. ते पारंपारिक पध्दतीने उत्पादन करतात. त्यामुळे उत्पादकता कमी आहे.

२) वीटभट्टी उद्योगासाठी अधिक भांडवलाची आवश्यकता असल्याकारणाने भांडवलाची कमतरता यामुळे अनेक विटभट्ट्या बंद होऊन कामगारांची बेकारी निर्माण होत आहे.

३) वीटभट्टी कामगारांना अल्प उत्पन्न- विटभट्टी कामगार ६ ते ८ महिने काम करून त्यांचा हाती फारच थोडे उत्पन्न पडते. तेवढया उत्पन्नात कामगारांच्या वर्षभराच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.

४) अवकाळी पाऊसाचे संकट विटभट्टी व्यवसायात आलीकडे अवकाळी पाऊसाचे संकट मोठया प्रमाणात येऊ लागले आहे.त्यामुळे विटभट्टी मालकांचे खूप मोठे नुकसान होते. त्यामुळ मालकवर्गांचा तोटा वाढतो.

५) शिक्षणाचे अल्प प्रमाण- विटभट्टी व्यवसायातील कामगारांच्या शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे कामगारांच्या रहाणीमानाचा दर्जा अतिशय निकृष्ट प्रतिचा आहे.

६) व्यसनाधिनतेचे प्रमाण जास्त जवळ जवळ सर्वच विटभट्टी कामगार व्यसने करतात. स्त्री आणि पुरूष दोघेही व्यसने करतात. व्यसनाधिनता ही कामगारांची मोठी समस्या आहे.

७) शिक्षण, आरोग्याकडे दूर्लक्ष, विटभट्टी कामगारात निरक्षरता आणि अल्पशिक्षितपणा असे दोष दिसून येतात. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे ते लक्ष देत नाहीत. तसेच या कामगारात आरोग्याचे प्रश्न मोठे गंभीर आहेत.

थोडक्यात वीटभट्टी व्यवसायास आजच्या जागतिकीकरणाच्या काळात विशेष महत्वाचे स्थान आहे. परंतू आजही परंपरागत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा उद्योग चालला आहे. असंख्य समस्या या उद्योग व्यवसायाच्या आहेत.

शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगा समोरील समस्येवर उपाय

1) वीटभट्टी व्यवसायातील अकुशल कामगार वर्गाला चांगले दर्जाचे प्रशिक्षण देणे.

२) वीटभट्टी उद्योगासाठी अधिक भांडवलाची आवश्यकता असल्याने शासनाने कमी व्याजदरावर कर्जपुरवठा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

३) वीटभट्टी कामगारांच्या पगारामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

४) अवकाळी पाऊसाचे संकट वीटभट्टी व्यवसायात आलीकडे अवकाळी पाऊसाचे संकट मोठया प्रमाणात येऊ लागले आहे.त्यामुळे विटभट्टी मालकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासकीय पातळीवर उपाय योजना करणे गरजेचे आहे.

५) वीटभट्टी कामगारांना तसेच त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे तर त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल.

६) व्यसनाधिनता ही कामगारांची मोठी समस्या आहे. त्याबाबत जनजागृती करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

७) वीटभट्टी कामगारांच्या मध्ये आरोग्य विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष

1. शेणगाव गावामध्ये केला जाणारा वीट उद्योग हा पारंपारिक पद्धतीने केला जातो.
२. शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगासाठी लागणारा कच्चामाल हा स्थानिक क्षेत्रातून उपलब्ध केला जातो.
3. शेणगाव गावामध्ये केला जाणारा वीटभट्टी उद्योग हा हंगामी स्वरूपाचा आहे.
4. शेणगाव गावांमधील वीटभट्टी उद्योगांमध्ये गुंतलेल्या मजुरांच्या मध्ये शैक्षणिक मागासले पण आढळते.
5. शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगासाठी लागणारा मजूर पुरवठा स्थानिक तसेच कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यातून होतो.
6. शेणगाव गावातील वीटभट्टी उद्योगात गुंतलेले बहुतांशी लोक हे कुंभार समाजातील आहेत.
7. भुदरगड तालुक्यातील शेणगाव हे गाव वीट उत्पादनामध्ये अग्रेससर असणार गाव आहे .
8. शेणगाव गावातून उत्पादित केलेली वीट ही भुदरगड, कागल, आजरा, चंदगड, करवीर, राधानगरी अशा वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये वितरित केली जाते

महाराष्ट्रातील मुख्य आदिवासी जमातींचा तुलनात्मक अभ्यास

प्रा डॉ नितीन तुकाराम जाधव
सहा.प्राध्यापक (इतिहास विभाग)
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी .
ntjadhav881@gmail.com

सारांश :-

महाराष्ट्रातील मुख्य आदिवासी जमातींमध्ये भिल्ल, वारली, कोळी महादेव, गोंड, आणि ठाकुर यांचा समावेश आहे. प्रत्येक जमात विशेष सांस्कृतिक परंपरा, आर्थिक स्थिती, आणि सामाजिक रचना राखून आहे. भिल्ल समाज नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात मुख्यतः शेतीवर अवलंबून असून त्यांच्यात पारंपरिक नृत्याची परंपरा आहे. वारली समाज त्याच्या वारली चित्रकलासाठी प्रसिद्ध असून ठाणे व पालघर जिल्ह्यात वसलेला आहे. कोळी महादेव समाज सातारा आणि पुणे जिल्ह्यात राहतो व त्यांच्यात कोळी गीतं आणि नृत्य महत्त्वाची आहेत. गोंड समाज विदर्भात राहून जंगलांवर अवलंबून आहे आणि ठाकुर समाज रायगड, ठाणे आणि पालघर भागात वसला आहे. शिक्षणाची आवड असूनही आर्थिक मर्यादांमुळे या जमातींचा शिक्षण स्तर कमी आहे. सरकारी योजना या समाजांसाठी उपलब्ध असल्या तरी त्यांचा विकास अद्याप अपूर्ण आहे.

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा राज्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक घटकाचा महत्त्वाचा भाग आहे. विविध आदिवासी जमाती राज्याच्या वेगवेगळ्या भौगोलिक भागात वसलेली असून त्यांची स्वतःची सांस्कृतिक, सामाजिक, आणि आर्थिक वैशिष्ट्ये आहेत. मुख्यतः भिल्ल, कोळी, वारली, ठाकुर, गोंड, महादेव कोळी या जमाती प्रमुख आहेत. या संशोधनाचा उद्देश या जमातींच्या जीवनशैली, आर्थिक स्थिती, सामाजिक रचना, आणि सांस्कृतिक परंपरांचा तुलनात्मक अभ्यास करणे आहे.

संशोधन पद्धती

डेटा संकलन: महाराष्ट्रातील आदिवासी विकास खात्याच्या अहवालांचा संदर्भ, तसेच क्षेत्रीय अभ्यास आणि पारंपरिक मुलाखतींचा वापर.

अभ्यास पद्धती: विविध आदिवासी जमातींच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक पैलूंचा तुलनात्मक विश्लेषण.

1. **भिल्ल जमात**
   - स्थान: भिल्ल आदिवासी मुख्यतः नंदुरबार, धुळे, नाशिक या जिल्ह्यांत आढळतात.
   - सांस्कृतिक वैशिष्ट्ये: भिल्ल समाजात पारंपरिक नृत्य, संगीत, आणि विशेषत: 'भिल्ल वाघ' नृत्य प्रसिद्ध आहे.
   - आर्थिक स्थिति: बहुतांश भिल्ल समाज शेतीवर अवलंबून आहे. येथे दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे.
   - शिक्षण स्तर: शिक्षणाचा अभाव असून, मुलांची शाळा सोडण्याचे प्रमाण अधिक आहे.
2. **वारली जमात**
   - स्थान: ठाणे, पालघर, नाशिक या जिल्ह्यांमध्ये मुख्यतः वारली समाज आढळतो.
   - सांस्कृतिक वैशिष्ट्ये: वारली चित्रकला ही जगभर प्रसिद्ध आहे. वारली नृत्य हे त्यांचे पारंपरिक नृत्य आहे.
   - आर्थिक स्थिति: बहुतेक वारली लोक शेती व हस्तकलेवर अवलंबून आहेत. त्यांचे अर्थार्जन फार मर्यादित आहे.
   - शिक्षण स्तर: शिक्षणाचे प्रमाण वाढत असून, विशेषतः कलात्मक शिक्षणाची आवड आहे.
3. **कोळी महादेव जमात**
   - स्थान: सातारा, पुणे, आणि नगर जिल्ह्यांत मुख्यतः कोळी महादेव समाज आढळतो.

- सांस्कृतिक वैशिष्ट्ये: पारंपरिक सण, कोळी गीत आणि नृत्य विशेष प्रसिद्ध आहे.
- आर्थिक स्थिति: हा समाज साधारणपणे खेड्यांत राहतो आणि छोट्या शेतीवर अवलंबून असतो.
- शिक्षण स्तर: शिक्षणाचे प्रमाण कमी आहे, परंतु अलिकडे सरकारी योजना उपलब्ध झाल्याने शिक्षणाची आवड वाढते आहे.

4. गोंड जमात

- स्थान: विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यांत गोंड समाज आढळतो.
- सांस्कृतिक वैशिष्ट्ये: गोंड समाजाची स्वतंत्र धार्मिक परंपरा आहे, 'गोंडी' नृत्य व संगीत प्रसिद्ध आहे.
- आर्थिक स्थिति: गोंड समाज जंगलावर अवलंबून आहे, तसेच बऱ्याचशा वनउत्पादक वस्तूवर त्यांचे आर्थिक जीवन आधारलेले आहे.
- शिक्षण स्तर: शिक्षणाची आवड असली तरी आर्थिक स्थितीमुळे शिक्षणात बरीच अडचण येते.

5. ठाकुर जमात

- स्थान: रायगड, पालघर, ठाणे जिल्ह्यांत ठाकुर जमात वसलेली आहे.
- सांस्कृतिक वैशिष्ट्ये: ठाकुर समाजाचे विविध धार्मिक विधी व परंपरा आहेत. त्यांच्या कलेमध्ये पारंपरिक शिल्पकला आणि नृत्य विशेष आहे.
- आर्थिक स्थिति: शेती व मोलमजुरीवर अवलंबून आहे. अर्थार्जनाचे साधन मर्यादित आहे.
- शिक्षण स्तर: शिक्षणाचे प्रमाण कमी आहे; प्राथमिक शिक्षणापर्यंतच बहुतेक मुलांचे शिक्षण थांबते.

तुलनात्मक विश्लेषण

आदिवासी जमाती	स्थान	सांस्कृतिक वैशिष्ट्ये	आर्थिक स्थिती	शिक्षण स्तर
भिल्ल	नंदुरबार , धुळे , नाशिक	भिल्ल वाघ नृत्य	शेती , वानौत्पादन	कमी
वारली	ठाणे , पालघर , नाशिक	वारली चित्रकला, वारली नृत्य	शेती, हस्त कला	सुधारत आहे
कोळी	सातारा , पुणे, नगर , जळगाव	कोळीगीत व नृत्य	छोटी शेती	वाढत आहे
गोंड	चंद्रपूर , गडचिरोली	गौंडी नृत्य व धार्मिक परंपरा	जंगलावर अवलंबून	शिक्षणात अडचणी
ठाकूर	रायगड,ठाणे , पालघर	शिल्पकला व नृत्य	शेती , मोलमजुरी	कमी

निष्कर्ष

महाराष्ट्रातील विविध आदिवासी समाजांचा सांस्कृतिक, सामाजिक, आणि आर्थिक जीवन वेगळे आहे, परंतु त्यांच्यात अनेक सामायिक गुण आढळतात. शिक्षण, अर्थार्जन आणि सामाजिक सुधारणांमध्ये अद्याप बऱ्याच बाबी उन्नतीच्या प्रतीक्षेत आहेत. सरकारी योजना व धोरणांमुळे त्यांच्या जीवनात काही बदल घडत आहेत, परंतु या सुधारणा अद्याप अपूर्ण आहेत.

संदर्भ :

1. महाराष्ट्र आदिवासी विकास खाते, शासकीय अहवाल - महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींवरील सरकारी माहिती, सामाजिक आणि आर्थिक स्थितीवरील विश्लेषण [महाराष्ट्र सरकारच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध].
2. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे सांस्कृतिक वैशिष्ट्ये - 'महाराष्ट्रातील आदिवासी: समाज, संस्कृती आणि आर्थिक स्थिति', लेखक: डॉ. रमेश पाटील, 2015, पब्लिकेशन: ज्ञान प्रकाशन.
3. अखिल भारतीय आदिवासी संशोधन आणि विकास संस्था, पुणे - महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे जीवन, प्रथा, आणि आर्थिक जीवन यावर आधारित संशोधन अहवाल.
4. 'वारली आर्ट ऑफ महाराष्ट्र' - लेखक: ज्योती प्रधान, 2017. या पुस्तकात वारली समाजाचे सांस्कृतिक आणि कलात्मक जीवन याचे सविस्तर वर्णन.
5. राष्ट्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी संस्था (NSO) अहवाल, 2020 - महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या शिक्षण, आर्थिक स्थितीवर आधारित सर्वेक्षण.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य - एक अनिवार्यता

प्रा.डॉ. सुप्रिया अमर शिंदे
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.
ता. भुदरगड, जि.कोल्हापूर.
ईमेल आयडी - supriyashinde711@gmail.com

सारांश -

मानवी जीवनामध्ये समाजशीलता खूप महत्त्वाची आणि प्रमुख भूमिका बजावत असते. मानव हा एक समाजशील प्राणी आहे. मागील अनेक वर्षापासून मानवाच्या प्रगती आणि विकास यामध्ये समाजशीलतेने खूप महत्त्वाची आणि प्रमुख भूमिका बजावलेली आहे. समाजशीलता ही परस्पर सहकार्यावरती अवलंबून असते. सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. समाजामध्ये कार्य करत असताना परस्पर सहकार्याशिवाय कोणतेही कार्य करणे शक्य होत नाही. जागतिक स्तरावर कार्य करत असताना तसेच व्यावसायिक स्तरावर कार्य करत असताना किंवा व्यक्तीगत कार्य करत असताना परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे समजले जाते. समाजाचा आणि कुटुंबाचा एक प्रमुख घटक म्हणून मानवाने सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य करणे खूप गरजेचे आहे. सध्याच्या काळात कोरोना सारख्या संकटानंतर मानव जातीमध्ये परस्पर सहकार्याची भावना वाढीस लागलेली आहे. त्या अनुषंगाने या लेखांमध्ये आपण परस्पर सहकार्य आणि त्याची समाजामधील असणारी अनिवार्यता या संबंधात सविस्तर विवेचन करणार आहोत. माहिती तंत्रज्ञानामध्ये झालेला बदल आत्मसात करून त्याचा वापर परस्पर सहकार्य करण्यासाठी करणे गरजेचे आहे. सामाजिक परस्पर सहकार्य हा तमाम मानव जातीचा आधार असल्याने त्यामध्ये वाढ होणे हे मानव जातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. परस्पर सहकार्य हा मानवाचा स्थायीभाव आहे त्यामुळे आज परस्पर सहकार्य वाढले तर मानवा मानवा मधील प्रेम, स्नेह आणि सहानुभूती वाढत जाईल साहजिकच सामाजिक समतोल निर्माण होईल.

प्रस्तावना -

सामाजिक कार्य करत असताना यामध्ये परस्पर सहकार्य हा शब्द सार्वजनिक आणि सामाजिक जीवनामध्ये अनेक वेळा वापरला जातो. संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी म्हंटलेलेच आहे एकमेका सहाय्य करू! अवघे धरू सुपंथ! या अभंगातून त्यांनी तमाम मानव जातीस परस्पर सहकार्य करणे अत्यंत आवश्यक आहे याबाबतचा संदेश त्यांच्या अभंगातून जनतेला दिलेला आहे. प्रत्येक मानव हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे आणि त्या व्यक्तीने आपण समाजाचे काही देणे आहोत या या अर्थाने परस्पर सहकार्याची भूमिका घेऊन एकमेकांना मदत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आणि व्यावसायिक पातळीवर परस्पर सहकार्य वाढत असताना सामाजिक पातळीवर सुद्धा परस्पर सहकार्य वाढणे आवश्यक आहे. आपण समाजाचा एक घटक आहोत आणि समाजाला आपण काही देणे आहोत या भूमिकेतून सामाजिक कार्य करत असताना प्रत्येकाने परस्पर सहकार्याची भूमिका ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परस्पर सहकार्य म्हणजे फक्त देणे आणि घेणे एवढे मर्यादित नसून त्यामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे. मानवाचा सामाजिक क्षेत्रामध्ये विकास फक्त परस्पर सहकार्यावरतीच अवलंबून असतो. मानव जातीला प्रगतीकडे न्यायचे असेल तर परस्पर सहकार्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागामध्ये चालणारे सामाजिक जीवन हे बरेचअंशी परस्पर सहकार्यावरती अवलंबून असते. माहिती तंत्रज्ञानामध्ये झालेला बदल आत्मसात करून त्याचा वापर परस्पर सहकार्य करण्यासाठी करणे गरजेचे आहे. सामाजिक परस्पर सहकार्य हा तमाम मानव जातीचा आधार असल्याने त्यामध्ये वाढ होणे हे मानव जातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कोरोना सारख्या महामारीनंतर समाजामध्ये परस्पर सहकार्याची भावना वाढल्याचे दिसून येत आहे. जागतिक तंत्रज्ञानामध्ये प्रचंड प्रमाणात बदल होत आहेत आणि त्याचा सहाजिकच जागतिक विकास आणि प्रगती वरती परिणाम होत आहे.

समाजकार्याची व्याख्या –

1) फ्रिडलॅटर यांनी पुढील शब्दात समाजकार्याची व्याख्या केली आहे. "समाजकार्य ही एक व्यावसायिक सेवा आहे हा व्यवसाय शास्त्रीय ज्ञानावर व मानवी संबंधाच्या कौशल्यावर आधारित आहे एखाद्या व्यक्तीला गटाला अशी मदत केली जाते जेणेकरून त्यांच्यात वैयक्तिक व सामाजिक समाधान निर्माण होऊन स्वलंबाची प्रक्रिया सुरू होईल. समाजकार्य एखाद्या संस्थेमार्फत किंवा संघटनेमार्फत केले जाते."
2) स्ट्राईप यांच्या मते, "समाजकार्य हे जसे शास्त्र आहे तसेच ही एक कला आहे त्यांच्या मते व्यक्ती, गट किंवा समुदायाच्या गरजांच्या पुर्तीसाठी सर्व प्रकारच्या साधनांचा एकत्रित वापर करून लोकांना स्वतःचे प्रश्न स्वतः सोडवण्या सक्षम करणे म्हणजे समाजकार्य होय."
3) सामाजिक कार्य करणाऱ्या भारतीय परिषदेने 1957 मध्ये समाजकार्याची व्याख्या अशी केली आहे की, "समाजकार्य ही एक कल्याणकारी कृती आहे समाजकार्य हे मानवतावाद, शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक कौशल्य यावर आधारित आहे. व्यक्ती समुह किंवा समुदायाचे आयुष्य अधिक परिपूर्ण करण्याच्या प्रयत्न त्यात आहे."
4) डॉ. विटमर - "व्यक्तीच्या संदर्भात ज्या गंभीर अडचणी किंवा समस्या उद्भवतात अशा समस्याचे निर्मूलन करून संबंधित सेना मदत करणे म्हणजे समाजकार्य होय."

समाजकार्याची मूलतत्त्वे संयुक्त राष्ट्रसंघाच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणात काही मूलतत्त्वे व नैतिक नियम मान्य करण्यात आले आहेत त्यावर समाजकार्य प्रत्यक्ष व्यवहारात कार्यरत आहे ही. मूल्यतत्वे खालील प्रमाणे आहेत.

1) व्यक्तीचा धर्म, दर्जा,जात, व राजकीय विचार आणि स्वभाव यावर अधिक भर देण्याऐवजी एक मानव म्हणून त्या व्यक्तीकडे पाहणे आणि व्यक्तीचा गौरव, सन्मान, चरित्र व स्वाभिमान वृद्धिंगत करणे.
2) व्यक्ती, समूह आणि समुदाय यांच्यामध्ये असलेल्या मित्रत्वाकडे आदराने पाहणे आणि त्यांच्यात समन्वय वाढवून त्यातून सामुदायिक कल्याण साधने.
3) व्यक्तीमध्ये स्वावलंबनाची भावना वाढवण्यासाठी शक्ती व प्रोत्साहन देणे ज्यामुळे व्यक्तींचा आत्मविश्वास वाढेल आणि व्यक्ती आपल्या जबाबदाऱ्या पार पाडू शकतील.
4) व्यक्ती, समूह आणि समुदाय यांना आपत्ती काळात, संकट काळात अशी मदत करणे ज्यामुळे त्यांचे जीवन सुसह्य होईल.
5) समाजकार्याचे ज्ञान व तत्त्वज्ञानावर आधारित नीती नियमांची प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची व्यावसायिक जबाबदारी स्वीकारणे ज्यामुळे व्यक्तींना आपल्या अपेक्षा व गरजांची पूर्तता करण्यासाठी चांगले वातावरण आणि कालावधी प्राप्त होईल आणि त्यांना आपल्या क्षमतेचा पूर्ण वापर करता येईल व ते समाधानी राहतील.
6) व्यावसायिक संबंधातील गुप्तता सांभाळणे.

परस्पर सहकार्याचे महत्त्व -

1) **संघटित समाजाची निर्मिती** - परस्पर सहकार्याची भावना समाजामध्ये वाढल्यामुळे सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करताना परस्पर सहकार्य वाढून संघटित समाजाची निर्मिती होते. परस्पर सहकार यामध्ये व्यक्तिगत हितापेक्षा व्यक्ति समूहाच्या हिताला प्राधान्य दिले जाते त्यामुळे धर्म, जात,पंत, लिंग, वर्ण इत्यादी भेद कमी होऊन सर्वांना समान मानले जाते. परिणामी समाजामध्ये संघटित समाजाची निर्मिती होण्यास मदत होते. कोरोना सारख्या महामारी नंतर परस्पर सहकार्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे. संघटित समाजाची निर्मिती करण्यासाठी परस्पर सहकार्य वाढणे अत्यंत गरजेचे आहे. परस्पर सहकारी वाढल्यामुळे समाजामध्ये संघटित समाजाची निर्मिती होऊन व्यक्तिगत विकास होण्यास मदत होईल.

2) **सामाजिक संबंध विकसित** -सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करत असताना परस्पर सहकार्याची भावना वाढल्यामुळे समाजामध्ये सामाजिक संबंध प्रस्थापित होतात आणि त्यामुळे समाजाला दिशा मिळते. एकमेकांना परस्पर सहकार्य केल्यामुळे समाजामध्ये चांगल्या प्रकारचे सामाजिक संबंध विकसित होऊन सामाजिक विकास होण्यास मदत मिळते. समाजामध्ये चांगल्या प्रकारचे सामाजिक संबंध विकसित होण्यासाठी परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

3) **समाज व्यवस्था टिकून राहते** - समाज व्यवस्था टिकून राहण्यासाठी समाजामध्ये परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ या अभंगानुसार समाजामध्ये परस्पर सहकार्य केल्यामुळे समाजव्यवस्था टिकून

राहण्यासाठी मदत होते, प्रत्येक समाजामध्ये एक प्रकारचे परस्पर सहकार्य असल्यामुळे भारतामध्ये सामाजिक व्यवस्था टिकून राहिली आहे आणि परस्पर सहकार्या मध्ये वाढ झाल्यामुळे ही समाज व्यवस्था चांगली राहण्यास मदत होऊ शकते.

4) **स्वसामर्थ्याची जाणीव** - सामाजिक क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्य वाढल्यामुळे व्यक्तिगत स्वसामर्थ्याची जाणीव होण्यास समाजास मदत होते. परस्पर सहकार्यामुळे आत्मविश्वास वाढवून संघटन आणि व्यवस्थापन कौशल्य इत्यादी व्यक्तिगत गुणांचा विकास होतो. सामाजिक क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्य वाढल्यामुळे लोकांच्या मध्ये स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होऊन आदर्श समाज घडण्यास मदत होते.

5) **लोकशाहीचा विकास** - सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य वाढल्यामुळे लोकशाहीचा विकास होतो. एकमेकांना परस्पर सहकार्य केल्यामुळे व्यक्तिगत आणि सामाजिक विकास होऊन लोकशाहीचा विकास होण्यास मदत होते.

6) **आर्थिक आणि सामाजिक विकास** - एकमेकांना परस्पर सहकार्य केल्यामुळे समाजाचा विकास होतो आणि व्यक्तिगत आर्थिक होऊन समाजाचा विकास होण्यास मदत होते. सहकारी तत्त्वांना अनुसरून परस्पर सहकार्य केल्यामुळे समाजाचे आर्थिक हितसंबंध वृद्धिंगत होण्यास मदत होते. समाजामध्ये वावरताना एकमेकांना परस्पर सहकार्य केल्यामुळे समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकास होत असतो त्यामुळे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे समाजाच्या आणि देशाच्या दृष्टीने आर्थिक आणि सामाजिक विकास होण्यासाठी परस्पर सहकार्य उपयुक्त ठरते.

7) **समता** - सामाजिक कार्यामध्ये परस्पर सहकार्य वाढल्यामुळे व्यक्ती संघटित होऊन एकमेकांना सहकार्य करीत असतात, त्यामुळे सर्वांना समानतेची वागणूक मिळते आणि त्यांच्यात कोणत्याही कारणामुळे भेद केला जात नाही. सर्वांना समान संधी उपलब्ध होतात आणि समाजामध्ये समता निर्माण होते.

8) **मूलभूत सुविधांचा विकास** - परस्पर सहकार्य वाढल्यामुळे समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्था निर्माण होऊ शकतात आणि त्यांच्या मधून लोकांना मूलभूत सुविधा मिळू शकतात. परस्पर सहकार्य वाढल्यामुळे समाजामध्ये सहकार क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्था तयार झाल्या आहेत, त्यामधून लोकांचा मूलभूत आणि सामाजिक विकास होत आहे.

9) **औद्योगिक क्षेत्राचा विकास** - देशाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान आहे औद्योगिक क्षेत्राच्या विकासामध्ये सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी तेल गिरण्या, सहकारी खत कारखाने, सहकारी फळ व भाजी प्रक्रिया संस्था, सहकारी दूध संस्था इत्यादींचा विकास सहकाराच्या माध्यमातून झालेला आहे. तसेच ग्रामीण भागातील लघु आणि कुटीर उद्योगांच्या विकासामध्ये सहकाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची समजली जाते. सहकारी प्रक्रिया उद्योगातून शिल्लक राहणाऱ्याने टाकाऊ पदार्थवर आधारित कागद कारखाने, प्लायवुड निर्मिती, स्पिरिट उत्पादन, खत कारखाने इत्यादी. उपउत्पादने सहकार क्षेत्रात घेतली जातात आणि यामधून ग्रामीण भागाचा विकास साध्य केला जातो अशा पद्धतीने सहकारामध्ये परस्पर सहकार्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विकास होतो.

10) **व्यापार क्षेत्राचा विकास** -जागतिकीकरणानंतर सहकारी संस्था आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी झाल्या शेतमाल, दुग्ध पदार्थ, प्रक्रिया केलेला माल, फळे,भाजीपाला, साखर इत्यादी माल सहकारी संस्थामार्फत निर्माण केला जातो आणि त्याद्वारे देशाला विदेशी चलन मिळत आहे त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाची गती मोठ्या प्रमाणात वाढत आहे अशा प्रकारे सहकारी संस्थांच्या माध्यमातून परस्पर सहकार्यामुळे व्यापार क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि त्याच्या सहकार्य देशाचा आर्थिक विकास होऊन देश समृद्ध बनत आहे.

11) **रोजगार निर्मिती** -सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. प्रामुख्याने शेती आणि औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली असल्याने तेथे रोजगाराची निर्मिती झालेली दिसून येते. सहकारी साखर कारखान्यामुळे भूमीहीन व गरीब शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे तसेच सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, प्रक्रिया संस्था यामधून अनेक लोकांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच सहकारी संस्थांमुळे स्वयंरोजगार ही मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लघुउद्योगांच्या विकासात चालना मिळत आहे त्यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊ देशाचा आर्थिक विकास होत आहे. सहकार क्षेत्र परस्पर सहकार्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करीत आहे.

सहकार्याचे प्रकार -

सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना एकमेकांप्रती परस्पर सहकार्याची भावना आवश्यक असते. समाजामध्ये कोणतेही कार्य पूर्ण करावयाचे असल्यास एकमेकांचे सहकार्य असल्याशिवाय ते काम पूर्ण होऊ शकत नाही.

1) **मार्गदर्शनपर सहकार्य** - जेव्हा अधिकार प्राप्त व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली समान उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी लोकांच्याकडून संघटितरित्या काम केले जाते त्या सहकार्यास मार्गदर्शनपर सहकारी असे म्हणतात. उदाहरणार्थ एखाद्या मोठ्या कंपनीमध्ये मॅनेजर हा मार्गदर्शनपर सहकार्य करीत असतो.

2) **पारंपारिक सहकार्य** - परंपरेनुसार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणारा सहकार्याचा हा प्रकार आहे. उदाहरणार्थ अनेक कुटुंबाकडून सामूहिक शेती एकत्रित येऊन केली जाते हा पारंपारिक सहकार्याचा प्रकार आहे.

3) **प्रत्यक्ष सहकार्य** - ज्यावेळी सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना अनेक लोक एकमेकांच्या संपर्कात येऊन समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कार्य करीत असतात त्यावेळी त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष सहकार्य होत असते उदाहरणात एखादा राजकीय कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी अनेक कार्यकर्ते एकत्रित येऊन प्रत्यक्ष सहकार्य करीत असतात.

4) **अप्रत्यक्ष सहकार्य** - समाजामध्ये व्यक्ती स्वतंत्ररीत्या स्वतःची कार्य पूर्ण करत असतात मात्र त्याचा अप्रत्यक्ष फायदा समाजाला होत असतो त्यामुळे ते एक प्रकारे समाजासाठी अप्रत्यक्ष सहकार्य करीत असतात उदाहरणार्थ पोलीस वकील न्यायाधीश सरकारी कर्मचारी शिक्षक कलाकार हे आपापल्या क्षेत्रामध्ये कार्य करीत असतात मात्र त्यांचा परस्पर अप्रत्यक्ष सहकार्य समाजाला होत असते.

परस्पर सहकार्याची आवश्यकता -

आदर्श समाज घडवण्यासाठी समाजामध्ये परस्पर सहकार्याची भावना निर्माण होऊन सामाजिक समतोल निर्माण होण्यासाठी परस्पर सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. परस्पर सहकार्याची आवश्यकता खालील प्रमाणे आहे.

1) **सामाजिक समतोल** - समाजामध्ये व्यक्तिगत आणि सामाजिक कार्य करीत असताना समाजाचा सामाजिक समतोल राहण्यासाठी परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. परस्पर सहकार्यामुळे सामाजिक समतोल राहण्यास मदत होते. परस्पर सहकार्य वाढल्यामुळे समाजामध्ये सहकार क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्था तयार झाल्या आहेत त्यामधून लोकांचा मूलभूत आणि सामाजिक विकास होत आहे.

2) **आर्थिक विकास** - देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी समाजामध्ये परस्पर सहकार्य आवश्यक आहे. समाजामधील लोकांनी एकमेकांना परस्पर सहकार्य केल्यामुळे त्यांचा व्यक्तिगत विकास होतो आणि तसेच देशाचा सुद्धा आर्थिक विकास होत असतो. समाजाचा सामाजिक समतोल राखण्यासाठी समाजामध्ये परस्पर सहकार्य वाढले वाढले गरजेचे आहे. सहकाराच्या माध्यमातून समाजामध्ये सामाजिक समतोल निर्माण होत आहे कोणत्याही समाजाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास आणि समाजाचा आर्थिक विकास होण्यास मदत होते आणि परस्पर सहकार्यामुळे ते शक्य आहे. त्यामुळे समाजाचा आर्थिक विकास आणि देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी परस्पर सहकार्य महत्त्वाचे आहे.

3) **व्यक्तिगत विकास** - सामाजिक क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्याची भावना निर्माण झाल्यामुळे व्यक्ती एकमेकांना परस्पर सहकार्य करीत असतात त्यामुळे समाजामधील व्यक्तींचा विकास होण्यास मदत होते. परस्पर सहकार्यामुळे व्यक्तीला त्याच्या स्व सामर्थ्याची जाणीव होते आणि त्याचा व्यक्तिगत विकास होण्यास मदत होते.

4) **रोजगार निर्मितीमध्ये वाढ** - लोकांच्या मध्ये एकमेकांना सहकार्य करण्याची भावना निर्माण झाल्यामुळे सामाजिक क्षेत्रामध्ये लोकांच्याकडून एकमेकांना काम देण्याची प्रवृत्ती निर्माण होऊन रोजगार निर्मितीमध्ये वाढ होऊ शकते त्यासाठी परस्पर सहकार्य आवश्यक आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून देशात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. प्रामुख्याने शेती आणि औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झाली असल्याने तेथे रोजगाराची निर्मिती झालेली दिसून येते.

5) **दुर्बल घटकांचे शोषण थांबवणे** - परस्पर सहकार्याची भावना समाजामध्ये वाढल्यामुळे समाजातील लोकांच्या मध्ये एकमेकांना परस्पर सहकार्य होऊ शकते आणि त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांचे शोषण थांबवणे शक्य होऊ शकते.

6) **कृषी क्षेत्राच्या विकासासाठी** - आज कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज निर्माण झाली आहे आणि परस्पर सहकार्यामुळे ती गरज भागवणे शक्य होऊ शकते. देशाचा विकास हा कृषी क्षेत्रावरती मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे आणि कृषी क्षेत्रासाठी मनुष्यबळाची खूप गरज निर्माण झाली आहे परस्पर सहकार्यामुळे ही गरज भागवता येऊ शकते आणि त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास होऊन पर्यायाने देशाचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकतो.

7) **औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी** - औद्योगिक क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात बदल निर्माण झाले आहेत हे बदल आत्मसात करून परस्पर सहकार्य केल्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा विकास होऊ शकतो. देशाची प्रगती ही औद्योगिक क्षेत्रावरती अवलंबून असते नवनवीन तंत्रज्ञानामुळे औद्योगिक क्षेत्रात मोठे बदल होत आहेत आणि परस्पर सहकार्यामुळे या नवीन बदलाचा उपयोग औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी होऊ शकतो.

8) **आंतरराष्ट्रीय समतोल** - जगामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. नवनवीन क्रांतिकारी शोधांची निर्मिती होत आहे. अशावेळी जागतिक स्तरावर परस्पर सहकार्याची भावना निर्माण होणे आवश्यक आहे. विकसित देशांनी अविकसित देशांना परस्पर सहकार्य करून त्यांना विकसित मार्गाकडे नेण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

निष्कर्ष -

परस्पर सामाजिक सहकार्य ही एक मूलभूत संकल्पना आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असताना समाजामधील घटकांमध्ये परस्पर सहकार्याची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येक मानव हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे आणि त्या व्यक्तीने आपण समाजाचे काही देणे आहोत या या अर्थाने परस्पर सहकार्याची भूमिका घेऊन एकमेकांना मदत करणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर आणि व्यावसायिक पातळीवर परस्पर सहकार्य वाढत असताना सामाजिक पातळीवर सुद्धा परस्पर सहकार्य वाढणे आवश्यक आहे. आपले जीवन जगत असताना आपण एक समाजाचा जबाबदार घटक आहे म्हणून परस्पर सहकार्य साधने आणि त्यातून स्वतःचा आणि कुटुंबाचा आणि पर्यायाने समाजाचा विकास साधने आवश्यक असते. कोरोना सारख्या महामारीनंतर समाजामध्ये परस्पर सहकार्याची भावना वाढल्याचे दिसून येत आहे. जागतिक तंत्रज्ञानामध्ये प्रचंड प्रमाणात बदल होत आहेत आणि त्याचा सहाजिकच जागतिक विकास आणि प्रगती वरती परिणाम होत आहे, नवीन तंत्रज्ञान हे परस्पर सहकार्य आणि मदत यावर विसरलेले आहे आणि हे परस्पर सहकार्य एवढे पद्धतशीर आहे की त्याच्या कामकाजात एकसूत्रीपणा आणि गती दिसून येते. ऑनलाइन वस्तू खरेदी करणे, ऑनलाइन रेल्वेचे बुकिंग करणे, सर्व प्रकारचे पेमेंट ऑनलाईन करणे या सर्व गोष्टी व्यावसायिक परस्पर सहकार्यावरती अवलंबून आहेत. माहिती तंत्रज्ञानामध्ये झालेला बदल आत्मसात करून त्याचा वापर परस्पर सहकार्य करण्यासाठी करणे गरजेचे आहे. सामाजिक परस्पर सहकार्य हा तमाम मानव जातीचा आधार असल्याने त्यामध्ये वाढ होणे हे मानव जातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. परस्पर सहकार्य हा मानवाचा स्थायीभाव आहे त्यामुळे आज परस्पर सहकार्य वाढले तर मानवा मानवा मधील प्रेम, स्नेह आणि सहानुभूती वाढत जाईल साहजिकच सामाजिक समतोल निर्माण होईल. परस्पर सहकार्य वाढवण्यासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे शिक्षणामुळे माणूस आपल्या जीवनाचे योग्य असे नियोजन करू शकतो. समाजाला योग्य दिशा देणे व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे आणि परस्पर सहकार्य वाढवणे यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे काम करू शकते.

संदर्भ -

1) डॉ. सर्जेराव साळुंखे : " समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना" नरेंद्र प्रकाशन, पुणे 1996
2) Rawat, H. K. : "Sociology", Rawat Publications, Jaipur, 2007.
3) Shankar Rao : "Sociology : Primary Principles", S. Chand and Co. Ltd., New Delhi, 2004.
4) Madver, R. M. and Page C. H. : "Society : An Introductionary Analysis", MacMillan India Limited, Madras, 1986.
5) Harry Johnson M. : "Sociology : A systematic Introduction", Alied Publishers, Bombay, 1970.
6) Vidya Bhushan and Suchdeva : "An Introduction to Sociology", Kitab Mahal, Allahabad, 1998
7) Subhedar I. S. - "Field Work Training in Social Work" Rawat Publications - Jaypur and Delhi (2001)
8) Lawani B. T. - "Social Work Education and Field Instructions". (SRD, Bharati Vidyapeeth, Pune (2002)

PRASHAST ची सर्वसमावेशक शिक्षणातील भूमिका
(शिक्षक शिक्षणातील संशोधनात नवीन विचार प्रवाह)

पीएच.डी.संशोधक :
रमेश बापू कोरे,
शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर
इ-मेल : koreramesh2@gmail.com

संशोधन मार्गदर्शक
डॉ. शैलजा एस. मंडले,
सहयोगी प्राध्यापक,
महावीर महाविद्यालय,कोल्हापूर.

2009 च्या शिक्षणाचा हक्क अधिकार कायद्यान्वये, (RTE Act 2009) विशेष गरजा असलेल्या सर्व मुलांनाही मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. तर 2016 RPWD च्या कायद्यान्वये, सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांची ओळख शक्य तितक्या लवकर करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात समावेशित करून घेण्यासाठी व त्यांचा शैक्षणिक विकास करणेसाठी विविध तरतुदींची शिफारस करणेत आलेली आहे. या कायद्यानुसार सांगितलेल्या 21 दिव्यांगांच्या प्रकारांपैकी बऱ्याचशा प्रकारांशी सामान्य पालक तसेच शिक्षक देखील अल्प परिचित आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रकारच्या दिव्यांगत्वाची लक्षणे आपल्या मुलांमध्ये किंवा विद्यार्थ्यांमध्ये असली तरी ती लक्षणे ओळखता न आल्याने संबंधित मुलांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर मुलांच्या दिव्यांगत्वाचे निदानच झाले नाही, तर त्याचा परिणाम हा प्रत्यक्षपणे त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणार आहे. दिव्यांगत्वाच्या दृष्टीने PRASHAST हे एक प्रभावी प्राथमिक तपासणी साधन आहे आणि ते एखाद्या मुलाचे दिव्यांगत्व वर्णन करून त्यास प्रमाणीकरणापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. दिव्यांग मुलांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना इतर कोणत्याही मुलांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी समान संधी पुरवणारी यंत्रणा तयार करण्याचे महत्व 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020' मान्य करते. याद्दष्टीनेच शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या मदतीने पडताळा सूचीद्वारे दिव्यांगत्वाची प्राथमिक तपासणी करण्यासाठी 'प्रशस्त' हे एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

बीज शब्द - शीघ्र हस्तक्षेपण, प्रशस्त पडताळा सूची, दिव्यांगत्वाचे प्रकार, सर्वसमावेशित शिक्षण, RTE 2009, RPWD Act 2016.

प्रस्तावना :

वर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी खालवण्यासाठी नेहमीच अभ्यासातील निष्काळजीपणा किंवा शिकवणे-शिकणे यांकडे होणारे दुर्लक्ष हीच कारणे असत नाहीत; तर शैक्षणिक, शारीरिक व मानसिक स्वरूपाची सहजासहजी लक्षात न येणारी दिव्यांगत्वाची पार्श्वभूमीही त्यास कारणीभूत ठरू शकते. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली गेली नाही, तर केवळ परिस्थितीजन्य कारणे लक्षात घेऊन शैक्षणिक मागासलेपणासाठी मुलांना बोल लावला जातो. अशा परिस्थितीत मुलांच्या या विशिष्ट दिव्यांगत्वाच्या लक्षणांची कारणमीमांसा करण्यासाठी शिक्षकांना व पालकांना मदत करणारी 'प्रशस्त' पडताळा सूची विकसित करणेत आलेली आहे.

2009 च्या शिक्षणाचा हक्क अधिकार कायद्यान्वये, (RTE Act 2009) विशेष गरजा असलेल्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे. RPWD 2016 च्या कायद्यान्वये, सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांची ओळख शक्य तितक्या लवकर करून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात समावेशित करून घेण्यासाठी व त्यांचा शैक्षणिक विकास करणेसाठी विविध तरतुदींची शिफारस करणेत आलेली आहे. या कायद्यानुसार सांगितलेल्या 21 दिव्यांगांच्या प्रकारांपैकी बऱ्याचशा प्रकारांशी सामान्य पालक तसेच शिक्षक देखील अल्प परिचित आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रकारच्या दिव्यांगत्वाची लक्षणे आपल्या मुलांमध्ये किंवा विद्यार्थ्यांमध्ये असली तरी ती लक्षणे ओळखता न आल्याने संबंधित मुलांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर मुलांच्या दिव्यांगत्वाचे निदानच झाले नाही, तर त्याचा परिणाम हा प्रत्यक्षपणे त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणार आहे. भारतात 2011 च्या जनगणनेनुसार, एकूण लोकसंख्येमध्ये दिव्यांगांचे प्रमाण 2.11% इतके आहे. UDISE 2016-17 नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रमाण प्राथमिक स्तरावर 1.1 % वरून गळून उच्च माध्यमिक स्तरावर 0.25 % इतके जास्त गंभीर

आहे. त्यामुळे शाळा स्तरावर विद्यार्थ्यांच्या दिव्यांगत्वाची ओळख करून घेऊन त्यांचे योग्य दिव्यांगत्व निदान करणारेसाठी 'प्रशस्त' पडताळा सूची हे सहाय्यकारी आहे.

शीघ्र हस्तक्षेपणात शिक्षकांची भूमिका

सर्वसमावेशक शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये शिक्षकांची भूमिका ही महत्वपूर्ण आहे. कुटुंबातील सदस्यांनंतर शिक्षक हाच विद्यार्थ्यांचा सर्वात जवळचा सोबती आहे. कुटुंबातील सदस्यानंतर शिक्षकच विद्यार्थ्यांचे भावविश्व जाणतो. विद्यार्थ्यांचे वर्गातील, वर्गाबाहेरील, क्रीडांगणावरील व इतर उपक्रमातील वर्तनाचे बारकाईने निरीक्षण हे शिक्षकांकडूनच केले जाते. जेव्हा मुले शिक्षण, भावनिक किंवा वर्तणुकीशी संबंधित समस्या दर्शवतात, तेव्हा शिक्षक या कारणांशी परिचित असतात. मुलांच्या विकास आणि शिकण्यात अडचणी निर्माण करणारे घटक, तसेच वर्तमान वर्तनास कारणीभूत असलेले प्रत्येक संभाव्य कारण समजून घेण्यासाठी शिक्षकाने विविध स्त्रोतांकडून, प्रसंगांमधून माहिती गोळा करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या पद्धतशीर प्राथमिक तपासणीसाठी व संभाव्य संशयित दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त करणेसाठी शाळा स्तरावर शिक्षकांसाठी प्रशस्त हे सुलभक व दिशादर्शक आहे.

प्रशस्त (PRASHAST-A Disability Screening Checklist for Schools) :

केंद्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (CIET) व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, न्यू दिल्ली (NCERT) यांनी भारतामधील सर्व शाळांसाठी 'प्रशस्त' (असेसमेंट होलिस्टिक स्क्रीनिंग टूल) नावाची दिव्यांगत्व तपासणी पडताळा सूची व ॲप तयार केलेले आहे. यात शिक्षण प्रणालीची सर्वसमावेशकता वाढविण्याच्या दृष्टीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विशिष्ट गरजा आणि आवश्यकता ओळखून त्यांना योग्य त्या सोयी सुविधा मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. प्रशस्तनुसार RPWD Act 2016 द्वारे, उल्लेखित केलेल्या २१ दिव्यांगत्वाच्या प्रकारांची तपासणी आणि तात्पुरते वर्गीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. प्रशस्त हे इंग्रजी भाषेसह भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूची मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २२ भारतीय भाषांमध्ये विकसित करण्यात आलेले आहे. ज्याचा उद्देश देशाच्या सर्व भागातील शिक्षक, विशेष शिक्षक आणि शाळा प्रमुखांना ते सहजपणे हाताळता यावे हा आहे.

PRASHAST चे मुख्य दोन भाग

प्रशस्त भाग - 1	**हा पहिल्या स्तरावरील तपासणीसाठी नियमित शिक्षकांच्या वापरासाठी आहे. यात RPWD Act 2016 नुसार 21 दिव्यांगत्वाच्या परिस्थितीची तपासणी करणेसाठी वस्तुनिष्ठ प्रकारची पडताळा सूची तयार करणेत आलेली आहे.**
प्रशस्त भाग - 2	हा विशेष शिक्षक, समुपदेशक, शाळा प्रमुखांच्या वापरासाठी तयार केले आहे. पहिल्या स्तरात नोंदविलेल्या पडताळा सूचीतील मुद्द्यांवरून दिव्यांगत्वाची ओळख करणेसाठी व त्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून देणेसाठीची प्रक्रिया सुलभ करणेसाठी हा भाग मदत करणारा आहे.

याचबरोबर आवश्यक तेथे पालक तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांचा दिव्यांगत्व तपासणीसाठीचा सहभागही अनिवार्य आहे. हे सर्व करताना मुलांच्या वर्तन निरीक्षणावरून घेण्यात येणा-या नोंदींची गोपनीयता पाळणे, मात्र अनिवार्य आहे.

'PRASHAST' ची गरज व महत्त्व :

1. सन 2019 मध्ये केलेल्या सर्वेक्षणात 52.9 % राज्यांमध्ये दिव्यांगत्वाची लक्षणे किंवा वैशिष्टे समजावून घेण्यात अडचणी येत असल्याचे लक्षात आले. यातील बहुसंख्य राज्यांनी मानसिक आजार, वाचा आणि भाषण अक्षमता, अध्ययन अक्षमता, पार्किन्सन आजार, हिमोफेलीया आणि थॅलेसेमिया यासारख्या दिव्यांगत्वाच्या परीस्थितींबाबत निदान करताना गोंधळ होत असल्याचा दावा केला आहे. या परिस्थितीत राष्ट्रीय पातळीवर सर्व शाळांसाठी एकसमान दिव्यांगत्व तपासणी पडताळा सूची म्हणून 'प्रशस्त' महत्वपूर्ण भूमिका बजावते.
2. 'प्रशस्त' हे दिव्यांगत्व पडताळणीचे प्रमाणित व सर्वसमावेशक असे साधन असल्याने याच्या वापराने चुकीचे निदान होण्याची शक्यता कमी झालेली आहे. थोडक्यात चुकीच्या व अशास्त्रीय दृष्टीकोणावर आधारीत केल्या जाणा-या निदानापासून संरक्षण देण्याचे काम प्रशस्त करते.

3. दिव्यांग मुलांची लवकर व योग्यरीत्या ओळख होण्यास यामुळे मदत होत असल्याने सर्वसमावेशक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी ते सहाय्यभूत ठरत आहे.
4. दिव्यांगत्व निश्चित करून प्रमाणपत्र प्रदान करताना यातून प्राप्त निष्कर्ष हे पायाभूत माहिती म्हणून उपयोगी ठरत आहेत.
5. दिव्यांगत्वाची पडताळणी करून शाळास्तरीय अहवाल सहजपणे तयार करणेसाठी 'प्रशस्त' महत्वपूर्ण आहे.
6. शाळास्तरीय अहवाल हा सहजपणे व एकत्रितरीत्या प्राप्त होत असल्याने मूल्यांकन शिबीरे आयोजित करणे, एकसमान दिव्यांगत्वाच्या दृष्टीने विशेष शिक्षकांची नियुक्ती करणे, आवश्यक त्या सरकारी सुविधा उपलब्ध करून देणे, इत्यादीबाबत सुलभता निर्माण होण्यास मदत होणार आहे.

' PRASHAST ' चा विकास

शाळा ही दिव्यांगत्वांची माहिती संकलनाचे सर्वात लहान एकक आहे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांच्या पद्धतशीर तपासणीमध्ये नियमित शिक्षकांचा सहभाग वाढविणे हाच प्रशस्तचा मुख्य उद्देश आहे.

प्रशस्तच्या विकासासाठी स्वीकारलेल्या प्रक्रियात्मक पाय-या खाली नमूद केल्या आहेत;

1.स्थिती अभ्यास सर्वेक्षण	जून 2019 मध्ये प्रशास्तच्या विकासाची प्रक्रिया सर्वेक्षणापासून सुरू झाली. 36 पैकी 34 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी यात सहभाग नोंदविला. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी दिव्यांगत्व असलेल्या शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करणेसाठी आणि त्यांची ओळख पटवण्यासाठी करत असलेल्या कार्यपद्धतींचा अभ्यास करणे, हा या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश होता. सर्वेक्षणातून असे दिसून आले की, केवळ 8 राज्यांनी (23.5%) म्हणजे सिक्कीम, तामिळनाडू, केरळ, आसाम, छत्तीसगड, पाँडेचेरी, दिल्ली आणि उत्तर प्रदेश यांनी दिव्यांगांच्या ओळखीसाठी तपासणी सूची विकसित करण्यास सुरुवात केली आहे. परंतु RPWD कायदा 2016 मध्ये सूचीबद्ध केलेल्या सर्व 21 दिव्यांग प्रकारांचा यात समावेश करणेत आलेला नाही.
2. PRASHAST चा मसुदा	जुलै-ऑगस्ट 2019 च्या दरम्यान PRASHAST चा मसुदा तयार करण्यात आला.
3. तपासणी आणि अंतिमीकरण कार्यशाळा	तीन दिवसीय तपासणी आणि अंतिमीकरण कार्यशाळेमध्ये (21 ऑगस्ट ते 23 ऑगस्ट 2019) विकसित केलेला PRASHASTच्या मसुदा आवृत्तीची तज्ञांसोबत देवाण-घेवाण केली गेली. तज्ज्ञ गटात मेडिस्कूल हेल्थ सर्व्हिसेस प्रा. लि., डायरेक्टर बोन मॅरो ट्रान्सप्लांट, बीएलके सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, क्लिनिकल सायकोलॉजिस्ट, समावेशित शिक्षण (IE) राज्य समन्वयक (हरियाणा, सिक्कीम, जम्मू आणि काश्मीर आणि आसाम), विशेष शिक्षक, राष्ट्रीय संस्थांमधील दिव्यांगत्व तज्ञ आणि विषय/नियमित शिक्षक इत्यादींचा यात सहभाग होता.
4. PRASHAST ची प्राथमिक चाचणी	PRASHAST ची तीन राज्यांतील 29 शाळांमध्ये क्षेत्रीय चाचणी घेण्यात आली. सहभागी शाळांमध्ये हुंसूर ब्लॉक, कर्नाटकमधील 11 शाळा (26 ते 27 नोव्हेंबर 2019), चिल्लिका ब्लॉक, ओडिशा मधील 14 शाळा (30 ते 31 जानेवारी 2020) आणि भोईरींगोग ब्लॉक, मेघालयमधील 4 शाळांचा (18 ते 19 फेब्रुवारी 2020) समावेश होता. क्लस्टर रिसोर्स पर्सनचा समावेश असलेल्या क्षेत्रीय चाचणी कार्यगटाकडून गोळा घेण्यात आलेले अभिप्राय, गट संसाधन व्यक्ती,, विशेष शिक्षक, विषय शिक्षक, मुख्याध्यापक, तपासणी कार्यशाळेतील तज्ञ आणि संबंधित प्रादेशिक शिक्षण संस्थांमधील (NCERT) घेण्यात आलेला तज्ञ गट यांनी दिव्यांगत्व अभ्यासाची पार्श्वभूमी माहिती नसेल तरीही PRASHAST पडताळा सूची वापरण्यात कोणतीही अडचण नाही, असे सूचित केले आहे.
5. PRASHAST ची वैधता व विश्वसनियता	देशभरातील तज्ञांसह तीन दिवसीय कार्यशाळेत PRASHAST च्या मुद्दयांना अंतिम रूप देण्यात आले आणि नंतर त्याची चाचणी प्रत्यक्ष क्षेत्रात घेण्यात आली. सामान्य शिक्षक,

	विशेष शिक्षक आणि दिव्यांगत्व तज्ञांकडून मिळालेल्या अभिप्रायानुसार काही घटकांतील निकषांत सुधारणा करणेत आली, तर काही घटक वगळण्यात आले. चंदीगडमधील 100 शाळांमध्ये PRASHAST चे व्यवस्थापन करण्यात आले. PRASHAST भाग-1 च्या वापरामुळे 3482 विद्यार्थ्यांची यादी झाली. PRASHAST भाग-2 चे व्यवस्थापन करण्यात आले आणि त्यानंतर 637 विद्यार्थ्यांना मूल्यांकन आणि प्रमाणीकरण शिबिरासाठी पाठविण्यात आले. मूल्यांकन आणि प्रमाणीकरण शिबिरांमधून प्राप्त निष्कर्षांची PRASHAST मधून प्राप्त संशयित अपंगत्व माहितीची (भाग २ मधून प्राप्त) तुलना केली असता त्यात 95.76% समानता आढळली. PRASHAST मध्ये 21 दिव्यांग प्रकारांशी संबंधित 63 घटकांचा (प्रश्नावली) समावेश करणेत आलेला आहे. क्रोनबेंच अल्फा वापरून PRASHAST ची अंतर्गत सुसंगतता 0.801 आहे. जसे की, a = 0.801 स्वीकार्य श्रेणीमध्ये येते. यावरून PRASHAST ची आंतरिक वैधता चांगली आहे.
6. भाषा संपादन	PRASHAST चाचणीचे भाषा संपादन हे प्रकाशन विभाग (PD), NCERT च्या प्रशिक्षित आणि नामनिर्देशित केलेल्या भाषा संपादकांनी केले आहे.
7. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांद्वारे बाह्य तपासणी	नोव्हेंबर 2021 मध्ये, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ञांना PRASHAST ची तपासणी करण्यासाठी विनंती करणेत आली. UNICEF India, University of Northampton, UK; University of Pennsylvania, USA; Monash University, Australia; and NIEPA, India येथील तज्ञांनी PRASHAST च्या उपयोगाबद्दल सकारात्मक निरीक्षणे नोंदविली.

PRASHAST वापरताना लक्षात ठेवण्याचे मुद्दे :

- मुलाने घरी वापरलेली भाषा ही शाळेत वापरल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या माध्यमापेक्षा वेगळी असल्यास, तिचा पडताळणीवेळी विचार केला पाहिजे.
- PRASHAST पडताळा सूची ही फक्त दिव्यांगत्व तपासणीसाठी संदर्भ म्हणून आहे. हे साधन दिव्यांगत्वाचे लेबल (ठपका) लावणे अथवा तज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याशिवाय कोणतेही निदान करण्यास मज्जाव करते.
- PRASHAST भाग-1 वापरण्यापूर्वी, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या संदर्भात किमान 2 आठवडे किंवा त्याहून अधिक काळ निरीक्षण केले पाहिजे.
- तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांशी संबंधित माहिती गोपनीय ठेवायची आहे आणि ती केवळ संबंधित विद्यार्थ्यांचे पालक आणि अधिकृत कर्मचा-यांमध्येच सामायिक करता येईल.

निष्कर्ष :

PRASHAST हे केवळ तपासणी साधन नाही, तर सर्व विद्यार्थ्यांच्या विशिष्ठ वर्तनाची ओळख करून देणारे आहे. प्रत्येक शाळेने या सर्वसमावेशक साधनाचा वापर करून सर्व विद्यार्थ्यांची प्राथमिक तपासणी केली पाहिजे. ही तपासणी करताना दिव्यांगत्वाचे निदान किंवा निश्चितीकरण करण्यासाठी हे साधन नाही, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. याचा वापर 'संशयित दिव्यांगत्व डेटा' प्राप्त करणे व तदनुषंगाने दिव्यांग प्रमाणीकरणासाठी विद्यार्थ्यांना संदर्भित करणे, यासाठीच करावयाचा आहे. प्रस्तुत पडताळा सूची वापरताना शिक्षक आणि विशेष शिक्षकांनी सावधगिरी बाळगली पाहिजे. विशेष शिक्षक, संसाधन शिक्षक आणि समुपदेशक यांचेवर शाळा प्रशासकांकडून भाग-1 मिळवणे, त्यातील निकालांची पुष्टी करण्यासाठी PRASHAST भाग-2 वापरणे आणि शिक्षक व पालकांना सल्ला आणि समुपदेशन देण्याची महत्वपूर्ण जबाबदारी आहे. दिव्यांगत्वाच्या दृष्टीने PRASHAST हे एक प्रभावी प्राथमिक तपासणी साधन आहे आणि ते एखाद्या मुलाचे दिव्यांगत्व वर्णन करून त्यास प्रमाणीकरणापर्यंत पोहोचवण्याचा एक सोपा व प्रभावी मार्ग आहे. दिव्यांग मुलांच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी समान संधी पुरवणारी यंत्रणा तयार करण्याचे महत्व 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020'

मान्य करते. यादृष्टीनेच शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या मदतीने पडताळा सूचीद्वारे दिव्यांगत्वाची प्राथमिक तपासणी करण्यासाठी 'प्रशस्त' हे एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

संदर्भ :

1. देशमुख, लक्ष्मीकांत (२०२०), नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : एक चिकित्सक अभ्यास अंमलबाजावणीच्या शिफारशींसह, पुणे : आंतरभारती.
2. निष्ठा : मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार शिक्षक प्रशिक्षण संच (डिसें २०१९) पुणे,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.
3. The Rights of Persons With Disabilities Act, 2016 Date - 27 th December 2016 PRASHAST A DISABILITY SCREENING CHECKLIST FOR SCHOOLS (PART-1AND PART-2), (2022) Central Institute of Educational Technology, NCERT, New Delhi

Web Resources

1. https://libraryzietmysore.wordpress.com/wp-content/uploads/2023/05/prashast.pdf (10 Oct 2024)
2. https://vikaspedia.in/education/teachers-corner/addressing-specific-problems-of-children/prashast-:-a-disability-screening-checklist-for-schools (10 Oct 2024)
3. https://ciet.ncert.gov.in/prashast (11 Oct 2024)
4. http://rehabcouncil.nic.in/(accessed on 23 April 2024).
5. http://ayjnihh.nic.in/index.asp (accessed on 23 April 2024)
6. http://www.iphnewdelhi.in/Home.aspx?ReturnUrl=%2f (accessed on 23 April 2024)
7. http://niepid.nic.in/abtmain.php (accessed on 23 April 2024)
8. http://nivh.gov.in/ (accessed on 23 April 2024)
9. http://niepmd.tn.nic.in/aboutus.php (accessed on 23 April 2024)
10. http://www.svnirtar.nic.in/?q=node/1 (accessed on 23 April 2024)
11. http://www.thenationaltrust.gov.in/content/innerpage/introduction.php (accessed on 23 April 2024)
12. www.mhrd.gov.in/shikshaparv(1stSep2020)Retrive From https://ncert.nic.in/pdf/shikshak-parv/Equitable
13. ChetanDarjihttps://www.studmentor.com/what-is-and-why-prashast-application Download-link-uses-2022/
14. Dr. Romesh Sharma (28 jan. 2024) Daily Excelsior, https://www-dailyexcelsior-com.translate.goog/prashast-a-disability-screening-tool-for-schools

एक राष्ट्र एक निवडणूक

डॉ अरुण दामोदर नलवडे
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
कर्मवीर हिरे कला, वाणिज्य, विज्ञान आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी

प्रस्तावना -:

एक राष्ट्र एक निवडणूक ही संकल्पना भारतीय राजकारणामध्ये अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अलीकडच्या काळात उदयास आलेल्या या संकल्पनेचा इतिहास फार जुना आहे तरी देखील 2014 ला या संकल्पनेचा पुनर्विचार होण्यास सुरुवात झाली. एक राष्ट्र एक निवडणूक ही कल्पना किमान १९८३ पासून आहे, जेव्हा निवडणूक आयोगाने प्रथम ती मांडली होती. मात्र१९६७ पर्यंत भारतात एकाचवेळी निवडणुका घेणे ही पद्धत रूढ होती. हाऊस ऑफ पीपल (लोकसभा) आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका १९५१-५२ मध्ये एकाच वेळी घेण्यात आल्या.त्यानंतर १९५७, १९६२ आणि १९६७ साली झालेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकांमध्ये ही प्रथा कायम राहिली.मात्र, १९६८ आणि १९६९ मध्ये काही विधानसभांचे अकाली विघटन झाल्यामुळे हे चक्र बिघडले. १९७० मध्ये लोकसभा स्वतःच अकाली विसर्जित करण्यात आली आणि १९७१ मध्ये नव्याने निवडणुका घेण्यात आल्या. अशा प्रकारे, पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या लोकसभेत संपूर्ण पाच वर्षांचा कार्यकाळ होता. लोकसभा आणि विविध राज्यांच्या विधानसभांच्या मुदतपूर्व विघटनामुळे आणि मुदत वाढवल्यामुळे लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांच्या स्वतंत्र निवडणुका झाल्या असून, एकाच वेळी निवडणुकांचे चक्र बिघडले आहे.

उद्दिष्टे :

१. एक राष्ट्र एक निवडणूक संकल्पना समजून घेणे
२. एक राष्ट्र एक निवडणूक या संकल्पनेचे फायदे समजून घेणे
३. एक राष्ट्र एक निवडणूक या संकल्पनेचे तोटे समजून घेणे.

विषय विवेचन -:

'वन नेशन वन इलेक्शन' म्हणजे थोडक्यात सांगायचं झाल्यास देशभरातील निवडणुका एकत्र घेणं.यात सार्वत्रिक म्हणजे लोकसभेची निवडणूक, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशा सगळ्या निवडणुका एकत्रितपणे घेण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.एक देश, एक निवडणूक' याचा सरळ अर्थ देशात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळस घेणे असा आहे. नागरिकांना या दोन्ही निवडणुकांसाठी एकाच वेळी मतदान करता येईल. सध्या देशात विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका वेगवेगळ्या वेळी दर पाच वर्षांनी घेतल्या जातात.देशभरातील लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा निवडणुका आणि पुढच्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचा प्रस्ताव म्हणजे वन नेशन वन इलेक्शन.भारतात यापूर्वी अशा निवडणुका झाल्या आहेत का? १९५७ मध्ये तत्कालीन बिहार, बॉम्बे, मद्रास, म्हैसूर, पंजाब, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांच्या विधानसभा वेळेपूर्वी विसर्जित करून एकत्र निवडणुका घेण्यात आल्या होत्या.त्यानंतर १९६७ पर्यंत एकत्र निवडणुका झाल्या. नंतर निवडणुका वेगळ्या होऊ लागल्या.२०१६ मध्ये निती आयोगाने एकत्र निवडणुका ठेवण्यासाठी प्रस्ताव समोर आणला होता. लॉ कमिशननुसार, एक देश एक निवडणूक आणण्यासाठी संविधानामध्ये पाच दुरुस्ती कराव्या लागतील.पंतप्रधान मोदी २०१९ मध्ये सत्तेत आल्यानंतर त्यांनी एक देश एक निवडणूक यावर चर्चा करण्यासाठी देशातील विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना बोलावलं होतं. यावेळी काँग्रेस, तृणमूल, बहुजन समाज पार्टी, समाजवादी पार्टी आणि द्रविड मुन्नेत्र कझघम या पक्षांनी जाणं टाळलं होतं. तर आम आदमी पार्टी, तेलगु देसम पक्ष, भारत राष्ट्र समिती या पक्षांनी बैठकीला हजेरी लावली होती. डिसेंबर २०२२ मध्ये लॉ कमिशनने यासंदर्भात राजकीय पक्षांकडून, निवडणूक आयोग, अधिकारी, तज्ञ यांच्याकडून याविषयावर सहा प्रश्नांची उत्तरे मागवली होती. २०१८ च्या लॉ कमिशनने एकत्र निवडणुका घेण्याचा प्रस्ताव दिली होता. देशाच्या विकासाठी एक देश, एक निवडणूक आवश्यक असल्याचं कमिशनने म्हटलं होतं.

एकत्रित निवडणूक कशासाठी ?

एकत्रित निवडणुकांचे समर्थक प्रशासकीय व घटनात्मक बदलांची मागणी करताना पटतील अशी अनेक कारणेही पुढं करत आहेत. पहिले कारण जगजाहीर आहे. ते म्हणजे, सततच्या निवडणुकांमुळे देशावर मोठा आर्थिक बोजा पडतो. निवडणुका घेणे ही आर्थिकदृष्ट्या न परवडणारी प्रक्रिया असते आणि दिवसेंदिवस ती अधिकच खर्चिक होत चाललीय. एकाच वेळी सर्व निवडणुका घेतल्यास या खर्चात मोठी बचत होऊ शकणार आहे. यातील आणखी एक युक्तिवाद म्हणजे, एकत्रित निवडणुका घेतल्यास राजकीय पक्षांना त्यासाठी सतत निधी उभारण्याची गरज भासणार नाही. तसं झाल्यास निधी उभारण्यासाठी राजकीय पक्षांकडून वापरले जाणारे हातखंडे कमी होतील, अशीही एक आशा आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्यामुळे निवडणुकीत दिलेली आश्वासने पाळण्यास सरकारला जास्तीत जास्त वेळ मिळेल. आजच्या प्रमाणे वर्षभर कुठल्या ना कुठल्या निवडणुकीच्या प्रचारात सरकारचा वेळ जाणार नाही.सततच्या निवडणुका म्हणजे सततची आचारसंहिता हे ओघाने आलेच. एकदा का आचारसंहिता लागली की प्रशासकीय कामावर त्याचा लगेचच परिणाम होतो. कल्याणकारी योजना आणि पायाभूत प्रकल्पांची अंमलबजावणी रखडते. त्याशिवाय अनेक प्रकारची प्रशासकीय बंधने येतात. वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशासकीय नियुक्त्या आणि बदल्या रखडत असल्याने विकासकामांना खीळ बसते. त्यातून निवडणूक काळात धोरण लकव्याची परिस्थिती निर्माण होते आणि राज्यकारभार ठप्प होतो.एकत्रित निवडणुकांमुळं मतदानाचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जातेय. शिवाय, एकदाच निवडणूक होणार असल्याने जाती, धर्माच्या आणि द्वेषाच्या राजकारणाला आळा बसेल. जे काही होईल, ते एकदाच होईल. वारंवार वातावरण कलुषित होणार नाही, असाही एक अंदाज आहे.

'एक देश, एक निवडणूक' टीकात्मक परीक्षण-:

वन नेशन वन इलेक्शनचे फायदे -:

- मतदारासांठी हे सोयिस्कर ठरेल त्यांचा ताण कमी होईल आणि त्यामुळं मतदानाची टक्केवारी वाढेल.
- आर्थिक विकास वाढू शकतो. तसंच सतत धोरण बदल्याची भीती उद्योजकांसमोर नसेल.
- पुरवठा साखळीवरचा ताण कमी होईल. कामगारांना वारंवार मतदानासाठी रजा घ्यावी लागणार नाही.
- प्रशासनाला वारंवार अडकून राहावं लागणार नाही.
- एकाचवेळी निवडणुका झाल्यास धोरणात्मक निर्णय घेणं सोपं होईल.
- सरकारी तिजोरीवरील भार कमी होईल.
- निवडणुकांच्या वेळापत्रकातून नागरिकांची कामे करण्यात अधिकाऱ्यांना कठिण जाणार नाही.
- निवडणुकीशी संबंधित वाद कमी होतील न्यायालयांवरील ताण कमी होईल.
- वारंवार समोर येणारा सामाजिक संघर्ष कमी होण्यास मदत होईल.

वन नेशन वन इलेक्शनचे तोटे -:

- विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घ्यायच्या झाल्यास संविधानामध्ये दुरुस्ती करावी लागेल. विधानसभेच्या निवडणुका लोकसभा निवडणुकीशी संलग्न कराव्या लागतील. तसेच रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्टमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक होईल.
- स्थानिक पक्षांचा या प्रस्तावाला विरोध असण्याचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, निवडणुकीदरम्यान ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाहीत. तसेच राष्ट्रीय पक्षांसोबत ते खर्च आणि रणनीती यामध्ये स्पर्धा करु शकणार नाहीत.
- २०१५ मध्ये आयडीएफसी इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासानुसार, ७७ टक्के शक्यता अशी असेल की लोक राज्यातील आणि केंद्रातील एकाच पक्षाला निवडून देतील. निवडणूक सहा महिन्यांच्या अंतराने ठेवली तर ६१ टक्के लोकच सारख्या पक्षाला मतदान करतील. एकत्र निवडणुकांमुळे भारताच्या संघराज्य ढाच्याला धोका पोहोचू शकतो असा दावा काहीजण करतात.

समारोप -:

निवडणुकीतील वाढता खर्च, वेळेचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी व निवडणूक आयोगावरील अतिरिक्त निवडणूक कार्यक्रमाचा ताण कमी करण्यासाठी'एक देश, एक निवडणूक' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे त्यामुळे या संकल्पनेचे अनेक फायदे आहेत त्या पद्धतीने अनेक तोटे देखील आहेत हे वरील शोधनिबंधात विस्ताराने मांडण्यात आले आहे

संदर्भ सूची :

१.दैनिक लोकसत्ता वर्तमानपत्र
२.दैनिक सकाळ वर्तमानपत्र
३.Economical and Political Weekly
४.दैनिक देशउन्नती वृत्तपत्र
५.साधना मासिक

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

कुटुंबसंस्थेतील लोकशाही

डॉ. कन्नाडे एम. के.
समाजशास्त्र विभागप्रमुख,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर
email- swamimamata@gmail.com

गोषवारा:

मानवाच्या संपूर्ण सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था ही एक आधारभूत व सर्वव्यापी सामाजिक संस्था आहे. सर्वच सामाजिक समूहात एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाचा कुटुंब हा एक सामाजिक समूह आहे. . न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाही जीवन पद्धतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाहीची चर्चा करताना ती लोकशाही आधी कुटुंबामध्ये मिळणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये तर लोकशाही मिळत नसेल तर समाजामध्ये ती कशी लागू होईल. कारण कुटुंबापासून देशाच्या जडणघडणीला सुरुवात होत असते. आजही कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून पुरुषांनाच महत्त्व आहे. स्त्रियांनी घर सांभाळावे अशी अपेक्षा केली जाते. पाश्चात्य देशातून आपण पाश्चात्य संस्कृती स्वीकारली पण सामाजिक मूल्य मात्र आपण स्वीकारायला तयार नाही म्हणूनच राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षणासारख्या अहवालातून देखील नवऱ्याने बायकोला मारण्यात काही चूक नाही अशी प्रतिक्रिया बहुसंख्य पुरुषांनी आणि महिलांनीही दिलेली आढळते. व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय आणि समता ही मूल्य जर कुटुंबातच विकसित झाली तर नक्कीच समाजातही ही मूल्य स्पष्टपणे पहावयास मिळतील.

प्रस्तावना :

मानवाच्या संपूर्ण सामाजिक संस्थांमध्ये कुटुंबसंस्था ही एक आधारभूत व सर्वव्यापी सामाजिक संस्था आहे. सर्वच सामाजिक समूहात एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाचा कुटुंब हा एक सामाजिक समूह आहे. मानवी विकासाच्या सर्वच अवस्थांमध्ये कुटुंबाचे अस्तित्व दिसून येते. मानवी समाजाच्या विकास टप्प्यातील पहिली अवस्था म्हणजे कुटुंब होय. मानवी समाजाचा इतिहास म्हणजे कुटुंबाचा इतिहास होय. कुटुंबसंस्थेच्या निर्मितीमुळेच समाजातील स्थैर्य व सातत्य टिकून राहिले आहे. म्हणूनच कुटुंबसंस्थेला सर्व प्रकारच्या समाजात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

अब्राहम लिंकननी लोकशाहीची व्याख्या केली लोकांनी, लोकांचे, लोकांसाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. आज जगात सर्वात लोकप्रिय शासन प्रकार म्हणून लोकशाही शासन पद्धतीकडे पाहिले जाते. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाही जीवन पद्धतीची आधारभूत तत्वे मानली जातात. लोकशाही जीवन पद्धतीत प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची संधी मिळवून देण्याची हमी असते. त्यामुळेच लोकशाही केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच मर्यादित राहत नाही तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कौटुंबिक इत्यादी सर्व क्षेत्रात लोकशाहीला स्थान प्राप्त झाले आहे.

भारत हा जगातील लोकशाही मानणारा सर्वात मोठा देश आहे. भारतामध्ये विविध प्रकारची विविधता ही आपणास पहावयास मिळते. अशा विविधतेने नटलेल्या देशाला एकसंघ ठेवण्याची किमया ही संसदीय लोकशाहीत आहे. लोकशाही म्हणजे 'लोकांची सत्ता'लोकशाहीमध्ये जनतेची इच्छा ही अंतिम आणि सर्वोच्च मानली जाते. म.गांधी म्हणतात, ' लोकशाही हा एक जीवनाचा मार्ग आहे'. इंग्लंड या देशाला संसदीय लोकशाहीची जननी म्हटले जात असले तरी तिथे सामाजिक व सांस्कृतिक भिन्नता तेवढी नाही जेवढी भारतामध्ये आहे. तरीही या विविधतेमध्ये एकता प्रस्थापित करण्यात भारतीय लोकशाही यशस्वी झाली आहे.

संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पद्धतीचा अवलंब करून संशोधन विषयाशी संबंधित व्दितीय माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये विविध संदर्भग्रंथ, मासिके, विशेषांक, वर्तमान पत्रातील लेख, साप्ताहिक इ. आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

- कुटुंब संस्था व लोकशाहीचा अर्थ समजून घेणे
- कुटुंबातील लोकशाही समजून घेणे
- कुटुंबातील पालकांची लोकशाही मूल्याबाबतची मानसिकता समजून घेणे
- कुटुंबातील लोकशाहीत येणारे अडथळ्यांचा अभ्यास करणे व उपाय सुचवणे

लोकशाहीची चर्चा करताना ती लोकशाही आधी कुटुंबामध्ये मिळणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये तर लोकशाही मिळत नसेल तर समाजामध्ये ती कशी लागू होईल. कारण कुटुंबापासून देशाच्या जडणघडणीला सुरुवात होत असते. आपण समाजात नेहमीच पाहतो की, एखाद्या मुला मुलीने स्वतःच्या इच्छेप्रमाणे जर लग्न केले तर त्यांना स्वतःच्या कुटुंबापासून दूर जावे लागते. काही वेळेला तर त्यांना जीव द्यावा लागतो किंवा त्यांच्या कुटुंबीयांकडून त्यांना संपविण्याचाही प्रयत्न केला जातो.

आजही कुटुंबातील कर्ता व्यक्ती म्हणून पुरुषांनाच महत्त्व आहे. स्त्रियांनी घर सांभाळावे अशी अपेक्षा केली जाते. पाश्चात्य देशातून आपण पाश्चात्य संस्कृती स्वीकारली पण सामाजिक मूल्य मात्र आपण स्वीकारायला तयार नाही म्हणूनच राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षणासारख्या अहवालातून देखील नवऱ्याने बायकोला मारण्यात काही चूक नाही अशी प्रतिक्रिया बहुसंख्य पुरुषांनी आणि महिलांनीही दिलेली आढळते. व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय आणि समता ही मूल्य जर कुटुंबातच विकसित झाली तर नक्कीच समाजातही ही मूल्य स्पष्टपणे पहावयास मिळतील.

लोकशाहीचा विचार करताना कुटुंबातील लिंग आधारित स्तरीकरण ही गोष्ट देखील विचारात घेणे महत्त्वाचे आहे. कारण समाजाची विभागणी प्रामुख्याने जैविक तत्वावर असलेली पहावयास मिळते. यामुळे स्त्री-पुरुषात फार मोठे अंतरभेद लिंगभाव निर्माण होतो. अँथोनी गिडन्स यांनी लिंगभाव ही संज्ञा सामाजिक सांस्कृतिक घटकाशी संबंधित असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, "लिंगभाव ही संज्ञा पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील मानसशास्त्रीय, सामाजिक व सांस्कृतिक भेदांशी संबंधित आहे. पुरुषीपणा आणि बायकीपणा याबाबतच्या समाजनिर्मित कल्पनांशी ही संज्ञा जोडलेली आहे."

लिंग ही जन्मजात बाब आहे. पण लिंगभाव मानवनिर्मित आहे. अनेक कुटुंबामध्ये असे दिसून येते की मुलीच्या जन्मापासून प्रत्येक टप्प्यावर ती वेगळी किंवा दुय्यम आहे याची सतत कुटुंबातून जाणीव करून दिली जाते. घरकाम, खेळ, शिक्षण, अन्न, आरोग्य, वंशाचा दिवा, म्हतारपणाचा आधार, परक्याचे धन इत्यादी बाबी मुलींच्या संदर्भात मनामध्ये रुजलेल्या आढळतात. यामुळे कुटुंबातील लोकशाहीस तडा जातो जर कुटुंबातच लोकशाही तडा जात असेल तर देशामध्ये ही लोकशाहीचे मूल्य दुर्लक्षित होताना पाहाव्यास मिळतात कुटुंबात स्त्रियांचा केला जाणारा छळ, अपमान, पिळवणूक यासारख्या घटना पूर्वीपासून चालत आलेले आहेत आणि प्रचलित नियमने यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारात भरच पडत गेली. स्त्रियांसाठी केल्या जाणाऱ्या काही कायदेशीर तरतुदी स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि काही प्रमाणात त्यांना मिळणारे आर्थिक स्वातंत्र्य या गोष्टी विचारात घेतल्या तरी असंख्य स्त्रियांना आजही अत्याचारांना बळी पडावे लागते.काही हिंसाचार, गुन्हे, अत्याचार हे प्रामुख्याने स्त्रियांविरोधी होत असतात. बलात्कार, लैंगिक अत्याचार, लैंगिक शोषण, लैंगिक दुरुपयोग, वेश्याप्रवृत्ती, कौटुंबिक अत्याचार आणि अश्लील वाङ्मयाचे प्रदर्शन ह्या मार्गाने स्त्रियांचा सतत छळ केला जात असतो. याबरोबरच, हुंड्याची पूर्तता न केल्याने, पुरेशा प्रमाणात आर्थिक मागण्यांची तडजोड न लावल्याने तरुण विवाहित मुलीचा छळ करणे, त्यांना मारहाण करणे, त्यांना मरणयातना भोगायला लावणे ह्या मार्गानेदेखील स्त्रियांविरोधी अत्याचार चालूच असतात. अलीकडच्या काही वर्षांत अशा स्वरूपाच्या हिंसाचारात प्रचंड वाढ होताना तर दिसतेच आहे, शिवाय अशा त-हेची हिंसात्मक प्रवृत्ती सतत वाढतही आहे. ही एक प्रकारची कुटुंबातील व समाजातील विकृत हुकूमशाहीच आहे.

कौटुंबिक हिंसाचार, आईवडिलांच्यात होणारे भांडण, नातेवाईकांकडून त्यांच्यावर होणारे भेदभावजनक अन्याय व मुख्यतः लैंगिक अत्याचार हा आणखी एक पैलू. जगभर झालेल्या वेगवेगळ्या पाहण्यांतून 80% लैंगिक अत्याचा हे घरातील व्यक्ती वा परिचित यांच्याकडून होत असल्याचे दिसून येते. ते करणाऱ्यांकडून त्याबद्दल वाच्यता न करण्याची सक्ती केलेली असतेच, परंतु त्याहून दुर्दैवाची बाब म्हणजे, जरी मुलांनी हिम्मत करून कुटुंबातील व्यक्तींना सांगितलीच, तरी त्यांच्यावर विश्वास ठेवला जात नाही. बालवयात असे अनुभव घेतलेल्या मुलांना आपण कोणत्या तोंडाने लोकशाही मूल्ये शिकवणार? म्हणून, आईवडिलांनी व इतर पालकांनी स्वतः लोकशाही मूल्यांचा अवलंब करणे, घरामध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण

करणे व ते टिकवून ठेवणे आवश्यक आहे. घरातील कोणत्याही प्रकारचे वर्तन मूल फार लवकर आत्मसात करते. माझे आईबाबा स्वतःही असे वागतात, म्हणजे ते चांगले आहेत, हे समीकरण जर मनात पक्के बसले असेल, तरच पुढील मार्ग सोपा होतो.

घरातील मुलांना किंवा मुलींना शाळेत रस्त्यावर, दुकानात, पाहुण्यांच्या घरी किंवा स्वतःच्या घरी झालेल्या अन्यायाबाबत तक्रार करायची असेल तर कुटुंबातील मोठ्या व्यक्तींना लहान मुलाचं ऐकून घ्यायची इच्छा नसते. घरातील मोठेही 'गप्प बस' अशा सूचना देतात. घरात वृद्ध व्यक्तींनी जे सांगितले ते ऐकून त्याप्रमाणे वर्तन करणे याला आदर्श मानले जाते. आणि अशा मुलांना आपण आज्ञाधारक असे मानतो. मूल स्वतःच्या विचाराप्रमाणे वर्तन करीत असे तर त्याला उद्धट समजले जाते. कुटुंबातील लोकशाहीमध्ये मुलांनाही बोलायचे, मत मांडण्याचे अधिकार आहे. शिवाय कलम नंबर 12 मध्ये तशी तरतूद केलेली आहे. अलीकडे समाजामध्ये ज्या पद्धतीने मुले मुली अत्याचाराला सामोरे जात आहेत त्या परिस्थितीत पालकांचे आद्य कर्तव्यच आहे की घरामध्ये लोकशाहीचे वातावरण निर्माण करणे व जोपासणे.

मुलांमध्ये लोकशाही मूल्य रुजवताना या लेखात भाषा सल्लागार समितीच्या सदस्य अनुराधा मोहनी यांनी म्हटल्याप्रमाणे, 'आपल्या आवडीप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मोकळेपणाचा व हलकेपणाचा अनुभव देते, पण स्वातंत्र्य म्हणजे स्वतःच्या जगण्याविषयीची कल्पना स्पष्ट होणे आणि नंतर तशा प्रकारे जगण्याची मोकळीक मिळणे, एवढेच नव्हे, तर असंख्य बंधनांतून आणि बेड्यांतून आपले मानस मुक्त होणे आणि मोकळेपणाने विचार करता येणे. कोणतेही काम करणारा, कोणत्याही जातिधर्माचा पुरुष किंवा स्त्री ह्यांच्याशी त्यांचा आत्मसन्मान जपणारी वागणूक ठेवण्याने तशाच आत्मसन्मानाचा अनुभव स्वतःलाही येतो; हे झाले समतेचे मूल्य. आपल्या परिचितांशी प्रत्यक्षपणे व अपरिचितांशी अप्रत्यक्षपणे, जिव्हाळ्याने जोडून घेतल्याने आपल्यालाही सुरक्षिततेचा अनुभव येतो; त्याला म्हणायचे बंधुता. अन्याय-अत्याचारांचे परिमार्जन घडविल्याने आपली न्यायाची बाजू बळकट होते. ह्यावरून दिसते की, लोकशाही मूल्ये ही फक्त इतरांकडून करायची वर्तणुकीची अपेक्षा नाही. तसेच, इतरांशी वागताना पाळावयाची आचारसंहिताही नाही, तर त्या कृतीतून आपल्यातही परस्पर सौहार्दाची, सामूहिकतेची जाणीव करून देणाऱ्या लोकशाही मूल्यांची जोपासना होते.'

आपले घर, कुटुंब, शाळा काही अपवाद वगळता तिथेही आपल्याला लोकशाही पहावयास मिळत नाही. बहुतांश शाळेच्या वर्गामध्ये पाहिले तर शिक्षकांचच वर्चस्व पहावयास मिळतं. शिक्षकांनी सांगायचं आणि मुलांनी ऐकायचं. इथे मुलांना बोलायला शिकवले जात नाही तर गप्प बस अशा सूचना दिल्या जातात. मुलाचं मत आपल्या विचारांशी विसंगत असेल तर त्याच्यावर हात न उचलता किती पालक चर्चा करतात, जातीबाहेर केलेला प्रेम विवाह किती पालक मुक्तपणे स्वीकारतात, आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह केल्यामुळे कितीतरी पालक किंवा भाऊ आपल्या मुलीला किंवा बहिणीला मारून टाकतात व यांचा त्यांना संस्कृती जोपासण्याचा अभिमान वाटतो तेथे कुटुंबातील मुला - मुलींना निर्णय स्वातंत्र्य मिळतो का? आपल्या समाजातील लेसबियन, गे, बायसेक्सुअल मुला मुलींना त्यांच्या इच्छेप्रमाणे वागण्याची परवानगी समाज देत नाही. आपला कायदा सुद्धा आतापर्यंत हे वर्तन अनैसर्गिक आणि गुन्हेगारी स्वरूपाचं मानत होता, मतदार ओळखपत्र मिळण्यासाठी त्याची किती परवड होते हे पाहिले की लोकशाहीत समान नागरिक म्हणून त्यांना जगता येण्याचा प्रवास किती अवघड आहे याची कल्पना येते. मुलांमध्ये लोकशाही मूल्य रुजवायची असतील तर आधी पालकांमध्ये असायला हवीत. भारतीय पालक हे काही अपवाद वगळता सरजामी मानसिकतेचे आणि पितृसत्ताक व्यवस्थेचे प्रतिनिधी आहेत. कुटुंबातल्या स्त्रियासुद्धा या मानसिकतेला अपवाद आहेत असं म्हणता येणार नाही कुटुंबातील मुलाला इंग्रजी माध्यमात- मुलीला प्रादेशिक भाषेत, मुलाला विज्ञान शाखेत - मुलीला कला शाखेत, मुलाला हॉस्टेलमध्ये - मुलीला घरी, मुलाला नोकरीसाठी - मुलीला गृहिणी म्हणून वागवण्याचा विचार करणारे सगळीकडे दिसतात. तेव्हा कुटुंबातल्या लोकशाहीला तडा जातो. शिक्षण व लोकशाही या एकाच राहण्याच्या दोन बाजू आहेत. केवळ शिक्षणामुळेच लोकशाही बळकट राहू शकते.

लोकशाही समाजात राहून तिच्यात सहभागी होण्याचा अधिकार राज्यघटनेने मुलाला दिलेला आहे. कलम 5 मध्ये मुलांच्या हळूहळू आकारास येणाऱ्या क्षमतांची मोठ्यांकडून योग्य ती बूज राखली जाण्याचा अधिकार. कलम 9 मध्ये मुलाचे मत विचारात घेतल्याशिवाय त्याला त्याच्या कुटुंबापासून विलग न करण्याचा अधिकार. कलम १२ मध्ये मुलाचे म्हणणे ऐकून घेतले जाण्याचा आणि ते गंभीरपणे घेतले जाण्याचा अधिकार.कलम १४ मध्ये सदसद्विवेकबुद्धी, विचार आणि धर्म याबाबतचा

अधिकार, कलम १५ मध्ये संघटना बांधण्याचा अधिकार, कलम १६ मध्ये खाजगीपणाचा अधिकार, कलम १७ मध्ये माहितीचा अधिकार देण्यात आलेला आहे.

कायद्याने समाज बदलतो का, मानसिकता बदलते का, यावर प्रबोधन-चळवळीच्या काळापासून जगभरात चर्चा होत आलेली आहे. अशा कायद्यामुळे समाज तांत्रिकदृष्ट्या बदलल्यासारखा वाटला तरी प्रत्यक्षात बदलतो असं नाही. प्रत्यक्ष बदलाची प्रक्रिया दीर्घकाळ, संथ चालणारी आणि अनेक पदर असलेली आहे. त्यामुळेच लग्नाआधीच शरीरसंबंधांसाठी तयार होणारा एखादा पुरुष जन्माला घातलेल्या मुलाची जबाबदारी घ्यायला तयार होत नाही. यासाठी अलीकडच्या काळात मुलांची डीएनए चाचणी करण्यापर्यंत वैज्ञानिक प्रगती झाली आहे. तर दुसरीकडे गर्भाचं लिंगनिदान करण्यावर कायद्याने बदी आली आहे. याचा अर्थ, लोकांचं वैचारिक परिवर्तन झालेलं आहे असं नाही, पण कायद्याने किमान काही लोकांना चाप बसला आहे. तरीसुद्धा वैद्यकीय पेशाला आणि पालकत्वालाही काळिमा फासणाऱ्या मुलीची भ्रूणहत्या करण्याच्या किंवा नवजात अर्भकाच्या हत्या करण्याच्या घटना संख्येने कमी नाहीत. ज्या वेळेला आपण स्त्रीभ्रूणहत्या करतो त्यावेळेला आपण मुलींचा जन्म नाकारतो. आजही मुलांच्या जन्माचे ज्या पद्धतीने स्वागत केले जाते त्या पद्धतीने मुलींच्या जन्माचे स्वागत होईलच याची शाश्वती नाही. कुटुंबातील ही मानसिकता लोकशाही नाकारणारी आहे.

कुटुंबातील लोकशाहीत येणारे अडथळे:

लोकशाहीचा जागर करणारे सर्वच प्रत्यक्ष वर्तनात लोकशाहीवादी असतातच असं नाही. त्यामुळे वैयक्तिक, सामूहिक विचारांमध्ये आणि आचरणात अ-लोकशाहीवादी असलेल्या व्यक्तींना आणि समूहांना लोकशाही वळणावर आणणं, हे खरं आव्हान आहे.

प्राचीन रोममध्ये ज्याप्रमाणे ग्लॅडिएटर एकमेकांशी लढत असत आणि त्यातल्या एकाने दुसऱ्याचा घेतलेला बळी, लोक आनंदाने चेकाळून जात अनुभवत असत; तसं आजच्या समाजमाध्यमांचं झालं आहे. रूढार्थाने ज्याला ट्रोलिंग म्हणतात, ती लोकशाहीविरोधी किंबहुना माणुसकीविरोधी कृती आहे. जोपर्यंत एखादी व्यक्ती आपला विश्वास असलेल्या भूमिकेच्या समर्थनार्थ आक्रमकपणे युक्तिवाद करते, तोपर्यंत ते क्षम्य आणि समर्थनीय असतं. पण, एका टप्प्याला जमावाने आपली नखं बाहेर काढून भूमिका मांडणाऱ्या व्यक्तीला बोचकारून, घायाळ करून संपवणं हे लोकशाही पुढील मोठे आव्हान आहे.

कुटुंबातील लोकशाही मधील सर्वात मोठा अडथळा म्हणजे पुरुषप्रधान संस्कृती होय. बुद्धिमत्ता, शारीरिक क्षमता, सर्जनशीलता, कष्ट करण्याची धमक इत्यादी बाबत पुरुषांपेक्षा स्त्रिया कमी नसतानाही स्त्रीला पुरुषांपेक्षा कमी लेखण्याची वृत्ती या संस्कृतीत पहावयास मिळते. स्त्री ही पुरुषांची मालमत्ता आहे तिचा वाटेल तसा उपयोग करू शकतो ही मालकी हक्काची अमानुष भावना पाहायला मिळते त्यामुळे कुटुंबातील लोकशाही मोडकळीस येते.

स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण पुरुषप्रधान समाजात झालेली असल्यामुळे समाजाने दिलेले बाईपनाचे गुण घेऊनच ती लहानाची मोठी होत असते, स्त्रीच्याही मनात खरोखरच पुरुष आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे आपणास पुरुषाचे संरक्षण कवच हवे असते असे वाटू लागते. या मानसिकतेचा फायदा पुरुष घेतात व ते स्त्रियांवर अधिकार गाजवतात त्यामुळे कुटुंबात लोकशाही निर्माण होत नाही.

उपाय

"अशी कोणतीही मानवी संस्था नाही, जिच्यात दोष नाही. एखादी संस्था जितकी मोठी असते, तितका तिचा दुरुपयोग होण्याच्या शक्यता वाढतात. लोकशाही ही एक व्यापक संस्था आहे आणि म्हणूनच तिचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला जाऊ शकतो. पण, त्यामुळे लोकशाहीच नाकारणे हा उपाय नव्हे, तर तिचा दुरुपयोग होण्याच्या शक्यता कमीत-कमी ठेवून लोकशाही टिकवून ठेवता येईल." - महात्मा गांधी

मुळामध्ये सर्व माणसं सारखी आहेत आणि त्यांना व्यवस्थेचे सारखे फायदे मिळाले पाहिजेत, हे लोकशाहीपुढचं गृहीतक आहे. मात्र प्रत्यक्षात तसं घडतंच असं नाही, त्यामुळे ते घडविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. समाजाची पुनर्निर्मिती करण्यासाठी, समाज सुधारण्यासाठी लोकशाहीचा मार्ग महत्त्वाचा आहे. ती लोकशाही कुटुंबामध्ये बिंबवणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी खालील उपाय सुचविता येतील -

ज्याप्रमाणे समाज प्रबोधनासाठी अण्णाभाऊ साठे, अमर शेख, शाहीर गवाणकर, शाहीर साबळे, शाहीर विठ्ठल उमप इत्यादींनी आपल्या कलेचा वापर समाज प्रबोधनासाठी केला त्याप्रमाणे कीर्तनकार आणि शाहिरांनी लोकशाही मूल्य समाजामध्ये बिंबवण्याचा प्रयत्न कलेच्या माध्यमातून करणे गरजेचे आहे.

कायद्याचे सहाय्य : समाजामध्ये लोकशाही निर्माण करण्यासाठी विविध कायदे आहेत. त्याच कायद्याची जर व्यवस्थित अंमलबजावणी झाली तर कुटुंबामध्ये ही लोकशाही निर्माण होऊ शकते.

लोकशिक्षण : कुठलीही गोष्ट प्रत्यक्षात उतरवायची असेल तर कायदा असणे आवश्यक आहे त्याचबरोबर लोकशिक्षण व लोक जागृती याची देखील आवश्यकता आहे. कुटुंबातील लोकशाहीचे महत्त्व समाजाला पटणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध वृत्तपत्रे मासिके आणि समाज माध्यमातून जागृती होणे गरजेचे आहे.

स्त्री शिक्षण व स्वावलंबन : कुठलाही व्यक्ती शिक्षणामुळे स्वावलंबी होतो. तेव्हा सर्व स्त्रियाला जर शिक्षण मिळाले, ती जर स्वतःच्या पायावर उभी राहिली तेव्हा तिच्यावर अधिकार गाजविण्याची पुरुषाची भावना कमी होईल, स्त्रीला वाटणारी भीती कमी होईल, तिच्या स्वावलंबनामुळे तिच्यात आत्मविश्वास निर्माण होईल व याचा परिणाम कुटुंबामध्ये लोकशाही वातावरण निर्माण होइल.

पुरुषांच्या मानसिकतेत बदल : पुरुषांच्या मनामध्ये स्त्रीबद्दल जी अमानवी विचारसरणी आहे ती बदलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रत्येक पुरुषांनी जर आपल्या पत्नीसोबत मैत्रीपूर्व व्यवहार केला तर त्याचे अनुकरण त्या कुटुंबातील मुलही करतील आणि आपोआपच कुटुंबामध्ये लोकशाही ची बीजे पेरले जातील.

सारांश

आपल्या देशात 'लोकशाही' फक्त राज्यव्यवस्थेत आणि तीदेखील निवडणूक प्रक्रियेपुरतीच मर्यादित राहिली आहे. आपण एक मूल्यव्यवस्था म्हणून लोकशाहीचा स्वीकार केलेलाच नाही. लोकशाही मूल्यं आपल्या जीवनपद्धतीचा अविभाज्य भाग बनलेली नाहीत. समाज आणि संस्कृती यांचं वळण लोकशाहीपर नसल्याने लोकशाही पद्धतीचे संविधान स्वीकारले तरी लोकशाही रुजणं आणि टिकणं अवघड आहे. म्हणून खासगी आणि सार्वजनिक पातळीवर विशेष प्रयत्न करावे लागतील. लहानपणापासून लोकशाहीवर आधारित वर्तनाचा सराव मुलांना कुटुंबातून आणि शाळेतून मिळायला पाहिजे. बदलाची सुरुवात आपल्या कुटुंबातच झाली पाहिजे - मोकळेपणाने प्रश्न विचारणं, मत व्यक्त करणं आणि आपसातील मतभेदांचा आदर करणं यांची कुटुंबापासून सवय लागली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्याला घाबरून चालणार नाही. एकाधिकारशाही मोडावी लागेल. मोठ्या माणसांनी आपसात वागताना लोकशाही मूल्यं जपावी लागतील. पुरुषांना घरकामात सहभाग घ्यावा लागेल, घरातले लहानमोठे निर्णय सर्वांच्या सोबत चर्चा करून, सर्वांच्या सोयीने आणि सामंजस्याने घ्यावे लागतील, शारीरिक क्षमता किंवा लिंगावर आधारित भेदभाव केला जाणार नाही, याकडे लक्ष द्यावं लागेल. नव्या पद्धतीने कुटुंब घडवण्यासाठी अनेक नव्या पद्धती, कामाची नवी विभागणी, नवे नियम तयार करावे लागतील. अर्थातच, हे एका रात्रीत होऊ शकणारे बदल नाहीत. एखाद-दुसऱ्या कुटुंबात असे बदल घडूनही फारसा उपयोग नाही आणि केवळ कुटुंबाच्या पातळीवर थांबून चालणार नाही. कुटुंबासोबत शाळा, प्रसारमाध्यमं, सरकारी कार्यालयं, बँका, अशा अनेक ठिकाणी वर्तन-संस्कृतीमध्ये बदल करावे लागतील. तेव्हा कुठे स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर बदल होण्याची आशा ठेवता येईल.

संदर्भ ग्रंथ

1. Indian Strems Research Journal volume 3 April 2013
2. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित) 2010, 'भारतीय लोकशाही: अर्थ आणि व्यवहार,' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
3. साबळे आर. डी. 2004, ' भारतीय शासन आणि राजकारण' हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर
4. दीपक पवार (संपादित), 2022, ' लोकशाही समजून घेताना' मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई
5. साधना
6. प्रतियोगिता दर्पण

प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध-एक अभ्यास

***रंजना शिवाजी ओलेकर**
पीएच.डी. संशोधक
शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ई-मेल आयडी- shelakeranjana32@gmail.com
****डॉ.युवराज यशवंत पवार**
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली
ई-मेल आयडी- yuvarajypawar@gmail.com

प्रस्तावना

मानवाच्या सर्व क्षेत्रातील प्रगतीला कारणीभूत असलेली शक्ती म्हणजे त्याची बुद्धी असा सर्वांचा समज आहे. पण बुद्धीची झेप मर्यादित आहे, तिचे सामर्थ्य मर्यादित आहे, बुद्धी हीच मानवाला प्राप्त झालेली एकमेव शक्ती नव्हे, तर तिच्यापेक्षाही एक श्रेष्ठतर शक्ती मानवाला लाभली आहे आणि ती म्हणजे सृजनशीलता. विज्ञानातील नवे शोध, तत्त्वज्ञानातील नवे विचार संप्रदाय, सामाजिक शास्त्रामधील नवनवीन उपपत्ती व कलेच्या क्षेत्रातील नवे प्रयोग, नवे प्रवाह ही सर्व सृजनशील व्यक्तींची देणगी आहे.

बुद्धीच्या साहाय्याने ज्ञानी, विद्वान किंवा पंडित निर्माण होतील, सृजनशील विचारवंत निर्माण होऊ शकत नाहीत. प्रगतीला खरा हातभार सृजनशील विचारवंतांचाच लागला आहे. म्हणून मानवाच्या- जगाच्या प्रगतीचे श्रेय हे बुद्धीपेक्षा सृजनशीलतेलाच द्यावे लागेल. विविध शिक्षण आयोगांनी शिक्षणाचे विविध आकृतीबंध सादर केले आहेत. त्यामधील 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिली ते पाचवी हा स्तर पूर्व प्राथमिक स्तर म्हणून ओळखला जातो. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या पुढील वाटचालीमध्ये हा स्तर अत्यंत महत्त्वाचा आहे. डॉ. बेंजामिन ब्लूम यांनी सुधारित केलेल्या उद्दिष्टांच्या श्रेणीमध्ये नवनिर्मिती हे सर्वात उच्च उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी अध्ययन अध्यापनाच्या विविध पद्धती वापरल्या जातात व त्यामधून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो.आज मितीला प्राथमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षकांना सृजनशील म्हणजे काय ? त्यांची सृजनशीलची संकल्पना काय आहे ? शिक्षक सृजनशील विकसनासाठी कोणते प्रयत्न करतात ? ते सृजनशीलतेच्या अनुषंगाने अध्ययन ,अध्यापनात विद्यार्थ्यांना कोणत्या संधी देतात ? या अशाच अनेक प्रश्नाच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक स्तरावर इयत्ता पाचवीला मराठी विषयाचे अध्यापन करणारे व अध्यापन केलेले ३०० शिक्षकांकडून संशोधिका विकसित 'शिक्षक प्रश्नावलीद्वारे' प्राप्त प्रतिसादांचे विश्लेषण करून प्राथमिक शिक्षण स्तरावर सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध याचा अभ्यास केला आहे.

की वर्ड: भाषा, मराठी भाषा, सृजनशीलता ,प्राथमिक स्तर ,प्राथमिक शिक्षक

भाषा हा शब्द 'भाष' या धातूपासून बनला आहे 'भाष' या शब्दाचा मूळ अर्थ 'बोलणे' असा आहे. मनुष्य स्वतःचे भाव, विचार हे मुख्यतः बोलण्याच्या माध्यमातून व्यक्त करत असतो किंवा समजावून घेत असतो.

सृजनशीलतेचा अर्थ

सृजनशीलता हा शब्द संस्कृत मधील "सृज" या धातूपासून तयार झाला असून त्याचा अर्थ म्हणजे 'निर्माण करणे' असा आहे. त्यावरून सृजनशीलता ही नवीन निर्माण करण्याची शक्ती आहे हे दिसून येते. काहीतरी नवे निर्माण करावे असे प्रत्येकाला वाटत असते, प्रत्येक माणसाजवळ नवे घडविण्याची इच्छा व शक्ती असते असे मानले जाते. नेहमीचे घडणे यापेक्षा नवे घडणे अशी क्रिया होणे महत्त्वाचे असते. सुरुवातीपासूनच आपण "ईश्वराने सृष्टी निर्माण केली" असे ऐकत आलेलो आहोत पण

काही कवी "आम्ही शब्दसृष्टीचे ईश्वर आहोत" असे म्हणतात. यावरून असे लक्षात येते की कवी, लेखक किंवा कलावंत हे एक कल्पित सृष्टी जन्माला घालत असतात. थोडक्यात नवनिर्मितीची क्षमता म्हणजेच "निर्माणक्षम प्रज्ञा" होय असे म्हणता येईल.

सृजनशीलतेच्या व्याख्या

Creativity is the process which result in a novel work that is accepted as tenable to useful for satisfying by a group at some paint in time. - Calvin Taylor

"कोणत्याही व्यक्तीला पूर्वी पूर्णपणे अज्ञात असलेली व नवीनतम असलेली रचना, कल्पना किंवा उत्पादन निर्मिती करण्याची क्षमता म्हणजे त्या व्यक्तीची सृजनशीलता होय." - Drevedaha

संशोधनाचे महत्त्व

समाजाच्या प्रगतीसाठी किंवा कोणत्याही क्षेत्राच्या प्रगतीसाठी नवनवीन विचारांची आवश्यकता असते. पण विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता नसेल तर हे सर्व सृजनशील विचारप्रक्रियेशिवाय अशक्यच आहे.

शिक्षकांना विद्यार्थ्यांची सृजनशीलता कशी वाढीला लावायची यासाठी विविध उपक्रम आयोजित करावे लागतील. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता कमी आहे हे समजल्यानंतर शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील विचारप्रक्रिया वाढीस लावता येईल तसेच सृजनात्मक दृष्टिकोन विकसित करता येईल त्यामुळे शिक्षकांकडून सृजनशीलतेच्या सद्य:स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

1. प्रस्तुत संशोधनामुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता सुधारण्यास मदत होणार आहे तसेच त्यांच्या दीर्घकाळ स्मरणात राहण्यास सुद्धा मदत होणार आहे.
2. शैक्षणिक संपादनाला सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये महत्त्वाचे स्थान निर्माण झाले आहे. सृजनशीलता व शैक्षणिक संपादन यातील सहसंबंधाचा शोध घेतल्यामुळे शैक्षणिक संपादन वाढविण्यासाठी सृजनशीलतेचा उपयोग होऊ शकतो हे समजणार आहे.

संशोधनाची गृहीतके

1. प्राथमिक शिक्षण स्तरामधील इयत्ता पहिली ते पाचवी मराठी पाठ्यपुस्तकातील आशय विद्यार्थी वयोगटास अनुरूप असा आहे.
2. सृजनशीलता वाढविता येते. (रॉबिन्सन केन 2001).
3. सृजनशीलता विविध क्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांमध्ये विकसित केली जाऊ शकते. (डेविस 2004).

संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट

प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध घेणे.

संशोधनाची व्याप्ती

1. प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषय अध्यापनासाठी उपयोगी आहेत.
2. मराठी विषयाचे अध्ययन -अध्यापन, मूल्यमापन यासाठी प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष मार्गदर्शक ठरणार आहेत.

संशोधनाच्या परिमर्यादा

1. प्रस्तुत संशोधन प्राथमिक शिक्षण स्तरावरील इयत्ता पाचवी मराठी माध्यमाच्या (प्रथम भाषा) पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित आहे.
2. प्रस्तुत संशोधन प्राथमिक शिक्षण स्तरावरील इयत्ता पाचवी मराठी पाठ्यपुस्तकातील आशयापुरते मर्यादित आहे.

3. कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शहरी भागातील व ग्रामीण भागातील शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये इयत्ता पाचवी वर्गाला अध्यापन करत असलेल्या/अध्यापन केलेल्या ३०० शिक्षकांपुरतेच मर्यादित आहे.

संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

मुळे, रां.श. व उमाठे, वि.तु. (1977), कुंडले, म.बा.(2008), धोंडगे, दिलीप (2000) प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये उपयोजन मराठी भाषिक कौशल्ये, सृजनशीलता निश्चितीसाठी या संदर्भ साहित्य व संशोधनाचा उपयोग झाला आहे. पंडित, बन्सी बिहारी व महाले, संजीवनी (2015) ,जगताप, ह.ना. (2022), कोल्हटकर, शीला (2011), गायकवाड, महेश (2010), Rajput, Archana (2018), खडसे, वर्षा (2019) R, Jayalakshmi (2019), Best, w. John & khan (2007) ,(2015), Best, w. John & khan (2007). गुणात्मक व संख्यात्मक पद्धती नमुना आकार, साधने व तंत्रे ,निवड, संशोधन साधने तयार करण्यासाठी मिश्र पद्धती , गुणात्मक व संख्यात्मक पद्धती प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये संदर्भ साहित्य व संशोधनाचा उपयोग झाला आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक शिक्षण स्तरावरील इयत्ता 5 वी मध्ये अध्ययन करत असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मराठी पाठ्यपुस्तकातील आशयावर आधारित सृजनशील कौशल्ये सद्य:स्थितीत कोणती आहेत हे जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

न्यादर्श निवड

संशोधनासाठी संभाव्यता पद्धतीमधील सहेतुक नमुना निवड पद्धतीने महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्याची निवड केली आहे. सर्वेक्षणासाठी नमुना निवड- कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील प्राथमिक शिक्षण स्तरावर अध्यापन करणाऱ्या 300 शिक्षकांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली आहे.

संशोधन साधन

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध घेण्यासाठी मुक्त व बद्ध स्वरूपाचे प्रश्न असलेल्या 'शिक्षक प्रश्नावलीचा' वापर केला आहे.

संख्याशास्त्रीय साधने : संशोधन साधनांद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करून करण्यात आले आहे.

शिक्षक प्रश्नावलीचे विश्लेषण

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध घेण्यासाठी प्राथमिक शिक्षकांसाठी प्रश्नावली विकसित केली व त्यामधून मिळालेल्या प्राप्त प्रतिसादांचे विश्लेषण गुणात्मक व संख्यात्मक स्वरूपात केले आहे ते खालीलप्रमाणे -

सारणी -1

सृजनशीलता म्हणजे काय? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	प्राप्त प्रतिसाद	प्रतिसादाचे प्रमाण	प्रतिसादक
1.	सृजनशीलता म्हणजे नवनिर्मिती.	जास्त प्रमाणात	90
2.	प्राप्त परिस्थितीमध्ये पूर्वीपेक्षा वेगळे, स्वतंत्र आणि उपयुक्त असे काहीतरी निर्माण करणे म्हणजे सृजनशीलता होय.	मध्यम प्रमाणात	20
	नावीन्यपूर्ण निर्माण करणे म्हणजे सृजनशीलता होय.		10
	सृजनशीलता म्हणजे वेगळा विचार, नवीन विचार, कल्पना, कृतींना उजाळा देणे होय.		7

निरीक्षण

वरील सारणी 1 वरून असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षण स्तरावरील सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी संशोधक विकसित शिक्षक प्रश्नावलीतील सृजनशीलता म्हणजे काय? या प्रश्नाला 'सृजनशीलता म्हणजे नवनिर्मिती होय' असा शब्द जास्तीत जास्त शिक्षकांनी वापरला असल्याचे दिसून येते. तसेच प्राप्त परिस्थितीमध्ये पूर्वीपेक्षा वेगळे, स्वतंत्र आणि उपयुक्त असे काहीतरी करणे म्हणजे सृजनशीलता होय, नावीन्यपूर्ण निर्माण करणे म्हणजे सृजनशीलता होय, सृजनशीलता म्हणजे वेगळा विचार, नवीन विचार, कल्पना असे मध्यम प्रमाणात शिक्षक म्हणताना दिसून येतात.

सारणी -2

सृजनशीलतेचे कोणते घटक मराठी विषयाच्या माध्यमातून विकसित करता येतात?

या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	पर्याय	प्रतिसादक	शेकडा प्रमाण
1.	प्रवाहित्व	8	2.67%
2.	लवचीकता	105	35.00 %
3.	मौलिकता	75	25.00 %
4.	स्पष्टीकरण, विस्तार किंवा पूर्ती	222	74.00 %

निरीक्षण

वरील सारणी 2 वरून असे दिसून येते की, शिक्षक प्रश्नावलीतील सृजनशीलतेचे कोणते घटक मराठी विषयाच्या माध्यमातून विकसित करता येतात? या प्रश्नाला दिलेल्या पर्यायांपैकी 'प्रवाहित्व' या पर्यायाला 8 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्यांचे शेकडा प्रमाण 2.67% इतके आहे. तसेच 'लवचीकता' या पर्यायाला 105 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्याचे शेकडा प्रमाण 35.00 % इतके आहे. तसेच 'मौलिकता' या पर्यायाला 75 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्याचे शेकडा प्रमाण 25.00 % इतके आहे. व 'स्पष्टीकरण, विस्तार किंवा पूर्ती' या पर्यायाला 222 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्याचे शेकडा प्रमाण 74.00 % इतके आहे.

सारणी- 3

सृजनशीलतेची कोणती तंत्रे / विकास पद्धती वापरता? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	पर्याय	प्रतिसादक	शेकडा प्रमाण
1.	बुद्धिमंथन	69	23.00%
2.	भिन्नान्वयन	88	29.33%
3.	गुणधर्म सूचीकरण	90	62.06%
4.	वरीलपैकी सर्व	98	32.66%

निरीक्षण

वरील सारणी 3 वरून असे दिसून येते की, सृजनशीलतेची कोणती तंत्रे / विकास पद्धती वापरता? या प्रश्नाला दिलेल्या पर्यायांपैकी 'बुद्धिमंथन' या पर्यायाला 69 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्याचे शेकडा प्रमाण 23.00% आहे. तसेच 'भिन्नान्वयन' या पर्यायाला 88 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्यांच्या शेकडा प्रमाण 29.33% इतके आहे. 'गुणधर्म सूचीकरण' या पर्यायाला 90 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्याचे शेकडा प्रमाण 62.06% आहे.

सारणी- 4

सृजनशील विद्यार्थ्यांमध्ये कोणती गुणवैशिष्ट्ये असतात? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	पर्याय	प्रतिसादक	शेकडा प्रमाण
1.	स्वतः निर्णय घेण्याची क्षमता	214	71.33%
2.	इतरांपेक्षा वेगळा विचार करण्याची क्षमता	243	81.00 %
3.	चौकस व शोधक वृत्ती	259	86.33%
4.	बहुमार्गी विचार करणे	188	62.67 %

निरीक्षण

वरील सारणी 4 वरून असे दिसून येते की, सृजनशील विद्यार्थ्यांमध्ये कोणती गुणवैशिष्ट्ये असतात? या प्रश्नाला दिलेल्या पर्यायांपैकी 'स्वतः निर्णय घेण्याची क्षमता' या पर्यायाला 214 शिक्षकाने प्रतिसाद दिलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण 71.33% आहे. तसेच 'इतरांपेक्षा वेगळा विचार करण्याची क्षमता' या पर्यायाला 243 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्यांचे शेकडा प्रमाण 81.00% इतके आहे. 'चौकस व शोधक वृत्ती' या पर्यायाला 259 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्यांच्या शेकडा प्रमाण 86.33% इतके आहे. तसेच 'बहुमार्गी विचार करणे' या पर्यायाला 188 शिक्षकांनी प्रतिसाद दिला असून त्यांचे शेकडा प्रमाण 62.67% इतके आहे.

सारणी- 5

विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता टिकून राहण्यासाठी प्रयत्न करता का? उत्तर होय असल्यास कोणते? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	प्राप्त प्रतिसाद	प्रतिसादाचे प्रमाण	प्रतिसादक
1.	होय	जास्त प्रमाणात	181
2.	प्रवास, क्षेत्रभेट, असे नावीन्यपूर्ण उपक्रम (सहली, चित्रकला, निसर्ग भेट, साहित्यनिर्मिती, कार्यानुभव, क्षेत्रभेट इ.)	मध्यम प्रमाणात	43
	स्वतः व्यक्त होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे.		14
	चित्रवर्णन, चित्रकला, चित्रलेखन, चित्रकथा, चित्ररेखाटन असे उपक्रम		14
	म्हणी, वाक्प्रचार यांचा शोध घेणे, कथा, कविता, निबंध यांची निर्मिती		13
	विविध खेळ, भाषिक खेळ, कोडी		11

निरीक्षण

वरील सारणी 5 वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता टिकून राहण्यासाठी प्रयत्न करता का? तर होय असल्यास कोणते? या प्रश्नाला 'होय' असा प्रतिसाद जास्तीत जास्त शिक्षकांनी दिला असल्याचे दिसून येते. 'प्रवास, क्षेत्रभेट, असे नावीन्यपूर्ण उपक्रम (सहली, चित्रकला, निसर्ग भेट, साहित्यनिर्मिती, कार्यानुभव, क्षेत्रभेट इ. स्वतः व्यक्त होण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, चित्रवर्णन, चित्रकला, चित्रलेखन, चित्रकथा, चित्र रेखाटन असे उपक्रम, म्हणी, वाक्प्रचार यांचा शोध घेणे, कथा, कविता, निबंध यांची निर्मिती, विविध खेळ, भाषिक खेळ, कोडी घेतो असे मध्यम प्रमाणात शिक्षक म्हणताना दिसून येते.

सारणी- 6

विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी वेगळे उपक्रम राबवता का? उत्तर होय असल्यास कोणते? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	प्राप्त प्रतिसाद	प्रतिसादाचे प्रमाण	प्रतिसादक
1.	होय	जास्त प्रमाणात	182
2.	कथाकथन	मध्यम प्रमाणात	27
	प्रकल्प		23
	चर्चासत्र		19
	कविता तयार करणे		19
	निबंध स्पर्धा		12
	चित्रकला स्पर्धा		10
	वक्तृत्व स्पर्धा		10

निरीक्षण

वरील सारणी 6 वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील कौशल्ये विकसित व्हावीत त्यासाठी वेगळे उपक्रम राबवता का? उत्तर होय असल्यास कोणते? या प्रश्नाला 'होय' असा प्रतिसाद जास्तीत जास्त शिक्षकांनी दिला असल्याचे दिसून येते. कथाकथन, प्रकल्प, चर्चासत्र, कविता तयार करणे, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेतो असे मध्यम प्रमाणात शिक्षक म्हणताना दिसतात.

सारणी- 7

एखादा विद्यार्थी सृजनशील आहे याचा शोध कशा पद्धतीने घेता? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	प्राप्त प्रतिसाद	प्रतिसादाचे प्रमाण	प्रतिसादक
1.	नवीन दृष्टिकोन, कल्पना, नवीन शिकण्याची इच्छा, नवीन काहीतरी करतो.	जास्त प्रमाणात	20
	शोधक वृत्ती व चौकस वृत्ती असणारा		18
	निरीक्षणातून शोध		11
2.	नावीन्याची आवड, चित्रकलेची आवड, प्रकल्प कसा तयार करतो.	मध्यम प्रमाणात	7

निरीक्षण : वरील सारणी 7 वरून असे दिसून येते की, एखादा विद्यार्थी सृजनशील आहे याचा शोध घेण्यासाठी 'नवीन दृष्टिकोन, कल्पना, नवीन शिकण्याची इच्छा, नवीन काहीतरी करतो', शोधक वृत्ती व चौकस वृत्ती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध निरीक्षणातून घेतो असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. नावीन्याची आवड, चित्रकलेची आवड, प्रकल्प कसा तयार करतो असे मध्यम प्रमाणात शिक्षक म्हणताना दिसून येते.

सारणी- 8

भाषिक कौशल्याबाबत उपक्रम राबवताना सृजनशीलता विकसनामध्ये पाठ्यपुस्तकातील प्रमाणभाषा मारक ठरते असे वाटते का? या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	पर्याय	प्रतिसादक	शेकडा प्रमाण
1.	होय	49	16.33%
2.	नाही	146	48.67%
3.	क्वचित	57	19.00%
4.	कधीकधी	32	10.67%

निरीक्षण

वरील सारणी 8 वरून असे दिसून येते की,भाषिक कौशल्याबाबत उपक्रम राबवताना सृजनशीलता विकसनामध्ये पाठ्यपुस्तकातील प्रमाणभाषा मारक ठरते असे वाटते का? या प्रश्नाला 'होय' असा प्रतिसाद 49 शिक्षकांनी दिला असून त्यांचे शेकडा प्रमाण 16.33% इतके आहे. तसेच 'नाही' असा प्रतिसाद 146 शिक्षकांनी दिला असून त्यांचे शेकडा प्रमाण 48.67% इतके आहे.

सारणी- 9

विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकसनामध्ये कोणकोणते अडथळे येतात असे आपणास वाटते?

या प्रश्नाला प्राप्त प्रतिसादाचे विश्लेषण

अ.क्र.	प्राप्त प्रतिसाद	प्रतिसादाचे प्रमाण	प्रतिसादक
1.	मनात शिक्षकांची भीती	जास्त प्रमाणात	21
	शारीरिकदृष्ट्या दुर्बलता		19
	घरातील / कौटुंबिक वातावरण		18
	आर्थिक दुर्बलता		12
2.	सामाजिक विषमता	मध्यम प्रमाणात	6
	वेळेची कमतरता		6
	विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड		6
	शैक्षणिक साधनांचा अभाव		5
	पालकांची उदासीनता		5
	विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी असणे.		5
	पुरेशा सोयी- सुविधांचा अभाव		5

निरीक्षण

वरील सारणी 9 वरून असे दिसून येते की, विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकसित होण्यामध्ये मनात शिक्षकांची भीती, शारीरिकदृष्ट्या दुर्बलता, घरातील / कौटुंबिक वातावरण, आर्थिक दुर्बलता हे अडथळे येतात असे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त आहे. तसेच सामाजिक विषमता, वेळेची कमतरता, विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड, शैक्षणिक साधनांचा अभाव, पालकांची उदासीनता, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास कमी असणे, पुरेशा सोयी- सुविधांचा अभाव हे अडथळे येतात असे मध्यम प्रमाणात शिक्षक म्हणताना दिसून येते.

सारणी – 10

सृजनशील कौशल्ये दर्शविणाऱ्या कृती / उपक्रम

अ.क्र.	उद्दिष्ट	सृजनशील कौशल्ये दर्शविणाऱ्या कृती / उपक्रम
1.	स्मरण (Remembering)	रोजनिशी इ.
2.	आकलन (Understanding)	अवांतर वाचन, निरीक्षणातून शोध, प्रश्नांचे सविस्तर स्पष्टीकरण देणे, वैयक्तिक मार्गदर्शन, सामूहिक मार्गदर्शन, वाचन कोपरा, ग्रंथालय / वाचनालय, विविध मासिके उपलब्ध करून देणे, बातम्यांचे प्रकटवाचन, श्रुतलेखन, अनुलेखन, शब्दकोडी, वाचन कट्टा आठवडी बाजारातील संवाद इ.
3.	उपयोजन करणे (Applying)	निबंधलेखन, पत्रलेखन, चित्रवर्णन, कथाकथन, नाट्यीकरण, प्रकल्प, हस्तकला, मुक्त संवाद, स्वतःचे मत व्यक्त करण्याची संधी,

		बालसभा, बातमीलेखन, कविता गायन, परिपाठ, प्रश्नमंजुषा, तोंडी परीक्षा, गटचर्चा, चर्चासत्रे, आभासी मुलाखत, आठवडे बाजार, संवाद / परिसंवाद, शालेय उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना संधी इ.
4.	विश्लेषण करणे (Analyzing)	कथा, गोष्टी, गाणी ऐकवणे, बालगीते ऐकवणे, रेडिओवरील गाणी ऐकवणे, छोटे- छोटे संभाषण, विद्यार्थ्यांच्या सृजनशील मतांचा आदर, अपेक्षित प्रतिसाद, विद्यार्थ्यांमधील न्यूनगंड, आत्मविश्वास कमी असणे, शैक्षणिक साधनांचा अभाव, पुरेशा सोयी सुविधांचा अभाव, पालकांची उदासीनता, आर्थिक दुर्बलता, सामाजिक विषमता, पालक मेळावा, जनजागृती इ.
5.	मूल्यमापन करणे (Evaluating)	निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, तोंडी परीक्षा, वाचन स्पर्धा, अभिनंदन करणे, शाबासकी देणे, प्रेरणा देणे, गुणगौरव करणे, चॉकलेट देणे, बक्षीस देणे, कौतुक करणे, चित्रकला स्पर्धा इ.
6.	नवनिर्मिती (Creating)	नवीन कविता तयार करावयास लावणे, नवोपक्रम, वर्ग सजावट, प्रकल्प, अर्धवट गोष्ट / प्रसंग पूर्ण करण्यास सांगणे इ.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक शिक्षण स्तरावरील सद्य:स्थिती जाणून घेण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या शिक्षक प्रश्नावलीतील सर्व प्रश्नांचा आढावा घेतला. शाळेतील शिक्षक सृजनशीलतेशी संबंधित कोणत्या बाबी विद्यार्थ्यांकडून करून घेतात याचे ब्लूम यांच्या सुधारित उद्दिष्टांच्या श्रेणीबद्ध संरचनेनुसार विश्लेषण केले आहे. वरील सारणी 10 च्या निरीक्षणावरून असे दिसून येते की, अत्यल्प प्रमाणात शिक्षकांच्या सृजनशीलतेच्या अनुषंगाने मिळालेल्या प्रतिसादावरून नवीन कविता तयार करावयास लावणे, नवोपक्रम, वर्ग सजावट, प्रकल्प, अर्धवट गोष्ट / प्रसंग पूर्ण करण्यास सांगणे इत्यादी बाबी शिक्षक विद्यार्थ्यांकडून करून घेतात असे दिसून येते.

निष्कर्ष

मुख्य उद्दिष्ट

प्राथमिक शिक्षण स्तरावरील मराठी विषयामधून सद्य:स्थितीत विकसित केल्या जाणाऱ्या सृजनशील कौशल्यांचा शोध घेणे.

1. सृजनशीलतेचा जुजबी अर्थ जास्तीत जास्त शिक्षकांनी देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. सृजनशीलता म्हणजे काय हे स्वतःच्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे सृजनशीलतेचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे गरजेचे आहे असे वाटते. (सारणी -1)
2. सृजनशीलतेचे कोणते घटक मराठी विषयाच्या माध्यमातून विकसित करता येतात? या प्रश्नातील 'स्पष्टीकरण, विस्तार किंवा पूर्ती' या पर्यायाला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक असून 'प्रवाहित्व' या पर्यायाला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. (सारणी -2)
3. सृजनशीलतेची कोणती तंत्रे / विकास पद्धती वापरता? या प्रश्नातील 'वरीलपैकी सर्व' या पर्यायाला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक असून 'बुद्धिमंथन' या विकास पद्धतीला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. काही शिक्षकांनी परिसंवाद, पाठांतर व सराव, वादविवाद या सृजनशीलतेच्या विकास पद्धती सांगितलेल्या आहेत परंतु या अध्ययन-अध्यापनाच्या पद्धती आहेत. 'बुद्धिमंथन' ही विकास पद्धती सृजनशील विकसनाच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. परंतु याला शिक्षकांचा प्रतिसाद कमी प्रमाणात मिळाल्याचे दिसून येते. (सारणी -3)

4. सृजनशील विद्यार्थ्यांमध्ये कोणती गुणवैशिष्ट्ये असतात? या प्रश्नातील 'चौकस व शोधक वृत्ती' या गुणवैशिष्ट्याला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक असून 'बहुमार्गी विचार करणे' या गुणवैशिष्ट्याला प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. 'बहुमार्गी विचार करणे' हे सृजनशीलतेचे महत्त्वाचे गुणवैशिष्ट्ये आहे. आणि हे गुणवैशिष्ट्य सृजनशील विद्यार्थ्यांमध्ये असणे खूप गरजेचे आहे परंतु याला शिक्षकांचा प्रतिसाद कमी प्रमाणात मिळाल्याची दिसून येते. (सारणी -4)
5. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता टिकून राहण्यासाठी प्रयत्न करतो म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे परंतु सृजनशीलता टिकून राहण्यासाठी मुलांना स्वतःला व्यक्त होण्याची संधी दिली पाहिजे तसेच नवनवीन विषय देऊन त्यांच्या कल्पनाविस्ताराला संधी दिली पाहिजे, शाळेमध्ये घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये संधी दिली पाहिजे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा घेऊन त्यांच्या सृजनशीलतेला वाव देणे गरजेचे आहे असे वाटते. (सारणी -5)
6. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील कौशल्ये विकसित व्हावीत त्यासाठी वेगळे उपक्रम घेतो म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त आहे. परंतु शाळेमध्ये शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकल्प करण्यास सांगणे, विविध पाठ्यघटकांवर आधारित नाट्यीकरण करून घेणे, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेणे, विविध नवोपक्रम करण्याची संधी दिली पाहिजे. संवाद / परिसंवाद घडवून आणला पाहिजे, नवीन कविता तयार करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे, वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा घेतल्या पाहिजेत, चर्चासत्रे घेतली पाहिजेत तसेच आठवडे बाजार व वर्ग सजावट असे उपक्रमदेखील सृजनशील कौशल्ये विकसित होण्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. तर शिक्षकांनी अशा प्रकारचे जास्तीत जास्त उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांमध्ये सृजनशील कौशल्ये विकसित केली पाहिजेत असे वाटते. (सारणी -6)
7. शिक्षकांनी विद्यार्थी सृजनशील आहे याचा शोध घेण्यासाठी विविध कृती / उपक्रम सांगितलेल्या आहेत परंतु विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नेतृत्व क्षमता असणे, त्याच्या कृतीमध्ये वेगळेपणा असणे, एखादी समस्या / घटना यावरती इतरांपेक्षा वेगळा विचार मांडता येणे या गोष्टीसुद्धा महत्त्वाच्या आहेत. सृजनशील विद्यार्थ्यांचा शोध घेताना शिक्षकांनी याही गोष्टींचा जास्तीत जास्त विचार केला पाहिजे असे वाटते. (सारणी -7)
8. भाषिक कौशल्याबाबत उपक्रम राबवताना सृजनशीलता विकसनामध्ये पाठ्यपुस्तकातील प्रमाणभाषा मारक ठरते असे वाटते का? या प्रश्नाला 'नाही' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त असून 'कधीकधी' असा प्रतिसाद देणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प आहे. यावरून सृजनशीलता विकसनामध्ये पाठ्यपुस्तकातील प्रमाणभाषा मारक ठरत नाही असे दिसून येते. (सारणी -8)
9. विद्यार्थी, शिक्षक, पालक, प्रशासन यांना सृजनशील विकसनामध्ये अडथळे येतात असे दिसून येते. हे अडथळे दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत व विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता कशी विकसित करता येईल यादृष्टीने विचार केला पाहिजे. (सारणी -9)
10. अत्यल्प प्रमाणात शिक्षकांच्या सृजनशीलतेच्या अनुषंगाने मिळालेल्या प्रतिसादावरून नवीन कविता तयार करावयास लावणे, नवोपक्रम, वर्ग सजावट, प्रकल्प, अर्धवट गोष्ट / प्रसंग पूर्ण करण्यास सांगणे इत्यादी बाबी शिक्षक विद्यार्थ्यांकडून करून घेतात असे दिसून येते. (सारणी - 10)

समारोप

प्रस्तुत संशोधनातून सृजनशील कौशल्यांची सद्य:स्थिती लक्षात घेता सृजनशील कौशल्यांच्या विकसनासाठी अध्यापन पद्धती,कार्यनीती विकसित करणे व त्याचे प्रशिक्षण शिक्षकांना देणे गरजेचे आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. आगलावे, प्रदीप. (2000). *संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे.* नागपूर: विद्या प्रकाशन.
2. कुंडले, म.बा. (1997). *मराठीचे अध्यापन.* पुणे: श्री विद्या प्रकाशन.
3. कुंडले,म.बा.(एप्रिल 2008). *सर्जनशीलता* .पुणे: नित्य नूतन प्रकाशन.

4. खडसे, वर्षा दिलीपराव .(2019). *विद्यार्थ्यांच्या भाषिक सर्जनशीलता विकासात भाषिक सृजनशील विकास कार्यक्रमाची उपयुक्तता एक प्रायोगिक अभ्यास.* (पीएच.डी.शोध प्रबंध ,कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ,रामटेक, भारत). Retrieved from http://hdl.handle.net/10603/287673.
5. जगताप, ह.ना. (2022). *शैक्षणिक संशोधन.* कोल्हापूर: फडके प्रकाशन.
6. जुनगरे, रेखा ज.(2001). *हिंदी भाषेतील (राष्ट्रभाषा) प्राविण्यांचा वाड:मयीन सृजनशीलता आणि भाषिक क्षमता यांच्या संबंधांचा अभ्यास.* (पीएच.डी. शोध प्रबंध शिक्षणशास्त्र,अमरावती विद्यापीठ,अमरावती ,भारत). Retrieved from http://hdl.handle.net/10603/72935
7. पंडित, बन्सी बिहारी.(फेब्रुवारी 2010). *शिक्षणातील संशोधन.*पुणे. नित्य नूतन प्रकाशन.
8. राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद. (2014). *शिक्षक और अधिगम की सृजनात्मक पद्धतियां (माध्यमिक स्तर के शिक्षकों के लिए संदर्शिका*). नई दिल्ली : एन.सी.आर.टी. प्रकाशन विभाग.
9. शैक्षिक मनोविज्ञान और शिक्षा आधार विभाग राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद. (2009). *सृजनात्मकता के लिए शिक्षा अध्यापक- प्रशिक्षकों के लिए स्रोत पुस्तक.* नई दिल्ली: एन.सी.ई.आर.टी. प्रकाशन विभाग.
10. Best, J.W.(2007). *Research in Education, (Ninth edition).* New Delhi: Prentice Hall.
11. Bhatia, H.R.(1968). *Elements of Educational Psychology*. Calcutta: Oreint Longman.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

पर्यटनाची वाढ आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

प्रा. डॉ. देविदास विक्रम हारगिले
(प्राध्यापक)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स.का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय,
मालवण,ता.मालवण,जि.सिंधुदुर्ग.पिन-४१६६०६,
Email - dvhargile@gmail.com

गोषवारा :-

पर्यटन हा जगभरातील आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा चालक म्हणून उदयास आला आहे, ज्याचा स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे. पर्यटकांच्या वाढीमुळे केवळ विविध क्षेत्रांना चालना मिळत नाही तर रोजगाराच्या संधी निर्माण होतात, पायाभूत सुविधा वाढतात आणि सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवते. सर्वप्रथम, पर्यटन, निवास, वाहतूक, अन्न आणि करमणूक यावरील खर्चाद्वारे अर्थव्यवस्थेत नवीन भांडवल टाकते. खर्चाचा हा ओघ अर्थव्यवस्थेत वाढतो, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सपासून स्मरणिका दुकाने आणि टूर ऑपरेटर्सपर्यंत असंख्य व्यवसायांना फायदा होतो. परिणामी, वाढत्या मागणीमुळे उच्च महसूल आणि नफा वाढतो, ज्यामुळे पुढील गुंतवणूक आणि विस्तारास प्रोत्साहन मिळते. शिवाय, पर्यटन रोजगार निर्मितीसाठी, विशेषत: आदरातिथ्य, वाहतूक आणि किरकोळ यांसारख्या क्षेत्रांमध्ये एक शक्तिशाली उत्प्रेरक म्हणून काम करते. पर्यटकांच्या ओघाने त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या श्रमशक्तीची गरज भासते, ज्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण कमी होते आणि घरगुती उत्पन्नात वाढ होते. याव्यतिरिक्त, पर्यटन उद्योग विविध रोजगाराच्या संधी प्रदान करतो, प्रवेश-स्तरीय पदांपासून ते विशेष भूमिकांपर्यंत, ज्यामुळे सर्वसमावेशक वाढ आणि सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळते. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात पर्यटनाची वाढ आणि त्याचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

संकल्पनात्मक शब्दाचे अर्थ *- आर्थिक पर्यटन, जीवनशैली, सर्वसमावेशक, विदेशी मुद्रा विनिमय, सांस्कृतिक क्षरण इ.*

प्रस्तावना :-

पर्यटन हा जगाचा झपाट्याने विकसित होणारा उद्योग असू शकतो. सर्वसमावेशक सामाजिक आर्थिक सुधारणेसाठी ती एक मजबूत मोटर म्हणून व्यापक मान्यता मिळवत आहे कारण त्याने केलेल्या व्यवसायाच्या सुरुवातीमुळे आणि त्याचा परिणाम म्हणून पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा. भारतातील पर्यटन प्रदीर्घ काळापासून हळूहळू निर्माण झाले आहे. पर्यटन हे पर्यटक आणि यजमान समाज यांच्यातील परस्परसंवाद असल्याने, यजमान समुदायांची केवळ सामाजिक-आर्थिक परिस्थितीच बदलत नाही, तर त्यांची मूल्य प्रणाली देखील सुधारते. पर्यटनामुळे वैयक्तिक आणि सामूहिक मूल्य प्रणाली, वर्तन पद्धती, सामाजिक संरचना, लोकांची जीवनशैली आणि त्यांच्या जीवनाचा दर्जा यामध्ये बदल होतो. शिवाय, विमानतळ, रस्ते आणि हॉटेल्स यांसारख्या पर्यटन पायाभूत सुविधांचा विकास केवळ अभ्यागतांचा अनुभवच वाढवत नाही तर स्थानिक समुदायांनाही फायदा होतो. सुधारित पायाभूत सुविधा केवळ पर्यटनालाच सुविधा देत नाही तर अभ्यागत आणि गुंतवणूकदार दोघांसाठीही गंतव्यस्थानाचे एकूण आकर्षण वाढवते. परिणामी, पर्यटनाच्या आर्थिक फायद्यांचे भांडवल करण्यासाठी सरकार अनेकदा लोकप्रिय पर्यटन स्थळांमध्ये पायाभूत सुविधा प्रकल्पांना प्राधान्य देतात. तथापि, त्याच्या असंख्य फायद्यांबरोबरच, अनियंत्रित पर्यटन वाढीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास, सांस्कृतिक कमोडिफिकेशन आणि अतिपर्यटन यासारखी आव्हाने निर्माण होऊ शकतात. हे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी आणि उद्योगाची दीर्घकालीन व्यवहार्यता सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार संसाधन व्यवस्थापन, समुदायाचा सहभाग आणि सांस्कृतिक संरक्षण यासह शाश्वत पर्यटन पद्धती आवश्यक आहेत.

संशोधनाची उद्दीष्टये :-

१) पर्यटनाचा अर्थव्यवस्थेवर नकारात्मक व सकारात्मक परिणाम समजावून घेणे.

२) रोजगार निर्मिती व आर्थिक विकासाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) पर्यटनाच्या वाढीचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून होणाऱ्या परिणामाचा शोध घेणे.

४) अर्थशास्त्रातील तंत्रज्ञानाचा प्रसार, व्यापार आणि परस्परावलंबन या घटकांचा परस्पर संबंध लक्षात घेणे.

संशोधनाची गृहितके :-

१) पर्यटन क्षेत्राचे निश्चित स्वरूप आहे आणि जागतिक उद्योग, जगभरातील सेवा उद्योगाचे मुख्य योगदान आहे.

२) भारतीय पर्यटन उद्योग आणि अर्थशास्त्राच्या वाढीचे नियमन करणाऱ्या संबंध आणि कारणात्मक घटनांमुळे राष्ट्रीय उत्पन्न आणि भारतीय देशाच्या विकासावर तर्कशुद्ध परिणाम होतो.

३) भारतीय पर्यटनात कमालीची घट झाली आहे, ज्याचा रोजगारावर परिणाम झाला आहे

४) गेल्या काही वर्षात प्रचंड बेरोजगारी वाढली आहे, सुमारे ६५ टक्के लोकांनी पर्यटन क्षेत्रातून नोकरी गमावली आहे.

पर्यटन व आर्थिक वाढ -

भारतातील पर्यटन हा देशाच्या सर्वसमावेशक आणि शाात विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. देशांतर्गत आणि परदेशी प्रवाशांमध्ये भारताला सर्वाधिक पसंतीचे ठिकाण बनण्यात यश आले आहे. पर्यटनामुळे आंतरराष्ट्रीय प्रवाशांना भारताच्या विविधतेतील एकतेचे तत्त्वज्ञान दिसून येते. इतर अनेक विकसनशील अर्थव्यवस्थांप्रमाणेच परकीय चलन निर्माण करण्यात, रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आणि भारतीयांसाठी घरगुती उत्पन्न निर्माण करण्यात पर्यटन क्षेत्राने अनेक वर्षांपासून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासाची संधी उपलब्ध झाली आहे आणि प्रादेशिक आणि आर्थिक विकासाला मदत झाली आहे. अशा प्रकारे, पर्यटन क्षेत्राचा विकास भारतीय अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांच्या विकासाइतकाच महत्त्वाचा असल्याचे दिसून येते.

भारतातील पर्यटन हे पगार आणि कामाच्या युगातील निराधारपणा कमी करणारे आणि व्यवहार्य मानवी प्रगतीचे साधन म्हणून उदयास आले आहे. प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन क्षेत्र खूप महत्त्वाची भूमिका बजावते. हे क्षेत्र वाढत आहे आणि प्रत्येक देशाची स्वतःची मूल्ये संस्कृती स्मारके आणि विविध ठिकाणे आणि इत्यादी आहेत त्यामुळे पर्यटक इतर देशांच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि गोष्टींकडे आकर्षित होतात जेणेकरून आपण उत्पन्न वाढवू आणि उत्तेजित करू शकू.

पर्यटनाची वाढीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा सकारात्मक परिणाम

भारत सरकार पर्यटन विभागाच्या माध्यमातून अधिक दूरगामी आणि अप्रत्यक्ष मार्गांनी पैसे गोळा करते जे विशिष्ट उद्यानांशी जोडलेले नाहीत किंवा संवर्धन क्षेत्र. वापरकर्ता शुल्क, आयकर, करमणूक उपकरणांच्या विक्रीवर किंवा भाड्याने देणे आणि राफ्टिंग आणि मासेमारी यांसारख्या क्रियाकलापांसाठी परवाना शुल्क सरकारला नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक निधी प्रदान करू शकतात. पर्यटनाचा अर्थव्यवस्थेवर अनेक प्रकारे सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

१. **रोजगार निर्मिती :-** पर्यटन क्षेत्रामध्ये रोजगार निर्मिती हे सर्वात पहिले आहे कारण पर्यटनामुळे प्रत्येक क्षेत्रात लहान-मोठ्या प्रत्येक अदृश्य सेवा, जसे- पर्यटक, मार्गदर्शक, प्रवास, तिकीट आणि हाताने बनवलेल्या वस्तू आणि राहण्याची सोय उपलब्ध करून दिली जाते. आंतरराष्ट्रीय पायाभूत सुविधांचा विकास पर्यटनाचा बहु-वापर फ्रेमवर्कच्या प्रगतीला सक्षम बनवण्याचा प्रकल्प आहे ज्यामुळे समुदायाला फायदा होतो, वाहतूक, वेलबीईंग केअर ऑफिसेस आणि स्पोर्ट्स सेंटर्सचे वेगवेगळे अर्थ मोजणे, दूरस्थ अतिथींना सेवा देणाऱ्या इन्स आणि हाय-एंड भोजनालयांचा विस्तार करणे.

२. **परकीय चलन सुधारेल:** पर्यटन हा भारतातील बाह्य व्यापार नफ्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. याचा राष्ट्राच्या हप्त्याच्या समायोजनावर अनुकूल परिणाम होतो. विदेशी मुद्रा विनिमय परिवर्तनीयतेसाठी हे खूप उपयुक्त आहे प्रत्येक देश त्यांच्या विविध प्रकारच्या निसर्ग आणि पर्यावरणीय घटनांमुळे एकमेकांना आकर्षित करतो म्हणून या पैशाची देवाणघेवाण फॉरेक्स एक्सचेंजसाठी खूप महत्वाची आहे. पर्यटन स्थानिक अर्थव्यवस्थेत विविधता आणू शकते, ज्यामुळे अधिक स्थानिक उत्पादन आणि स्थानिक व्यवसायांसाठी नवीन बाजारपेठ निर्माण होऊ शकते.

३. **गरिबी कमी करणे** : पर्यटनामुळे उत्पन्न आणि संपत्ती वाढून गरिबी कमी होण्यास मदत होते. तथापि, रहिवासी आणि अभ्यागत दोघांनाही दीर्घकालीन लाभ सुनिश्चित करण्यासाठी पर्यटन वाढ शाातपणे व्यवस्थापित करणे महत्त्वाचे आहे. यामध्ये पर्यावरणीय, सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांचा समावेश असू शकतो.

४. **जीवनमान सुधारणे** : एखाद्या व्यक्तीचे आणि देशांतील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी पर्यटन क्षेत्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, पर्यटनातून आपण प्रत्येक वेगवेगळ्या देशाच्या ठिकाणी फिरतो, त्यांची मूल्ये आणि संस्कृती, समज समजून घेतो, त्यामुळे आपण आपले जीवनमान उंचावले आहे.

५. **उद्योजक विकसित होतो** : पर्यटन क्षेत्रातून, आपण उद्योजक बनवतो किंवा बनवतो, कारण हे क्षेत्र रोजगार प्रदान करते आणि एखाद्या व्यक्तीला स्टार्ट-अपसाठी पुढाकार घेण्यास प्रोत्साहन देते. प्रत्येक देशात पर्यटन हा एक वेगळा उद्योग आणि वाढणारे क्षेत्र आहे.

६. **सांस्कृतिक पुनरुज्जीवन** : पर्यटन स्थानिक संस्कृतींचे पुनरुज्जीवन करण्यास आणि शिक्षणास प्रोत्साहन देण्यास मदत करू शकते

७. **पायाभूत सुविधांचा विकास** :- पर्यटनामुळे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी मिळू शकतो. परकीय चलन: पर्यटनामुळे देशाला परकीय चलन मिळू शकते.

पर्यटनाची वाढीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा नकारात्मक परिणाम

पर्यटनावरील अति अवलंबित्वामुळे अनेक नकारात्मक आर्थिक परिणाम होऊ शकतात, यासह:

१. **आर्थिक असुरक्षितता** : पर्यटनावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्था अनेकदा नैसर्गिक आपत्ती, राजकीय अस्थिरता किंवा साथीच्या रोगांसारख्या जागतिक घटनांसारख्या बाह्य धक्क्यांना बळी पडतात. पर्यटकांच्या आगमनात घट झाल्याने लक्षणीय आर्थिक मंदी येऊ शकते.

२. **हंगामीता** : पर्यटन हे अत्यंत हंगामी असू शकते, ज्यामुळे व्यवसाय आणि कामगारांच्या उत्पन्नात चढ-उतार होऊ शकतात. यामुळे रोजगार आणि उत्पन्नाच्या पातळीवर अस्थिरता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे समुदायांना वर्षभर आर्थिक आरोग्य टिकवून ठेवणे कठीण होते.

३. **संसाधनांचा ताण** : जास्त पर्यटकांच्या संख्येमुळे पाणी, ऊर्जा आणि पायाभूत सुविधांसह स्थानिक संसाधनांवर ताण येऊ शकतो. यामुळे स्थानिक रहिवासी आणि व्यवसायांसाठी वाढीव खर्च होऊ शकतो आणि स्थानिक लोकांच्या जीवनाचा दर्जा खालावू शकतो.

४. **किमतीची चलनवाढ** : पर्यटकांचा ओघ वस्तू आणि सेवांच्या किमती वाढवू शकतो, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांना त्यांच्या स्वतःच्या समुदायात राहणे अधिक महाग होते. यामुळे सामाजिक असमानता वाढू शकते आणि स्थानिकांमध्ये नाराजी निर्माण होऊ शकते.

५. **पर्यावरणाचा ऱ्हास** : अति-पर्यटनामुळे पर्यावरणीय समस्या जसे की अधिवासाचा नाश, प्रदूषण आणि वाढलेले कार्बन उत्सर्जन होऊ शकते. हे स्थानिक परिसंस्थेला हानी पोहोचवू शकते आणि भविष्यातील अभ्यागतांसाठी परिसराचे आकर्षण कमी करू शकते.

६.**सांस्कृतिक क्षरण** : पर्यटनावर अधिक लक्ष केंद्रित केल्याने स्थानिक संस्कृती आणि परंपरांचे व्यापारीकरण होऊ शकते आणि त्यांची सत्यता कमी होऊ शकते. समुदाय पर्यटकांच्या मागण्या पूर्ण करत असल्याने ते त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे पैलू गमावू शकतात.

७. **मर्यादित आर्थिक विविधीकरण** : पर्यटनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्था इतर क्षेत्रांकडे दुर्लक्ष करू शकतात, ज्यामुळे ते पर्यटन बाजारपेठेतील बदलांना कमी लवचिक बनवतात. विविधीकरणाचा हा अभाव एकूणच आर्थिक वाढ आणि विकासात अडथळा आणू शकतो.

८. **अवांछित सामाजिक आणि सांस्कृतिक बदल**: पर्यटन काही प्रकरणांमध्ये समुदायाच्या सामाजिक पोत नष्ट करण्यासाठी प्रेरित. पुटमध्ये जितके जास्त प्रेक्षणीय प्रेक्षक येतात, तितकाच त्या पुटचा वर्ण गमावण्याचा धोका जास्त

असतो. गोव्याचे मोठे प्रकरण आहे. ६० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून ते ८० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत जेव्हा हिप्पी संस्कृती आपल्या उंचीवर होती, तेव्हा गोवा हे अशा गैर-अनुरूपवाद्यांसाठी सुरक्षित घर होते. येथे ते हजारोंच्या संख्येने आले आणि त्यांनी ड्रग्ज, वेश्याव्यवसाय आणि मानवी तस्करी यांच्या वापरात वाढ करण्यासाठी राज्यातील ड्रायव्हिंगची संपूर्ण संस्कृती बदलली. याचा देशावर मोठा परिणाम झाला.

९. तणाव आणि शत्रुत्व वाढवा: पर्यटनामुळे प्रेक्षणीय प्रेक्षक आणि शेजारच्या समुदायांमध्ये दबाव, भीतीदायक वातावरण आणि संशय वाढू शकतो जेव्हा एकमेकांच्या संस्कृती आणि जीवनशैलीबद्दल आदर आणि समज नसते. यामुळे प्रेक्षणीय लोकांविरुद्ध क्रूरता आणि इतर उल्लंघने होऊ शकतात. नंतर गोव्यात रशियन पर्यटकाविरुद्ध केलेले चुकीचे कृत्य हे एक प्रकरण असू शकते.

१०. विरोधी भावना निर्माण करणे : पर्यटनामुळे शेजारच्या समुदायाला थोडासा फायदा झाला. बहुतेक सर्वसमावेशक बंडल भेटींमध्ये ८०S पेक्षा जास्त प्रवाशांचा खर्च विमाने, निवासस्थान आणि इतर जगभरातील कंपन्यांवर जातो, शेजारच्या व्यावसायिक आणि कामगारांना नाही. याव्यतिरिक्त, विस्तीर्ण लॉजिंग साखळी भोजनालयांमुळे बाहेरील पाहुण्यांना पूर्ण करण्यासाठी वारंवार पोषण मिळते आणि काही वेळाने शेजारच्या कर्मचाऱ्यांचा वापर वरिष्ठ प्रशासकीय पदांसाठी करतात, शेजारच्या शेतकरी आणि मजुरांना त्यांच्या जवळचा फायदा घेण्यापासून टाळतात. यामुळे पर्यटक आणि सरकार यांच्याबद्दल नियमितपणे तिरस्काराची भावना निर्माण झाली आहे.

निष्कर्ष :-

पर्यटन हा उत्पन्नाचा आणि रोजगाराचा एक महत्त्वाचा स्रोत असला तरी, त्यावर जास्त अवलंबित्वामुळे आर्थिक अस्थिरता, पर्यावरणीय आव्हाने आणि सामाजिक समस्या उद्भवू शकतात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन टिकाव कमी होतो. भारतीय पर्यटनामध्ये रोजगार निर्मिती आणि परकीय चलन कमावण्याची अफाट क्षमता आहे. हा एक बहुआयामी आणि सेवाभिमुख उद्योग असल्याने केंद्र आणि राज्य सरकारचे सर्व विभाग, खाजगी क्षेत्र आणि स्वयंसेवी संस्था देशाच्या पर्यटनात शाात वाढ करण्याच्या प्रयत्नात सक्रिय भागीदार बनतात. देशातील एकूण परदेशी पर्यटकांच्या संख्येत अनेक पटींनी वाढ झाली आहे. अभ्यास कालावधीत काही वर्षे वगळता त्यात वाढता कल दिसून आला. हे सूचित करते की भारत सरकार पर्यटनाच्या विकासाकडे लक्ष देत आहे आणि जवळपास सर्व ज्ञात पर्यटन स्थळांना रस्ते, रेल्वे आणि नागरी विमान वाहतूक या दोन्ही मार्गांनी जोडत आहे. पर्यटन हा जगातील सर्वात मोठा उद्योग म्हणून संपुष्टात आला आहे, ज्यामुळे संपत्ती आणि काम निर्माण झाले आहे, अभ्यागतांची मने विशिष्ट जीवनशैलीसाठी उघडली आहेत. विविध निराधार राष्ट्रांना वाढत्या दराने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या मार्गात पर्यटन विभागाची अत्यावश्यक भूमिका आहे. पर्यटन विविध उपक्रमांद्वारे आपल्या आर्थिक परिस्थितीचा विकास करून देशात आर्थिक बदल घडवून आणू शकते. देशासाठी पर्यटनाचे मोठे योगदान म्हणजे जीडीपी निर्माण करणे आणि स्थानिक तसेच राष्ट्रीय अशा दोन्ही प्रकारच्या रोजगाराच्या संधी निर्माण करणे.

संदर्भ सूची :-

१. अरविंदो गणेश आणि डॉ. माधवी, सी. २००७. जानेवारी-जून, 'भारतीय अर्थव्यवस्थेवर पर्यटनाचा प्रभाव - एक स्नॅपशॉट' जर्नल ऑफ कंटेम्पररी रिसर्च इन मॅनेजमेंट, खंड-१, क्रमांक १,

२. रैना, ए.के., आणि अग्रवाल, एस.के. (२००४). पर्यटन विकासाचे सार: गतिशीलता, तत्त्वज्ञान आणि धोरणे. अँड सन्स.

३. इवानोव, एस., आणि वेबस्टर, सी. (२००७). आर्थिक वाढीवर पर्यटनाचा प्रभाव मोजणे. पर्यटन अर्थशास्त्र,

४. मिश्रा, पी.के., राउत, एच.बी., आणि महापात्रा, एस.एस. (२०११). पर्यटन आणि आर्थिक वाढ यांच्यातील कार्यकारणभाव: भारतातील अनुभवजन्य पुरावे. युरोपियन जर्नल ऑफ सोशल सायन्सेस.

५. शर्मा, ए., जोहरी, ए., आणि चौहान, ए. (२०१२). क्रक्ष्: पर्यटन उद्योगातील आर्थिक वाढ आणि विकासाचे साधन. इंटरनॅशनल जर्नल ऑफ सायंटिफिक अँड रिसर्च पब्लिकेशन्स.

6. Sharma, A., Johri, A., & Chauhan, A. (2012). FDI: An instrument of economic growth

& development in tourism industry. International Journal of Scientific and Research Publications, 2(10), 1-6.

7. Mishra, P. K., & Rout, H. B. (2012). Economic impact of tourism: a case study of Jharkhand. International Journal of Economics and Managerial Thoughts, 3(2),139.
8. Ohlan, R. (2017). The relationship between tourism, financial development and economic growth in India. Future Business Journal, 3(1), 9-22.
9. Akadiri, S. S., Akadiri, A. C., & Alola, U. V. (2019). Is there growth impact of tourism? Evidence from selected small island states. Current Issues in Tourism, 22(12), 1480- 1498.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

भारतीय लोकशाही एक अभ्यास

डॉ.रेणुका राजशेखर मेंगाणे
कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी,

प्रस्तावना-

"१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला आणि भारतीय समाजाच्या जीवन प्रवासाचा मार्ग म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. भारतीय लोकशाहीचे संवर्धन योग्य दिशेने होण्यासाठी परिश्रमपूर्वक या लोकशाहीचे मूलाधार ठरविण्यात आले. त्यांचे प्रकटीकरण भारताच्या संविधानात झालेले आहे. भारताचे संविधान भारतीय समाजव्यवस्थेच्या विविध अंगांना स्पर्श करून जाते. संविधानाने भारतीय लोकांचे सार्वभौमत्व निर्विवादपणे मान्य केले आहे. भारताच्या संविधानाच्या प्रास्ताविकातच याची प्रचिती येते. संविधानाच्या प्रास्ताविकात सुरूवातीस "आम्ही भारताचे लोक, भारतीय लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित संवर्धित करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प करतो." असे म्हंटले आहे. हे संविधान जरी संविधान सभेतील लोकांनी तयार केले असले तरी ही जबाबदारी भारतीय लोकांच्यावतीने संविधानसभेने पार पाडलेली आहे, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळेच भारताचे संविधान भारतीय लोक अंगिकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करीत आहेत. याची स्पष्ट नोंद संविधनाच्या प्रास्ताविकात केली आहे. "

भारताच्या संविधानाचे प्रास्ताविक हे भारतीय लोकशाही व्यवस्थेचे प्रवेशद्वार म्हणूनलक्षात घ्यावे लागेल. प्रास्ताविकामधील बांधिलकी संविधनामधील तरतूदी व त्यांच्याअंमलबजाणीची दिशा कशा प्रकारची असेल याची माहिती देते. भारतीय लोकशाहीमधीलसत्ता भारतीय लोकांच्या जास्तीत जास्त कल्याणासाठी सहभागीत्वाचे मार्गाने वापरलीजाईल. लोकांचा जास्तीत जास्त सहभाग, धोरणांचे नियोजन व अंमलबजावणी व्हायची असेल तर सत्तेच्या विकेंद्रीकरणास प्राधान्यक्रम द्यावा लागतो. भारतीय संविधनामध्ये जनतेचा सहभाग जनप्रतिनिधींच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य पातळीवर कशाप्रकारे घेता येईल. याबाबत स्पष्ट तरतूदी केलेल्या आढळून येतात.लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे कोणत्याही प्रश्नांवर चर्चेच्या माध्यमातून मार्ग शोधणे आणि त्यानुसार मार्गक्रमण करणारी शासन व्यवस्था असते. चर्चेमुळे संबंधित विषयाच्या सर्व बाजूंवर विचार विनिमय करता येतो, चर्चा नवीन विचारांना जन्म देतात. कारण चर्चेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे असे काही विचार किंवा मते असतात की ज्याला लोकशाहीमध्ये लोकमत / जनमत असे म्हणतात. जो लोकशाहीचा मूलभूत आधार आहे.

भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्ये

१) आधुनिक राज्यव्यवस्थेचा स्वीकार
२) लोकांचे सार्वभौमत्व
३) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार
४) संसदीय शासनपद्धती
५) नागरिकांचे मूलभूत हक्क
६) संघराज्यपद्धती
७) स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि न्यायालयीन पुनर्विलोकन
८) मार्गदर्शक तत्वांचा स्वीकार :

भारतीय लोकशाहीचे वास्तव स्वरूप-

भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वाचे मूल्य म्हणून आपण सारे लोकशाहीकडे पाहतो. जगात सर्वात मोठ्या लोकसंख्येची लोकशाही म्हणून भारताचा लौकिक आहे; मात्र गेल्या काही वर्षांपासून या लोकशाहीला ग्रहण लागून तिच्यात हुकूमशाहीवृत्ती वाढताना दिसत आहे. स्वीडनमधील व्हरायटी ऑफ डेमोक्रेसी (व्ही डेम) या संस्थेच्या 11 मार्च 2021 रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालातही भारतात गेल्या काही वर्षांपासून लोकशाहीचा संकोच होत आहे, हे उदाहरणांसहित अधोरेखित केले आहे.

भारतातील सर्वच निवडणुका लोकशाही पद्धतीने होत असल्या तरी या पद्धतीने मिळवलेली सत्ता व्यक्तीकेंद्रित होत आहे, असे या अहवालात नमूद केले आहे.वाढती बेरोजगारी, प्रचंड महागाई, शेतकरी आंदोलने, पेट्रोल व गॅसची दरवाढ, अतार्किक निर्णयांचे गंभीर परिणाम यामुळे सर्वसामान्य भारतीयांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. याशिवाय माध्यम स्वातंत्र्य, स्वायत्त संस्थांचे स्वातंत्र्य आणि नागरी समाज यांच्यावरही पद्धतशीरपणे आघात केले जात आहेत.

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने-

लोकहितापेक्षा सत्ता मिळविणे हाच भारतीय लोकशाहीचा आज प्रमुख उद्देश झाला आहे. लोकप्रतिनिधींसाठी सत्ता हेच एकमेव साध्य झाल्याने कोणत्याही मार्गाने निवडणुकीत विजय प्राप्त करून सत्ता काबीज करण्यासाठी कायदे, नियम, नीतिमत्ता पायंदळी तुडवली जात आहे. त्यामुळे भ्रष्ट आणि गुंड लोकांना राजकारणात महत्त्वाची पदे मिळू लागली आहेत. बरेच लोकप्रतिनिधी निरनिराळ्या गुन्ह्यांत अडकलेले दिसतात. त्यामानाने त्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्यच आहे. अशा भ्रष्ट लोकांच्या हाती देशाची सत्ता असल्याने भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहे.

1) जागरूक मतदानाचा अभाव :-
2) भ्रष्टाचार निर्मूलन :-
3) बेरोजगारी :-
4) धार्मिकता आणि दहशतवाद :-
5) वाढती महागाई :-

भारतीय लोकशाहीपुढील आव्हानवरील उपाय :-

1) मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करून योग्य प्रतिनिधी कसे निवडून येतील? यादृष्टीने मतदारांचे प्रबोधन झाले पाहिजे.
2) कायद्याचा गैरवापर करून मोठमोठे भ्रष्टाचार करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून त्यांना सक्त शिक्षा करून नवीन भ्रष्टाचार करण्याच्या वृत्तीला आळा घातला पाहिजे.
3) रोजगाराभिमुख शिक्षण व्यवस्था आणून जास्तीत जास्त रोजगाराच्या उपलब्धतेसाठी देश विकासाचे प्रकल्प राबविले पाहिजे.
4) सर्वधर्मसमभावाची भावना लोकांमध्ये रुजवून इतर धर्मांचा द्वेष थांबवून दहशतवादाला आळा घालण्यासाठी तळागाळातील लोकांसाठी विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.
5) योग्य आर्थिक नियोजनाने वाढती महागाई नियंत्रणात आणून हतबल झालेल्या सर्वसामान्यांना दिलासा दिला पाहिजे.
6) सत्ताधाऱ्यांनी केवळ सत्तेच्या राजकारणाचा विचार न करता देश विकासाच्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले पाहिजे.
7) देशातील सर्वच घटकांना केवळ कागदोपत्री नव्हे तर खऱ्या अर्थाने साक्षर बनवून देशाच्या विकासात त्यांचे योगदान वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.
8) स्वायत्त संस्थांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून केवळ व्यक्तीद्वेषातून विरोधी पक्षासाठीच्या त्यांच्या वापरावर निर्बंध ठेवले पाहिजे.
9) प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा न आणता त्यांच्याद्वारा योग्य व अचूक माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.
10) सर्वात महत्वाचे म्हणजे जनतेचा लोकशाहीवरील विश्वास टिकून ठेवण्यासाठी शासनाने सदैव प्रयत्नशील राहिले पाहिजे.

निष्कर्ष :-

आजच्या 21 व्या शतकात भारतीय लोकशाहीला मानवी विकासाचे ध्येय प्राप्त करण्यासाठी अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. देशाचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधण्यासाठी भारतीय लोकशाहीने सकारात्मक दृष्टिकोनातून स्वतःला नवीन दिशा दिली पाहिजे. नव्या युगाच्या नव्या गरजा पूर्ण करून स्वतःची प्रस्तुतता टिकविण्यासाठी, तसेच भारतात गुणात्मक, सहभागी व पारदर्शक शासन व्यवस्थेद्वारा जागरूक लोकमताच्या स्थापनेसाठी लोकशाहीने योग्य मार्गांचा अवलंब केल्यास येणाऱ्या काळात भारताची जगाच्या पटलावर महासत्ताक म्हणून ओळख निर्माण होईल यात शंकाच नाही.

संदर्भ सूची -

१.डॉ. विभूती ,भालवा प्रबोधन ज्योती निवडक निबंध "ग्रामपंचायत लोकसहभाग आणि विकास "प्रकाशन प्रसाद कुलकर्णी ,इचलकरंजी 2004 पृ. क्र.८

२. डॉ.भोळे भास्कर,"भारताचे शासन आणि राजकारण" प्रकाशक पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2004 पृ. क्र.४२.

३. कांबळे ,डॉ.बाळ ,डॉक्टर एकनाथ खांदवे ."भारतीय लोकशाही समोरील आव्हाने "डायमंड पब्लिकेशन्स.

४. कुलकर्णी ,प्रसाद माधव."आव्हानांच्या विळख्यातील लोकशाही." 21 मार्च 2022 .वायर मराठी.

५. मेश्राम,"इतिहास भारतीय लोकशाही पुढील आव्हाने"7 ऑगस्ट 2020.

६. लोकशाही समोरील आव्हाने जनशक्ती 25 जानेवारी 2019 ,"राज्यघटना आणि पुढील आव्हाने" महाराष्ट्र टाइम्स 24 जानेवारी 2019.

७. डॉ.वैद्य सुमन, डॉ.कोठेकर शांता ,आधुनिक भारत का इतिहास ,साईनाथ प्रकाशन नागपूर.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

सर्वसमावेशक दृष्टीकोन मजबूत करण्यामध्ये सामाज कार्य शिक्षणाचे योगदान

प्रा विजय जयसिंग माने

प्रस्तावना:

सामाजिक वंचीतता आणि सर्वसमावेशक धोरण या महत्त्वाच्या संकल्पना आहेत, ज्याबद्दल अलीकडच्या काळात बरच काही बोलल जात आहे. समाजातील उपेक्षित वंचित समुदायाचा अभ्यास करून त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात आले आहे. जगभरात आणि विशेषत: भारतातील धोरणकर्ते आणि योजनाकार या विषयाच्या अनुषंगाने भरीव काम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचाच ऐक भाग म्हणून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही या संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी वा या विषयाची माहिती जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी देशभरा मधील निवडक विद्यापीठेमध्ये, "सामाजिक वंचीतता आणि सर्वसमावेशक", केंद्रांची सुरवात करण्यात आली आहे. यूजीसीच्या पुढाकाराने व्यावसायिक शिक्षण घेतलेले सामाजिक कार्यकर्ते या केंद्रांमध्ये व्याख्याता, संशोधन सहाय्यक, सहाय्यक संचालक, संचालक आणि प्राध्यापक/अध्यक्ष अशा विविध पदांवर कार्यरत आहेत.

व्यावसायिक सामाज कार्यकर्ते हे समाजातील गरीब, वंचित, उपेक्षित, अल्पसंख्याक तसेच सामाजिक वंचीततेमुळे शिकार झालेल्या समुदायांच्या उन्नतीसाठी फार मोलाचे योगदान अदा करत आहेत. व्यावसायिक सामाज कार्यकर्ते हे सामाजिक बदल समजून घेण्यासाटी प्रयत्ना करतात व त्या आधारावर ते मानवी समस्या सोडवण्यावर भर देतात. गरीब, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत लोकांचे उत्थान करणे व त्यांना सैद्धांतिक अधिकार प्राप्त करून देण्यासाठी हे दोन्ही विषय फार महत्वाचे योगदान देऊ शकतात. या लेखाच्या माद्यमातून सर्वसमावेशक दृष्टीकोन मजबूत करण्यामध्ये सामाज कार्य शिक्षन फार मोलाचे योगदान देऊ शकते हे मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

समाज कार्य व्याप्ती आणि स्वरूप :

मानवी हक्कांचे संवर्धन आणि सामाजिक न्याय हा सामाज कार्याचा मूलभूत गाभा आहे. समाजकार्य हा मानवतेच्या तत्वज्ञानावर आधारित कल्याणकारी कार्यक्रम आहे. सामाजिक कार्यशी सम्बन्धित विविध पद्धतींचा वा कौशल्याचा वापर करून प्रशिक्षिस्त समाज कार्यकर्ता समाजातील विविध स्वरूपाच्या जटिल समस्यांना संबोधित करतो. लोक आणि त्यांच्या सभोवतालच्या साधनसामुग्रीचा वापर करून लोकांना स्वताचा विकास स्वत करण्यास सक्षम करणे हे त्याचे ध्येय असते. लोकांच्या पूर्ण क्षमताचा वापर करून, त्यांचे जीवन समृद्ध करणे हे प्रमुक्याने प्रशिक्षिस्त समाज कार्यकर्त्याचे काम आहे. व्यावसायिक सामाज कार्याचा प्रमुख उदेश हा समाजातील विविध समस्या सोडवणे आणि लोकांच्या जीवनमाना मध्ये बदल घडवून आणणे यावर केंद्रित आहे. आणि म्हणूनच सामाज कार्य शिक्षणामध्ये तसेच क्षेत्रकार्याचे प्रशिक्षण देत असताना 'समावेशक दृष्टीकोनाच्या' बाबत शिक्षण देणे आवश्यक आहे

व्याख्या:

मानवी समाजाला प्राचीन काळापासून अनेक समस्या व अडचणी भेडसावत आहेत. जशाकी गरीबी, रोगराई, अंधश्रद्ध इत्यादी. ज्याचा परिणाम माणसाच्या सामाजिक वागण्यावर व त्याच्या सभोवतालच्या वातावरणावर होतो. अशा अनेक प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शासनाला कल्याणकारी विभागांची निर्मिती करावी लागली. तसेच जिथे जिथे सरकार पोहचू शकत न्हवते तेथे स्वयंसेवी संस्थाची स्थापना कारणे हे समाजाची गरज होऊन बसली. अर्थातच या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शास्त्रीय दृस्तीकोनाची गरज पुढे आली. काळाच्या ओघात शास्त्रीय आधार असलेली लोकांचे प्रश्न सोडवणारी कार्यपद्धती अस्तित्वात आली. पुढे जाऊन त्या पद्धतीला प्रशिषित समाजकार्यकरते तयार करणारी शिक्षण पद्धती म्हणून विकसित करण्यात आली.

फ्रेडलँडर यांच्या मते — "समाजकार्य हे मानवी संबंधांमधील वैज्ञानिक ज्ञान आणि कौशल्यावर आधारित आहे. ती एक व्यवसायिक सेवा आहे .जे व्यक्तींना सामाजिक आणि वैयक्तिक समाधान आणि स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यास मदत करते, मग ते एकटे असतो किंवा समूहामध्ये."

"समाजकार्य ही एक व्यवसायिक सेवा आहे. जी वैज्ञानिक ज्ञानावर आधारित सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्य करते. समाजकार्य हे एक सामाजिक शास्त्र आहे".

मूल्ये :

वेयक्तिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक जीवनामध्ये मूल्यांना अनन्यसाधारण महत्व आहे. या मूल्य व्यवस्थेच्या मर्यादेत राहून मानवी समूह आपले जीवन व्यतीत करत असतो. या धर्तीवरच समाजकार्यामध्ये देखील मूल्यांना फार महत्व आहे. मानवतावादी आणि लोकशाही तत्वांच्या आधारावर सामाज कार्याच्या मुल्यांचा सद्याचा डोलारा उभा आहे. प्रत्येक व्यक्तीला समाणतेची वागणूक देणे, त्याची आत्मप्रतिष्ठा जपणे वा त्याच्या मुल्याव्याव्श्तेचा आदर करणे हे समाज कार्याची मूल्ये आहेत. सामाजिक कार्य मानवी गरजा पूर्ण करण्यावर आणि मानवी क्षमता विकसित करन्यावर लक्ष केंद्रित करते.

सिद्धांत :

सामाजिक कार्याची सैद्धांतिक बेठक हि संशोधन, सराव आणि मूल्यमापनातून मिळवलेल्या ज्ञानावर आधारित असून ती पुराव्याच्या मदतीने काम करणारी ज्ञान शाखा आहे. सामाजिक कार्याची सैद्धांतिक बांधणी हि आंतरविद्याशाखीय आहे. समाजशास्त्र, राज्याशास्त्र, मानवशास्त्र, गुन्हा व गुन्हेगार याविषयींचे शास्त्र, पर्यावरणशास्त्र, शिक्षण, आरोग्य, कायदा, तत्वज्ञान, अर्थशास्त्र तसेच इतर सामाजिक शास्त्रांच्या मदतीने मानवी समूहाबरोबर काम करते. ती मानव आणि त्यांचे वातावरण आणि लोकांची क्षमता आणि त्यानच्यातील परस्परसंवादाच्या सिद्धांतांवर आधारित आहे. मानवी विकास आणि वर्तन तसेच सामाजिक प्रणालींचा सिद्धांत हे देखील समाज कार्याच्या सैद्धांतिक रचणेचा भाग आहेत. समाजकार्य हा ऐक भक्कम शैक्षणिक तसेच प्रत्यक्ष लोकांमध्ये मिसळून सरावावर आधारित मिळवलेल्या ज्ञनावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम आहे. याच्या मदतीने सामाजकार्यकर्ता व्यक्ती, कुटुंब, मानवी गट, समुदाय आणि संपूर्ण समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या वैयक्तिक आणि सामूहिक कल्याणासाठी कार्यरत असतो.

सीमांतीकरण व त्याचा अर्थ:

सीमांतीकरण हि ऐक सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक प्रकिया आहे. या प्रक्रीये मध्ये लोकांना सर्वप्रकारच्या साधनसंपत्ती तसेच सत्तेपासून जाणीवपूर्वक लांब ठेवले जाते किवा त्यांचा सहभाग नाकारला जातो. सीमांतीकरनाच्या प्रक्रीयेचे गंभीर परिणाम होऊ शकतात. या मध्ये काही गटाच्या लोकांना निवळ वस्तू स्वरूपातील सहकार्य नाकारले जात नाही तर काही वेळा त्या संपुर्ण गटाला बहिष्कृत केले जाते ज्यामुळे त्यांना जीवन जगणे अवघड होऊन बसते. सीमांतीकरण हे तीन प्रकारामध्ये विभागले जावू शकते. वैयक्तिक पातळीवर, समुदायाच्या पातळीवर आणि संरचनात्मक किवा धोरणात्मक पातळीवर देखील सीमांतीकरनाची प्रक्रिया होऊ शकते.

वैयक्तिक पातळीवरील सीमांतीकरण प्रक्रियेमध्ये त्या व्यक्तीला सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक प्रकियामधून वगळण्यात होते. याचे उत्तम उदहरण म्हणजे आपल्या समाजातील विधवा तसेच परितक्त्या स्त्रिया. यांच्या बरोबरच मानासिकदृस्त्या वा शारीरिकदृष्ट्या विकलांग व्यक्तींना देखिल सीमांतीकरनाच्या प्रक्रीयेला सामोरे जावे लागते. त्यांच्या या परिस्थितीला ते जबाबदार नसतात, परंतु त्यांना सर्व प्रकारच्या सब-समारंभातून वगळले जाते. त्यांना अशुभ व्यक्ती म्हणून सातत्याने अव्हेरले जाते.

समुदायाच्या पातळीवर देखील आपल्या इथे गुन्हेगार जाती-जमातींना तसेच इथल्या डोंगर-दर्यांमध्ये राहणाऱ्या तसेच तृतीय पंथी समुदायांना सध्याच्या काळात देखील अनेकवेळा सीमांतीकरनाच्या प्रक्रीयेला सामोरे जावे लागते

निष्कर्ष:

भारतातील सामाजिक कार्य शिक्षण आणि सराव व्यावसायिकांना 'समावेशक दृष्टीकोन' मजबूत करण्याची खरी गरज आहे. व्यावसायिक सामाजिक कार्याचे संपूर्ण तत्वज्ञान अगदी सुरुवातीपासूनच, उपेक्षितांचे, अलगीकरनाच्या झळा बसल्यामुळे पोरकेपणा वाट्याला आलेल्या समाजाचे तसेच विविध प्रकारच्या सामाजिक समस्यांनी बाधित झालेल्या समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असले तरी 'सर्वसमावेशक विकास' किंवा 'सर्वसमावेशक वाढ' या धोरणात्मक बाबींच्या बाबतीत फार काम करताना दिसून येत नाही. जगभरातील तसेच भारतामधील सध्याच्या सामाजीक, राजकीय आणि आर्थिक परीस्थीतीकडे

पाहता 'सर्वसमावेशक विकास' किंवा 'सर्वसमावेशक वाढ' या विषयांचा अंतर्भाव सामाज कार्य शिक्षण आणि प्रशिक्षणामध्ये होणे अत्यंत अत्यावश्यक आहे.

'व्यावसायिक सामाजिक कार्यकर्त्यांना' सक्षम करण्याच्या अंतिम उद्दिष्टासह त्यांच्या मध्ये 'सर्वसमावेशक मानसिकता' विकसित केली पाहिजे तरच ते येणाऱ्या काळामध्ये समर्थपणे समाजा प्रती आपली सेवा योग्य पद्धतीने बजावू शकतील.

References:

1) Authored by Prateek Raj, Assistant Professor in Strategy at Indian Institute of Management Banglore (IIMB) along with Thomas J Roulet, Professor of Organisational Sociology and Leadership at Cambridge Judge Business School and Co-Director of the King's Entrepreneurship Lab at King's College; and Hari Bapuji, Professor in the Department of Management and Marketing, Faculty of Business and Economics, The University of Melbourne, Australia: **"It's not who you know, but who you are: Explaining income gaps of stigmatized-caste business owners in India",** published in PLOS ONE journal on August 7 ,2024.
2) Uttam Madane: **Social Exclusion and Inclusion of De-Notified, Nomadic, and Semi-Nomadic Tribes in India;** Asian Journal of Research in Social Sciences and Humanities Vol. 6, No. 9, September 2016, pp. 1726-1736
3) Dr. Sandipan R. Gavhale: **Issue of Social Exclusion In India: Perspectives And Challenges**; IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS) Volume 22, Issue 6, Ver.10 (June. 2017) PP 28-35 e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845.
4) Shodhana Consultancy, Pune: **Social exclusion: concepts, findings and implications for the MDGs**; A report to UNICEF
5) Dr. Jeeru Raghu Prasad: Social Exclusion and Inclusion in India: Issues and Challenges of Marginalized Sections in 21st Century, International Journal of Novel Research and Development, Volume 7, Issue 11 November 2022 | ISSN: 2456-4184

Aayushi International Interdisciplinary Research Journal
www.aiirjournal.com

भुदरगड तालुक्यातील मध उत्पादन- एक पर्यावरणपूरक व्यवसाय

प्रा. गौतमी कांबळे
सहाय्यक प्राध्यापक,भूगोल विभाग,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र
महाविद्यालय गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर 416209

प्रा. एस एन पाटील
सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, भूगोल विभाग,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य व शिक्षणशास्त्र
महाविद्यालय गारगोटी,
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर 416209

प्रस्तावना :

थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी असं म्हटलं आहे की जर मधमाशा संपल्या तर माणूस जीवन पुढील चार वर्षात नष्ट होईल. मधमाशांचे आपल्या जीवनसृष्टी मध्ये फार महत्त्व आहे. मध तयार होण्यासाठी एका प्रक्रियेतून जावे लागते. परागीभवन हे या ठिकाणी महत्त्वाचे असते. मधमाशा विविध प्रकारच्या फुलांचे, फळांचे, झाडांचे ,धान्यांचे परागीभवन करतात. जर यांचे प्रमाण कमी झाले तर अनेक प्रजाती नष्ट होतील व अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होईल व भूकबळी वाढतील. विशेष म्हणजे जे अन्न परागीभवन होऊन येत नाही ते खाण्यासाठी जास्त पौष्टिक नसते.शेतकऱ्याला मुंग्या, कीटक, गांडूळ, उंदीर, साप हे सर्वच घटक मदत करत असतात. पण यात सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे मधमाशा करतात. कारण मधमाशा फुलांचे रूपांतर फळात करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत असतात आणि त्यांच्या शिवाय हे काम दुसरे कोणी करू शकत नाही. मधाच्या मोठ्या प्रमाणावर प्राप्तीसाठी व त्याची विक्री करण्यासाठी मधमाशा पाळल्या जातात. मधमाशी पालन हा एक शेतीपूरक व्यवसाय आहे. मधमाशी ही फुलातील रसाला परागांना मधात बदलवते व त्यास आपल्या पोळ्यात जमा करते. जंगलातून व इतर ठिकाणांमधून मध गोळा करण्याची फारच प्राचीन परंपरा आहे. बाजारात मधाच्या मागणीस वाढता प्रतिसाद बघता मधमाशी पालन हा एक फायदेशीर व आर्थिक प्राप्ती देणारा उद्योग आहे. त्यापासून निघणारे नैसर्गिक मेणही आर्थिक लाभदायक असते. पूर्वीपासूनच मध हा त्याच्या शुद्धतेसाठी आणि आरोग्यदायी गुणधर्मासाठी प्रसिद्ध आहे.

उद्दिष्टे:

1) भुदरगड तालुक्यातील मध उत्पादन गावातील मध उद्योगाची सद्यस्थिती अभ्यासणे.

2) मध व्यावसायिकांसमोरील समस्यांचा शोध घेणे.

3) मधव्यवसायातील समस्या सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.


अभ्यास पद्धती:

पाटगाव गावातील मध उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी विशिष्ट अभ्यास पद्धती व तंत्रांचा वापर करण्यात आला. प्रत्यक्ष निरीक्षणे,मुलाखती व लिखित साहित्याचे संकलन तसेच यूट्यूब चैनल वरून साहित्याचे संकलन करण्यात आले. यासाठी विविध अभ्यास पद्धती व तंत्रे यांचा वापर करण्यात आला. पाटगाव या गावातील मध व्यवसायाची माहिती घेण्यासाठी व त्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी मध उत्पादकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन आवश्यक त्या माहितीच्या नोंदी घेतल्या. पाटगाव या गावातील मध उद्योगासंदर्भात संपूर्ण माहिती ही पाटगाव गावातील मधउद्योगास प्रत्यक्ष भेटून आवश्यक माहितीच्या नोंदी घेतल्या.विविध संशोधन साहित्य व इंटरनेटच्या माध्यमातून पाटगाव या गावातील मध्ये व्यवसायासंबंधी संपूर्ण माहिती घेतली व विश्लेषण करण्यात आले. पाटगाव या गावातील मध व्यवसायाची माहिती भरून घेण्यासाठी मध उत्पादकाकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली व महत्वाच्या नोंदी घेतल्या.

भौगोलिक परिस्थिती:

सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगात वसलेले कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील पाटगाव हे निसर्गरम्य ऐतिहासिक गाव कोल्हापूर पासून 90 किलोमीटर अंतरावर असलेले वेदगंगा नदीच्या धरण क्षेत्रातील वसलेले गाव आहे.पाटगावची एकूण लोकसंख्या 1502 आहे. तर या गावात 375 कुटुंबे राहतात. पाटगावचे महसूल क्षेत्रफळ 1058.73 हेक्टर आहे.

मधाचे गाव - पाटगाव



पाटगावचे हवामान उष्ण व दमट स्वरूपाचे आहे. पावसाळ्यात पर्जन्याचे प्रमाण अधिक असते. वार्षिक सरासरी 300 ते 350 सेमी.इतके पर्जन्यमान असते. हिवाळ्यात जास्त थंडी जाणवते. हिवाळ्यात तापमान थोडे कमी म्हणजे बारा अंश सेल्सिअस ते पंधरा अंश सेल्सिअस इतके असते.उन्हाळ्यात हवामान कोरडे उबदार असते. मार्च ते मे दरम्यान येथील तापमान जास्त असते. मे महिन्यात सरासरी तापमान पंचवीस ते पस्तीस अंश सेल्सिअस असते. पाटगाव या गावी दख्खनच्या पठारावर आढळणारी सर्वसाधारण मृदा आढळते.गावात प्रामुख्याने तांबडी मृदा आढळते. वेदगांगा नदी धरण क्षेत्र असल्यामुळे येथे प्रामुख्याने भात व ऊस ही पिके तसेच नाचणीचे पीक घेतले जाते. भुदरगड व कागल तालुक्यांसह कर्नाटक सीमेला वरदान ठरलेला पाटगाव मौनिसागर जलाशयाचा उपयोग वीज निर्मिती जलसिंचनासाठी केला जातो. गारगोटीहून सुमारे ३५ किलोमिटर अंतरावर असलेला जलाशय पाहण्यासाठी एक उत्तम स्थान आहे. मौनी मठ, रांगणा किल्ला अन वळणदार घाट रस्त्यांमुळे पर्यटकांना एक पर्वणी मिळाली आहे. येथे सूर्यास्त आणि सूर्योदयाचे मनमोहक दर्शन पर्यटकांना होते. रानगवे आणि सांबर आदी जंगली पशू पाहण्याची संधी मिळते. सह्याद्रीच्या रांगांमध्ये वसलेले पाटगाव हे निसर्गाचा अद्भुत आविष्कार म्हणून पाहायला मिळते. दाजीपूर अभयारण्य असलेले राधानगरी व भुदरगड तालुक्याच्या भागात जंगलयूक्त भाग विविध वृक्षांनी समृद्ध असा पाहायला मिळतो.या जंगलात अनेक नैसर्गिक वनस्पती व औषधी वनस्पती आढळून येतात. या जंगलातील वृक्ष सदाहरित व घनदाट असल्यामुळे येथे वाघ, गवे, अस्वल, हत्ती असे जंगली प्राणी आढळून येतात.

मध उत्पादन व मधमाशांच्या वसाहतीचे व्यवस्थापन

साधी लाकडी पेटी आणि तिच्या आतील भागात अनेक चौकोणी पट्ट्या असतात. या पेटीचा अंदाजे आकार 45 सेंमी लांब-रुंद आणि 24 सेंमी उंच असतो. ही पेटी अर्धा सेंमी जाडीची असते. पोळे एक सेंमी रुंदीच्या प्रवेश छीद्रांसहित एकत्र चिकटवलेले आणि स्क्रूंनी घट्ट केलेले असते. वरील पट्ट्या पोळ्याच्या रुंदी इतक्याच लांबीच्या असतात जेणेकरून त्या आडव्या बरोबर बसतील आणि त्यांची जाडी 1.5 सेंटीमीटर असते. म्हणजे एक वजनदार मधाचे पोळे पेलण्यासाठी त्या पुरेशा होतील. प्रत्येक स्वतंत्र वरील पट्टीला एक एक पोळी तयार करण्यासाठी मधमाशांना आवश्यक नैसर्गिक जागा मिळण्याकरता 3.3 cm रुंदीची ठेवण गरजेची असते.

मध पेटी पाण्याचा चांगला निचरा असलेल्या खुल्या जागेत ठेवावी लागते. शक्यतो फळांच्या बागांच्या जवळ मकरंद, परागकण आणि पाणी भरपूर असलेल्या ठिकाणी उभारणी करावी. पोळ्यामधील तापमान आवश्यक तितकं राहण्यासाठी सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण महत्वाचं आहे. पोळ्याच्या स्टँडच्या भोवती मुंग्या शिरू नयेत यासाठी पाणी भरलेलं खंदक ठेवाव्यात. वसाहतीचे तोंड पूर्वेच्या दिशेला असावं. पाऊस आणि सूर्यापासून पेटीच रक्षण होण्यासाठी दिशेमधे थोडेफार बदल करावेत. या वसाहतींना पाळीव जनावर, अन्य प्राणी, गर्दीचे रस्ते आणि रस्त्याकडील दिव्यांच्या खांबापासून दूर ठेवावे. मधमाशांची वसाहत स्थापन करण्यासाठी जंगलात वसलेली वसाहत एखाद्या पोळ्याकडे स्थानांतरीत करून किंवा मधमाशांचा जत्था जवळून जात असताना त्यांना तिथे वसण्यासाठी आकृष्ट करून मधमाशा मिळवता येतात.

मधाच्या पोळ्याची तपासणी शक्यतो सकाळच्या तासांमध्ये मधाच्या हंगामामध्ये आठवड्यातून एकदा करावी. पोळ्याची स्वछता पुढील क्रमाने करावी. छप्पर, सुपर ब्रुड चेंबर्स आणि फ्लोअर बोर्ड सुदृढ राणी चौकटीची उपस्थिती, माशांच्या संख्या आणि नर मधमाशांच्या वाढ पाहण्यासाठी वसाहतीवर नियमितपणे देखरेख ठेवणे. मधमाशांच्या खालीलपैकी कोणत्याही शत्रूंद्वारे

त्रास होत असल्यास त्याचा शोध घ्यावा. मधमाशांच्या पेटीतील पोळे, कोपरे आणि पोकळीतून सर्व अळ्या आणि रेशीमयुक्त जाळ्या काढून टाकणे. मेण किडे (प्लॅटीबोलियन), प्रौढ किडे गोळा करून नष्ट करणे, तुडतुडे पोळ्यांची चौकट आणि तळाचा बोर्ड ताज्या बनवलेल्या पोटॅशियम परमॅग्नेटमधे बुडवलेल्या कापसाच्या बोळ्यांनी स्वच्छ केला जातो. तळाचा बोर्डवरील सर्व तुडतुडे निघून जाईपर्यंत ही प्रक्रिया वारंवार केली जाते. अनुत्पादक काळातील व्यवस्थापन ज्येष्ठ माशांना काढून आणि उपलब्ध सुदृढ नव्या माशांना ब्रुड चेंबरमध्ये नीट बसवले जाते. आवश्यक असल्यास विभाजन बोर्ड बसवला जातो. राणीच्या चौकटी आणि नर मधमाशांची चौकटी दिसल्यास नष्ट केली जाते. भारतीय मधमाशांसाठी प्रति आठवडा प्रति वसाहत 200gm साखर या दराने साखर सिरप दिले जाते. पळवा पळवी टाळण्यासाठी सर्व वसाहतींना एकाचवेळी अन्न द्यावे लागते. मधाची उपलब्धता असण्याच्या काळातील व्यवस्थापन मध उपलब्ध असण्याच्या हंगामापूर्वी वसाहतीत पुरेशा संख्येत माशा ठेवतात. सुपर आणि ब्रुड चेंबर यांच्यामध्ये जास्तीत जास्त जागा दिली जाते. माशीला ब्रूड चेंबर मध्ये ठेवण्यासाठी आणि सुपर चेंबर यांच्या दरम्यान राणीला वेगळी करण्याच्या शीट्स ठेवतात. वसाहतीची तपासणी आठवड्यातून एकदा केली जाते आणि मधाने भरलेल्या फ्रेम्स सुपर च्या बाजूने काढून घ्याव्यात. तीन चतुर्थांश भाग मधाने किंवा परागकणांनी भरलेल्या आणि एक चतुर्थांश बंदिस्त अळ्यांनी भरलेल्या फ्रेम्स आधारासहित ठेवण्यात याव्यात. पूर्णता बंदिस्त किंवा दोन तृतीयांश आवरणयुक्त पोळी मध काढण्यासाठी बाहेर काढण्यात यावीत आणि मध काढून घेतल्यानंतर सूपर्समध्ये परत ठेवावित.

पोळ्याच्या ज्या भागातून मध काढायचा आहे त्या भागातील मधमाशांना धुराने दूर करावे आणि पोळी काळजीपूर्वक कापून घ्यावीत मधाची काढणी शक्यतो दोन मुख्य फुलोर्यांच्या मोसमांच्या दरम्यान आणि त्यांच्या लगेच नंतर अनुक्रमे आक्टोंबर/नोव्हेंबर आणि फेब्रुवारी/जून मध्ये काढणे शक्य होते. पिकलेले पोळे रंगाने हलके असते आणि मधाने भरलेले असते दोन्ही बाजूंच्या निम्म्यापेक्षा अधिक मधाचे कप्पे मेणाने बंद केलेले असतात.

मधमाशी पालन हा शेतीशी संबधित एक उपक्रम आहे. शेतकरी अतिरिक्त उत्पन्न मिळवण्यासाठी हा उद्योग करू शकतात. मधमाशा फुलातील मकरंदाचे मधामधे रूपांतरण करतात आणि त्यांना पोळ्याच्या कप्प्यामधे साठवून ठेवतात. जंगलामधून मध गोळा करण्याचा उद्योग दीर्घकाळापासून अस्तित्वात आहे. मध आणि त्यापासून बनवलेल्या उत्पादनाची बाजारपेठेतील मागणी वाढत असल्याने मधमाशी पालनाचा उद्योग एक टिकाऊ उद्योग म्हणून उदयास येत आहे. मध आणि मेण ही मधमाशी पालनातून मिळणारी आर्थिकदृष्ट्या महत्वाची दोन उत्पादने आहेत.

मधमाशी पालनाचे फायदे:

1) फुलांचा रस पराग यांचा सदुपयोग होतो, आर्थिक प्राप्ती मिळते व रोजगाराचा प्रश्न सुटतो.
2) शुद्ध मधाचे उत्पादन, मेणाचे उत्पादन व इतर आधारित वस्तूंचे उत्पादन होते.
3) मध हा अत्यंत औषधी व गुणकारी आहे.
4) सौंदर्य प्रसाधनांमध्ये विविध प्रकारे मधाचा उपयोग केला जातो.
5) शुगर असणाऱ्या लोकांना मध अत्यंत गुणकारी आहे.
6) संधिवात असणाऱ्या रुग्णांसाठी मधमाशा हे एक अत्यंत प्रभावी औषध आहे.
7) दंतवैद्यकशास्त्रामध्ये अत्यंत उपयुक्त आहे.
8) कोणत्याही इतर जातीच्या बियांशिवाय, खताशिवाय मधमाशी पालन हे शेताच्या बांधावर/शेतालगत केल्याने त्याचा फायदा शेतीला होतो. शेतीतील भाजी, फुलांच्या उत्पादनात सव्वा ते दीड पटींनी वाढ होते.

आर्थिक प्राप्तीचा एक उद्योग म्हणून मधमाशी पालनाचे फायदे:

मधमाशी पालनासाठी वेळ, पैसे आणि पायाभूत गुंतवणुकीची आवश्यकता असते. मधमाशा स्त्रोतांसाठी कोणत्याही अन्य शेती उद्योगासोबत स्पर्धा करीत नाही. मधमाशी पालनाचे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतात. मधमाशा फुलोरा येणाऱ्या अनेक वनस्पतींच्या परागीकरणात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे सूर्यफूल आणि विविध फळे यांसारख्या ठराविक पिकांचे उत्पादनात वाढ होते मध रुचकर आणि अत्यंत पोषक अन्न आहे. मध गोळा करण्याच्या पारंपरिक पद्धतीमुळे मधमाशांच्या अनेक जंगली वसाहती नष्ट होतात. त्यामुळे मधमाशांच्या पोळ्यांमध्ये संगोपन करून आणि घरच्या घरीच मधोत्पादन घेऊन हे टाळता येते. वैयक्तिक किंवा गटागटात मधमाशी पालन सुरू करता येऊ शकते मध आणि मेन यांच्यासाठी बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

पाटगाव गावातील मध उद्योगाची सद्यस्थिती:

मध उत्पादक गावे:

पाटगाव अंतर्गत शिवडाव, अंतुर्ली, मठगाव, भारमलवाडी, डेळे, चांदमवाडी, मानी, तळी, भटवाडी या परिसरात मधमाशापालन उद्योग केला जातो महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्या संकल्पनेतून आता "मधाचे गाव पाटगाव" ही नाविन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात आली आहे.

पर्यावरण पूरक शाश्वत विकास:

पाटगाव मध्ये पाटगावसह पाच ग्रामपंचायती एकत्र येऊन या ठिकाणी तयार होणाऱ्या शुद्ध व नैसर्गिक मधाची निर्मिती करण्यात येत आहे. सामूहिक सुविधा केंद्र व कृषी उत्पादन कंपनीच्या माध्यमातून या भागाचा विकास साधण्यात येत असून मधाच्या थीमवरून गावाचे सुशोभीकरण केले जात आहे. या ठिकाणी माहिती केंद्र, बी ब्रीडिंग प्रशिक्षण, मधमाशापूरक व औषधी गुणधर्म असलेले वृक्ष लागवड करण्यात येत आहे. बी - ब्रीडिंग मधून मधमाशांची संख्या वाढवून परागीभवनाची वाढ होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पर्यावरण पूरक शाश्वत विकासाला प्राधान्य देत दिवसेंदिवस कमी होणारी मधमाशांची संख्या वाढवण्यासाठी पाटगाव मधाचेगाव ब्रँड तयार करून मधला योग्य बाजार भाव मिळवून देऊन मध उत्पादकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

आजूबाजूच्या गावाचा संपूर्ण विकास:

पाटगाव परिसरात मधमाशापालनासाठी नैसर्गिक परिस्थिती अनुकूल आहे. मधाच्या गावाला भेट देणाऱ्या पर्यटक, शालेय विद्यार्थी, सहलींना मार्गदर्शनाकरिता भुदरगड तालुक्यात प्रवेशापासून ते मधाच्या गावात पोहोचेपर्यंत व गावाच्या वेशीवर दिशादर्शक फलक लावले आहेत. तसेच गावात मधाच्या गावाचा आकर्षक लोगो तर मधपालांच्या घरावरही नोंदणीकृत लोगो फलक लावण्यात आलेले आहेत.अधिकाधिक मध उत्पादकांना प्रशिक्षण, मधपाळांना मधपेट्या देण्यासह आवश्यक कर्ज पुरवठा होण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पाटगाव सहित शिवडाव, अंतुर्ली, मठगाव ,तांब्याचीवाडी या ग्रामपंचायती अंतर्गत गावांमध्ये मधपाल तयार करून येथील नागरिकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी प्रयत्न होत आहेत. पाटगाव मधून उत्पादक शेतकरी कंपनीच्या माध्यमातून मधउत्पादक विक्रेत्यांसह महिलांनाही रोजगार उपलब्ध करून देत मधनिर्मिती व विक्री उद्योग व पर्यटन पूर्व उद्योगातून पाटगाव बरोबरच आजूबाजूच्या गावांना स्वयंपूर्ण होण्यासाठी चालना देण्यात येत आहे.

मधमाशांच्या प्रजाती:

भारतामध्ये मधमाशांच्या चार प्रजाती आहेत. दगडी माशी, अपिस डोरसोटा या माशा उत्तम प्रकारे मध गोळा करतात. आणि त्यांच्या प्रत्येक वसाहती मागे सरासरी मध उत्पादन 50 ते 80 किलो असते. लहान माशी अपीस फ्लोरीआ या माशा कमी मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहती मागे अंदाजे 200 ते 900 ग्रॅम मध्ये मिळतो. भारतीय मधमाशी अपीस सेरणा इंडिका या मधमाशां द्वारे होणारा मध उत्पादन दरवर्षी प्रति वसाहत सहा ते आठ किलो असतो. युरोपियन मधमाशी इटालियन मधमाशी आपिस मेल्लीफेरा यांचा दर वसाहती मागे सरासरी मधउत्पादन 25 ते 40 किलो असतो. पाटगाव मध्येच नाही तर सह्याद्री घाटमाथ्यावर सातेरी मधमाशी आढळून येते. ही माशी डंक विरहित आहे. तिने जरी डंक केला तरी त्रास होत नाही. एका पेटीतून सरासरी पाच ते दहा किलो सरासरी मध मिळतो.

मध संकलन प्रशिक्षण प्रक्रिया व मार्केटिंग:

पाटगाव परिसरातील 250 मधपाळांना कौशल्यांचे राष्ट्रीय प्रमाणीकरण व सुलभ पुरवठा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.तसेच शंभर मधपाळांना बी- ब्रीडिंग चे प्रशिक्षण देऊन पेटी वाटपातून उत्पन्नाची संधी देण्यात येत आहे. मध उत्पादक शेतकरी कंपनीमध्ये सहभागी पाटगाव आजूबाजूच्या पाच ग्रामपंचायतीतील मधपाळाकडून मध उत्पादन करण्यात येत आहे. या मधपाळांना मंडळामार्फत प्रशिक्षण देऊन सेंद्रिय मधसंकलन करण्यासाठी स्टेनलेस स्टील भांडी पुरविण्यात येणार आहेत.मधसंकलनानंतर पाटगाव येथे प्रक्रिया युनिट उभारून प्रक्रिया झालेल्या मधाचे लेबलिंग पॅकेजिंग व ब्रँडिंग करून तो मार्केटिंग साठी उपलब्ध होईल.

वसाहतींचे स्थलांतर करण्याविषयी जनजागृती

हवामान व पर्यावरणातील बदलामुळे मधमाशांच्या वसाहती जगण्यासाठी त्यांची संख्या वाढवण्यासाठी त्या एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी राज्यांतर्गत व राज्याबाहेर वाहतूक करून न्यावे लागतात. त्यामुळे प्रतिकूल हवामानापासून मधमाशांच्या वसाहतींचे रक्षण करता येते. वसाहती जगण्यासाठी त्यांचे स्थलांतर करणे विषयी मध उत्पादकांना प्रोत्साहन व मदत देणे, लांब अंतराच्या ठिकाणी तंबू उभारणे वसाहती जगण्यासाठी साखरपाक देणे अशा उपायोजना करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

पाटगाव मधील मधपाळ हे हंगाम संपल्यानंतर मधपेट्या सुरक्षित राहण्यासाठी दुसऱ्या गावी दुसऱ्या शेतकऱ्यांकडे जिथे सूर्यफुल आहे. अशा ठिकाणी त्या पेट्या सुरक्षित राहण्यासाठी ठेवल्या जातात. हंगाम आला की पेट्या पुन्हा आणल्या जातात. पाटगाव मधील मधपाळांना मध पेट्या सुरक्षित राहण्यासाठी खूप अडचणी येतात. जंगलयुक्त भाग असल्याने याठिकाणी अस्वल या प्राण्यामुळे या पेट्याचे मोठे नुकसान होते व वसाहती कायमच्या नष्ट होतात. त्यामुळे मधपाळाना सतत त्या पेट्याकडे लक्ष द्यावे लागते. तसेच या पेट्या जंगलात असल्यामुळे त्या वेगवेगळ्या ठिकाणी दूर दूर अंतरावर ठेवलेल्या दिसून येतात. या पेट्याची देखभाल करण्यासाठी कितीतरी किलोमीटर पायी चालत जावे लागते. तसेच या जंगलामध्ये गवे व इतर प्राणी असल्यामुळे या लोकांना जीव मुठीत घेवून हा व्यवसाय करावा लागतो.

शैक्षणिक अभ्यासाला प्रोत्साहन

पाटगाव मधील सदाहरित जंगलात मधाचे औषधी व उपयुक्त गुणधर्म आहेत या परिसरातील सातेरी मधमाशांच्या कार्यप्रणालीचा अभ्यास करून इतर ठिकाणच्या मधापैकी पाटगाव मधील मध अधिक उत्कृष्ट असल्याबाबत अभ्यासाला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

पर्यटन स्थळांचा विकास

पाटगाव मध्ये शिवकालीन संत मौनी महाराज यांची संजीवन समाधी आहे. या व्यतिरिक्त वेदगंगा नदीवर 1990 मध्ये बांधण्यात आलेले पाटगाव धरण म्हणजेच मौनी जलाशय गावाच्या जवळच आहे. हे धरण आणि निसर्गरम्य ठिकाणी असलेला रांगणा किल्ला हे प्रमुख पर्यटन स्थळे पाटगाव परिसरात आहेत. या ठिकाणांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी कोल्हापूर ते पाटगाव मार्गावर माहिती फलक लावण्यात येत आहेत. तसेच पर्यटन संचालनाच्या वतीने पर्यटकांसाठी या ठिकाणी न्याहारी व निवासाची व्यवस्था, स्वच्छतागृह आदी सुविधा अधिक दर्जेदार पद्धतीने देण्यात येणार आहेत.

भविष्यातील नियोजन

गावातील नोंदणीकृत मधपाळाकडून मधसंकलन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने गावाला भेट देणाऱ्या पर्यटकांना मधाची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे, स्थानिक पातळीवर मधपाळांना मधाची शुद्धता व गुणवत्ता तपासणीसाठी पर्यटकांना लाईव्ह डेमो उपलब्ध करून देणे मधतपासणीसाठी प्रयोगशाळा प्रोसेसिंग व पॅकेजिंग सुविधा ब्रॅण्डिंग करून स्थानिक पातळीवर सीएफसी केंद्र मार्फत विक्री केंद्र उभारणे मधाचे गाव जागतिक नकाशावर येण्यासाठी चांगले रस्ते, दिशादर्शक फलक लावणे व नकाशा रेखांकन करून घेणे मध आणि मधाचे उपयोग व उत्पादने याबाबत साहित्य, पुस्तके, सीडी विक्रीसाठी उपलब्ध करून देणे. मध व मधाची उप-उत्पादने तयार करण्यासाठी फॅक्टरीची निवड करून मधपाळाना मधाची उत्पादने तयार करण्याचे प्रशिक्षण देणे व तयार झालेला मध सीएफसी केंद्र खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत विक्री करणे. गाव पातळीवर तयार झालेल्या मालाचे पॅकेजिंग ब्रॅण्डिंगसाठी मार्गदर्शन करणे.मध संकलन व विक्रीसाठी ने आण करण्यासाठी वाहन व्यवस्था करणे आधी सुविधाही उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने नियोजन करण्यात येत आहे.

निष्कर्ष :

1) पाटगाव गावचे स्थान जैविकदृष्ट्या समृद्ध असलेल्या पश्चिम घाटामध्ये येत असल्याने येथील मध व्यवसाय हा पारंपरिक पद्धतीने केला जातो.
2) पाटगाव मधे केला जाणारा मध व्यवसाय हा स्थानिक क्षेत्रातील जंगल व शेती मध्ये केला जातो.
3) हा व्यवसाय हंगामी स्वरुपाचा आहे. फुलोरा ज्यावेळी येतो म्हणजे ऑक्टोबर /नोव्हेंबर व फेब्रुवारी/मार्च या वेळी हा व्यवसाय तेजीत असतो.
4) पाटगाव गावामधे मधव्यवसायामधे गुंतलेल्या व्यावसायिकांचे शिक्षण पदवी पर्यंत झाले असले तरी पारंपरिक पद्धतीने मध उत्पादन केले जाते.
5) भुदरगड तालुक्यतील मधाचे गाव असणारे पाटगाव हे मध उत्पादनामध्ये अग्रेसर असे गाव आहे.
6) जैविकदृष्ट्या समृद्ध असलेल्या पश्चिम घाटामध्ये पाटगावमधून उत्पादित होणारा मध हा शुध्द व दर्जेदार असून त्याला खादी ग्रामोद्योग कडून खरेदी केली जाते व हा मध संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचविला जातो.

संदर्भ सूची:

1. डॉ सावंत प्रकाश, साधनसंपत्ती भूगोल, फडके प्रकाशन
2. मुळे व उमाठे (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलततत्त्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर

3. Balasubramanyam, M.V. (2013) Journal of Environmental Science, Computer Science and Engineering & Technology, E-ISSN: 2278−179X JECET; June − August-2013; Vol.2.No.3, 931-937 Journal of Environmental Research And Development Vol. 5 No. 3, January-March 2011 542
4. K. J. Cherian, M. Bhowal and S. D. Godghate (2010), Pollen and Physiochemical Analysis of of Honey Hysicochemical Analysis of Honey Produced by Apis Cerena Indica of Nagpur, MAHARASHTRA (INDIA)
5. K. Beula (2020), A Study on Honey Production and Marketing by the Marthandam Beekeepers' Co-Operative Society in Kanniyakumari District, Vol-8, P-ISSN: 2319-961X E-ISSN: 2582-0192
6. https://youtu.be/sbroNiZAbfs?si=yJEKJNntZIBpga2L
7. https://youtu.be/730keYVeaFA?si=BUH_Gg0VMkmi5V-1
8. https://youtu.be/UUyBX1Eojsw?si=Nv0xgzUT-lpu_MI6
9. https://youtu.be/730keYVeaFA?si=aJQe7G6sUNotRlJz

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

मतिमंदत्वास कारणीभूत भौतिक वातावरणातील कारणे

प्रा. डॉ. दत्तात्रय कुंडलिक पाटील
सहा. प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख,
कर्मवीर हिरे कला, शास्त्र, वाणिज्य आणि
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर, पिन. ४१६२०९
dattatrayapatil78@gmail.com

गोषवारा :

*कुटुंब, समाज यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, शारीरिक, मानसिक अवस्था, वातावरण यामुळेही मतिमंदत्व येण्याची शक्यता असते. **अपंग व्यक्ती कायदा १९९५ नुसार**, "मतिमंदता याचा अर्थ एखाद्या व्यक्तीच्या मनाचा विकास खुंटलेला किंवा अपूर्ण विकास झाल्याची स्थिती असा आहे आणि याचे प्रमुख लक्षण म्हणजे बुद्धिमत्तेची अपसामान्यता हे आहे आणि हे लक्षण अठरा वर्षाच्या आतील मुलांचे असते" (सहानी रामशाकाल,२००४ :५७४४), मतिमंदत्वाची अनेक कारणे असू शकतात. त्यामुळे वैद्यकीय तज्ञ फक्त २५% घटनांमध्ये त्यांचं अचूक कारण सांगू शकतात. उर्वरित ७५% घटनांमध्ये ह्यांची कारणे अनुत्तरीतच राहतात. ज्या गोष्टीमुळे मेंदूला इजा होते किंवा ज्या घटनेमुळे मेंदूची वाढ होण्यात किंवा परिपक्व होण्यास बाधा येते. अशा सर्व घटनांमुळे मतिमंदत्त्व येऊ शकते. बाळाच्या जन्मापूर्वी, बाळाच्या जन्मावेळी आणि जन्मानंतर हे घडू शकतं गरोदर स्त्रीचे वय, आरोग्य आणि आहार विषयक सवयी इत्यादींचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम बाळाच्या वाढीवर होत असतो आणि म्हणूनच गरोदर स्त्रियांनी आणि पर्यायांनी तिच्या उदरात वाढणाऱ्या बाळाची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा मतिमंदत्वास कारणीभूत असणारी सभोवतालच्या कारणांचा मागोवा घेणे फार महत्वाचे आहे.*

मुख्य शब्द :- *मतिमंदत्व, जन्मपूर्व अवस्था, गर्भधारणा, संसर्गजन्य आजार, गर्भपात, अपस्मार, हायपोक्सिया, रुबेला.*

प्रस्तावना : वातावरणातील कारणांमध्ये मानसिक व सामाजिक कारणे येतात. ज्यामध्ये गर्भधारणा, गर्भावस्था, प्रसुती आणि प्रसूती नंतरची असणारी कारणे यामध्ये समाविष्ट होतात. आणि ही कारणे सभोवतालच्या वातावरणातील समस्येमुळे निर्माण होतात. अशी वातावरणातील कारणे यामध्ये शरीराच्या स्वास्थ्याचा ज्यावर व्यक्तींचे नियंत्रण काही प्रमाणात किंवा काही नियंत्रण नसते. या कारणांना सामाजिक आणि भौतिक कारणही म्हटले जाते. अपंगत्व हे सामाजिक व पर्यावरणाचा प्रश्न, आकांक्षा आणि नियोजनाचे कार्य आहे जे विशिष्ट सामाजिक- सांस्कृतिक कारणांशी जोडलेले आहे. मानवाची विचार करण्याची पद्धत, मानलेल्या गोष्टी, श्रद्धा, अंधश्रद्धा या धारणेतून समाजाला सामाजिक वातावरणामध्ये अक्षमता निर्माण करायला भाग पाडतात. उदा. अक्षमता व्यक्तीला सामाजिक वातावरणात समस्या निर्माण करत असते. जेव्हा व्यक्तीला आपले कार्य करणे गरजेचे आहे असे वाटते तेव्हा अक्षमता ही शारीरिक व मानसिक योग्यतेला कमी करते यामध्ये भौतिक वातावरण, समस्या जसे की डोक्याला मार लागणे, आजारी पडणे या क्रियामधून व्यक्तीला अक्षमता येते आणि हीच अक्षमता व्यक्तीला त्या समस्येमध्ये घेऊन जाते. ज्यामध्ये व्यक्तीचा ऱ्हास व क्रियात्मक हालचालींना विरोध केला जातो. खऱ्या अर्थाने खालील प्रमाणे होणाऱ्या टप्प्यांमधून होणाऱ्या समस्येमुळे व काळजी न घेतल्यामुळे मुले ही मतिमंद होत असतात. कुटुंब, समाज यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, शारीरिक, मानसिक अवस्था, वातावरण यामुळेही मतिमंदत्व येण्याची शक्यता असते. सामान्यपणे याबाबत खालील कारणे दिसून येतात.

अभ्यासाची उद्दिष्टे :

मतिमंदत्वास कारणीभूत असणारी सभोवतालच्या वातावरणातील कारणे या विषयाच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात खालील उदिष्टांना अनुसरून अभ्यास करण्यात आलेला आहे.

१) मतिमंदत्वाचा परिचय याचा अभ्यास करणे.

२) जन्मपूर्व अवस्थेतील किंवा गर्भधारणे पूर्वीच्या कारणांचा अभ्यास करणे.

३) जन्मापूर्वीची कारणे (गर्भावस्थेतील कारणे) यांचा अभ्यास करणे.

अभ्यास पद्धती:-

प्रस्तुत शोधनिबंधसाठी दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला. यात मासिके, परिपत्रके, पुस्तके, प्रबंध, प्रकाशित आणि अप्रकाशित लिखाण , ग्रंथ, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेट, वेबसाईट यांचा वापर केला आहे.

१) जन्मपूर्व अवस्थेतील कारणे किंवा गर्भधारणेपूर्वीची कारणे:-

स्त्रीची गर्भधारणा झाल्यापासून ते २८० दिवस किंवा नऊ महिने नऊ दिवसाचा कालावधी यास 'प्रसूतीपूर्व कालखंड' असे म्हणतात. यालाच 'जन्मपूर्व अवस्था' असे म्हणतात. या २८० दिवसांच्या कालावधीत खालीलपैकी कोणताही दोष उद्भवल्यास जन्मलेल्या बाळांमध्ये मतिमंदत्त्व येण्याची शक्यता वाढते असे मतिमंदत्व येण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत. (शाक्य पी.जे.,२००७ :११४)

अ) १८ वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या स्त्रीचे मातृत्व.

ज्यावेळी गर्भधारणा होण्याच्या वेळी आईचे वय अठरा वर्षापेक्षा कमी असल्यास त्या गर्भधारणेतून जे बाळ जन्मते त्यास मतिमंदत्व येण्याची शक्यता वाढते. कारण या अठरा वर्षापर्यंत एका बाळाला जन्म देण्यासाठी स्त्रीमध्ये जी परिपक्वता, क्षमता हवी असते ती १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रियांमध्ये आलेली असते. या आईचे मूळ अपरिपक जन्मते, यामुळे सारखा सारखा गर्भपात करणे, कमी वजनाचे मूल, पूर्ण दिवस भरण्याआधीच बाळाचा जन्म होणे, रंगसुत्रांमध्ये विसंगती होऊन बाळ मतिमंद होण्याची शक्यता वाढते त्यामुळे अठरा वर्षापेक्षा कमी वयाच्या स्त्रियांना गर्भधारणा झाल्यास त्यातून उद्भवणाऱ्या बाळांमध्ये मतिमंदत्त्व येण्याची शक्यता जास्त वाढते. (रेड्डी जी. लोकनंदा., मालिनी जे. सुजाता., आणि कुसुमा ए., २००४ : ३१)

आ) मातेचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त असणे.

१८ वर्षानंतर स्त्रियांमध्ये परिपक्वता विकसित झालेले दिसून येते. हळूहळू वयानुसार स्त्री मधील परिपक्वता व क्षमता क्षीण होऊ लागते ३५ वर्षाच्या स्त्रियांमध्ये गर्भनिकोप वाढीसाठी लागणारे अंतरिक वातावरण तयार करू शकत नाही. त्यामुळे ३५ वर्षाच्या स्त्रियांना गर्भधारणा झाल्यास त्यातून जन्मणाऱ्या बाळांमध्ये मतिमंदत्व येण्याची शक्यता वाढते. या अवस्थेत स्त्रियांचा गर्भाशय शिथिल होतो सुयोग्य व चांगले मूल जन्मण्यासाठीची गर्भधारणा योग्य स्थितीमध्ये राहत नाही. यामध्ये प्रसूती होताना अडचण, मुलाचा विलंबाने जन्म, रंगसूत्रे आणि भौतिक विसंगती अशा मुलांमध्ये घडून आल्यामुळे अशी मुले मतिमंद म्हणून जन्म घेतात.

इ) मातेचे कुपोषण व आरोग्याच्या तक्रारी.

जेव्हा आईचे आरोग्य खालावते किंवा तिच्या आरोग्याच्या तक्रारी वाढतात तेव्हा ती संतुलित आहार किंवा पौष्टिक आहार घेऊ शकत नाही अशा वेळची गर्भधारणेची स्थिती योग्य असत नाही आणि अशावेळी जर गर्भ पोटात राहिला तर या बाळाचा विकास होऊ शकत नाही. वाढ योग्य होत नाही यामुळे सुद्धा मतिमंदत्त्व व कुपोषण झालेले मूल होण्याचा धोकाही वाढू शकतो. (शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., २०१७ : ४७)

ई) मातेस संसर्गजन्य आजार असल्यास.

स्त्रियांना गर्भधारणा झाल्यापासूनच्या (प्रसूतीपूर्व) कालावधीत कोणत्याही प्रकारचे संसर्गजन्य आजार जसे की गोवर, कांजिण्या, कावीळ इत्यादी झाल्यास जन्मणाऱ्या बाळाला मतिमंदत्त्व होण्याची शक्यता वाढते. (सिंह जगत, २००७ :२३)

उ) कुटुंबामध्ये मतिमंदत्त्वाचा वारसा किंवा इतिहास असल्यास.

जर कुटुंबामध्ये मागच्या पिढीमध्ये किंवा सध्याचे पिढीमध्ये आई किंवा वडिलांपैकी कोणी व्यक्ती मतिमंद असेल तर किंवा आईच्या किंवा वडिलांच्या मागच्या वारशात कोणी व्यक्ती मतिमंद असेल तर अशा व्यक्तीला होणारे मुल मतिमंद होण्याचा धोका हा अधिक असू शकतो असे वैद्यकीय तज्ञांचे म्हणणे आहे.

ऊ) स्त्री व पुरुष यांचे रक्तगट एकच असल्यास.

जेव्हा पती किंवा पत्नी हे एकाच नात्यातील असतील म्हणजेच रक्तसंबंधित असतील ज्यामध्ये आते-मामे, मावस – भाऊ, चुलत- भाऊ, जवळच्या नात्यातील, एकाच रक्तगटाशी मिळते जुळते रक्त असल्यास अशांना होणारे मुल मतिमंद होण्याचा धोका अधिक असतो. (सिंह जगत, २००७ :२२)

ए) विषबाधा झाली असल्यास.

प्रसूतीपूर्वी आईला कोणत्याही प्रकारची विषबाधा झाली असल्यास कारण गर्भाशयात अशा विषाचा प्रभाव होणाऱ्या बाळाला परिणाम करतो अशा मातेला होणारी मुलेही मतिमंद होऊ शकतात. (शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., २०१७ : ४७)

ऐ) व्यसनाधीनता.

जेव्हा जी स्त्री गर्भधारणा करते अशा व्यक्तीला जर मादक पदार्थ, धूम्रपान, तंबाखू, दारू, बिडी, सिगारेट अशा व्यसनांची सवय असेल तर या व्यसनांच्या प्रभावामुळे मुलाला मतिमंदत्व येते कारण अंमली पदार्थांच्या सेवनाने जन्मणाऱ्या बाळाच्या मेंदूला इजा होऊन त्या बाळात मतिमंदत्त येऊ शकते.

ओ) गर्भपात किंवा वांझपणा असल्यास.

ज्या स्त्रीला गर्भातील बाळ हवे नसल्यास किंवा जर गर्भापात करण्याचा प्रयत्न केला असल्यास आणि जर यामुळे गर्भापात होऊ शकला नाही तर मात्र त्या बाळांच्या मेंदूला इजा होऊन त्याला मतिमंदत्त्व येऊ शकते. तसेच काही काही स्त्रियांना लवकर मूल होत नाही तेव्हा वांझपणा घालवण्यासाठी औषध व गोळ्या खातात याचाही परिणाम शरीरावर होऊन त्या अर्भकालाही त्याचा परिणाम भोगावा लागतो. यानंतर होणाऱ्या मुलाला मतिमंदत्व येवू शकते.

औ) अनुवंशिकता किंवा वंशपरंपरा असल्यास.

याचे कारण खऱ्या अर्थाने जैववैज्ञानिक आहे. अनुवंशिक विकार आणि गुणसूत्र विकार यामुळे सदोष भ्रूण गर्भधारणेचा धोका देखील अधिक असतो. यामध्ये बाळाचे आई-वडीलच जर मतिमंद असतील किंवा पूर्वीच्या सात पिढ्यांमध्ये कोणी व्यक्ती मतिमंद असेल तर याही पिढीमध्ये बाळ मतिमंद होण्याचा धोका अधिक असतो. अशी परिस्थिती ही तीन प्रकारच्या अनुवंशिक विकृतीमधून उद्भवली जाते त्यामध्ये - १)गुणसूत्र विकृती २)आनुवंशिक विकृती ३) बहुआनुवंशिक विकृती.

क) 'क्ष' किरण तपासण्या.

गर्भ वाढवत असताना खास करून गर्भधारणेपासूनच्या सुरुवातीच्या तीन महिन्यांमध्ये पोटाचे क्ष किरण काढल्यास गर्भात असलेल्या बाळाच्या मेंदूला इजा होऊ शकते.यामुळे बाळाला मतिमंदत्व येऊ शकते. (पेशावारीया रिटा, मेनन डी. के.,गांगुली राहुल, रॉय सुमित, पिल्ले राजम पी., गुप्ता आशा, होरा आर. के., १९९६ : ८)

ख) जन्मजात एचआयव्ही संक्रमण.

माता एचआयव्ही बाधित असेल तर मुलामध्येही संक्रमण होऊन मतिमंदत्व येण्याचा धोका वाढतो असे अभ्यासातून स्पष्ट झालेले आहे. (शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., २०१७ : ४७)

२) जन्मापूर्वीची कारणे. (गर्भावस्थेतील कारणे)

या अवस्थेला जन्मापूर्वीची अवस्था किंवा प्रसूती पूर्वीची स्थिती असे सुद्धा म्हटले जाते. या कारणांमध्ये गर्भधारणेपासून ते प्रसूतीपर्यंतच्या काळाला यामध्ये गृहीत धरले जाते. याचा कालावधी ९ महिन्यांचा असतो. जेव्हा मूल मातेच्या उदरात असते त्यावेळी खालील वातावरणातील कारणे मतिमंदत्त्वाला जबाबदार ठरणारी कारणे म्हणून त्यांच्याकडे आपण पाहतो.

अ) गर्भावस्थेमध्ये आजारांचे किंवा रोगांचे संक्रमण झाल्यामुळे.

गर्भधारणा झाल्यानंतर सुरुवातीच्या तीन महिन्यातच आईला रोगाचा संसर्ग झाल्यास गर्भातील बाळाला याचा परिणाम भोगावा लागतो. जर गर्भवती मातेलाच तीन महिन्यातच रूबेला, जर्मन गोवर, एन्फ्लुएंजा, हर्पिस आणि टी.बी. अशा रोगांची लागण झाल्यास गर्भातील मुलांच्या मेंदूला हानी पोहोचते आणि यामुळे अशा मुलाला मतिमंदत्त्व येऊ शकते. तसेच आईलाच जर मधुमेह, उच्च रक्तदाब, हायपोथॉयराडीझम, मूत्रपिंड, किडनी समस्या अशा आजारी व्यक्तीमुळेही गर्भात वाढणाऱ्या मुलाच्या मेंदू व शरीराची हानी होते यामुळे सुद्धा मतिमंदत्व येऊ शकते. (रेड्डी जी. लोकनंदा., मालिनी जे. सुजाता., आणि कुसुमा ए., २००४:२९)

आ) डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय आपल्या मनानेच औषधे सेवन केल्यास.

गरोदर महिलेकडून घेतलेले कोणतेही औषध हे बाळाच्या रक्तामध्ये प्रवेश करते. अशा प्रकारे गर्भावस्थेवेळी जर त्या महिलेला आरोग्याची समस्या असेल तर त्याची काळजी घेतलीच पाहिजे पण काही स्त्रिया डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय उच्च

दाबाचे औषध घेतल्यास त्याचे वाईट परिणाम गर्भातील बाळावर होऊ शकतात यासाठी डॉक्टरांना आधीच सांगितले पाहिजे की ही महिला गर्भवती आहे की ज्यामुळे ते डॉक्टर चांगले इलाज व औषधे देतील. कोणत्याही परिस्थितीत गर्भवती महिलेला जरी ताप, सर्दी, खोकला असला तरी अशा साध्या गोष्टीमुळे आजारी असला तरी डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधोपचार घेता कामा नये जर आपल्या मनानेच औषधे घेतली तर त्यामुळे जन्मना-या बाळात मतिमंदत्त्व येऊ शकते. (सिंह जगत, २००७ :२९)

इ) गर्भपात करण्याचा प्रयत्न केल्यास.

प्रशिक्षण न झालेल्या सुईणी किंवा मांत्रिक यांच्या द्वारे गर्भपात करण्याचा प्रयत्न केल्यास गर्भातील असणा-या बाळाला आणि आईला हे दोघांनाही घातक असते. ज्यावेळी गर्भावस्थेमध्ये हे बाळ नको असल्यास गर्भपात करण्याचा प्रयत्न केल्यास जर गर्भपात होऊ शकला नाही तर मात्र या बाळाच्या मेंदूला किंवा पेशींना इजा होऊन त्यास मतिमंदत्त्व येऊ शकते.

ई) गर्भपात संभावना असल्यास.

ज्यावेळी आईला अचानक गर्भपात किंवा रक्तस्त्राव सुरू झाला तर या गर्भावस्थेदरम्यान डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आणि सल्ल्याची गरज या मुलाला असते यामुळेही मतिमंदत्त्व बाळाला येऊ शकते.

उ) संतुलित आहाराचा अभाव.

गर्भवती महिलेला संतुलित, पौष्टिक आणि पुरेसा आहार न मिळणे हे सुद्धा एक कारण मुलांच्या मतिमंदत्वाला जबाबदार ठरू शकते, गरोदर महिलेला आपल्या शरीराबरोबरच गर्भातील बाळाच्या वाढीसाठी तिच्या आहारातून अतिरिक्त मात्रेमध्ये कार्बोदके, प्रोटीन, विटामिन आणि खनिजे अशा द्रव्यांची गरज असते. गरोदर महिलेला लोह, रक्तवाढीसाठी पॉलिक ॲसिड कमी झाल्यामुळे एनिमिया आणि आणखी सकस आहाराच्या अभावी गर्भात वाढणा-या बाळाला मानसिक मंदपणा, वाढीमध्ये सुद्धा मतिमंदपणा आणि इतर आणखीन आजार सुद्धा होऊ शकतात. (सिंह जगत, २००७ :२३)

ऊ) अपस्मार किंवा फीटस आल्यास.

प्रसूतीपूर्वी या अवस्थेत आईला फिट्स येत असतील तर आईला कमी प्रमाणात प्राणवायू मिळतो यामुळे या अवस्थेत गर्भाशयातील आपत्यालाही(बाळालाही) कमी प्राणवायू मिळतो परिणामी गर्भाशयातील अपत्याच्या मेंदूला इजा होऊन मतिमंदत्व येऊ शकते.

ए) हायपोक्सिया झाल्यास.

गरोदर असताना थोड्या वेळासाठी आईची श्वसन घेण्याची क्रिया बंद झाल्यास म्हणजे हायपोक्सिया झाल्यास त्याचे विपरीत परिणाम बाळाला मिळणा-या ऑक्सिजनच्या पुरवठ्यावर होतो अशावेळी त्या गर्भाशयात असणा-या बाळाच्या मेंदूमधील पेशी मृत होऊ शकतात व त्यातून मतिमंदत्व बाळाला येऊ शकते. (शाक्य पी.जे., २००७ :११५)

ऐ) रक्तामधील भिन्नता.

रक्तातील (Rh) विसंगतीमुळे सुद्धा बाळांमध्ये मतिमंदत्त्व येऊ शकते.रक्तामध्ये प्रोटीन असतात ज्याला आर. एच. फॅक्टर असे म्हणतात. हे रक्तामध्ये असते तेव्हा हे रक्त 'Rh पॉझिटिव्ह' प्रकारचे रक्त म्हणतात. जेव्हा हे रक्तामध्ये प्रोटीन नसते तेव्हा ते रक्त 'Rh निगेटिव्ह' प्रकारचे म्हटले जाते. अशाप्रकारे Rh विसंगती अशी ही अवस्था आहे . जेव्हा गरोदर महिलेचे रक्त 'Rh निगेटिव्ह' असते आणि गर्भातील बाळाचा रक्त प्रकार 'Rh पॉझिटिव्ह' असतो. जेव्हा असे होते तेव्हा गुंतागुंत निर्माण होते अशा स्थितीमध्ये पहिल्या वेळी होणारे मुल सुरक्षित असते पण त्यानंतर होणा-या दुसऱ्या गरोदरपणात याचा धोका हा वाढतो कारण दुसरे अपत्य जर 'Rh पॉझिटिव्ह' असेल आणि आईचे रक्त 'Rh पॉझिटिव्ह' असल्यामुळे या बाळाला मेंदूस हानी होणे, मतिमंदत्व येणे, हृदयामधील पेशींची हानी आणि कधीकधी बाळाच्या मृत्यूलाही ही कारणे जबाबदार ठरू शकतात. यामुळे गर्भधारणेपूर्वी अशा महिलांनी त्यांचा रक्तगट जाणून घेणे आवश्यक आहे. कारण पहिले 'Rh पॉझिटिव्ह' बाळ जन्मल्यानंतर 'Rh निगेटिव्ह' आईला लसीकरण केले जाते त्यामुळे दुसऱ्या मुलाला Rh विसंगतीमुळे होणा-या हानीपासून टाळता येते.

ओ) एकाच वेळी दोन पेक्षा अधिक मूले किंवा जुळी.

गर्भाशयामध्ये सगळ्यात मोठा धोका हा आहे की दिवस भरण्यापूर्वीच प्रसूती होणे म्हणजे गरोदरपणाचा काळ ३७ आठवड्यापेक्षा कमी असतो. वेळेपूर्वी जन्म झालेल्या मुलांच्या महत्त्वाच्या समस्या या आहेत की अशा मुलांचे वजन कमी

असते, अशा मुलांना कावीळ होते आणि अशा मुलांच्या पेशी मध्ये सुद्धा विसंगती आढळून येते यामुळे अशा मुलांमध्ये मतिमंदत्व येऊ शकते.

औ) प्रदूषित घटक

वातावरणातील प्रदूषक गर्भामध्ये वाढ होणाऱ्या बाळाला हानिकारक होऊ शकतात. ज्यामध्ये पारा, शिसे आणि इतर रसायनामुळे ज्या महिला गरोदरपणात धुरांच्या लोंढ्यामध्ये, कारखान्यातील धुरामुळे, सामानामुळे ज्यामध्ये शिसे, धुरावाटे नाकातून शरीरात घुसते. याचप्रमाणे जुन्या घरातील भिंतीला लावलेल्या पेंटच्या फोफड्यामुळे अशा कायम प्रदूषित घटकांमुळे गरोदर महिलेच्या बाळाला मेंदूची हानी होऊन विविध प्रकारचे शारीरिक आजार सुद्धा होऊ शकतात.

क) अपघात झाल्यास.

गर्भवती महिलेला कधी कधी जास्त वजन उचलण्याने, जास्त काम केल्यामुळे, कशावरून तरी पडल्यामुळे, पोटाला मार बसल्यामुळे, अपघात झाल्यास, गर्भामध्ये वाढणाऱ्या बाळाच्या मेंदूलाही मार लागू शकतो त्यामुळे अशा बाळाच्या मेंदूला इजा होऊन त्या बाळांमध्ये मतिमंदत्व येऊ शकते.

ख) मानसिक ताण तणाव.

आई जर मानसिक आजाराने ग्रस्त असेल, घरामध्ये ताण-तणावाचे वातावरण असेल, सासू-सासरे, दिर- भावजय यांच्यातील ताण-तणाव होत असतील तर मात्र ही महिला गंभीर भावनात्मक तणावात राहते यामुळे अचानक रक्तस्त्राव होणे, आधीच प्रसूती आणि कमी वजनाचे मूल जन्मणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. बाळाचे दिवस पूर्ण होण्याआधीच बाळाचा जन्म होणे, कमी वजन जन्मतः असणारी मुले ही मतिमंदत्त्वाबरोबरच आणखीन काही समस्या त्यांना भेडसावू शकतात.

ग) आईला रूबेलाची(जर्मन गोवर), नागीण (हर्पिस), उपदंश (सिफिलीस), सी.एम.व्ही. आणि टॉक्सोप्लास्मोसीसची लागण झाल्यास.

आई गरोदर असताना जर तिला रूबेला नावाच्या विषाणूची लागण झाल्यास तो विषाणू आईच्या वारेवाटे बाळाच्या मेंदूत जातो व तो मज्जापेशीवर आघात करतो यामुळे बाळाला मतिमंदत्व येऊ शकते. पहिल्या तीन महिन्यात गरोदरपणाच्या काळात जर रूबेला झाला तर याच बरोबर हार्पिस या रोगामुळेही मेंदूला हानी पोहोचते. यामुळे या बाळाला मतिमंदत्व येवू शकते. (पेशावारीया रिटा, मेनन डी. के., गांगुली राहुल, रॉय सुमित, पिल्ले राजम पी., गुप्ता आशा, होरा आर. के., १९९६ : ८)

घ) आईला मधुमेह झाल्यास.

गरोदरपणात आईच्या रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्यास म्हणजेच हायपरग्लाक्सेमीया झाल्यास किंवा साखरेचे प्रमाण कमी झाल्यास हायपोग्लासेमिया झाल्यावरही त्याचे विपरीत परिणाम गर्भातील बाळावर होऊन बाळाला मतिमंदत्व येऊ शकते.

सारांश :

मतिमंद व्यक्ती ही जन्मताच किंवा इतर कारणाने मतिमंद म्हणून जगत असते. यामध्ये अनुवंशाने रंगसुत्रातील अपसामान्यता, गुणसूत्रातील अपसामान्यता याचबरोबर मातेचे वय, मातेचे आजार, असंतुलित आहार, चुकीच्या औषधांचा वापर इत्यादी कारणाने मतिमंदत्व येत असते. एकच एक कारण ठामपणे याबाबत सांगता येत नाही. त्यामुळे कमी अधिक प्रमाणात अनेक कारणे मतिमंदत्वास कारक ठरतात असा निष्कर्ष उपरोक्त विवेचनातून निघतो.

संदर्भ :

१. सहानी रामशाकाल, (२००४), 'मानसिक मंदता प्रकृति, आवश्यकताएँ एवं पहचान', इंटरनॅशनल जर्नल ऑफ इमर्जिंग ट्रेंड्स इन सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पृ. क्र. ५७४४.
२. शाक्य पी.जे., (२००७), 'स्पेशल एजुकेशन ऑन पर्स्पेक्टिव ऑफ मेडिकल अँड एजुकेशन', उनि. पृ. क्र. ११४.
३. रेड्डी जी. लोकनंदा., मालिनी जे. सुजाता., आणि कुसुमा ए., (२००४), 'मेंटल रिटार्डेशन एज्युकेशन अँड रिहॅबिलेशन सर्विसेस', उनि., पृ. क्र. ३१.
४. शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., (२०१७), 'मुलांमधल्या शारीरिक आणि बोधात्मक व्यंगाचे बहुविषयक व्यवस्थापन', उनि., पृ. क्र. ४७.

५. सिंह जगत, (२००७), 'मंदबुद्धी बालक', उनि., पृ. क्र. २३.
६. तत्रैव पृ. क्र. २२.
७. शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., (२०१७), 'मुलांमधल्या शारीरिक आणि बोधात्मक व्यंगाचे बहुविषयक व्यवस्थापन', उनि., पृ. क्र. ४७.
८. पेशावारीया रिटा, मेनन डी. के.,गांगुली राहुल, रॉय सुमित, पिल्ले राजम पी., गुप्ता आशा, होरा आर. के., (१९९६), 'मुव्हिंग फॉरवर्ड', मानसिक राष्ट्रीय विकलांग संस्थान सिकंदराबाद, पृ. क्र. ८.
९. शर्मा अलोक, एम. एस., एम. सी. एच., (२०१७), 'मुलांमधल्या शारीरिक आणि बोधात्मक व्यंगाचे बहुविषयक व्यवस्थापन', उनि., पृ. क्र. ४७.
१०. रेड्डी जी. लोकनंदा., मालिनी जे. सुजाता., आणि कुसुमा ए., (२००४), 'मेंटल रिटार्डेशन एज्युकेशन अँड रिहॅबिलेशन सर्विसेस', उनि., पृ. क्र. २९.
११. सिंह जगत, (२००७), 'मंदबुद्धी बालक', उनि., पृ. क्र. २९.
१२. तत्रैव पृ. क्र. २३.
१३. शाक्य पी.जे., (२००७), 'स्पेशल एजुकेशन ऑन पर्स्पेक्टिव ऑफ मेडिकल अँड एजुकेशन', उनि., पृ. क्र. ११५.
१४. पेशावारीया रिटा, मेनन डी. के., गांगुली राहुल, रॉय सुमित, पिल्ले राजम पी., गुप्ता आशा, होरा आर. के., (१९९६), 'मुव्हिंग फॉरवर्ड', उनि., पृ. क्र. ८.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

रचनावादी शिक्षण पद्धती वर्गात अध्यापनामध्ये राबविण्यासाठी शिक्षकांना येणाऱ्या समस्या, आव्हाने व त्यावरील उपाय योजना

श्री राहुल आनंदराव चित्रकार,
कर्मवीर हिरे कला शास्त्र वाणिज्य व शिक्षण शास्त्र महाविद्यालय, गारगोटी

NCF 2005 पासून रचनावादी शिक्षण प्रक्रिया शिक्षणात समाविष्ट झाली पण त्यांची अंमलबजावणी म्हणावी तितक्या प्रमाणात होत नसलेली दिसून येते. याची अनेक कारणे आहेत परदेशात आणि भारतीय शैक्षणिक वातावरणात खूप मोठा फरक हेही यातील एक कारण असू शकते. अशा अनेक कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रस्तुत शोधनिबंधात केला गेला आहे. संशोधकांनी यातील काही कारणे व शक्य असणारी उपाययोजना सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेसाठी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय. या शिक्षकासमोरील विविध आव्हानांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांच्यासाठी अध्यापन शास्त्रामधील आव्हाने

या अध्यापन शास्त्रीय आव्हानांमध्ये शिक्षकांना विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते उदाहरणार्थ पारंपारिक शिक्षण पद्धती पासून होत गेलेला बदल पारंपरिक शिक्षण पद्धतीतील व्याख्यान पद्धती, पाठांतर व शिक्षक-केंद्री पद्धतीतून विद्यार्थी-केंद्रीय पद्धतीमध्ये जाणे हे फार मोठे आव्हान आहे. ज्या वर्गामध्ये ते शिकवतात,त्या वर्गामध्ये आतापर्यंत शिकत आलेली विद्यार्थी या पारंपारिक शिक्षण पद्धती मधून आलेले आहेत. त्यांच्या मानसिकतेमध्ये बदल करणे हे खूप मोठे आव्हान आहे.

शिक्षकांच्या साठी अध्यापन शास्त्रामधील रचनावादी पद्धतीने पाठ टाचण तयार करणे हे क्लिष्ट व अडचणीचे काम आहे .रचनावादी पाठ टाचण्यामध्ये त्याच्या बदलणाऱ्या भूमिकेनुसार आवश्यक साधनसामग्री, वर्गखोली रचना, विद्यार्थी मानसिकता ईत्यादि यांचा विचार करून पाठ टाचण तयार करावे लागते.

मुक्त पद्धतीने, जिज्ञासा व पृच्छा पद्धतीने शिक्षण प्रक्रिया व्यवस्थापन करणे हे तसे अवघड काम शिक्षकाला करावे लागते. भारतीय पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांनी मोकळेपणाने पृच्छा करणे घडत नाही. याबरोबर शिक्षकाने मुक्त प्रश्न विचारल्यानंतर वर्गामध्ये होणारी देवाण-घेवाण, आवाज ,गोंधळ इत्यादी गोष्टींचे व्यवस्थापन करणे कठीण आहे.

शिक्षण केंद्रीय पद्धतीमध्ये वर्गाची रचना पाठाचे नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये एकसूत्रता असते ,तशी सूत्रबद्धता रचनावादी शिक्षण प्रक्रियेमध्ये आढळत नाही. यामुळे वर्गातील पाठ नियोजन, बैठक व्यवस्था व घडणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया यांच्यामधील लवचिकता संतुलन करणे हे एक प्रकारे आव्हानच ठरते.

विद्यार्थ्यांची मूल्यमापन करणे त्यासाठी आवश्यक साधने वापरणे हे कठीण काम शिक्षकाला करावे लागते. त्याला मिळालेल्या प्रशिक्षणानुसार अध्यापनेत्तर चाचणी हे एकमेव मूल्यमापनाचे साधन त्याला माहीत असते. रचनावादी शिक्षण प्रक्रियेमध्ये अनेक प्रकारे मूल्यमापन करावे लागल्यामुळे त्याला यासाठीचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक ठरते व हे प्रशिक्षण उपलब्ध होईलच असे सांगता येत नाही.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांच्यासाठी वर्ग व्यवस्थापनामधील आव्हाने

रचनावादी शिक्षणक्रम लागू करताना शिक्षकासमोरील वेगवेगळ्या आव्हानांमध्ये वर्ग व्यवस्थापनामधील आव्हाने ही महत्त्वाची ठरतात.

वर्ग व्यवस्थापनाचे आव्हान मध्ये वर्गामध्ये शिस्त आणि सुव्यवस्था राखणे हे एक मोठे आव्हान आहे. भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये वर्गातील मुलांची संख्या ५० ते ७० या दरम्यान असते. या वर्गाला उपक्रम देणे, प्रकल्प देणे ,चर्चा घडवणे, ब्रेनस्टॉर्मिंग करणे इत्यादी विविध प्रकारच्या शिक्षण प्रक्रियांचा उपयोग करतानावर्ग व्यवस्थापन करणे वर्गामध्ये शिस्त आणि सुव्यवस्था राखणे हे काम जोखमीचे ठरते.

मोठ्या संख्येच्या वर्गामुळे विद्यार्थ्यांमधील दिले जाणारे घटक कार्य आणि त्यांच्यामध्ये सहयोग निर्मिती करणे त्यासंबंधीची व्यवस्थापन करणे हे एक मोठे आव्हान शिक्षकासमोर असते. भारतीय परिस्थितीमध्ये गटकार्यासाठी आवश्यक असणारी साधनसामग्री कमी असल्यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते.

भाषणामध्ये शिक्षण पद्धतीमध्ये निर्माण होणाऱ्या साधनसामग्री चा तुटवडा वर्ग व्यवस्थापन वर्गातील साधनांची अनूपलब्धता,विजेचा तुटवडा व भारनियमान अशा अनेक कारणामुळे शिक्षकाला व्यत्यय येत असतो. येणारा हा व्यत्यय कमी करणे हे एक मोठ्या आव्हान ठरते.

रचनावादी शिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांचा सहभाग व सहयोग याविषयी त्याला खूपच नियोजन करावे लागते. या पद्धतीसाठी विद्यार्थ्यांची पारंपारिक मानसिकता अडचणीची ठरते . याचप्रमाणे गर्दीचे वर्ग ही एक मोठी समस्या ठरते. विद्यार्थ्यांचा सहभाग हा विविध उपायोजन करून जास्तीत जास्त घेणे गरजेचे ठरते.

वर्ग व्यवस्थापनामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा आणि क्षमता हे रचनावादी शिक्षण पद्धतीने निश्चित करून त्यांच्या क्षमतामध्ये वाढ करणे हे एक मोठे आव्हान ठरते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ठरवणे त्या निश्चित करणे त्यावर उपाययोजना करणे या प्रक्रिया पारंपारिक पद्धतीच्या तुलनेत खूप क्लिष्ट आहे.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांच्यासाठी अभ्यासक्रम आणि मूल्यांकनासंबंधीची आव्हाने

शिक्षण विभागाने नेमून दिलेल्या म्हणजेच प्रमाणित केलेला अभ्यासक्रम व त्याची रचनावादी दृष्टीने संरेखन करणे हे एक शिक्षकांसाठी आव्हान ठरते, कारण निर्माण केलेला अभ्यासक्रम एका विशिष्ट वर्गाला डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला असतो. परंतु ग्रामीण व दुर्गम भागामध्ये असणाऱ्या साधन सामग्री यांची उपलब्धता याचा विचार करून शिक्षकाला अभ्यासक्रम राबविणे विषयी आव्हानंतर सामना करावा लागतो.

रचनावादी तत्त्वांचा विचार करून अस्तित्वात असलेल्या मूल्यांकन चौकटीमध्ये त्याला रचनावादी अध्ययन अध्यापनाचे मूल्यांकन करणे गरजेचे ठरते यासाठी त्याला तारेवरची कसरत करावी लागते.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे मूल्यमापन करण्याची सध्याची पद्धत म्हणजे पारंपारिक चाचणी,सहामाही व वार्षिक परीक्षा आहे. यामधून रचनावादी शिक्षण प्रक्रियेचे मूल्यमापन करणे तसे कठीणच ठरते. यासाठी त्याला प्राप्त चाचण्यांमध्ये आवश्यक ते बदल घडवून,त्याचे मूल्यमापन करावे लागते.

पारंपारिक मूल्यांकन त्यासंबंधी असणारी साधने ही शिक्षक संघटनांच्या कडून वारंवार निर्माण केली जातात व वितरित केली जातात. परंतु रचनावादी शिक्षण प्रक्रियेच्या मूल्यांकनासाठी त्याला स्वत: प्रमाणीत मूल्यमापन प्रक्रियेचे व्यवस्थापन करावे लागते.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेमध्ये असणारी आव्हाने उदाहरणार्थ वेळेचे बंधन पाळणे, साहित्य सामग्री यांची उपलब्धता करणे, वेळोवेळी येणारे प्रशासकीय आदेश पाळणे ,अशैक्षणिक कामे करणे, पालकांच्या न बदलणाऱ्या मानसिकतेवर विजय मिळवणे अशा अनेक समस्यांचा सामना शिक्षकाला करावा लागतो.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांच्यासाठी ज्ञान आणि कौशल्य

ज्ञानरचनावादी अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांना येत असलेल्या समस्या किंवा आव्हानामध्ये शिक्षकाचे ज्ञान आणि कौशल्य हे सुद्धा प्रमुख आव्हान आहे.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेमध्ये आवश्यक असणारे तात्विक ज्ञान, विविध सिद्धांत ,अध्ययन -अध्यापन प्रक्रियेमधल्या छोट्या मोठ्या गोष्टींची समज व त्यांच्या राबवणुकी संदर्भात आवश्यक ज्ञानाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. हे ज्ञान घेण्यासाठी आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव दिसून येतो.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेसाठी असणाऱ्या वर्गामधील आवश्यक साधनसामग्री सुविधा व त्यांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कौशल्य यांचे विकसन यांचा अभाव विद्यमान शिक्षण पद्धतीत दिसून येतो. या सर्वावर मात करणे हे शिक्षकासमोरील एक मोठ्या आव्हान आहे.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेमध्ये आवश्यक तेथे तंत्रज्ञानाचा वापर ही अनिवार्य गोष्ट आहे यासाठी आवश्यक साधन सामग्री ती हाताळण्यासंदर्भातील प्रशिक्षण यांची कमतरता शिक्षकाला त्यांच्या व्यवस्थापनाविषयी आव्हान निर्माण करते.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये आवश्यक असणारी नवनवीन संशोधने पद्धती तंत्रज्ञाने यांचा वापराविषयी अपडेट राहणे यासाठी आवश्यक प्रशिक्षण करणे हे शिक्षकासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

ग्रामीण व दुर्गम भागामध्ये रचनावादी शिक्षण प्रक्रिया राबवणे हे विद्यार्थी पालक समाज शाळा व्यवस्थापन यांच्या दृष्टीने खूप कठीण व न जमण्याजोगे कार्य आहे. त्यामुळे त्या आव्हानांच्यावर मात करून प्रश्नावली शिक्षण पद्धतीचे शिक्षण उपलब्ध करून देणे शक्य आहे, असा आत्मविश्वास निर्माण करणे ही मोठी समस्या दिसते .

रचनावादी शिक्षण प्रक्रियेसाठी आवश्यक संसाधने व समर्थनात्मक यंत्रणा यांचा अभाव

रचनावादी शिक्षण प्रक्रिया वर्गामध्ये राबवण्यासाठी शिक्षकासमोर प्रामुख्याने त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व मर्यादित संसाधने यांचा अभाव ही खूप मोठी समस्या आहे. भारतीय परिस्थितीमध्ये खूपशा शाळांमध्ये अजून लाईट, पाणी ,स्वच्छता गृह या पायाभूत सुविधांचा अभाव दिसतो. या सर्वावर मात करून संगणक ,प्रोजेक्टर अशा मूलभूत सुविधांच्यासाठी शिक्षकाला संघर्ष करावा लागतो. व्यावसायिक विकासाच्या अत्यंत अपुऱ्या संधी सध्याच्या शिक्षणात शिक्षकांसाठी उपलब्ध होतात. विविध शैक्षणिक कामे व अशैक्षणिक कामे यामुळे त्याला स्वतःच्या व्यावसायिक कौशल्यामध्ये वाढ करणे कठीण होते.

शिक्षकाला आवश्यक कौशल्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय बाबी करून समर्थन मिळत नाही. त्यामुळे अत्यंत अपुऱ्या अशा ज्ञानावर त्याला अध्ययन अध्यापनाचे कार्य करावे लागते .याबरोबरच पालकांचा अत्यंत मर्यादित सहभाग आणि त्यांचे सहाय्य शिक्षण प्रक्रियेमध्ये लाभते. विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि फक्त शिक्षकाची जबाबदारी असते अशा मानसिकतेमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग मिळत नाही आणि त्यांच्या पालकांच्याकडून सहकार्य आवश्यक तेवढे मिळत नाही.

शिक्षण प्रक्रियेतील शिक्षकावर असणारा कामाचा अति प्रचंड ताण वेळेच्या मर्यादित सर्व गोष्टी करणे हे एक मोठे आव्हान शिक्षकासमोर उभे आहे.

रचनावादी शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षकांसमोरील भावनिक व मानसिक आव्हाने

रचनावादी शिक्षण पद्धतीमुळे विविध प्रकारच्या समस्यांना शिक्षकाला तोंड द्यावे लागते उदाहरणार्थ पारंपारिक शिक्षण पद्धती सोडून या नवीन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे पालक ,समाज, प्रशासन ई. चा होणारा विरोध त्याला सहन करावा लागतो.

शिक्षकाला विविध उपक्रम अध्यापन पद्धती अध्यापन नीती यांच्या वापरामुळे कधी कधी वर्ग नियंत्रण गमावण्याची भीती निर्माण होते. त्यामुळे येणारा तणाव त्याचे व्यवस्थापन करणे हे अवघड काम त्याला करावे लागते.

शिक्षकांची ***burnout stage*** हे एक मोठे आव्हान आहे, कारण बऱ्याच कालावधीनंतर शिक्षकाला बदल नकोसे असतात आहे. त्या ज्ञानावर अध्ययन अध्यापन प्रक्रिया राबवणे त्याला सोयीस्कर वाटते यामुळे शिक्षक स्वतःच तणावग्रस्त अवस्थेमध्ये जातो.

रचनावादी शिक्षण प्रक्रियेत स्वतःची कार्यक्षम शिक्षक म्हणून ओळख निर्माण करणे हे कठीण कार्य त्याला पार पाडावे लागते व होणाऱ्या टीकेला आणि संशयाला सामोरे जावे लागते .

रचनावादी शिक्षण प्रक्रिया राबवण्यात येणाऱ्या समस्या व आव्हाने यावरील उपाय योजना

रचनावादी शिक्षण प्रक्रिया राबवण्यासाठी थोडक्यात शिक्षकालावरील आव्हानांचा सामना करावा लागतो यासाठी काही धोरणे त्याला अवलंबणे गरजेचे आहे त्या संदर्भातील चर्चा पुढीलप्रमाणे-

वरील आव्हानांचा सामना करण्यासाठी शिक्षकाला वेळोवेळी आवश्यक तेवढी प्रशिक्षणाची उपलब्धता करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी व्यावसायिक विकास व प्रशिक्षण संस्थांच्या बरोबर, विविध शिक्षक संघटना, एनजीओ यांनी पुढाकार घेणे गरजेचं आहे.

- शिक्षकाने एकमेकांच्या सहयोगाने नियोजन करून या संदर्भात विविध उपायोजना करून शैक्षणिक अध्ययन अध्यापन नीती ठरवल्या पाहिजेत , प्राप्त परिस्थितीमध्ये असणाऱ्या अडचणी किंवा समस्या व त्यावर मात करण्यासाठी एकत्रित चर्चा करून मार्ग काढले गरजेचे ठरते. या संदर्भात कृती संशोधनासारखी मार्ग वापरून कार्य करता येईल.

- रचनावादी शिक्षण प्रक्रिया टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करणे यासंदर्भात पालक सभा शिक्षक व प्रशासन यांच्या सभा यांचा उपयोग करून या प्रक्रियेची आवश्यक ज्ञान सर्वांना करून देणे गरजेचे आहे.
- शिक्षकाने स्वयं मूल्यांकन करून विमर्शि चिंतन करून आपल्याला आवश्यक अशा कौशल्यांचा सराव करणे ज्ञान घेणे व त्यांचा वर्गामध्ये उपयोग करणे गरजेचे ठरते.
- शिक्षकांनी प्रशासनास योग्य मार्गाने या संदर्भातील माहिती देऊन आवश्यक असणारी संसाधने उपलब्ध करून घ्यावी व प्रशासनाचे समर्थन प्राप्त करणे महत्त्वाचे आहे.
- पालक सभा पालक भेटी व समाजातील विविध उपक्रम यामध्ये भागीदार होऊन या नवीन शिक्षण पद्धतीची गरज भविष्यासाठी किती आहे ते स्पष्ट करणे. विद्यार्थ्याला 21 व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांचा उपयोग पटवून देणे गरजेचे ठरते.
- शिक्षकांनी वेळोवेळी त्या पद्धती संदर्भातील संशोधने कौशल्य यांच्या विषयी अपडेट राहणे महत्त्वाचे आहे त्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक करणे शक्य होईल.
- विद्यार्थ्यांच्या भूमिकेविषयी त्यांच्याबरोबर संवाद साधून त्यांना चिंतन करण्यासाठी व स्वयं -मूल्यांकन करण्यासाठी प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे.
- विद्यार्थ्यांना वेळोवेळी प्रोत्साहन देणे,प्रेरणा देणे व या पद्धतींच्या अंमलबजांविषयी मानसिकता करणे हे महत्त्वाचे ठरते.

एकंदरीत विचार करता शिक्षकासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांच्यावर उपाययोजना करणे त्यांची निराकरण करून रचनावादी शिक्षण प्रक्रिया वर्गामध्ये यशस्वीपणे राबविणे, विद्यार्थ्यांना नवनवीन अध्यापन पद्धतीचे ज्ञान योग्य पद्धतीने देणे, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रोत्साहन देणे, ही कामे शिक्षकांनी करणे गरजेचे आहे. याबरोबरच योग्य त्या पद्धतीचे प्रशिक्षण घेऊन आपल्या अध्ययन-अध्यापन अधिक आकर्षक, प्रभावशाली करून विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक अनुभव द्यावे. प्रशासन,पालक,शासन अशा विविध घटकांची मानसिकता होण्यासाठी विविध प्रकारे प्रबोधन करणे महत्त्वाचे आहे. समस्या आव्हाने यांना धैर्याने तोंड दिले तर रचनावादी शिक्षण प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यात शिक्षकाला शक्य होईल असे वाटते.

संदर्भ:

1. *Brunner, J. S. (1996) The Culture of Education, Cambridge, Mass.: Harvard University Press.*
2. *Brooks, M.G. (2001) In Search of Understanding: The case for Constructivist Classrooms, Prentice Hall*
3. *Edward de Bono, Think Before It's Too Late'. Vermilion, Embury Publishing, Random House Group Company, Britain, 2009.*
4. *Edward de Bono, 'Free Mind - A Lateral Thinking Approach, JAICO Publishing House, Mumbai, - 2008*
5. *Ghaye, T. (2010) Teaching and Learning Through Reflective Practice, Routledge, New York*
6. *Hardiman, M. (2012) The brain-Targeted Teaching Model, Corwin, California.*
7. *Moseley, David et al (2005). "Framework for Thinking A Handbook for Teaching and Learning", Cambridge University Press, Cambridge, UK.*
8. *McGregor, Debora (2007), "Developing Thinking; Developing Learning A Guide to Thinking Skills in Education" Vol. I and II, Open University Press, MC Graw-Hill, Berkshire, England,*
9. *Posner, G. (1996) Field Experience: A Guide to Reflective Teaching, 4th Edition, Longman Publishers, Newyork. Sharma, S. (Ed). (2006) Constructivist Approaches to Teaching and Learning*

10. Handbook for Teachers of Secondary Stage, New Delhi, NCERT Zeichner, K & Liston, D. (1996) Reflective Teaching An Introduction, Routledge New York.

11. शिक्षण परिवर्तनाची सामाजिक चळवळ :प्रा रमेश पानसे ,डायमंड पब्लिकेशन ,सदाशिव पेठ ,पुणे.

12. रचनावादी शिक्षण*:* रमेश पानसे*,* वितरक*,* ग्राम मंगल*,* पुणे कार्यालय ,कोथरूड .*(*२०१०*)*

13. मैत्री ज्ञान-संरचनावादशी*:* संपादक राजश्री बाम , सहसंपादक शीला कोलटकर ,निराली प्रकाशन *(*एप्रिल २०१३ *)*

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने व वाटचाल

प्रा.डॉ.विक्रमराव नारायणराव पाटील.
शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली (सातारा)

प्रस्तावना:-

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. भारत हा वसाहतवादातून मुक्त झालेला देश आहे. नव स्वातंत्र्य देशानी भारताच्या नेतृत्वाखाली अलिप्तवादाचे धोरण स्वीकारले त्यामधील अनेक देशांनी लोकशाही स्वीकारली परंतु ती टिकवता आली नाही. ब्रिटीशांच्या संसदीय लोकशाहीचा स्वीकार भारतीय विविधतेला पूरक होता म्हणून धर्मनिरपेक्ष लोकशाहीचा स्वीकार केला. देशात अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक भाषा, अनेक चाली-रीती, अनेक जाती-उपजाती एकत्रित नांदत आहेत. विविधता हीच या देशाची शक्ती आहे आणि कमजोरीही आहे, या विविधतेला धर्मनिरपेक्षतेचे जोड देणे गरजेचे आहे. धर्मनिरपेक्षता, जाती निरपेक्षता, भाषा निरपेक्षता आणि लिंग निरपेक्षता हाच भारतीय संविधानाचा प्रमुख गाभा आहे.

संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून निश्चित तत्वे, मूल्य, सिद्धांत याचा स्विकार केला आहे. कल्याणकारी राज्याच्या उद्दीष्टाने जनतेशी बांधिलकी जपत जनतेच्या निर्णय क्षमतेवर, विवेक बुद्धीवर संविधान कर्त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे. लोकशाही ही केवळ शासनपध्दती नाही तर ती एक जीवन पध्दती आहे. व्यक्ती स्वातंत्र्य, मूलभूत हक्क, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता पर्यायाने देशातील या तत्त्वाचे पालन करुन देशाचा पर्यायाने सर्व समाज घटकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यास साहाय्य करणारी ती एक आदर्श शासन व्यवस्था आहे. भारतीय लोकशाहीला राजकीय लोकशाही बरोबरच सामाजिक व आर्थिक लोकशाही अभिप्रेत आहे. यातूनच भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने उभे राहिले आहेत त्याचा आपण अभ्यास करणार आहे.

संशोधनाचे उद्देश:

१) भारतीय लोकशाहीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
२) भारतीय लोकशाही पुढील आव्हानांचा अभ्यास करणे.
३) भारतीय लोकशाहीच्या वाटचालीचा अभ्यास करणे.

संशोधन पध्दती-

भारतीय लोकशाही पुढील आव्हाने व वाटचाल या शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासीक संशोधन पध्दतीचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने लोकशाहीवरील विद्वान संशोधकांचे ग्रंथ, विविध नियतकालीके, वर्तमानपत्रे, विविध इंटरनेटवरील वेबसाईट, इत्यादीचा अभ्यास करण्यात आला आहे.

भारतीय लोकशाही पुढे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय व्यवस्थेतून जमातवाद, प्रादेशिकता वाद, भाषावाद, जातीयवाद, बेकारी, निरक्षरता ही आव्हाने उभी राहिली. या आव्हानांचा मुकाबला भारतीय संसदीय व्यवस्थेच्या माध्यमातून केला. त्यामध्ये प्रामुख्याने जमातवादाचे आव्हान भारतीय राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता, समता, न्याय ही मूल्य रुजवून कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. जातीयवाद कमी करण्यासाठी अनेक कायदे केले आहेत. निरक्षरता कमी करण्यासाठी भारतामध्ये मोठे प्रमाणात ग्रामीण भागात शिक्षणाची व्यवस्था जनजागृती या माध्यमातून हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न केला आहे. भाषेवर आधारीत राज्य निर्माण केली. विविध उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून बेकारी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य घटनेतील नितीमूल्याच्या आधारे समतामूलक समाज निर्माण करण्याचे प्रयत्न झाले परंतु वरील विश्लेषण केलेली आव्हाने आजही काही प्रमाणात असल्याचे दिसून येते.

भारतीय लोकशाही पुढे राजकीय व्यवस्थेतून उभी राहिलेली अनेक आव्हाने आहेत. भारतीय लोकशाही प्रत्येक दशकात वेगवेगळे स्वरूप धारण करत होती त्यामुळे दशकनिहाय भारतीय लोकशाही पुढील आव्हाने समजून घेतली पाहिजेत या अर्थाने

भारतीय लोकशाही या प्रारूपाच्या अंतर्गत अहिंसात्मक लोकशाही, विकेंद्रित लोकशाही, सामाजिक लोकशाही, संसदीय लोकशाही, समाजवादी लोकशाही याची चर्चा राजकीय प्रक्रीयेमध्ये होत असते. घटनात्मक चौकट स्वीकारून मार्क्सवादी पक्षांनी घटनात्मक लोकशाहीला स्वीकारण्याचे उदाहरण पश्चिम बंगाल, केरळ इत्यादी राज्यात दिसून आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित असणारी सामाजिक लोकशाही, सामाजिक न्यायलक्षी लोकशाही किंवा सामाजिक आधारामध्ये बदल घडवून येणारी लोकशाही प्रक्रिया घडली नाही यामूळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पन्नाशीच्या दशकात लोकशाही पुढील विषमतेचे आव्हान नोंदविले होते. काँग्रेस पक्षाने नव्याने उद्याला आलेली पर्यायी लोकशाहीची संकल्पना समजून घेतली नाही. पन्नाशीच्या दशकात कल्याणकारी राज्य हा विचार स्वीकारला गेला परंतु त्यानंतर आर्थिक पेचप्रसंग हे आव्हान उभे राहिले. 1971 ते 1990 या वीस वर्षाच्या काळात लोकशाही केंद्रीत स्वरूपाची होती. काँग्रेस पक्षाची लोकशाही इतर पक्षांना मान्य नव्हती त्यामुळे बिगर काँग्रेस या प्रकारची लोकशाहीची एक कल्पना उदयाला आली. या गोष्टीची सुरुवात साठीच्या दशकात झाली होती. पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू या राज्यांमध्ये हा विचार स्वीकारला गेला या सर्व प्रक्रियेत नवीन लोकशाहीची संकल्पना घडत होती.

पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात लोकशाहीतील भागीदारीच्या आणि लोकशाहीतील हक्कांचा प्रश्न पुढे आला होता. 'इतर मागासवर्गाच्या संदर्भात लोकशाहीतील भागीदारीचा आणि लोकशाहीतील हक्कांचा विचार सुरू झाला होता. घटनात्मक लोकशाहीची संकल्पना निश्चित करताना हा प्रश्न घटनापरिषदेत उभा राहिला होता. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात काकासाहेब कालेलकर आयोग नेमण्यात आला. या दोन टप्प्यांमध्ये राजकीय भागीदारीचे व हक्काचे आव्हान उभे राहिले होते परंतु यापेक्षा मोठे आव्हान सत्तरीच्या व ऐंशीच्या दशकात उभे राहिले. काँग्रेस पक्ष मध्यम मार्गी भूमिकेकडून वर्चस्वशाली भूमिकेकडे वळला होता. यामुळे काँग्रेस पक्षाची लोकशाहीची संकल्पना आणि नव्याने उदयास येणारी नवीन लोकशाहीची संकल्पना यामध्ये मेळ बसला नाही. (बहुजन लोकशाही, ओबीसीची लोकशाही संकल्पना) कारण काँग्रेसने व वर्चस्वशाली गटांची लोकशाही ही संकल्पना या काळात विकसित केली होती तर लोहिया गट न्याय आणि सामाजिक परिवर्तन या प्रकारची लोकशाही घडवत होते हे मोठे आव्हान लोकशाही समोर उभे राहिले.'[1]

राजकीय अर्थकारणाचा पेचप्रसंग तिसऱ्या टप्यामध्ये जास्त परिणाम करू लागला. शेतकरी वर्ग समाधानी नव्हता यामुळे शेतकरी संघटना स्थापन झाली. शेतकऱ्यांचे प्रश्न हे भारतीय लोकशाही पुढील एक महत्वाचे आव्हान म्हणून पुढे आले. ९०च्या दशकानंतर भारतीय लोकशाहीच्या पुढे राजकीय नवहिंदुत्ववाद हे नवीन आव्हान तिसऱ्या टप्यातील लोकशाहीपासून सुरु झाले. हिंदुत्वाने सांस्कृतिक क्षेत्राच्या बाहेर प्रत्येक क्षेत्रात आपला विस्तार सुरु केला विशेषतः मध्यम शेतकरी जाती, इतर मागासवर्ग अदिवासी समूह आणि अनुसूचित जाती अशा समाजगटांना हिंदू अस्तित्वभान आले हे मोठे आव्हान भारतीय लोकशाही पुढे उभे राहिले आहे.

लोकशाहीतील लोकांची जागा मध्यमवर्गाने व्यापली ही राजकीय प्रक्रिया घडत असतानाच मंडल आयोग आणि महिलांसाठी राखीव जागा या दोन पद्धतीने भारतीय लोकशाहीत एक सुप्त राजकीय क्रांती घडून आली. बिहार, उ. प्रदेश, कर्नाटक अशा राज्यामध्ये ओ.बी.सी.चा राजकीय सहवास हा मुद्दा लोकशाही संकल्पनेची नवीन आवृत्ती जन्माला आली. उत्तर प्रदेशात बहुजन लोकशाहीचे प्रारूप उदयास आले. या प्रारूपाचा समावेश देखील सहभाग प्रधान लोकशाहीत होतो याला आव्हान मध्यमवर्गीय लोकशाही प्रारूपाने दिले. या प्रक्रियेतून भारतीय समाज राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांमध्ये विभागला गेला यातून प्रादेशिक पक्ष भारतात जन्माला आले यातून लोकशाही राजकारण आघाडयांच्या राजकारणात विभागले गेले. आघाड्यांच्या राजकारणातून सहभाग प्रधान लोकशाही प्रक्रिया विकसित होत गेली. बहुसंख्याकवादी लोकशाही प्रक्रिया देखील घडत होती नवहिदुत्व या अस्तित्वभानाच्या भोवती बहुसंख्याकवादी लोकशाही प्रक्रिया देखील घडवली गेली. मंडल विरुध्द कमंडलू अशी प्रक्रिया घडली. नवहिंदूत्व अस्तित्वभान व्यक्त करणारे प्रारूप उदयास आले.

आघाडयांचे राजकारण सहभाग प्रधान लोकशाहीला मदत करणारे होते. त्यामुळे बहुसंख्याकवादी लोकशाही राजकारणाने आघाड्यांच्या राजकारणाला विरोध केला. या प्रक्रियेचा भाग म्हणून बहुसख्यांकवादी लोकशाही आघाडीचे राजकारण संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. 2014 नंतर नवहिंदुत्ववादी लोकशाही हा प्रकार वर्चस्वाखाली ठरलेला आहे. हा लोकशाहीचा प्रकार या आधीच्या लोकशाही प्रकारांच्या विरोधात सातत्याने भूमीका मांडत आला आहे. 'स्वातंत्र्य चळवळीची नव्याने मांडणी

सुरु केली. त्यामुळे काँग्रेस मुक्त भारत असे वैचारिक चर्चा विश्व नवहिंदुत्ववादी लोकशाहीने उभे केले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतून अहिंसात्मक लोकशाहीचा आणि घटनात्मक लोकशाहीचा विचार विकसित झाला होता परंतु नवहिंदुत्ववादी लोकशाहीने अहिंसात्मक लोकशाही ही संकल्पना जवळपास रद्दबाद ठरवली गेली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेतृत्त्वाची विचारसरणी केवळ प्रतीकात्मक स्वरुपात मांडण्यात आली. व्यक्तीपूजा हा महत्वाचा आशय पुढे आला. ही प्रक्रिया घटनात्मक लोकशाहीच्या विरोधातील होती. भारतीय राज्यघटनेतील मध्यवर्ती विचार अमान्य केला. घटनात्मक संस्थांना आव्हान दिले गेले. घटनेचा आधार घेऊन स्थापन केलेल्या संस्थेच्या जागी नवी संस्था स्थापन करण्यात आली.'[2]

नवहिंदुत्ववादी लोकशाही प्रकारच्या पुढे पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश, दिल्लीव पंजाब या राज्यांमधून आव्हान उभे राहिले. या राज्यांनी नवहिंदुत्ववादी लोकशाही प्रकाराला विरोध केला आहे त्यांनी घटनात्मक लोकशाहीचा नेहरूंच्या लोकशाहीचा डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक लोकशाहीचा, महात्मा गांधी यांच्या अहिंसात्मक आणि विकेंद्रित लोकशाहीचा विचार राजकीय प्रक्रियेत गेल्या दहा वर्षात मांडला आहे. या राज्यांना जनतेने निवडणूक प्रक्रीयेत प्रतिसाद देखील दिलेला आहे यामुळे दक्षिण विरोधी उत्तर अशा दोन भागामध्ये लोकशाही बद्दलच्या वेगवेगळ्या संकल्पना उद्यास आल्या आहेत.

2014 ते 2024 या दशकातील राजकीय वातावरणाचे अवलोकन करता भारतीय राजकारणाचे सांप्रदायीकरण वेगाने होत आहे असे चित्र आहे. धार्मिक प्रभावाच्या माध्यमातून राजकीय वर्चस्वाची उभारणी केली जात आहे. राजकारणासाठी धर्माचा बेकायदेशीर वापर, धार्मिक प्रतीक चिन्हांचा दुरुपयोग, मतासाठी धार्मिक ध्रवीकरण हे निवडणूक आचारसंहितेला अमान्य असणाऱ्या बाबी केल्या जातात. बहुसंख्याक वादाच्या माध्यमातून अल्पसंख्यांक विरोध त्यामध्ये मुस्लीम विरोध प्रखर आहे. केवळ विरोधातच नाहीतर अल्पसंख्याक समाजाचा तिरस्कार, घृणा आणि हिंसक प्रतिकार करण्यात येत आहे. धार्मिकतेवर आधारीत संघटनांना पाठबळ देऊन त्याचे अनुनयीकरण केले जात आहे. संप्रदायीक राजकारणातून भारतीय जनतेतील एकात्मतेला तडा जाऊन असहिष्णुतेचे वातावरण वाढत आहे. अल्पसंख्याक समाजात असुरक्षिततेची भावना समाजात वाढीस लागली आहे. भौतिक विकासाचे मुद्दे जसे रोजगार, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा हे विषय बाजूला पडून भावनिक मुद्दे पुढे येत आहेत. लोकशाही व्यवस्थेतील संस्थांचा वापर चूकीच्या पद्धतीने केला जात आहे. लोकपाल, मुख्य माहिती आयुक्त, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, यासारख्या उत्तरदायित्वासाठी तयार करण्यात आलेल्या संस्था फक्त नावालाच राहिल्या आहेत. अन्वेषण विभाग, अंमलबजावणी संचालनालय व राष्ट्रीय तपास संस्था यासारख्या अधिसंस्थानी निपक्षपाती चौकशी करणे अपेक्षीत असतानाही त्याचा वापर राजकीय विरोधक, स्वतंत्र माध्यमे मतभिन्नता व्यक्त करणारे यांच्या विरोधात केला जात आहे. 'जागतिक विषमता अहवाल 2022 नुसार भारतात 2021 मध्ये 1% अति श्रीमंत लोकांकडे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 20% तर 10% लोकांकडे 57% उत्पन्न होते. सातत्याने श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत जाणे हे भारतीय लोकशाही पुढील आव्हान आहे.'[3] नविन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून आर्थिक विषमता कमी करण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. सतत वाढत जाणारी बेरोजगारी ही आज देशासमोरची सर्वात मोठी गंभीर समस्या आहे.

लोकशाही यशस्वीतेसाठी निर्भिड, स्वातंत्र्य नि:पक्षपाती प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका बजावतात. भारतीय प्रसारमाध्यमे व्यवसायिक भूमिकेतून सरकारचे दूत असलासारखे भूमिका मांडत आहेत त्यामूळे त्यांच्या निरपक्षतेवरती व सत्यपरती प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. आजचे राजकीय पक्ष व त्यांचे नेते राजकीय विचार पक्षाची निष्ठा यापासून दूर जात आहेत. पक्षांतर हे भारतीय लोकशाही पुढील आव्हान आहे. विरोधी पक्षाची कोंडी करण्यासाठी शासकीय संस्थाचा मुक्तपणे वापर करण्यावर भर देण्यात आला आहे यामध्ये इडी, सी.बी.आय. यासारख्या चौकशी यंत्रणापासून निवडणूक आयोगापर्यंतच्या यंत्रणाचा वापर होत आहे. यासारखेच नविन आव्हाने भारतीय लोकशाही समोर उभी आहेत.

निष्कर्ष:

भारताला संविधानिक लोकशाहीचा प्रवास करुन 70 वर्षाहून अधिक वर्ष झाली आहेत. या अनेक वाटचालीमध्ये अनेक अडीअडचणी सोबत आव्हाने उभी राहिलेली आहेत. विदेशी तत्वे व संस्था लोकशाही मूल्य भारतीय समाजात अद्यापही पूर्णपणे रुजली नाहीत आणि हा देश लोकशाही आदर्शापासून अजूनही दूर आहे. हे मान्य करूनही या देशाची आजपर्यंतची लोकशाही मार्गाने चाललेली वाटचाल ही आशादायक वाटते. पारंपारिक समाज आणि आधुनिक राजकीय व्यवस्था यांच्यात मेळ

घातले जात आहे. भारताचे सध्याचे स्वरूप संक्रमण काळातील लोकशाही असे आहे. लोकशाही आदर्शापासून फारकत झाल्याचे आज आढळते ते लोकशाही बद्दलच्या निष्ठांच्या अभावामुळे नसून इथल्या सामाजिक व आर्थिक स्थितीमुळे आहे आणि ही स्थिती परिवर्तनीय आहे. बहुसंख्याकवाद किंवा इतर आव्हाने ही भारतातील विविधतेतील एकता, बहूसंस्कृतीचे अस्तित्व, एकता, धर्मनिरपेक्षता सहिष्णुता विचार, निपक्ष न्याय व्यवस्था निर्भिक व निःपक्ष प्रसारमाध्यमे, सक्षम विरोधी पक्ष, प्रभावी सामाजिक चळवळी, सत्तेचे अधिकाधिक विकेंद्रीकरण, लोकांचा जास्तीत जास्त सहभाग, लोकशाही मूल्यातून पुढे येणारा सुजाण नागरिक आणि भारतीय राज्यघटना इत्यादी घटक लोकशाही समोरील आव्हाने समर्थपणे परतवून लावू शकतात. सामाजिक न्याय आणि लोकशाही यांची सांधेजोड राजकीय प्रक्रियेत करणे यामध्ये लोकशाहीचे भविष्य उज्वल दिसते. तसेच लोकशाही आणि नागरी समाज यांच्यामध्ये संवाद घडणे यामध्ये भारतीय लोकशाहीचे भविष्य उज्ज्वल दिसते. सामाजिक न्याय आणि नागरी समाज यातून भारतीय लोकशाहीला उर्जा मिळत आहे. त्यामूळे लोकशाही सामाजिक न्याय आणि नागरी समाज यांच्या मदतीने लोकशाही गतिमान करण्यासाठी लोकशाहीतील प्रबोधनाच्या चळवळी झाल्या पाहिजेत.

संदर्भ

1) पवार प्रकाश – विचारशलाखा (संपा. नागोराव कुंभार) भारतीय लोकशाही पुढील आव्हाने व भविष्य, प्रकाशक नागोराव कुंभार एप्रिल 2024, लातूर, पृ.क्र. 101
2) पवार प्रकाश - उपरोक्त पृ.क्र. 104
3) जगताप प्रदीप - विचारशलाखा (संपा. नागोराव कुंभार) भारतीय लोकशाही पुढील आव्हाने प्रकाशक नागोराव कुंभार, लातूर, पृ. क्र. 147.

संदर्भ ग्रंथ-

1) भोळे भा. ल. - भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण प्रकाशक - पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर सप्टेंबर 2012.
2) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास- भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे 2010
3) कुंभार नागोराव- विचारशलाखा भारतीय लोकशाही आव्हाने व भविष्य विशेषांक प्रकाशक - नागोराव कुंभार लातूर, एप्रिल 2024.
4) नलावडे पंडित - भारतीय लोकशाही स्थिती आणि गती, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद डिसेंबर 2011.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या निरोगी आरोग्यासाठी उत्तम भावनिक व्यवस्थापन क्षमता वृद्धीची गरज व महत्त्व

संध्यादेवी रघुनाथ बाड
सहा. प्राध्यापक (सीएचबी)
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.
Email- sandhyadevi.bad6580@gmail.com

डॉ. लता शिवाजी पाटील
प्रोफेसर
श्री. म. ता. शासकीय अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर

सारांश :

सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगात मानवाने खूप प्रगती केली आहे. प्रत्येक क्षेत्रात नवनवीन शोध लावले जात आहेत. परंतू या स्पर्धेच्या युगात ताणतणाव आणि आव्हानांनी भरलेल्या युगात मानव स्वत:ला कुठेतरी हरवत चालला आहे. आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, भावनिक बंध कमी होत चालले आहेत, आज कोणतेही वर्तमानपत्र उघडले की, त्यामध्ये अस्थिर भावनिक विश्व समोर येते, मग ते दहावी, बारावी विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या, चार वर्षाच्या मूलीवरील अत्याचार, महाविद्यालयाची फी भरण्यासाठी पैसे नाहीत म्हणून आत्महत्येच्या स्वरुपात असो किंवा प्रेमभंग त्यातील निराशा यामूळे होणारे दुदैवी प्रकार असतील. या सर्वांचे कारण एकच आहे की, मुलांना आपल्या भावनांवर योग्य प्रकारे नियंत्रण करता येत नाही.

विकासाच्या 13 ते 19 वर्षे या कालखंडात कुमारावस्थेत मूलांना अधिक मार्गदर्शनाची गरज असते. कारण या अवस्थेत मूला-मुलींमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक बदल मोठ्या प्रमाणात होतात, मूले, अस्थिर गोंधळलेली असतात म्हणून या अवस्थेस वादळी व ताणतणावाची अवस्था (A period of strom and stress) असे म्हटले जाते. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी याच कालखंडातील असतात. त्यांच्यामध्ये झालेल्या या विविध बदलामूळे मूले अस्थिर गोंधळलेली असतात. याचा त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होतो यासाठी या कालखंडातील मूलांना त्यांच्या भावना ओळखणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, त्या योग्य पद्धतीने व्यक्त करणे याबाबत मार्गदर्शन केले तर नक्कीच त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यात सुधारणा होईल व मूलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच राष्ट्र विकास साधण्यास व सक्षम भारत घडवण्यास मदत होईल.

Key words - माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी, निरोगी आरोग्य, भावनिक व्यवस्थापन क्षमता.

प्रस्तावना

व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्व विकासात प्रत्येक विकासावस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परिपक्वता आणि अनुभव यांच्या परिणामातून घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या प्रगतीसूचक मालिकेस विकास म्हणतात. प्रत्येक विकासावस्थेमध्ये व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे बदल घडून येत असतात. त्या बदलाची जाणीव संबधिताना तीव्रपणे होते तो कालखंड म्हणजे कुमारावस्था वय वर्ष 13 ते 19 हा होय. ज्यांला इंग्रजीमध्ये टीन एजर्स असे म्हणतात. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी, हे याच अवस्थेतील असतात त्यांच्या भावनांचा, गोंधळाचा, अस्थिर अवस्थेचा परिणाम त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असतो. म्हणूनच या कालखंडात मूलांना भावनिक व्यवस्थापन क्षमतेचे मार्गदर्शन देणे, प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. यासाठी प्रथम भावना, भावनाचे वर्गीकरण, भावना व्यवस्थापन, भावनांचा आरोग्यावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

भावना

मानवी जीवनात भावनांना खूप महत्त्वाचे स्थान आहे. भावनाविरहीत जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. जीवनात भावनाच नसतील तर जीवन निरस बनेल. भावनांमुळेच आपले जीवन उद्देशपूर्ण व अर्थपूर्ण बनते.

भावना- व्याख्या


मॉर्गन आणि किंग 1984 –

"उत्तेजक आणि प्रेरक गुणधर्म, असलेली चेहऱ्यावरील आणि शारीरिक हावभावांनी युक्त अशी जाणीवेची व्यक्तिनिष्ठ स्थिती म्हणजे भावना होय."

क्लिंगीना आणि क्लिंगीना (1981) –

जागृतावस्थेतील व्यक्तीनिष्ठ भावानुभव सुखात्मक आणि दु: खात्मक भाव, राग, भिती, आनंद, खिन्नता, आश्चर्य, किळस इ. सारख्या विशिष्ट भावाविष्कारांना भावना असे म्हणतात.

प्रस्तुत व्याख्यांवरुन भावनांचे दोन विभागात वर्गीकरण करता येते.



व्यक्तीच्या या सकारात्मक व नकारात्मक भावनांमूळे होणारे शरीरांतर्गत व बाह्य बदल.

शरीरांतर्गत बदल

- श्वासोच्छवासाच्या गतीत बदल गती वाढणे, कमी होणे.
- हृदयाचे ठोके वाढतात.
- लाळरस निर्मितील घट, तोंड कोरडे पडणे.
- जठर आणि आतड्याच्या कार्यात घट
- अति भूक लागणे किंवा भूक न लागणे.
- डोकेदुखी, पोटदुखी
- निद्रानाश इ.

शरीराच्या बाह्य भगात -

- घाम येणे
- चेहऱ्यावरील हावभावात बदल, आक्रमकता
- स्नायूंमध्ये ताठरता
- चेहरा, ओठ लाल होणे.
- नेत्रछिद्राचा आकार वाढणे
- भीतीने थरथरणे, रागाने थरथरणे
- त्वचेचे तापमान वाढणे
- आवाजात बदल

व्यक्तीच्या या सकारात्मक तसेच नकारात्मक भावनांमुळे शरीरांतर्गत व बाह्य बदल होतात आणि त्यांचा व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. तो पुढीलप्रमाणे-

भावनांचा आरोग्यावर होणारा परिणाम

सकारात्मक भवनांचा आरोग्यावर भावनाचा परिणाम-

- ज्या लोकांचा जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन आहे त्यांची
- रक्तातील साखरेची पातळी योग्य असते. त्यांना हृदयविकाराचा धोका कमी असतो.
- जेव्हा आपण आजारी पडतो तेव्हा जर सकारात्मक दृष्टिकोन ठेवला तर लवकर बरे होतो.
- ताणतणाव व आव्हानांनी व्याप्त जीवनात सकारात्मक भावनांचा आपल्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो.

उदा. 'आनंद, प्रेम, कृतज्ञता यासारख्या सकारात्मक भावना आरोग्याला चालना देण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

नकारात्मक भावनांचा आरोग्यावर परिणाम

नकारात्मक भावनांमूळे व्यक्तीच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. शारीरिक तसेच मानसिक आरोग्य बिघडते. उदा. उच्च रक्तदाब, दमा, पचनसंस्थेचे आजार, हृदयरोग, चिंता, भीती, वैफल्य, उदासीनता (मेयर, ई.ए. 2011)

या सकारात्मक व नकारात्मक भावनांचे वर्गीकरण करणे, त्या ओळखणे त्यावर योग्य नियंत्रण ठेवणे यासाठी व्यक्तीला भावनांचे व्यवस्थापन करता येणे गरजेचे आहे. हे भावनांचे व्यवस्थापन म्हणजे काय ते पुढीलप्रमाणे-

भावनिक व्यवस्थापन - व्याख्या

"भावनांचे नियमन व नियंत्रणाची क्षमता याद्वारे योग्य वर्तन करणे व आयोग्य वर्तनाला स्वयंसूचनेमार्फत नियंत्रित करणे म्हणजे भावनांचे व्यवस्थापन होय."

भावनिक व्यवस्थापन ही एक कला आहे व त्याचबरोबर एक शास्त्रदेखील आहे. एक कला म्हणून ते जीवनाला सुंदर बनवते व आसपासच्या व्यक्तींशी जोडलेले राहण्यास मदत करणे हे एक कौशल्य आहे.

भावनिक व्यवस्थापन न करता आल्यामुळे व्यक्तीकडून घडणारे गैरवर्तन

- भाषिक गैरवर्तन
- अभाषिक गैरवर्तन

1) **भाषिक गैरवर्तन -**

- आरडाओरडा करणे
- अपमानास्पद बोलणे
- शिव्या देणे
- धमकी देणे
- दोषारोप करणे
- शपथ घालणे
- दोषारोप करणे
- उपदेश करणे
- अनपेक्षित रागाचा उद्रेक

2) **अभाषिक गैरवर्तन-**

- बोलण्याकडे दुर्लक्ष करणे
- अबोला धरणे
- बहिष्कृत करणे
- दादागिरी करणे

- हेरगिरी करणे
- समोरच्यास नाकारणे

वरील भावनिक गैरवर्तने घडू नयेत यासाठीच शरीर व मन यामध्ये समतोल साधण्यासाठी, निरोगी आरोग्यासाठी भावनिक व्यवस्थापन गरजेचे व महत्त्वाचे आहे.

भावनिक व्यवस्थापन क्षमता वृद्धीची गरज च महत्त्व

- माध्यमिक किंबहुना सर्वच स्तरावरील विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना योग्य पद्धतीने ओळखता येण्यासाठी भावनिक व्यवस्थापन क्षमता वृद्धीची गरज आणि सहत्त्व आहे
- उत्तम व योग्य पद्धतीने भावना व्यक्त करता येणे.
- अस्थिर भावनिक अवस्थेतून बाहेर येणे.
- कौटुंबिक व मित्रांमधील संबंध सुधारणे.
- आत्मविश्वासात वाढ करणे.
- निराशा, चिंता, दुःख यातून यशस्वीपणे बाहेर येणे.
- इतरांच्या भावनांची जाणीव व त्यांना समजून घेणे.
- उत्तम संवाद साधणे.
- संघर्षमय स्थितीतून बाहेर येणे.
- निराशामय परिस्थितीत सकारात्मक आणि जबाबदारपणे प्रतिक्रिया देणे.
- योग्य भागनि भावना व्यक्त करणे.
- स्वतःला विशिष्ट भावनिक परिस्थितीतून सावरण्यासाठी योग्य वेळ देणे.

भावनिक व्यवस्थापन क्षमता

भावनात्मक संघर्षातून जात असताना इतरांना न दुखावला किंवा त्यांच्या भावनांचा अनादर न करता. आपली मते दृष्टिकोन, भावना व्यक्त करणे तसेच आपल्या भावना व्यक्त करण्यापूर्वी होणाऱ्या संभाव्य परिणामांवर विचार करणे आवेगपूर्ण वर्तनावर नियंत्रण ठेवणे म्हणजेच भावनिक व्यवस्थापन क्षमता होय. Lifeskillscollaborative.in7glossary

काही भावनिक व्यवस्थापन क्षमता-

- आत्म-जागरूकता
- योग्य प्रतिसाद
- स्वीकृती
- इतराच्या भावनांचा आदर
- तणावमुक्त जीवन जगणे

आत्म-जागरूकता -

आत्म-जागरुकता, हे असे कौशल्य आहे जे विद्यार्थ्यांना त्यांची भावनिक स्थिती समजून घेऊन वर्तन करण्यास मदन करते. या क्षमतेत वृद्धी झाल्यामुळे विद्यार्थी भावनिक दृष्ट्या स्थिर व शांत होतात आणि आत्मविश्वासाने काम करतात.

योग्य प्रतिसाद देणे —

एखाद्याच्या वर्तनाला आपण दिलेली प्रतिक्रिया कशी आहे यावरही भावनिक व्यवस्थापन क्षमता समजते.
उदा- जर आपला मित्रांशी काही कारणांवरुन वाद झाला. काही वेळाने आपल्या लक्षात येने की आपण योग्य प्रतिसाद दिला नाही आणि आपण मित्राची माफी मागतो. हे भावनिक व्यवस्थापन क्षमता आहे.

स्वीकृती - आपण आपल्या व इतरांच्याही भावनांचा स्विकार करणे हे महत्त्वाची क्षमता आहे.

इतरांच्या भावनांचा आदर -

इतरांना त्यांच्या तीव्र भावनिक परिस्थितीत काय वाटत असेल हे स्वतःच्या अनुभवांचा वापर करुन समजून घेणे हि एक महत्त्वाची क्षमता आहे.

उदा-मित्राच्या उदास असण्याचे कारण समजून घेऊन त्याला मदन करणे.

तणावमुक्त जीवन अगणे -

ताणामुळे हृदयरोगापासून नैराश्यापर्यंत अनेक समस्या उद्भवतान त्यामूळे तणावमुक्त व आनंदी जीवन जगणे. अशाप्रकारे काही भावना व्यवस्थपन क्षमता आहेत त्याच्या वृद्धीसाठी मार्गदर्शनाची गरज असते. प्रशिक्षणाची गरज असते. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना जर याचे प्रशिक्षण दिले तर त्याचे आरोग्य उत्तम राहते.

निष्कर्ष-

सकारात्मक भावनांचा आपल्या आरोग्यावर खोलवर परिणाम होतो. त्या ताण-तणाव कमी करतात, रोगप्रतिकारशक्ती वाढवतात आपले आरोग्य तसेच आयुष्यही बदलून टाकतात. म्हणूनच माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यामध्ये सकारात्मक भावनांचा विकास करणे गरजेचे आहे. त्यांना भावना व्यवस्थापन करण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे. तरच विद्यार्थी संतुलित व तणावमुक्त जीवन जगतील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण समतोल विकास होईल.

संदर्भसूची

1. करंदीकर, सुरेश (2006) 'शौक्षणिक मानसशास्त्र' कोल्हापूर : फडके प्रकाशन
2. गोसावी, विवेक (संचा. 2019) 'स्व-विकास व कलारसास्वाद' पुणे: महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ
3. गोसावी, विवेक (संचा. 2020) 'मानसशास्त्र' पुणे: महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ
4. सिंह, दलिप (2008) 'भावनिक बुद्धिमत्ता एक व्यावसायिक मार्गदर्शन' पुणे : डायमंड प्रकाशन

Online Resources

1. https:// www.researchgate.net/pub
2. https:// shodhaganga. inflinet.ac.in
3. mr. vikaspedia.in > health>Hlthoth.info
4. www. desunhospital.com
5. www.takingcharge.esh Umn.edu>
6. www.health.com/emotion

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि प्राकृत भाषा

प्रा.महावीर सुरेश पाटील,
श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स,सांगली

मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळात भाषा हे संपर्क साधण्याचे प्रमुख साधन होते. या भाषेतूनच समाजाची अभिव्यक्ती ही अगदी आरशाप्रमाणेच होत असते म्हणूनच भाषेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. भाषेचा इतिहास पाहता प्राचीन काळातील जनभाषा, लोकभाषा, मातृभाषा, बोलीभाषा, प्रकृती भाषा किंवा स्वाभाविक भाषा म्हणून जनरुची असलेली प्राकृत भाषा चे अनन्य साधारण महत्त्व असलेले दिसून येते. ज्यामध्ये धार्मिक आख्यान, चरित्रें, स्तुती, स्तोत्र, लोककथा, काव्य, चंपूकाव्य, प्रहसन, व्याकरण, छंद, कोश, अर्थशास्त्र, वास्तुशास्त्र, रत्नपरीक्षा, सामुद्रिकशास्त्र, जैन स्थापत्य, मूर्ती व शिल्पकलेची निर्मिती झाली जो भारतीय इतिहास आणि साहित्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

भारतीय सांस्कृतिक परंपरा समृद्ध आणि चिरंतन करण्यास प्राकृत भाषेने मोलाचे योगदान केले आहे. या प्राकृत साहित्याची परंपरा मोहेंजोदारो या संस्कृतीच्या कालापर्यंत पोहोचते. प्राचीन गुहा, प्राकृत शिलालेख, मंदिरे, अशोक स्तंभ, मूर्ती, प्रतीक, शिल्प इत्यादीच्या रूपाने भारतात प्राकृतने आपले अस्तित्व सिद्ध केले आहे.

अलीकडेच केंद्र सरकारने पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला. यात पाली आणि प्राकृत या प्राचीन भारतातील लोकप्रिय भाषांचा समावेश करण्यात आला आहे. "पाली आणि प्राकृत या भाषा भारतीय संस्कृतीच्या मुळाशी आहेत. या अध्यात्म, ज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या भाषा आहेत. त्यांना अभिजात भाषांचा दर्जा देणे हे भारतीय विचार, संस्कृती आणि इतिहासावर त्यांच्या असलेल्या शाश्वत प्रभावाचा सन्मान करणे आहे. अभिजात भाषा म्हणजे एक अशी भाषा जी प्राचीन, समृद्ध आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची असते. ही भाषा सांस्कृतिक, साहित्यिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण मानली जाते. अभिजात भाषा म्हणून ओळखली जाणारी भाषा काही महत्त्वाच्या निकषांवर आधारित असते, जसे की -

1. प्राचीनता: ती भाषा 1500 – 2000 वर्षे प्राचीन असावी लागते.
2. समृद्ध साहित्य परंपरा: त्या भाषेत विस्तृत आणि महत्त्वपूर्ण साहित्य असावे.
3. स्वतंत्र साहित्यिक परंपरा: ती भाषा इतर कोणत्याही भाषेवर आधारित नसावी आणि तिची स्वतंत्र साहित्यिक परंपरा असावी.
4. सांस्कृतिक महत्त्व: त्या भाषेला समाजाच्या सांस्कृतिक आणि बौद्धिक इतिहासात विशेष स्थान असावे.[१]

प्राकृत साहित्याचे महत्त्व आणि त्याची सखोलता याविषयी दोन शब्द बोलणे आवश्यक वाटते. प्राकृतची परंपरा सुमारे पंधरा शतके चालू राहिली. भाषाशास्त्राच्या दृष्टिकोनातून असे म्हणता येईल की , इंडो-आर्यन कुटुंबातील भारतीय भाषांचा पालीपेक्षा प्राकृत भाषेशी जवळचा संबंध आहे. किंबहुना, या देशातील आधुनिक भाषा मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात प्रचलित असलेल्या विविध प्राकृत आणि अपभ्रंशांच्या वारसदार आहेत. हिंदी, बंगाली, मराठी वगैरे कोणतीही भाषा घ्या, ती कोणत्या ना कोणत्या प्राकृतातून विकसित झाली आहेत. विकासाच्या काळात असे काही ग्रंथही रचले गेले ज्यांचे वर्गीकरण अत्यंत कठीण आहे, म्हणजेच ज्यांच्या संदर्भात त्यांची भाषा प्राकृत आहे की कोणत्यातरी आधुनिक भाषेचे जुने स्वरूप आहे हे लगेच सांगणे सोपे काम नाही. या दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक भाषांचा उगम आणि संपूर्ण विकास समजून घेण्यासाठी प्राकृत साहित्याचे योग्य ज्ञान आवश्यक आहे.

प्राकृत भाषा ही वैदिक काळापासून समृद्ध भाषा आहे. प्राकृतची काही वैशिष्ट्ये ऋग्वेदातील काही शब्द, ध्वनी, प्रकृती-प्रत्यय आणि वाक्य रचनांमध्ये आढळतात. प्राकृत भाषा ही वैदिक काळापासून पतंजलीच्या काळापर्यंत जनसामन्याची भाषा होती. वैदिक व्याकरण आणि प्राकृतातील शब्दांचे विविध ठिकाणी साम्य आहे. मौर्यांच्या काळात प्राकृत ही राजभाषा होती, सातवाहनांच्या काळातही तिचा ओघ कायम राहिला. दक्षिणेकडील भाषा - तेलुगू, तमिळ, कन्नड, मल्याळम व प्राकृत भाषेत अधिक साम्य आहे. कालिदासाच्या नाटकांमध्ये प्राकृत भाषा बोलणाऱ्या पात्रांची संख्या ही अधिक होती.यावरून तत्कालीन

परीस्थितीमध्ये प्राकृत भाषा ही लोकभाषा असल्याचा स्पष्ट पुरावा मिळतो.सम्राट खारवेलांचा प्राकृत शिलालेख प्रसिद्ध आहे. या शिलालेखातील आशयावरून प्राकृत भाषेच्या प्राचीनतेची जाणीव होते.

प्राकृत भाषेतील ग्रंथभंडाराचे विपुल प्रमाणात उपलब्ध असूनही वर्तमानकाळात ते साहित्य मिळत नसल्याचे दिसून येते. अनेक शतकांपासून दुर्लक्षित राहील्यामुळे साहित्याचा मोठा भाग नष्ट झाला असावा. परंतु तरीही आज आपणास जिनसेन स्वामींचे 'आदिपुराण', 'हरिवंशपुराण' आणि रविषेनचे 'पद्मपुराण' जवळपास एक हजार वर्षे वाचले जात असले तरी, श्रीपुष्पदंत कवीचे प्राकृत 'आदिपुराण', 'हरिवंशपुराण' वगैरे इत्यादींचे साहित्य आजही भांडारात सुरक्षित आहेत. तसेच इतर ग्रंथही प्राचीन भांडारात शोधून सापडतील.

तीर्थंकर महावीर यांनी प्राकृत या प्रचलित भाषेत प्रवचन देऊन सर्वसामान्यांच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. भाषा हे संवादाचे शक्तिशाली माध्यम आहे. त्याचा जीवनाशी जवळचा संबंध आहे. जीवनातील सर्वोच्च मूल्ये सार्वजनिक भाषेत मांडणे हाच खरा लोकशाही दृष्टीकोन आहे.

प्राकृत भाषा ही जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाची आणि आगमाची मूळ भाषा आहे हे सर्वज्ञात आहे. हे भ. महावीरांची वाणी(अर्धमागधी- प्राकृत) आहे, जे प्राकृत या लोकभाषेत विणलेले, रचलेले आणि प्रवाही आहे. प्राकृत भाषेच्या ज्ञानाशिवाय जैन तत्त्वज्ञानाच्या साधकाला, विद्यार्थ्यांना आगमांचे खरे ज्ञान मिळणे शक्य नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्राकृत भाषेचे महत्त्व, सुसंगतता, सौंदर्य आणि साहित्य याचे महत्व अधोरेखित केले आहे. यामध्ये विविध धर्माच्या आणि निधर्मी लोकांनी समाजातील सर्व स्तरातील आणि विविध सामाजिक - आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या लोकांनी हजारो वर्षाच्या काळात लिहिलेल्या गणित ,तत्त्वज्ञान, व्याकरण, संगीत, राजकारण, वैद्यकशास्त्र ,वास्तुकला, धातूकाम, नाटक, काव्य, कथाकथन आणि इतर गोष्टीच्या खजिन्याचा समावेश आहे.[२] या प्राकृत भाषेचा आणि त्याच्या समृद्ध साहित्याचा उच्च शिक्षणात उपयोग होण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार खालील कृती कार्यक्रमाची आवश्यकता आहे.ती पुढीलप्रमाणे -

1. ऑनलाईन मोड्युल्स[३]

भारतात अभिजात प्राकृत भाषेमध्ये अतिशय समृद्ध साहित्य आहे. याशिवाय, भावी पिढ्यांच्या सुख आणि समृद्धीसाठी पाली, पर्शियन आणि प्राकृत भाषा; आणि त्याच्यातील साहित्याचेही संवर्धन करणे आवश्यक आहे. भारत संपूर्ण विकसित देश बनेल तेंव्हा पुढील पिढीला भारताच्या व्यापक आणि सुंदर अभिजात साहित्याच्या अभ्यासात सहभागी आणि समृद्ध व्हायचे असेल. प्राकृत आणि इतर अभिजात भारतीय भाषा आणि साहित्यसुद्धा विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी शिक्षणामध्ये पर्याय म्हणून शक्यतो ऑनलाईन मोड्युल्सच्या माध्यमातून अनुभवात्मक आणि नाविन्यपूर्ण मार्गांनी उपलब्ध असाव्यात.त्यामुळे या भाषा आणि त्यांच्यातील साहित्य जिवंत आणि चैतन्यपूर्ण राहण्यासाठी You tube, Blended learning, flipped classroom, Google classroom यासारख्या विविध online modules च्या माध्यमातून अपणास प्रयत्न करता येईल. प्राकृत साहित्यातील काही महत्त्वपूर्ण आशय खालीलप्रमाणे जे सर्वांसाठीच दिशादर्शक ठरणारे असतील उदाहरणार्थ -

भगवती आराधना -

आचार्य शिवार्य यांनी लिहीलेल्या "मूलाराधना" किंवा "भगवती आराधना" हा ग्रंथ प्रथम शतकात 2071 गाथांमध्ये लिहीला. सल्लेखना हा मुख्य केंद्रीत विषय घेऊन हा ग्रंथ लिहीला असला तरी शरीरशास्त्र, गर्भशास्त्र, घरगुती उपचार , औषध आणि विविध रोग इत्यादिवर विवेचन केले आहे.

अट्ठीगी हुंति तिन्नी हु सदाणि भरिदाणि कुणिममज्जाए।
सबमिम चेव देहे संधीणि हवंति तावदिया II (व्हारुण, णवसदाइं सिरा सदाणि हवंति सत्तेव ।
देहम्मि मंसपेसीण हुति पंचव य सदाणि ।।[४]

अर्थात, मानवी शरीरात १०० अस्थिबंधन, 100 नसा आणि 500 स्थायू प्रणाली आहेत.

कोढी संतो लद्धूण डहइ उच्छू रसायणं ।[५]

अर्थात, कुष्ठ रोगाला नष्ट करणेसाठी इक्षुरस श्रेष्ठ रसायन आहे.

अकउम तितय मणविलंव निखर, आणि अकसायमलवणममधुरं ।
अविरस महुरविगंध अच्छमणु वह अणदिसीद ।।[६]

अर्थात, कायम निरोगी आरोग्यासाठी मध्यम स्वादाचे कडु, तिखट, आम्ल, चटपटीत, गोड, वीरस, सुगंधित स्वच्छ आणि मध्यम उष्ण आहार घेतले पाहिजे.

'भगवती आराधना' ग्रंथातून जीवन जगण्याची कला, मुनी आचार तर कळतेच त्याचबरोबर आयुर्वेदाची माहिती ही अगदी सुक्ष्म आणि अचूक पद्धतीने वैज्ञानिक दृष्टीकोनातून वैद्यक शास्त्रावर प्रकाश टाकलेला दिसून येतो. ग्रंथकाराने अगदी सर्दी खोकल्यापासून ते गर्भीचे वाढ - विकासचा संकल्पना स्पष्ट केल्या अहित. कोणता आहार योग्य सकस? कोणता अयोग्य हे सांगितले. मानवी शरीराची पूर्ण संरचना त्यांनी अगदी अचूक शब्दात मांडली आहे. हा ग्रंथ पहिल्या शतकात लिहीला आहे यावर विश्वासच बसत नाही. आधुनिक तंत्राज्ञानाची कास धरूनही आज इतक्या आत्मविश्वासाने आयुर्वेदाविषची माहिती अचूक शब्दात मांडताना आज ही आम्हाला दिसत नाही.

रयण परिक्खा-

हा ग्रंथ १४ व्या शतकात होऊन गेलेल्या 'ठक्कुर फेरू' यांनी लिहिला आहे. या ग्रंथात १३२ गाथा असून, कोणती रत्ने कोठे मिळतात? कोणत्या रत्नाचे कोणते फळ मिळते ? रत्न परीक्षा कशी करावी? रत्नांची किंमत कशी ठरते? इत्यादी प्रकारची माहिती दिलेली दिसून येते.

समपिंड - सगुण निम्मल गुरूलुल्ला हीणपिंड लहुमुल्ला।
अइ लहुतुल्ल वज्जा बहु-मुल्ला, सम-समा मुल्लो ।।[७]

अर्थात, 'समान आकाराचे, गुणांनी युक्त निर्मल, अधिक किंमतीचे असतात. लहान आकाराचे कमी किंमतीचे असतात. लहान - कमी वजनाचे हिरे अत्यंत मौल्यवान असतात. समान मध्यम आकाराचे मध्यम किंमतीचे असतात.'

कूडाय इय परिक्खा गुरू विन्नाया य सुहमधारा य।
साणायं सुह घसिया दुह घसिया रयण जाइभवा ।।[८]

अर्थात, 'जे वजनाने अधिक, लवकर भेदणारे अधिक धारधार असलेले, सानेवर घासले असता सहज छेद होणारी रत्ने ती खोटी होत. परंतु जी घासण्यात कठीण आहेत ती रत्ने श्रेष्ठ जातीवंत होत.

या अशा साहित्यामधून उद्योग व्यवसायाशी संबंधित कौशल्य विकसित झालेल्या आपणास आढळतात.

2. विविध ॲप्स[९]

नाविन्यपूर्ण आणि अनुभवात्मक पध्दती वापरून भाषा शिकवण्याची प्रक्रिया समृध्द केली जाईल, यामध्ये विविध ॲप्सचा वापर करुन प्राकृत भाषेच्या सांस्कृतिक पैलूंबरोबर सांगड घालता येईल - उदा. AI, Google Translator etc. भाषांचे शब्दसंग्रह आणि शब्दकोश नियमितपणे अधिकृतरित्या अद्ययावत करणे, व्यापकपणे प्रसारित करणे आवश्यक आहे, जेणेकरुन या भाषांमध्ये सर्वात वर्तमान मुद्यांवर आणि संकल्पनांवर प्रभावीपणे चर्चा करता येऊ शकेल.जसे कि पर्यावरण,भ्रुणहत्या,मानवी मुल्ये , प्राचीन शिक्षण पद्धती (गुरुकुल),व्यापार इत्यादीसारख्या आशयाच्या माध्यमातून अनेक समस्यांचा प्रभावीपणे सामना करता येऊ शकते.

3. संशोधन[१०]

आज कोणत्याही देशाच्या आर्थिक, बौद्धिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि तांत्रिक आरोग्यासाठी आणि प्रगतीसाठी संशोधनाचे महत्त्व पूर्वी कधीही नव्हते इतके वाढले आहे. संशोधनाचे हे महत्त्व लक्षात घेऊन प्राकृत भाषेच्या समृद्ध साहित्यावर संशोधन होणे नितांत आवश्यक आहे. याशिवाय, सामाजिक समस्यांच्या उपायांमधील त्यांच्या मूल्याबरोबरच, कोणत्याही देशाची ओळख, प्रगती, आत्मिक/बौद्धिक समाधान आणि कल्पकता या गोष्टीसुद्धा देशाचा इतिहास, कला, भाषा आणि संस्कृती इ.द्वारे मोठ्या प्रमाणात साध्य केल्या जातात. विज्ञान आणि समाज शास्त्रातील शोधांबरोबरच कला आणि मानव्यशास्त्रातील संशोधनसुद्धा देशाच्या प्रगतीसाठी आणि आत्मज्ञानासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. प्राकृत भाषेत असे अनेक क्षेत्र आहेत जिथे संशोधनाला वाव आहे . जसे की ,

ठक्कुर फेरू यांनी शिल्प शास्त्रावरील 'वास्तुसार' नावाचा २८२ गाथांनी युक्त असलेला प्राकृत भाषेतील ग्रंथ लिहिला. त्यानंतर १४९ गाथांनी युक्त असलेला मुद्राशास्त्रावरील प्राकृत भाषेतील ग्रंथ लिहिला. 'धातू उत्पत्ती' नावाचा चौथा प्राकृत ग्रंथ लिहिला जो ५७ गाथानी युक्त आहे. त्यांनी 'भूगर्भ प्रकाश' नावाच्या या ग्रंथाचीही रचना केली. आपल्या बंधूस व मुलास मुद्रा शास्त्राचे ज्ञान मिळावे म्हणून मुद्राशास्त्रावरील 'द्रव्यपरीक्षा' हा ग्रंथ त्यांनी लिहिल्याचा उल्लेख मिळतो. 'गणितसारकौमुदी' हा गणित विषयावरील त्यांचा ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ भाषा विज्ञानाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला दिसून येतो याशिवाय त्यांनी 'ज्योतिषसार' आणि 'युगप्रधान चौपाई' ग्रंथाचीही रचना केली.[११] या साहित्यावर धोरणात्मक संशोधन करता येईल.

याचबरोबर सम्राट अशोकाचे '14 गिरनार' व राजा खारवेलाचे 'हाथीगुंफा' शिलालेखामध्ये राज्याने जमिनीच्या सिंचनाकडेही लक्ष दिले. शिलालेखामध्ये सिंचनासाठी तलाव, कालवे, आणि धरणे बांधल्याचे वर्णन आहे. मौर्य काळापासून राज्यकर्ते सिंचनाची व्यवस्था करत आहेत. चंद्रगुप्त मौर्याने सौराष्ट्रात गिरनार पर्वताखाली एक विशाल सुदर्शन तलाव बांधला होता, ज्याची उपयुक्तता इतकी होती की नंतरच्या राज्यकर्त्यांनी त्याची दुरुस्ती करून त्यावर धरण बांधले. पूर्व भारतात पाऊस जास्त असल्याने कालव्याची गरज कमी होती. खारवेलाच्या हाथीगुंफा शिलालेखावरून हे स्पष्ट होते की, त्याच्या राज्याभिषेकाच्या 5 व्या वर्षी त्यांनी कलिंगाच्या राजधानीपर्यंत एक कालवा बांधले होते, ज्यामुळे जनतेला त्याचा फायदा होऊ शकला. शिलालेखात उल्लेख आहे - पंचमे दानीं वसे नंदराज तिवससत ओघाटितं तानसुलीय वाटा पणाडिं नगरं पवेसयति... म्हणजे पाचव्या वर्षी सम्राट खारावेल नंदवंशी राजाने 300 वर्षांपूर्वी उदघाटन केलेला (बांधलेला) कालवा पुढे खोदून तनसुलीया मार्गाने आपल्या राजधानीत आणले.[१२] सद्य स्थितीत भारतातील पाणीटंचाई, पर्यावरण, कृषी इत्यादिसारख्या विविध विषयावर मार्ग काढण्यासाठी उपरोक्त आशयांवर संशोधन होणे आवश्यक आहे. या दृष्टीने प्राकृत साहित्याचे महत्त्व अनन्य साधारण दिसून येते.

4.पुर्नमुद्रण[१३]

भाषा उपयुक्त आणि चैतन्यमय राहण्यासाठी जे प्राचीन साहित्य आहेत त्यांचे पुर्नमुद्रण होणे अत्यंत आवश्यक आहे, तसेच प्राकृत भाषेचा शाश्वत विकास होण्यासाठी त्या भाषेतील उदा. ताडपत्री, ग्रंथसंपदा, हस्तलिखीते, ताम्रपट इत्यादि सारख्या तत्सम लेखणाचे साहित्य जनसामान्यांपर्यंत सहज उपलब्ध व्हावे या हेतूने त्याचे पुर्नमुद्रण होणे आवश्यक आहे.

5. भाषा अनुवाद[१४]

प्राकृत भाषा चांगल्या प्रकारे जिवंत आणि प्रवाही राहण्यासाठी अनुवादाची गरज आहे. उच्च दर्जाचे अध्ययन साहित्य आणि इतर महत्त्वाचे लिखित व मौखिक साहित्य, सामान्य जनतेला विविध भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी भाषा अनुवाद होणे अत्यंत गरजेचे आहे यामुळे सर्व भारतीय भाषांचा प्रसार होण्यास मदत होईल.

उपरोक्त कृतीकार्यक्रमामध्ये ग्रंथालय, तंत्रज्ञान आणि क्राऊडसोर्सिंग, शिष्यवृत्ती आणि योजना, शैक्षणिक सॉफ्टवेअर्स, प्राकृत भाषा प्रयोगशाळा, सशक्त विभाग इत्यादि सारख्यांचाही समावेश करता येईल. या प्राकृत भाषेला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात महत्त्वाचे स्थान देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच अलीकडेच या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने एकंदरीत या दोन्ही बाबींमुळे निश्चितपणे प्राकृत भाषा आणि त्या भाषेतील ज्ञान सर्वसामान्य पर्यंत पोहोचविण्यास मदत होऊन या भाषेला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त होण्यास मदत होईल.

निष्कर्ष

उपरोक्त विवेचनावरून असे लक्षात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभिजात प्राकृत भाषेस वरील कृती कार्यक्रमाची जोड दिल्यासनी निश्चितपणे आपणास प्राकृत भाषेस सुवर्णकाळ येण्यास वेळ लागणार नाही. अभिजात प्राकृत भाषेचे जतन करणे. प्राकृत भाषेचे साहित्य समृद्ध करणे. पाकृत भाषा संवर्धनासाठी सुसज्य ग्रंथालय स्थापित करणे. प्राकृत भाषेतील प्राचीन हस्तलिखिते डिजिटायजेशन करणे. प्राकृत भाषेच्या विकासासाठी विविध सॉफ्टवेअर तयार करणे उदाहरणार्थ गुगल ट्रान्सलेटर मध्ये प्राकृत भाषा. प्राकृत भाषेसाठी लॅंग्वेज लॅब तयार करणे. प्राचीन प्राकृत ग्रंथांचे (आगम साहित्य) पुनर्मुद्रण करणे. प्राकृत भाषा विकासासाठी स्वतंत्र अध्ययन केंद्राची स्थापना करणे. प्राकृत भाषा अध्ययनासाठी डिजिटल डिक्शनरी तयार

करणे .प्राकृत भाषेच्या संदर्भात अनेक जैन मंदिरामध्ये, जैन मठामध्ये किंवा घरातील उपलब्ध होत असलेल्या साहित्याचे संरक्षण व संवर्धन करणे.

समारोप

भारतीय संस्कृतीमध्ये प्राकृत भाषा आणि त्याचे साहित्य याचे महत्त्व अधोरेखीत केले आहे. 21 व्या शतकातील आधुनिक भाषेबरोबरच प्राचीन् प्राकृत भाषा ही काळाची गरज आहे असे वाटते. त्यामुळे प्राकृत भाषेचे संरक्षण आणि संवर्धनासाठी आपल्या बहुमोल सहकाराची सहकार्याची अपेक्षा आहे. निश्चितच बर उल्लेख केल्याप्रमाणे प्राकृत भाषेला नवी दिशा मिळाली तर प्राकृत भाषेला पुन्हा एकदा सुवर्ण काळ यावयास वेळ लागणार नाही.

संदर्भ

1. मराठी अभिजात कशी ? : हरी नरके, दैनिकतरुण भारत, सोमवार, ७ ऑक्टोबर २०२४
2. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- मराठी : शिक्षण मंत्रालय भारत सरकार, पृ. १८
3. तत्रैव पृ.१८
4. भगवती आराधना :आचार्य श्री शिवार्य, गा १०२१,१०२२ पृ. ५४८, प्रकाशन जैन
5. संस्कृती संरक्षक संघ, सोलापुर, ई. स. 2004
6. तत्रैव गा १०२३ पृ. ५४८
7. तत्रैव गा. १४८५ पृ. ६९४
8. रयण परिक्खा, पाइय-रमणमाला अर्धमागधी-प्राकृत (ऐच्छिक): कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर गा. १६ पृ.१२४ ई. स. २०१३
9. तत्रैव गा. १७ पृ.१२५
10. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- मराठी : शिक्षण मंत्रालय भारत सरकार, पृ. १९
11. तत्रैव पृ. ६०
12. प्राचीन साहित्य : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रथमावृत्ती - 2009 पृष्ठ क्रमांक — 59
13. प्राकृतभाषा — अभिलेख : प्रो. रमेश कुमार पाण्डेय, श्री लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, पृ. क्र. ४५ , ४६ आवृत्ती : २०१४
14. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०- मराठी : शिक्षण मंत्रालय भारत सरकार,पृ. ७३
15. प्राकृत साहित्य का इतिहास : डॉ. जगदीशचंद्र जैन, प्रकाशक - चौखम्बा विद्याभवन भारतीय संस्कृति एवं साहित्य के प्रकाशक तथा वितरक) चौक, वाराणसी ,सर्वाधिकार प्रकाशकाधीन संस्करण : २०१४
16. प्राकृत भाषा और साहित्य का आलोचनात्मक इतिहास : डॉ . नेमीचंद्रशास्त्री, प्रकाशक : तारा बुक एजन्सी , वाराणसी, पहिली आवृत्ती - 1966 पुनर्मुद्रण - 1988 पुनर्मुद्रण — २०१४

उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व

सचिन विलास चौगले
कर्मवीर हिरे महाविदयाल, गारगोटी

उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व विविध कारणांनी अधोरेखित केले जाते. शारीरिक शिक्षण केवळ शारीरिक स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातूनच नाही, तर मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकासातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. या लेखात, उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व विस्तृतपणे समजून घेऊ.

१. शारीरिक स्वास्थ्य

शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य सुधारले जाते. नियमित व्यायामामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते, वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते आणि हृदय-संवहनीय आरोग्य सुधारते. हे विद्यार्थ्यांना दीर्घकाळात आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करते.

२. मानसिक स्वास्थ्य

शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यासाठीही अत्यंत आवश्यक आहे. नियमित व्यायामामुळे मानसिक ताण कमी होतो आणि एकाग्रतेत वाढ होते. शारीरिक क्रियाकलाप केल्याने endorphins रिलीझ होतात, ज्यामुळे आनंद आणि समाधानाची भावना वाढते. यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य सुधारते आणि त्यांना चांगली कामगिरी करण्यास मदत होते.

३. सामाजिक कौशल्ये

शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांना सामाजिक कौशल्ये विकसित करण्याची संधी देते. खेळात टीमवर्क, सहकार्य आणि संवादाची आवश्यकता असते. हे गुण विद्यार्थ्यांच्या सामाजिक जीवनात मदत करतात, ज्यामुळे ते अधिक प्रभावीपणे संवाद साधू शकतात आणि सहकार्याची भावना निर्माण करतात.

४. अनुशासन आणि धैर्य

शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनुशासनाची भावना निर्माण होते. नियमित प्रशिक्षण, वेळेवर उपस्थिती आणि शारीरिक ताण सहन करणे हे सर्व गुण अनुशासनाच्या विकासात महत्त्वाचे असतात. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात धैर्य आणि सातत्य येते, जे त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनात उपयोगी ठरते.

५. भावना आणि आत्मविश्वास

शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास वाढते. खेळ आणि शारीरिक स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यांनी स्वतःवर विश्वास ठेवण्यास शिकतात. यामुळे त्यांचे भावनात्मक स्वास्थ्य सुधारते, आणि ते चुकल्यावर किंवा पराभूत झाल्यावर हार मानण्याऐवजी पुन्हा प्रयत्न करण्याची मानसिकता विकसित करतात.

६. क्रीडा आणि करिअर संधी

शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या अनेक संधी उपलब्ध करतो. उच्च शिक्षणात, अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये क्रीडा शिष्यवृत्त्या उपलब्ध असतात. यामुळे क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रात करिअर घडविण्याची संधी मिळते.

७. ताण आणि आराम

उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांना अनेक ताणतणावांचा सामना करावा लागतो. शारीरिक शिक्षण विद्यार्थ्यांना ताण कमी करण्याचे आणि आराम करण्याचे साधन उपलब्ध करतो. खेळ आणि व्यायामामुळे ताण कमी होतो आणि विद्यार्थ्यांना मनाची शांतता मिळते.

८. एकत्रित विकास

शारीरिक शिक्षण केवळ शारीरिक विकासातच मदत करत नाही, तर संपूर्ण व्यक्तिमत्व विकासातही योगदान देते. मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकासासाठी आवश्यक असलेले गुण या शिक्षणातून मिळतात. त्यामुळे विद्यार्थी एकत्रित आणि संतुलित व्यक्तिमत्व विकसित करतात.

९. शारीरिक शिक्षणाची शालेय भूमिका

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाचा समावेश आवश्यक आहे. शारीरिक शिक्षणाच्या वर्गांमध्ये विद्यार्थ्यांना विविध खेळ आणि शारीरिक क्रियाकलापांचे शिक्षण मिळते. त्यामुळे ते केवळ शारीरिक तंदुरुस्ती साधत नाहीत, तर जीवन कौशल्येही शिकतात.

१०. शारीरिक शिक्षणाचे सुसंगत शिक्षण

शारीरिक शिक्षण एकाच प्रकारे शिक्षण देत नाही; त्यात विविध प्रकारच्या क्रियाकलापांचा समावेश असतो. यामध्ये योग, नृत्य, खेळ, आणि विविध शारीरिक प्रशिक्षण पद्धती यांचा समावेश होतो. हे सर्व विविध कौशल्ये आणि ज्ञान विद्यार्थ्यांना प्रदान करतात.

११. शारीरिक शिक्षणाचे जागतिक संदर्भ

जागतिक स्तरावर, शारीरिक शिक्षणाचे महत्त्व वाढत आहे. अनेक देशांमध्ये शारीरिक शिक्षणाला महत्त्व दिले जाते आणि ते उच्च शिक्षणाचा एक अविभाज्य भाग मानले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने शारीरिक क्रियाकलापांबाबत अनेक शिफारसी केल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य आणि कल्याण सुधारण्यासाठी प्रेरणा मिळते.

१२. शारीरिक शिक्षणाच्या भविष्याची दिशा

उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाच्या भविष्याची दिशा शिक्षण पद्धतींमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा समावेश करणे आणि शारीरिक शिक्षणाची जागरूकता वाढवणे आहे. यामध्ये वर्च्युअल क्लासेस, ऑनलाइन क्रीडा स्पर्धा आणि इंटरऍक्टिव्ह शिक्षण पद्धतींचा समावेश होऊ शकतो.

निष्कर्ष

उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व अत्यंत व्यापक आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकास होतो. शारीरिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनुशासन, आत्मविश्वास, आणि सहकार्याची भावना वाढते. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी शारीरिक शिक्षणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे एकत्रित विकास साधण्यासाठी शारीरिक शिक्षण एक महत्त्वाचा घटक आहे, जो त्यांच्या जीवनाला सकारात्मक परिणाम करतो.

शारीरिक शिक्षण हे आजच्या युगात अधिक आवश्यक आहे, कारण ताणतणाव, मानसिक स्वास्थ्य आणि एकाग्रतेच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या विद्यार्थ्यांना यामुळे फायदा होतो. त्यामुळे उच्च शिक्षण संस्थांनी शारीरिक शिक्षणाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थी एक समर्थ, स्वस्थ आणि उत्साही नागरिक बनू शकतील.

संदर्भ

1) उच्च शिक्षणातील शारीरिक शिक्षणाचे महत्त्व - दातार एम.के. अहुजा प्रकाशन पुणे 2004, पान नं 25
2) शारीरिक शिक्षण – खंड पाच
3) योग आणि आरोग्य – कुलकर्णी व्ही के प्रतिक पब्लिकेशन, मुंबई पान नं 345

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मधील स्थानिक भाषाविषयक तरतुदी आणि संधी

प्रा. शिवाजी वसंत देसाई
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.

प्रस्तावना

नुकतेच महाराष्ट्र सरकारने एनईपी 2020 धोरण लागू केले आहे. 1986 च्या अभ्यासक्रमाचा आराखडा लक्षात घेऊन २०१९ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक मसुदा तयार केला आहे. त्यानुसार नवीन शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये येणाऱ्या आव्हानांचा विचार करून भारतातील शिक्षित तरुण या स्पर्धेत टिकावा, शिक्षण प्रकियेतून तयार झालेले आपले भारतीय मनुष्यबळ संगणकाच्या युगात, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात टिकावे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जागतिक पातळीवरील बदल स्वीकारताना, नवीन आव्हानांना तोंड देता देता आपल्या स्थानिक परिसरांमध्ये असलेली अद्वितीय गुणवत्ता आणि साधन संपत्ती याचं बाजारीकरण करता यावे. त्याबरोबरच आपल्या मनुष्यबळामध्ये असलेले कौशल्य विकसित करावे आणि त्याला जागतिक बाजारपेठ-व्यासपीठ मिळवून देत यावी. असा व्यापक दृष्टिकोन ठेवून एनईपी 2020 आपल्यासमोर मांडल्याचे दिसून येते. याबरोबरच 1986 च्या शैक्षणिक धोरणातील पूर्ण न झालेली ध्येये धोरणे एनइपी 2020 या योजनेद्वारे पूर्ण करण्याचा प्रयत्न करता यावा हा मुख्य उद्देश आहे.

भारतीयांच्या सातत्यपूर्ण आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, शास्त्रीय प्रगतीमध्ये सातत्यपूर्णता यावी यासाठी एन इ पी २०२० ची योजना केलेली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारतीयांना जागतिक पातळीवर नेतृत्व करता यावे यासाठी दर्जेदार शिक्षणाचा अंतर्भाव केला आहे. शिक्षण अधिक अनुभवात्मक, सर्वसमावेशक, संशोधनकेंद्रित आणि आनंददायी होण्यासाठी अध्यापनशास्त्र विकसित करणे आवश्यक आहे. त्याबरोबरच शिकणाऱ्याच्या सर्व क्षमता आणि पैलू यांचा विकास करणे यामध्ये अपेक्षित आहे. अभ्यासक्रमामध्ये विज्ञान आणि गणित यांच्या बरोबरीने मूलभूत कला, हस्तकला, मानव्यशास्त्रे, खेळ, क्रीडा, भाषा , साहित्य, संस्कृती आणि मानवी मूल्य यांना अग्रस्थान दिल्याचे दिसून येते. विद्यार्थीना चारित्र्यवान बनवण्याबरोबरच रोजगारक्षम बनवण्याकडे कल असल्याचे दिसून येते.

उद्दीष्टे

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्थानिक / प्रांतिक भाषांना दिलेलं महत्व शोधणे .
२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्थानिक / प्रांतिक भाषांची संधी शोधणे.

गृहीतके

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बहुभाषिक तत्वामुळे स्थानिक / प्रांतिक भाषांना महत्व येणार आहे.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बहुभाषिक तत्वामुळे स्थानिक पातळीवरील ज्ञानसाठा जागतीक पातळीवर पोचणार आहे.

भारतीय ज्ञानाला खूप मोठा आणि अतिप्राचीन वारसा आहे. गणित, खगोलशास्त्र, धातुशास्त्र, वैद्यकशास्त्र, शास्त्रशल्यचिकित्सा, स्थापत्य, अभियांत्रिकी, योग, ललितकला, जहाजबांधणी, बुद्धिबळ अशा अनेक विषयांमधील भारतीय ज्ञानाचा प्रभाव जगावर आहे. याचे संशोधन, प्रचार, प्रसार होण्यासाठी, असे ज्ञान जतन करण्यासाठी अशा विषयाची मांडणी आणि आग्रह एनईपी २०२० मध्ये जाणीवपूर्वक केल्याचे दिसून येते.

भारत देशातील युवकांना इथल्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजांबरोबरच इथल्या अद्वितीय कला, भाषा आणि ज्ञानाच्या परंपरेविषयी राष्ट्रीय अभिमान आणि परस्पर सहयोग होण्यासाठी प्रोत्साहित करणे एन ई पी २०२० मध्ये अपेक्षित आहे. या धोरणाच्या तत्त्वांमध्ये बहुभाषिक अथवा आणि भाषा शक्ती यांना प्रोत्साहन असे एक धोरण आहे. ते आपल्या शोधनिबंधाच्या अनुषंगाने आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने व्यक्तीच्या सृजनक्षमतेच्या विकासावर भर दिलेला आहे. हे आपणाला दिसून येते. व्यक्तीची अभिव्यक्ती भाषेतून अधिक होते आणि व्यक्तीच्या शारीरिक विकासाबरोबरच सामाजिक, नैतिक आणि भावनिक क्षमतांचा विकास सुद्धा भाषेच्या सहाय्यानेच होतो.

मातृभाषांचा पुरस्कार.

लहान मुल प्रथमतः आपल्या आई-वडिलांकडून विशेषकरून आईकडूनच ज्ञानग्रहणाचे धडे घेत असते. ज्ञान कोणत्या ना कोणत्या भाषेतून घेतली जाते आणि ती भाषा म्हणजे मातृभाषा होय. मूल बारा ते चौदा वर्षांचे होईपर्यंत ते जास्त वेळ कुटुंबात असते आणि यादरम्यान त्याच्या कानावर आई-वडिलांचीच, भावंडांचीच भाषा पडते. या भाषेमधून त्याला सर्व गोष्टीचे आकलन होत असते. अवघडात अवघड सिद्धांत, ज्ञान बालकाला आई वडिलांच्या भाषेत सुलभपणे उदाहरणांसहित शिकविता येतात. समजून देता येतात. जगातील सर्व अवघड गोष्टींचे आकलन त्याला मातृभाषेतूनच उत्तम प्रकारे होऊ शकते असे भाषाशास्त्रज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांचे विधान आहे. या मातृभाषेला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषा / घरातील भाषा / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा असे म्हटले आहे आणि इयत्ता पाचव्या इयत्तेपर्यंत आणि शक्यतो आठवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतूनच / प्रादेशिक भाषेतूनच द्यावे अशी शिफारस करण्यात आली आहे. इयत्ता आठवीनंतर इतर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय भाषेबरोबर एक स्थानिक भाषा / मातृभाषा म्हणून शिकवली जाईल असे म्हटले आहे. विशेष म्हणजे खाजगी आणि सरकारी अशा दोन्ही शाळांना हा नियम बंधनकारक राहील असे नमूद केले आहे. यावरून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आपणाला मातृभाषा / घरातील भाषा / स्थानिक भाषा / प्रादेशिक भाषा यांना महत्व दिलेले दिसून येईल.

स्थानिक भाषा आणि बोलीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे विज्ञान, गणित यासारख्या विषयांची पाठ्यपुस्तके मातृभाषेत उपलब्ध करण्याचा प्रयत्न राहील, की जेणेकरून उच्च प्रतीचे आणि अध्ययवत ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्याला इंग्रजीसारख्या आंतरराष्ट्रीय भाषेचा अडथळा जाणवणार नाही. त्याच्या ज्ञानग्रहणात परभाषा अडसर ठरणार नाही.

जिथे मुलांची मातृभाषा एक आहे आणि शिक्षणाचे माध्यम वेगळी भाषा आहे त्यांच्यासाठी द्विभाषा अध्ययन-अध्यापन सामग्रीसह शिक्षकांना द्विभाषापद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. पायाभूत पायरीपासूनच मुलांना विविध भाषांची ओळख करून दिली जाईल. सर्व भाषा परस्परसंवादी आणि आनंददायक पद्धतीने शिकवल्या जातील. असे असले तरी इथे मातृभाषेचे महत्त्व कमी केले नाही हे लक्षात घ्यावयास हवे. सुरुवातीच्या दोन इयत्तांमध्ये मातृभाषेचे वाचन आणि लेखन शिकवले जाईल. तिसऱ्या इयत्तेपासून इतर भाषांचे लेखन आणि वाचन शिकवले जाईल. मुलांच्यामध्ये भाषांच्या विकास करण्यासाठी भाषा शिक्षक नेमण्याची योजना असेल. त्रिभाषा सूत्राचे प्रोत्साहन कायम राहील. भारतीय बोली भाषांच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले जाईल. विविध भाषा शिकण्यासाठी, शिकवण्यासाठी भाषा शिक्षण लोकप्रिय करण्यासाठी, तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात केला जाईल.

गणित आणि विज्ञान यासारख्या विषयांच्या ज्ञानदानासाठी विद्यार्थ्यांना भाषिक अडथळा येण्याची शक्यता गृहीत धरून गणित आणि विज्ञान विषयावरील क्रमिक पुस्तके आणि अध्यापन अध्ययन सामग्री द्विभाषिक करण्यास प्रोत्साहन देण्याची तरतूद केली आहे.

एन ए पी 2020 मध्ये भाषाविषयक केलेल्या तरतुदीवरून आपणाला काही संधी दिसून येतात त्या अशा.

१) विविध भाषा शिकण्या - शिकविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान निर्माण करणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे भाषेचे अद्यायन अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्याना यामध्ये संधी आहे.

२) गणित आणि विज्ञान या विषयांची क्रमिक पुस्तके, अध्ययन-अध्यापन सामग्री तयाआहेरणे गरजेचे बनेल. ही सामग्री जर मातृभाषा आणि इंग्रजीमध्ये केली तर जे विद्यार्थी या ज्ञानाचे आकलन करून योग्य प्रकारे उपयोजन करतील यातून नवनिर्मिती होईल. ते उत्तम प्रकारे सादरीकरण करू शकतील.

३) स्थानिक पातळीवरील ज्ञान आपणाला द्विभाषिक पुस्तकांमुळे जागतिक पातळीवर नेण्यासाठी प्रोत्साहन दिल्यामुळे आपल्या ज्ञानाचा प्रसार, प्रचार होईल. त्याबरोबरच भाषांतरकार, ग्रंथप्रकाशनाशी संबंधित मनुष्यबाळाला संधी आणि काम मिळेल. परकीय भाषेतील ज्ञान स्थानिक भाषेत आणण्यासाठीही भाषांतरकारांना संधी मिळेल.

४) द्विभाषिक क्रमिक पुस्तकांमुळे आपल्या स्थानिक भाषेतील समृद्ध साहित्य, ज्ञान, सांस्कृतिक वारसा इतर भाषिकांपर्यंत पोहोचविणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अंतर्भूत आहे. यादृष्टीनेआपला ज्ञान वारसा जतन करणे हि एक संधी आहे

५) स्थानिक बोलींच्यामध्ये मौखिक स्वरूपात असलेले ज्ञान, साहित्य यांचं संकलन- संपादन करण्याची एक मोठी संधी यामधून मिळणार आहे.

६) संस्कृत आणि प्राकृत यासारख्या अभिजात भाषा आणि त्या भाषेतील साहित्य ऑनलाईन मॉड्युल्सच्या माध्यमातून शिकण्यास उपलब्ध असेल. तर ही ऑनलाईन मॉड्युल्स तयार करणे, उपलब्ध करणे, कार्यान्वित करणे आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणं ही सुद्धा एक संधी आहे.

७) नाविन्यपूर्ण आणि अनुभवात्मक पद्धती वापरून भाषा शिकण्यासाठी नवनवीन पद्धतींचा शोध लावता येईल नवे ॲप तयार करता येतील.

सारांश

वरील विवेचनावरुन आपणाला असे लक्षात येईल कि, एनईपी 2020 या धोरणांमध्ये सर्वांगीण विकासाची आणि स्थानिक भाषेतील ज्ञान वृद्धींगत करण्याची अनेकविध क्षेत्रे आहेत. स्थानिक भाषांना आणि ज्ञानाला जागतिक व्यासपीठ मिळवून देण्याचे विविध मार्ग दिसून येतात. स्थानिक बोलीतील मनुष्यबल कितपत याचा वापर करून घेणार आहे हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे.

संदर्भ

१) नवीन शैक्षणिक धोरण २०२०.
२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मसुदा २०१९

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

भारतातील पर्यटन व्यवसायाचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

प्रा. शत्रुघ्न शिवाजी पाटील
(एम.ए., सेट, अर्थशास्त्र; एम.एल.आय.एस., नेट, सेट, ग्रंथालयशास्त्र)
ग्रंथपाल, क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा
ई.मेल.आयडी. shatrughna.edu@gmail.com

सारांश

भारत हा विविध संस्कृती, धर्म, आणि नैसर्गिक सौंदर्याचा संगम असलेला देश आहे, ज्यामुळे पर्यटन क्षेत्र देशाच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण ठरले आहे. भारतातील ऐतिहासिक स्मारके, मंदिरे, किल्ले, धार्मिक स्थळे, आणि नैसर्गिक आकर्षणांनी देशाला जागतिक पातळीवर एक अनोखी ओळख मिळवून दिली आहे. 'अतुल्य भारत' आणि अशा इतर अनेक सरकारी उपक्रमांमुळे पर्यटन क्षेत्राच्या वाढीस चालना मिळाली आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे. पर्यटनाच्या प्राचीन इतिहासात तेराव्या शतकात 'पर्यटन' या संकल्पनेचा उदय झाला. पर्यटनामुळे रोजगार निर्मिती, परकीय चलनाची कमाई, आणि पायाभूत सुविधांचा विकास होतो, ज्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होतो. धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, आणि सांस्कृतिक पर्यटन यांसारख्या विविध प्रकारांनी भारतातील पर्यटन क्षेत्राला व्यापक वाढ मिळवून दिली आहे. वाराणसी, मथुरा, अजमेर, आणि तिरुपती यांसारख्या धार्मिक स्थळांमुळे लाखो पर्यटक आणि यात्रेकरू भारतात येतात. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. पर्यटनामुळे काही ठिकाणी आर्थिक असमानता, महागाई, आणि पर्यावरणीय ऱ्हास यांसारख्या नकारात्मक परिणामांचाही सामना करावा लागतो. उदाहरणार्थ, गोवा आणि केरळ येथे समुद्रकिनाऱ्यांवर होणाऱ्या प्रदूषणामुळे पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. शाश्वत पर्यटनाच्या विकासासाठी पर्यावरणपूरक धोरणे, स्थानिक समुदायांचा समावेश, आणि दिर्घकालीन पायाभूत सुविधा निर्माण करणे अत्यावश्यक आहे. भारतात पर्यटन हे वेगाने वाढणारे क्षेत्र असून देशाच्या अर्थव्यवस्थेत त्याचा मोठा वाटा आहे. या निबंधात भारतातील पर्यटनाच्या विकासाचे विश्लेषण केले आहे, त्याचे विविध प्रकार, पर्यटनामुळे होणारे आर्थिक फायदे आणि त्यासोबत येणाऱ्या आव्हानांची चर्चा केली आहे. विशेषतः रोजगार निर्मिती, परकीय चलनाची कमाई, पायाभूत सुविधांचा विकास यासह पर्यावरणीय ऱ्हास, सांस्कृतिक परिवर्तन, आणि स्थानिक लोकांच्या जीवनमानावर होणारा परिणाम यांचा समावेश केला आहे.

१. प्रस्तावना :

भारतातील पर्यटनस्थळांनी भारताला जागतीक पातळीवर पर्यटनाच्या दृष्टीने लोकप्रिय बनवले आहे. पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी सरकारने विविध उपक्रम हाती घेतले आहेत, जसे की 'अतुल्य भारत'. त्यामुळे भारतात आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

पर्यटन (Tourism) हा आधुनिक शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ 'एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठरावीक काळात परत येणें असा होतो. या व्याख्येनुसार पर्यटन करणारा भ्रमंती करून आपल्या मूळ ठिकाणी परत येतो. ऑस्ट्रेलियन अर्थशास्त्रज्ञ हर्मर यांच्या मते, 'परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात वा शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजे पर्यटन होय.' स्वीस शास्त्रज्ञ प्रा. हुंझीर व फ्रेंक यांनी १९४२ मध्ये केलेली पर्यटनाची व्याख्या अधिक व्यापक व अर्थपूर्ण आहे. या तज्ज्ञांच्या मते, 'कायमस्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्व घटना संबंध म्हणजे पर्यटन होय.'

पर्यटनात पर्यटक (Tourist) हा एक प्रमुख घटक आहे. पर्यटकांशिवाय पर्यटनाला कोणताही अर्थ नाही; म्हणून आपण जेव्हा पर्यटनाविषयी बोलतो तेव्हा त्यात पर्यटक येतो. ऑक्सफर्ड शब्दकोशावरून (इ. स. १८००) पर्यटक म्हणजे, 'जो उत्कंठेची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमतीजमतीसाठी अथवा मी असा प्रवास केला आहे हे सांगण्यासाठी भ्रमंती 'करतो, त्यास 'पर्यटक' असे म्हणतात.' लीग ऑफ नेशन व संयुक्त राष्ट्र संघटनेने १९३७ मध्ये पर्यटकाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे : 'एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी १४ तास वास्तव्य करणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे देशी पर्यटक होय.' (खातीब, १९७)

१८४५ मध्ये, थॉमस कुकने सहलीचे आयोजन करण्यासाठी एक पूर्ण-वेळ पर्यटन संस्था सुरु केली. रेल्वे कंपनीने तिकिटांच्या विक्रीवर पाच टक्के कमिशन दिले, जे त्यांचे सर्व खर्च भागवण्यासाठी पुरेसे नव्हते. म्हणून, त्यांनी त्यात विविधता आणण्याचे ठरवले. त्यांनी प्रवासाच्या दुसऱ्या पैकेज टूर चालवण्यास सुरुवात केली, ज्यात हॉटेल निवास, प्रेक्षणीय स्थळे,

मार्गदर्शक-सेवा आणि जेवण यांचा समावेश होता. थॉमस कुकने काही नवीन व्यवसाय सुरू केले, जे अजूनही प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, त्याने ट्रॅव्हलर्स चेक आणि हॉटेल व्हाउचरची प्रणाली शोधून काढली, ज्याने रोख रक्कम काढून टाकली. पर्यटकांनी त्यांच्या सहलीचा खर्च प्रीपेड केला आणि त्या बदल्यात त्यांना हॉटलचे व्हाउचर मिळाले, जे जेवणासह हॉटेलद्वारे प्रदान सर्व सेवांची काळजी घेतात. हॉटेल्सनी त्याला कमिशन दिले. त्याचप्रमाणे, प्रवाशांनी कुकचे व्हाउचर घेतले. जगभरात कोट्यवधी डॉलर्सचे ट्रॅव्हलर्स चेकची दररोज खरेदी - विक्री केली जाते. अशा तऱ्हेने थॉमस कुकने प्रथम पर्यटन हा व्यवसाय म्हणून पुढे आणला. (Buragohain, 1)

विसाव्या व एकविसाव्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूरगामी परिणाम करणारी योगवाही आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास आणि पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असून त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त होतो. इ.स. २००० मध्ये ९० कोटी लोकांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून प्रवास केला आणि सुमारे ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका पैसा खर्च केला. एकूण जागतिक उत्पन्नाच्या १२% ते १३% इतकी ही रक्कम होते. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेला मानव आवड, कुतूहल व संशोधक म्हणून प्रवास करतो. 'अनभिज्ञ व अज्ञाताचा ठाव घेणे हे आर्थिक सुज्ञपणाचे एक लक्षण आहे' असे भारतातील माजी अमेरिकन राजदूत जे. के. गॅलब्रेथ म्हणतात. पर्यटनामुळे प्रत्येक देशाला परकीय चलन मिळत असते. भिन्न विभिन्न समाजातील, देशांतील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढण्यासाठी मदत होते. (घारपुरे, २)

२. भारतातील पर्यटनाची वाढ :

पर्यटकाची भारतातील व्याख्या —

परदेशी पर्यटक - १९६३ मध्ये रोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आंतराराष्ट्रीय पर्यटन परिषदेत पर्यटन खात्याने भारतातील पर्यटकांच्या संदर्भात पुढील व्याख्या स्वीकारली आहे

'परदेशी पर्यटक म्हणजे परदेशी परवाना असलेली (Passport), मनोरंजन, अभ्यास, धार्मिक गोष्टी, खेळ, व्यवसाय, कुटुंब, बैठक वा विशिष्ट कार्यासाठी भारताला भेट देणारी व किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती होय.' (खातीब, १९७)

भारताला धार्मिक प्रवासाची प्रदीर्घ परंपरा आहे. भारताने पर्यटनाच्या दिशेने पहिले पाऊल १९४५ मध्ये टाकले, जेव्हा भारत सरकारने तत्कालीन सल्लागार सर जॉन सार्जेंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. समितीने १९४६ मध्ये आपला अहवाल सादर केला आणि केंद्रात बॉम्बे, दिल्ली, कलकत्ता आणि मद्रास येथे प्रादेशिक कार्यालयांसह एक स्वतंत्र पर्यटन संस्था स्थापन करण्याची सूचना केली. जगभर प्रसिद्धी सेल बसवण्याची शिफारसही समितीने केली आहे. परिणामी १९४८ मध्ये परिवहन मंत्रालयात पर्यटक वाहतूक शाखा स्थापन करण्यात आली. मुंबई आणि दिल्ली येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालये उघडण्यात आली. परदेशातील पहिले पर्यटन कार्यालय १९५२ मध्ये न्यूयॉर्कमध्ये स्थापन करण्यात आले. (Maneet Kumar 49)

२.१ विविधता आणि सांस्कृतिक वारसा

भारतात ऐतिहासिक स्मारके, मंदिरे, किल्ले, आणि धार्मिक स्थळे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

२.२ धार्मिक पर्यटन

पर्यटनाच्या दृष्टीने धार्मिक स्थळांना खूप महत्व आहे. धार्मिक स्थळे वेगवेगळ्या धर्माची असतात. उदा. मंदिरे, दर्गा, गुरुद्वारा, चर्च, इत्यादी. प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या धार्मिक स्थळांना भेटी देत असतात तसेच इतर धर्माच्या धार्मिक स्थळांनाही भेटी देतात. या भेटी यात्रा, उरूस, धार्मिक उत्सवाच्या काळात होतात. यातून पर्यटनाचा विकास होतो. (खातीब, २१३)

भारतात वाराणसी, मथुरा, वृंदावन, तिरुपती, अमृतसर, अजमेर यांसारखी धार्मिक स्थळे जगभरातील यात्रेकरूंना आकर्षित करतात. धार्मिक पर्यटनामुळे लाखो यात्रेकरू भारतात येतात आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

२.३ वैद्यकीय पर्यटन

भारत वैद्यकीय पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र बनले आहे. सुलभ आणि स्वस्त वैद्यकीय सेवा, तज्ज्ञ डॉक्टर, आणि अत्याधुनिक रुग्णालये यामुळे परदेशातून अनेक रुग्ण भारतात उपचारांसाठी येतात. यामुळे परकीय चलनात भर पडते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला फायदा होतो.

२.४ पर्यटन पायाभूत सुविधा

सरकारने हवाई सेवा, रेल्वे, आणि रस्ते वाहतुकीत सुधारणा करून पर्यटनाच्या विकासासाठी पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. मेट्रो, आधुनिक विमानतळ, आणि राष्ट्रीय महामार्गांच्या वाढीमुळे पर्यटन आणखी सुलभ झाले आहे.

जर शेती आणि उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचे शरीर असेल तर वाहतूक आणि दळणवळण हे मज्जासंस्थेचे जाळे असेल, जे मानव आणि साहित्याची वाहतूक करेल. (Datt and Sundharam, 128)

३. भारतातील पर्यटनाचे आर्थिक परिणाम :

३.१ सकारात्मक आर्थिक योगदान

३.१.१ रोजगार निर्मिती

पर्यटन हा भारतातील रोजगार निर्मितीचा एक महत्त्वाचा घटक आहे. हॉटेल व्यवसाय, वाहतूक, मार्गदर्शन, हस्तकला, आणि अन्य सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होत आहे. भारतात पर्यटनामुळे लाखो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, विशेषत: ग्रामीण आणि निमशहरी भागात.

३.१.२ परकीय चलनाची कमाई

पर्यटनामुळे भारताला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते. २०२३ साली, पर्यटनामुळे भारताने सुमारे २३१९२७ कोटी जे मागील वर्षापेक्षा ६५.७४% ने जास्त होते. परकीय चलन मिळवले. परदेशी पर्यटकांचे येणे आणि त्यांचे स्थानिक सेवांवर होणारे खर्च स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात. (Govt. of India 2023-24, 209)

परदेशी पर्यटकांचे आगमन (FTAs)

जून २०२४ मध्ये परदेशी पर्यटकांची संख्या ७,०६,०४५ इतकी झाली, जी जून २०२३ मध्ये ६.४८.००८ इतकी होती. जानेवारी २०२४ ते जून २०२४ पर्यंत परदेशी पर्यटकांची संख्या ४७,७८,३७४ इतकी झाली, जी जानेवारी २०२४ ते जून २०२३ मध्ये ५२,९६,०२५ इतकी होती. (Govt. of India June 2024, 5)

परकीय चलनाची कमाई (FEEs)

२०२४ च्या जून महिन्यातील FEE 19,266 कोटी झाले. जून 2023 मध्ये ते रु.18,737 कोटी आणि जून 2019 मध्ये रु. 16,592 कोटीं होते. त्यात वाढ झालेली दिसून येते.

२०२४ च्या जून महिन्यात FEE US$ २.३०८ अब्ज होते. जून २०२३ मध्ये ते US$ २.२७९ बिलियन होते. त्यात वाढ झालेली दिसून येते.

जानेवारी ते जून 2024 या कालावधीत FEE रु.1,27,628 कोटी होते जे जानेवारी ते जून 2023 मधील रु.1,07,178 कोटी आणि जानेवारी ते जून 2019 मधील रु.1,01,774 कोटींच्या तुलनेत 2023 आणि 2019 च्या संदर्भात अनुक्रमे 19.08% आणि 25.40% ची वाढ नोंदवली गेली.

जानेवारी ते जून 2024 या कालावधीत शुल्क US$15.339 अब्ज होते जे जानेवारी ते जून 2023 मधील US$13.041 अब्ज आणि जानेवारी ते जून 2019 मधील US$14.534 अब्जच्या तुलनेत 2023 आणि 2019 च्या संदर्भात अनुक्रमे 17.62% आणि 5.54% ची वाढ नोंदवते. (Govt. of India June 2024, २ ते ६)

३.१.३ पायाभूत सुविधांचा विकास

पर्यटनाच्या विकासामुळे हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, आणि वाहतुकीच्या सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. हे केवळ पर्यटकांसाठीच नाही तर स्थानिक लोकांसाठीही फायद्याचे आहे.

३.२ नकारात्मक आर्थिक परिणाम

३.२.१ आर्थिक असमानता

पर्यटनामुळे अनेकदा स्थानिक लोक आणि परकीय गुंतवणूकदार यांच्यात असमानता वाढते. अनेक वेळा परकीय हॉटेल्स किंवा कंपन्या मोठ्या प्रमाणात नफा कमावतात, परंतु स्थानिक लोकांना कमी वेतनावर काम करावे लागते.

३.२.२ महागाई आणि वाढलेले खर्च

पर्यटनामुळे काही पर्यटन स्थळांवर महागाई वाढते. विशेषत: गोवा, जयपूर, आणि केरळ सारख्या ठिकाणी पर्यटनामुळे घरांच्या किमती वाढतात, ज्यामुळे स्थानिक लोकांसाठी राहणीमान अधिक खर्चिक होते.

३.२.३ पर्यावरणीय ऱ्हास

पर्यटनामुळे काही ठिकाणी पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. उदा., गोव्यात समुद्रकिनाऱ्यांच्या अतिवापरामुळे प्रदूषण वाढले आहे. स्थानिक संसाधनांचा अतिरेकी वापर, कचरा व्यवस्थापनाच्या समस्या आणि नैसर्गिक परिसंस्थेचे नुकसान हे मुद्दे गंभीर आहेत.

४. सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम :

४.१ सांस्कृतिक परिणाम

पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती आणि परंपरांवर प्रभाव पडतो. अनेक वेळा पर्यटकांच्या अपेक्षांमुळे स्थानिक परंपरांचे व्यापारीकरण होते, ज्यामुळे सांस्कृतिक अस्मिता धोक्यात येते. याचा परिणाम म्हणून स्थानिक जीवनशैलीवर परिणाम होतो.

४.२ पर्यावरणीय परिणाम

पर्यटनामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, हिमालयीन पर्यटनामुळे तेथील जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटनामुळे कचरा व्यवस्थापनाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

५. उदाहरणे :

५.१ गोवा

गोवा हे भारतातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळ आहे. समुद्रकिनारे, नाईट लाइफ, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी गोव्यातील पर्यटन उद्योगाला चालना दिली आहे. मात्र, पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक संसाधनांवर ताण निर्माण झाला आहे, तसेच जमीन आणि घरांच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे.

५.२ राजस्थान

राजस्थान हे ऐतिहासिक किल्ले, महाल, आणि सांस्कृतिक वारसा यासाठी प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, ज्यामुळे स्थानिक हस्तकला, पर्यटन मार्गदर्शन, आणि हॉटेल व्यवसायांना चालना मिळते. परंतु काही ठिकाणी सांस्कृतिक वारसा पर्यटनामुळे धोक्यात आला आहे.

५.३ केरळ

केरळच्या बॅकवॉटर, आयुर्वेद पर्यटन, आणि समुद्रकिनाऱ्यांमुळे येथे मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय पर्यटक येतात. वैद्यकीय पर्यटनामुळे केरळ आर्थिकदृष्ट्या अधिक बळकट झाले आहे, परंतु पर्यावरणीय समस्यांमुळे पर्यटनाला धोका निर्माण होऊ शकतो.

६. शाश्वत पर्यटन विकासासाठी शिफारसी :

६.१ पर्यावरणपूरक पर्यटन

भारताने पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देण्यावर भर दिला पाहिजे. सरकारने तसेच खासगी क्षेत्राने पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जबाबदार धोरणे स्वीकारली पाहिजेत. पर्यटकांनी नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे आणि स्थानिक संस्कृतींचा आदर करणे आवश्यक आहे.


६.२ स्थानिक समुदायांचा समावेश

पर्यटनाच्या फायद्यांचा लाभ स्थानिक लोकांनाही मिळावा, यासाठी स्थानिक व्यावसायिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्थानिक हस्तकला, कला, आणि संस्कृती यांचा प्रचार करणे गरजेचे आहे.

६.३ पायाभूत सुविधांचा विकास

पर्यटनस्थळांच्या पायाभूत सुविधांचा विकास करताना दीर्घकालीन शाश्वत धोरणे तयार केली पाहिजेत. पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक विकास यांचा समतोल राखणे गरजेचे आहे.

२०१९ ते २०२३ पर्यंत भारताच्या GDP मध्ये प्रवास आणि पर्यटन क्षेत्राचे योगदान, २०२४ च्या अंदाजांसह



(Source – https://www.statista.com/statistics/1250204/india-contribution-of-travel-and-tourism-to-gdp/ Date - 26/09/2024)

७. निष्कर्ष :

भारतातील पर्यटन हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे, ज्यामुळे रोजगार निर्मिती, परकीय चलन कमाई, आणि पायाभूत सुविधा विकास होतो. मात्र, पर्यटनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि पर्यावरणीय आव्हानांवर सखोल विचार करून शाश्वत धोरणांची अंमलबजावणी केली पाहिजे. यासाठी स्थानिक समुदायांचा समावेश, पर्यावरणपूरक धोरणे, आणि आर्थिक असमानता कमी करण्यावर भर दिला पाहिजे.

संदर्भ:

1. Modern Language Association (MLA) Style
2. खातीब, के. ए. *आर्थिक भूगोल.* मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००७.
3. घारपुरे, विठ्ठल. *पर्यटन भूगोल.* पिंपळापुरे एण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००१.
4. Buragohain, Pulak. *Fundamentals of Travel and Tourism.* Murari Lal & Sons, New Delhi, 2009.
5. Datt and Sundharam. *Indian Economy.* S.Chand and Company LTD., New Delhi, 55 Ed. 2005
6. Government of India June 2024. *Monthly Tourism Statistics.* Ministry of Tourism, New Delhi. June 2024.
7. Govt. of India 2023-24, *Annual Report,* Ministry of Tourism, New Delhi. 2024
8. Maneet Kumar, *Tourism Today – An Indian Perspective.* Kanishka Publishing House, Delhi, 1992.
9. Keelery, Sandhya. *२०१९ ते २०२३ पर्यंत भारताच्या GDP मध्ये प्रवास आणि पर्यटन क्षेत्राचे योगदान, २०२४ च्या अंदाजांसह. STISTA Website.*
10. https://www.statista.com/statistics/1250204/india-contribution-of-travel-and-tourism-to-gdp/ Accessed 26 Sept. 2024.

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे इंग्रजी विषयातील भाषिक कौशल्य व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

Mrs. Sanjana Sanjay Bhalkar
Ph.D Researcher
Shivaji University,Kolhapur ,Maharashtra ,India.
Email-sanjanabhalkar12@gmail.com

Prof.Dr.Pratibha sadashiv Desai
I/C Principal
Aacharya javadekar college of education ,Gargoti
Affiliated to shivaji University Kolhapur ,
Maharashtra ,India.
Email-drpratibhadesai@gmail.com

सारांश :-

भाषा शिक्षण हा शिक्षणाचा मूलभूत गाभा आहे. कारण भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे लहान मूल कोणतेही ज्ञान त्यातील सैद्धांतिक भाग योग्य आकलनासह परक्या भाषेपेक्षा आपल्या मातृभाषेत अधिक सहजतेने व प्रभावीपणे आत्मसात करू शकते. हे आता जगभर अनेक अभ्यासाअंती सिद्ध झालेले आहे. पण बहुभाषिक व बहुसांस्कृतिक भारत देशात जेथे संविधानसंमत (आठव्या शेड्युलप्रमाणे) २१ अधिकृत राष्ट्रीय भाषा आहेत तेथे पूर्ण देशासाठी एकच एक राष्ट्रभाषा ठरवणे शक्य नव्हते ,पुन्हा दीडशे वर्षे ब्रिटिश सत्तेमुळे देशभर पसरलेली इंग्रजी भाषा व त्याद्वारे आधुनिक ज्ञान विज्ञान आणि झालेली प्रगती याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून देशासाठी इंग्रजी ही संपर्क भाषा हिंदी सोबत असावी हे संविधानकर्त्यांनी दूरदर्शीपनाने ठरवून भाषेच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढला ,तो राष्ट्रीय एकात्मतेसाठी हे उघड होते.

मुख्य संबोध :-. *माध्यमिक स्तर ,इंग्रजी ,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.*

प्रस्तावना:-

आज मराठी माध्यमातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या भाषिक कौशल्यचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या एकणे, बोलणे,वाचन , लेखन (LSRW)व संप्रेषण कौशल्य संदर्भात अडचण जाणवते आहे.कारण आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे सोशल मीडियाद्वारे इंग्रजीचा सर्रास उपयोग सर्व स्तरावर केला जातो .यामध्ये मुख्यतः मुख्यतः मराठी माध्यमातील इयत्ता नववीचा विद्यार्थी देखील मागे नाही. मराठी मातृभाषा हिंदी राज्यभाषा व इंग्रजी हे आंतरराष्ट्रीय भाषा हे त्रैभाषिक सूत्र प्रत्येक आयोगामध्ये नमूद करण्यात आले आहे .आपल्यापैकी बहुतेकांना मराठी व आपली मातृभाषा व परिसर अभ्यास शाळेत जायच्या आधीच अवगत झालेली असते ,तरीही इंग्रजीचा विषयाच्या बाबतीत मराठी माध्यमांमधील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी तेवढासा सजग दिसून येत नाही, हे सर्वेक्षणातून दिसून येते आहे .इंग्रजी ही पुढील शिक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी तेवढीच महत्त्वाची भाषा आहे परंतु मराठी माध्यमांमध्ये इंग्रजी भाषा ही तेवढ्याच तासिकेपूर्ती बोलली जाते इंग्रजी विषय बोलायला आवडतो पण तसा बोलता येत नाही किंवा त्यांचे वाचन ,लेखन तेवढे जमत नाही इंग्रजीतून लिहिता ,बोलता येणे म्हणजेच अभिव्यक्त होणे महत्त्वाचे आहे याची जाणीव या साऱ्याच्या मुळाशी आहे भाषा शिक्षणासाठी त्या भाषेचे वातावरण मिळणे महत्त्वाचे असते. मराठी शाळांमध्ये फक्त इंग्रजीच्या तासांपुरतेच हे वातावरण मिळते ,तेही सर्व शाळेत असतेच असे नाही अनेक ठिकाणी तर मराठीतूनच इंग्रजी शिकविण्याची तिला व्याकरणाच्या जंजाळात अडकविण्याची पद्धत रुजली आहे. वास्तविक प्रसार माध्यमांमुळे, तंत्रज्ञानामुळे इंग्रजीशी असलेला संबंध कितीतरी पटीने वाढला आहे इंग्रजी सहजपणे कानावर पडते या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन गेल्यास ती सहज अवगत होण्यास मदत होऊ शकते.

संशोधनाची उद्दिष्टे:-

१. मराठी माध्यमातील इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.
२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० इंग्रजी भाषा विषयाचा आढावा घेणे.

संशोधन परिकल्पना:-

माध्यमिक स्तरावरील इंग्रजी भाषा कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनवृद्धीवर सकारात्मक परिणाम होतो .

शून्य परिकल्पना :-

माध्यमिक स्तरावरील इंग्रजी भाषा कौशल्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनवृद्धीवर सकारात्मक परिणाम होत नाही .

प्रस्तुत संशोधनाचे महत्व:-प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाचे कौशल्याचे त्यांच्या समस्यांचे निराकरण होण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० इंग्रजी भाषा विषयक माहिती मिळवण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्याचप्रमाणे पालक, विद्यार्थी, शिक्षक संशोधक यांच्यासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल.

संशोधनाची परिमर्यादा:-प्रस्तुत संशोधन हे मराठी माध्यम इयत्ता नववीतील विद्यार्थी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० इंग्रजी भाषा यापुरतेच मर्यादित आहे.

संशोधन पद्धती:-प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने दस्ताऐवजांचे विश्लेषण ,सर्वेक्षण संशोधन पद्धती व प्रायोगिक संशोधन पद्धती अशा मिश्र संशोधन पध्द्तीचा उपयोग केला आहे.

संशोधन जनसंख्या:- प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने न्यू हायस्कूल कोल्हापूर ,कोल्हापूर शहर जिल्हा -कोल्हापूर येथील इयत्ता नववीच्या मराठी माध्यम मधील ५० विद्यार्थ्यांची सहेतूक नमुना निवड पद्धतीने केलेली आहे. न्यादर्श म्हणून ५० प्रतिसादकांपैकी सर्वच ५० प्रतिसादकांची निवड केली आहे.

संशोधनाची साधने:-संशोधिकेने स्वनिर्मित प्रश्नावलीचा वापर केलेला आहे .प्रतिसादकांनी प्रश्नावली चाचणीद्वारे आपली मते देण्यास प्रवृत्त केले होते.

संख्याशास्त्रीय विश्लेषण:-संशोधना संदर्भात प्राप्त सामग्रीचे विश्लेषण हे प्रश्नावली द्वारे उपलब्ध झाली. विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला.

विश्लेषणात्मक विषयविवेचन :-

कोष्टक क्र.१ .१

० -२०	२१-४९	५०	५१- १००
अल्प	मध्यम	निम्मे	बहुतांश

निरीक्षण व अर्थनिर्वचन

प्रश्न क्रमांक १ तुम्हाला इंग्रजी विषय आवडतो का?

कोष्टक क्र.१ . २

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
१	४२ (८४%)	००(०%)	०६.(१२%)	०२(४%)

निरीक्षण:-

वरील कोष्टक क्र.१.२ असे दिसून येते की ,मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय आवडतो का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय ४२ (८४%)असे दिले. एखाद्या वेळेस००(०%) याचे उत्तर तर कधी कधी ०६.(१२%)आणि कधीच नाही ०२(०%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन:-

मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय आवडतो, हे होय म्हणणाऱ्याचे प्रमाण बहुतांश(८४ %) आहे व इंग्रजी विषय न आवडणाऱ्यांचे प्रमाण अल्प (१२%) (४%)आहे, हे संशोधनातून दिसून आले.

प्रश्न क्रमांक २. तुम्हाला इंग्रजी भाषा बोलायला आवडते का?

कोष्टक क्र.१. ३

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
२.	४५(९० %)	००(०%)	०३.(६%)	०२(४%)

निरीक्षण :-

वरील कोष्टक क्र.१. ३ असे दिसून येते की ,मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय बोलायला आवडतो का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय ४५(९० %)असे दिले एखाद्या वेळेस ००(०%)याचे उत्तर तर कधी कधी ०३.(६%)आणि कधीच नाही ०२(४%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन :- मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय बोलायला आवडतो, हे होय म्हणणाऱ्याचे प्रमाण(९० %) बहुतांश आहे. इंग्रजी भाषा बोलायला न आवडणाऱ्यांचे प्रमाण अल्प(६%)(४%) आहे, हे संशोधनातून दिसून आले.

प्रश्न क्रमांक ३. तुम्ही तुमच्या मित्र मैत्रिणींशी इंग्रजी मध्ये संभाषण करता का?

कोष्टक क्र.१. ४

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
३	०५.(१०%)	१० (2०%)	१५(३०%)	2०(४०%)

निरीक्षण:-

वरील कोष्टक क्र.१. ४ असे दिसून येते की मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही तुमच्या मित्र मैत्रिणींशी इंग्रजी मध्ये संभाषण करता का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय०५.(१०%) असे दिले एखाद्या वेळेस१० (2०%) उत्तर तर कधी कधी १५(३०%)आणि कधीच नाही2०(४०%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन :- मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही तुमच्या मित्र मैत्रिणींशी इंग्रजी मध्ये संभाषण करता का? या प्रश्नावरती कधीच नाही हे सांगणाऱ्यांचे प्रमाण म्हणजेच मध्यम(४०%) (३०%) दिसून आले. तर मित्र मैत्रिणींशी इंग्रजी मध्ये संभाषण करतो हे सांगणाऱ्यांचे प्रमाण अल्प (2०%) (१०%)दिसून आले

प्रश्न क्रमांक ४. तुम्ही इंग्रजी मध्ये तुमच्या कुटुंबीयांशी संवाद साधता का?

कोष्टक क्र.१. ५.

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
४	०७(१४%)	१०(2०%)	2०(४०%)	१३(2६%)

निरीक्षण:-

वरील कोष्टक क्र. १.५ असे दिसून येते की ,मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजी मध्ये तुमच्या कुटुंबीयांशी संवाद साधता का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय ०७(१४%)असे दिले एखाद्या वेळेस १०(2०%) उत्तर तर कधी कधी 2०(४०%)आणि कधीच नाही १३(2६%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन :- मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजी मध्ये तुमच्या कुटुंबीयांशी संवाद साधता का? हे सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम म्हणजेच (४०%)((2६%)दिसून आले. तर इंग्रजी मध्ये कुटुंबीयांशी संवाद साधतो हे सांगणाऱ्यांचे प्रमाण अल्प(१४%) (2०%)दिसून आले.

प्रश्न क्रमांक ५. तुम्ही सोशल मीडियाद्वारे इंग्रजी मध्ये संभाषण करता का?

कोष्टक क्र.१.६

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
५.	१०(2०%)	१५.(३०%)	२४(४८%)	६.(१२%)

निरीक्षण :-

वरील कोष्टक क्र.१. ६ असे दिसून येते की , मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही सोशल मीडियाद्वारे इंग्रजी मध्ये संभाषण करता का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय १०(2०%)असे दिले एखाद्या वेळेस १५.(३०%)याचे उत्तर तर कधी कधी२४(४८%) आणि कधीच नाही ६.(१२%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन :- मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही सोशल मीडियाद्वारे इंग्रजी मध्ये संभाषण करता का हे सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम (४८%) (३०%)दिसून आले. तुम्ही सोशल मीडियाद्वारे इंग्रजी मध्ये संभाषण होय (2०%) कधीच नाही (१२%) हे सांगणाऱ्यांचे प्रमाण अल्प दिसून आले.

प्रश्न क्रमांक ६. तुम्ही इंग्रजीभाषेतील वर्तमानपत्राचे वाचन करता का?

कोष्टक क्र.१. ७

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
६.	००(०%)	2०(४०%)	१०(2०%)	2०(४०%)

निरीक्षण:-

वरील कोष्टक क्र.१. ७ असे दिसून येते की , मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजीभाषेतील वर्तमानपत्राचे वाचन करता का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय ००(०%)असे दिले एखाद्या वेळेस 2०(४०%) याचे उत्तर तर कधी कधी १०(2०%) आणि कधीच नाही 2०(४०%) हे उत्तर आले

अर्थनिर्वचन :- इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजीभाषेतील वर्तमानपत्राचे वाचन करता का या प्रश्नावरती हे सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम म्हणजेच (एखाद्या वेळेस ४०% ,कधीच नाही ४०%) दिसून आले. इंग्रजीभाषेतील वर्तमानपत्राचे वाचन कधी कधी करतो हे सांगणाऱ्यांचे अल्प (2०%) प्रमाण दिसून आले.

प्रश्न क्रमांक ७.तुम्हाला इंग्रजी विषयातील व्याकरण विभाग वाचन ,लेखन करायला आवडतो का?

कोष्टक क्र.१. ८

अं.क्रं	होय	एखाद्या वेळेस	कधी कधी	कधीच नाही
७.	००(०%)	०२(४%)	०६ (१२%)	४२(८४%)

निरीक्षण :-

वरील कोष्टक क्र.१.८ असे दिसून येते की,मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना.तुम्हाला इंग्रजी विषयातील व्याकरण विभाग, वाचन ,लेखन करायला आवडतो का? या प्रश्नावरती त्यांनी उत्तर होय ००(०%) असे दिले एखाद्या वेळेस ०२(४%) याचे उत्तर तर कधी कधी ०६ (१२%) आणि कधीच नाही ४२(८४%) हे उत्तर आले.

अर्थनिर्वचन :- मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना.तुम्हाला इंग्रजी विषयातील व्याकरण विभाग वाचन ,लेखन करायला आवडतो का म्हणणाऱ्याचे प्रमाण बहुतांश(८४ %) आहे हे संशोधनातून दिसून आले. इंग्रजी विषयातील व्याकरण विभाग वाचन ,लेखन करायला एखाद्या वेळेस (४%), कधी कधी (१२%)आवडतो हे सांगणाऱ्यांचे अल्प (2०%) प्रमाण दिसून आले.

प्रश्न क्रमांक ८. तुम्ही इंग्रजी संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी काय उपाययोजना करता ते थोडक्यात लिहा?

उत्तर - तुम्ही इंग्रजी संभाषण कौशल्य सुधारण्यासाठी काय उपाययोजना करता या वर्णनात्मक पद्धतीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना विचारला असता काही प्रमाणात मित्र-मैत्रिणीची संवाद साधतो ,डिक्शनरी चा उपयोग करतो, शिक्षकांच्या बोलण्याकडे लक्ष देतो, हे उत्तर आले यामधून इंग्रजी व मराठी मधून वर्णनात्मक पद्धतीने प्रश्न विचारला होता. मराठी मधून ९५% टक्के विद्यार्थ्यांनी या प्रश्नाचे दिले तर इंग्रजी मधून दिले आहे ५% विद्यार्थ्यांनी इंग्रजी मधून उत्तर दिले आहे.

प्रश्न क्रमांक ९.तुम्हाला इंग्रजी विषय का आवडतो किंवा का आवडत नाही ते थोडक्यात लिहा?

उत्तर -तुम्हाला इंग्रजी विषय का आवडतो किंवा का आवडत नाही या इंग्रजी व मराठी मधून वर्णनात्मक पद्धतीने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर नववीच्या विद्यार्थ्यांनी स्पेलिंग मिस्टेक होतात भीतीमुळे व्यवस्थित बोलताना येणे इतरांचे इंग्रजी मधून बोलणे न समजणे इंग्रजी मधून व्याकरण समजत नाही अवघड जाते त्याचप्रमाणे कुटुंबाशी परिस्थिती घरातील वातावरण शिक्षकांची शिकवण्याची पद्धती हे उत्तर मिळाले. इंग्रजी विषय आवडतो हे सांगणाऱ्यांचे प्रमाण ९६% टक्के होते. इंग्रजी विषय आवडत नाही हे सांगणाऱ्यांचे प्रमाण ४% होते.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० इंग्रजी भाषा विषयाचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे :-

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कोठारी आयोगाप्रमाणे त्रैभाषिक धोरण तंतोतंत स्वीकारले आहे.

२.राज्याची प्रादेशिक भाषा हिंदी आणि इंग्रजी हे त्रैभाषिक धोरण कमी अधिक प्रमाणात देशभर सर्वत्र स्वीकारले आहे त्यामुळे बहुभाषा व विविधता जपण्यासाठी त्रैभाषिक भाषा सूत्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये स्वीकारले गेले आहे.

३. नव्या शैक्षणिक धोरणात भाग दोनमध्ये जी वैशिष्ट्ये नमूद केली आहेत, त्यामध्ये विज्ञान व गणितासह सर्व विषयाची पाठ्यपुस्तके मातृभाषेत/राज्यभाषेत सुलभ आकलनासाठी निर्माण करून दिली जातील आणि द्विभाषीय अध्ययन-अध्यापन सामग्रीसह शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी द्विभाषा पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल, असे नमूद केले आहे. ही विद्यार्थी हिताच्या दृष्टीने फार सकारात्मक शिफारस आहे. यामुळे विद्यार्थी आपली मातृभाषा आणि इंग्रजीमध्ये विचार करण्यासाठी व बोलण्यासाठी सक्षम बनतील, हे मराठीच्या भल्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे भाषा धोरण असणार आहे.

४. इंग्रजी व मराठीला समप्रमाणात महत्त्व आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर सहजतेने बिंबवले जाईल व त्यांचा आजचा भाषिक न्यूनगंड कमी होईल व पुढे तो पूर्णपणे नाहीसा होईल.

५. द्विभाषिक पाठ्यपुस्तकामुळे विद्यार्थ्याचे ज्ञानात्मक, संकल्पनात्मक व सैद्धांतिक बाबींचे आकलन परिपूर्ण व सहज सुलभ होईल. विज्ञान व गणिताचे काही सिद्धान्त इंग्रजी वाचून समजले नाहीत, तर तोच भाग लगेच मराठी वाचला तर त्या सिद्धान्ताचे पूर्ण आकलन होण्यास मदत होईल व पुन्हा इंग्रजी वाचून ते पक्के होईल. असा द्विभाषिक अभ्यास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विषय पारंगततेसाठी उपयुक्त ठरेल. उच्च तंत्रज्ञान-विज्ञानाच्या शिक्षणासाठी, जे आज बहुतांश इंग्रजी भाषेतून भारतात शिकवले जाते, ते विद्यार्थ्यांना अधिक सखोलपणे अभ्यासणे व पाठांतरविना आकलनासह आत्मसात करणे सुलभ होईल. असा अभ्यास हा मुलांना आनंदी अभ्यास वाटेल. त्यामुळे सर्व विद्यार्थी परीक्षेचे ओझे मनावर न घेता अधिक सखोल अभ्यास करून यशस्वीपणे परीक्षा देऊ शकतील. पूर्ण आकलनासह विज्ञान व गणित हे विषय अभ्यासले तर भावी काळात मूलभूत संशोधन करणारे विद्यार्थी बहुसंख्येने निर्माण होतील.

६. आजचे भारताचे भाषिक धोरण पाहता व इंग्रजीचे जागतिक स्थान पाहता केवळ इंग्रजी किंवा केवळ मराठी असा टोकाचा आग्रह व अभिनिवेश न करता 'उत्तम इंग्रजीसह उत्तम मराठी' हे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे.

संशोधनाचे उद्दिष्टनुसार निष्कर्ष:-

वरील प्रश्नांच्या विश्लेषणावरून निष्कर्ष पुढीलप्रमाणे

उद्दिष्ट क्र.१.मराठी माध्यमातील इयत्ता नववीतील विद्यार्थ्याची इंग्रजी विषयाची सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

१. मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय आवडतो, हे होय म्हणणाऱ्याचे प्रमाण बहुतांश (८४ %) आहे हे संशोधनातून दिसून आले.

२. मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषय बोलायला आवडतो, हे होय म्हणणाऱ्याचे प्रमाण बहुतांश (९०%) आहे हे संशोधनातून दिसून आले.

३. नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजी मध्ये तुमच्या कुटुंबीयांशी संवाद साधता का, या प्रश्नावरती कधी कधी हे सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम (४०%) दिसून आले.

४. मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजी मध्ये तुमच्या कुटुंबीयांशी संवाद साधता का, या प्रश्नावरती कधी कधी हे सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम (४०%) दिसून आले.

५. मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही सोशल मीडियाद्वारे इंग्रजी मध्ये संभाषण करता का, या प्रश्नावरती कधी कधी हे सांगणाऱ्यांचे मध्यम (४८%) दिसून आले.

६. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना तुम्ही इंग्रजीभाषेतील वर्तमानपत्राचे वाचन करता का या प्रश्नावरती एखाद्या वेळेस (४०%) ,कधीच नाही(४०%)सांगणाऱ्यांचे प्रमाण मध्यम दिसून आले.

७.मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना.तुम्हाला इंग्रजी विषयातील व्याकरण विभाग वाचन ,लेखन करायला आवडतो का ,कधीच नाही म्हणणाऱ्याचे प्रमाण बहुतांश (८४%) आहे हे संशोधनातून दिसून आले.

८. मराठी माध्यमांमधील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी व मराठी मधून वर्णनात्मक पद्धतीने प्रश्न विचारला होता. मराठी मधून ९५% टक्के विद्यार्थ्यांनी या प्रश्नाचे दिले तर इंग्रजी मधून दिले आहे ५% विद्यार्थ्यांनी इंग्रजी मधून उत्तर दिले आहे. यावरून मराठी माध्यमांमधील इ.९ च्या विद्यार्थ्यांना स्पष्ट ,व्याकरणदृष्ट्या इंग्रजी भाषा कौशल्य अवगत झालेले संशोधनातून दिसून येत नाही.

९. संशोधनामधून असे दिसून आले येते की,इंग्रजी भाषा आवडते ,तिचे महत्व देखील माहिती आहे आहे परंतु अध्ययन अध्यापनाच्या अभावामुळे इंग्रजी भाषा कौशल्य अवगत झालेले दिसून येत नाही.

उद्दिष्ट क्र.२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० इंग्रजी भाषा विषयाचा आढावा घेणे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कोठारी आयोगाप्रमाणे त्रैभाषिक धोरण तंतोतंत स्वीकारले आहे.इंग्रजी मधून उत्तम प्रकारे अभिव्यक्त होण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेतच जायला हवे असे नाही; मराठी व अन्य भारतीय भाषांच्या माध्यमातून शिक्षण घेतलं तरी ते शक्य होऊ शकते .याची खात्री आजच्या पालकांना पटवून देता आली पाहिजे. मराठीतून शिक्षण घेऊन उत्तम इंग्रजी बोलू लिहू शकणाऱ्यांची उदाहरणे देऊन ही खात्री पटविता येणार नाही. त्यासाठी शाळांमध्ये मुलांच्या कला कलाने , आनंददायी वातावरणात अध्यापन करण्याची कृती आधारित अध्ययन ,रचनावादी शिक्षण इंग्रजीसाठी उपयुक्त ठरू शकते.

शिफारशी :-

संशोधिकेने पुढील शिफारशी मांडल्या आहेत.

१.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण ,शहरी स्तरातील विद्यार्थ्यांना व शाळांना योग्य साधनसामग्रीचा पुरवठा करावा.

२ . राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०चे मूल्यमापन करण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावर योग्य प्रयत्नांची आवश्यकता आहे.

३ .राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जावी.

संदर्भ:-

1. वास्कर ,आ., वास्कर, पु. (२००८);भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण पुणे: नित्य नूतन प्रकाशन
2. पाटील, स. (एप्रिल २०२२) ;शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पुणे:;निराली प्रकाशन
3. http://www.education.gov.in 29july 2020 retrived on29 sep 2024.
4. http://www.mr.vikaspedia .in 2020 retrived on 29 sep 2024.
5. http://www.esakal.com.july2020 retrived on 28 sep 2024
6. http://www.educationalmaharashtra.com.mar2022 retrived on 30sep 2024
7. https://blogs.maharashtratimes.indiatimes.com/patipencil/marathi-english-and-freedom-speech retrived on 2 Oct 2024
8. https://www.aksharnama.com/client/article-details/5675 retrived on 2 Oct 2024

भारतीय इतिहास लेखन परंपरा-मार्क्सवादी इतिहास लेखन

प्रा. तानाजी बाबासाहेब मोहिते
इतिहास विभाग
कर्मवीर हिरे महाविद्यालय. गारगोटी ता. भुदरगड जि. कोल्हापूर
Email -tanajimohite6107@gmail.com

प्रस्तावना-

इतिहास लेखनाचा उदय फार प्राचीन काळापासून झालेला आपणास दिसतो. प्राचीन इतिहास लेखनाचा संबंध पुराण व वस्तुशी जोडला गेला व त्यातून अनुभवाच्या आधारे इतिहास लेखन करण्यात आले. पूर्वी इतिहास लेखनाचा संबंध भूगर्भशास्त्राशी जोडला गेलेला दिसतो. त्यानंतर बुद्धी प्रामाण्यवादावर इतिहासाचचे लेखन केले गेले. प्राचीन इतिहास लेखन परंपरा ही दैव्य परंपरा व सामाजिक स्थित्यंतरे यावर अवलंबून होती. प्राचीन काळापासून ते मध्ययुगापर्यंत इतिहास लेखनात ग्रीक इतिहास लेखन परंपरा, रोमन इतिहास लेखन परंपरा, अरेबियन इतिहास लेखन परंपरा, पर्शियन इतिहास लेखन परंपरा अस्तित्वात होत्या.

इतिहासात उपलब्ध पुराव्याचे चिकिस्तापूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी केली जाते हे आपणास माहिती आहे अशी मांडणी करणाऱ्या लेखनपद्धतीला इतिहास लेखन पद्धतीने म्हणतात. आधुनिक इतिहास लेखन परंपरेत भारतीय इतिहास लेखन परंपरा अतिशय महत्त्वाची आहे यात प्रामुख्याने वसाहतीक इतिहास लेखन परंपरा, पौरात्यवादी इतिहास लेखन परंपरा, साम्राज्यवादी इतिहास लेखन परंपरा, मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा याचा समावेश होतो.

उद्दिष्टे-

१) मार्क्सवाद आणि मार्क्सवादी इतिहास लेखनाचे तत्त्वज्ञान समजावून घेणे.
२) द्वंद्वात्मक भौतिकवाद व ऐतिहासिक भौतिकवाद समजावून घेणे.
३) कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्षाच्या सिद्धांताचा अभ्यास करणे .
४) आधुनिक इतिहास लेखन प्रवाहात मार्क्सवादी इतिहास लेखनाचा प्रभाव अभ्यासणे.

आधुनिक इतिहास लेखन परंपरेची वैशिष्ट्ये-

१) ही एक शास्त्रशुद्ध पद्धत असून यात इतिहासाची योग्य पद्धतीने मांडणी केली जाते.
२) आधुनिक इतिहास लेखन परंपरा ही प्रामुख्याने मानवनिर्मित आहे यात भूतकाळातील विविध मानवी समाजाच्या कृतीसंबंधिचा अभ्यास केला जातो.
३) आधुनिक इतिहास लेखनाची मांडणी तर्कशुद्ध व विश्वासार्हतेवर तपासले जाते.
४) मानवजातीने भूतकाळात केलेल्या कृतीच्या आधारे मानव जातीच्या वाटचालीचा वेध इतिहासात घेतला जातो.

आधुनिक इतिहास लेखनाची बीजे प्रामुख्याने युरोपात रोवली यात प्रामुख्याने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर केला गेला. यामध्ये रेने, व्होल्टेअर, हेगेल, रांके, कार्ल मार्क्स, मायकेल फुक्रो इत्यादी इतिहास कारायचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. यामध्ये मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा इतिहास लेखनासाठी अतिशय उपयुक्त आहे.

मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा-

कार्ल मार्क्सच्या विचारावर आधारित इतिहास लेखन केले गेले म्हणून त्याला मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा असे म्हणतात.मार्क्सवाद हा शास्त्रीय समाज वादाचा पुरस्कार करणार आहे. मार्क्सवादी इतिहास लेखनाची सुरुवात प्रामुख्याने १९ व्या शतकात झालेली दिसते यात प्रामुख्याने १९४८ हे वर्ष क्रांतीचे वर्ष मानले जाते यावर्षी साम्यवादाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला हा जाहीरनामा एगेल व कार्ल मार्क्स या दोघांनी मिळून प्रसिद्ध केला त्यांनी' द कम्युनिस्ट मॅनिफिटो'हा ग्रंथ लिहिला व त्यातून त्यांनी आपले विचार मांडले. यात मार्क्स सांगतात, जगातील कामगारांनो एक व्हा 'असा नारा दिला'त्यांच्या मते दोन फळे असतात त्यात गोड व कडू फळे असतात गोड फळे ही वरिष्ठ वर्गांची असतात तर कडू फळे ही श्रमजीवी सामान्य जनतेची

असतात त्याचप्रमाणे समाजातील वर्ग संघर्षावर त्याने भर दिला समाजामध्ये दोन पद्धतीचे वर्ग असतात ते म्हणजे 'आहे रे व नाही रे 'वर्ग यातूनच मोठ्या प्रमाणात संघर्ष निर्माण होतो असे त्यांचे मत होते. मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा ही एक सामाजिक परिवर्तनाची विचारधारा आहे. मार्क्सवाद हा क्रांतिकारी समाजवादाचा एक महत्त्वाचा अंग आहे, मार्क्सवाद हा आर्थिक व सामाजिक समतेवर आधारित आहे स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय इतिहास लेखन हे जास्त प्रमाणात मार्क्सवादी इतिहास लेखनावर अवलंबून असल्याचे दिसते.

आधुनिक भारतीय मार्क्सवादी इतिहासकार-

भारतीय इतिहास लेखन परंपरेत प्रामुख्याने मार्क्सवादी इतिहास लेखन परंपरा अतिशय महत्त्वाची असून यात प्रामुख्याने डॉ. दामोदर धर्मानंद कोसंबी, डॉ. राम शरण शर्मा, डॉ. रोमिला थापर, डॉ. इरफान हबीब, डॉ. बिपिनचंद्र यांचा समावेश होतो. यात प्रामुख्याने कोसंबी, डांगे व शरद पाटील यांचे योगदान महत्त्वाचे आहे. दामोदर कोसंबी यांचे इतिहास लेखनाबद्दलचे विचार अतिशय महत्वपूर्ण आहेत त्यांना आधुनिक इतिहास लेखनाचे संस्थापक मानले जातात. त्यांचे लिखान पारंपरिक इतिहास व मध्यमवर्गीय आश्रयदात्याच्या मान्यतेला छेद देणारे आहे. कोसंबी चा मार्क्सवादी सिद्धांत हा द्वद्वात्मक भौतिक वातावर अवलंबून आहे. त्यांचे लिखाण वैज्ञानिक दृष्टी कोणावर आधारित आहे त्यांनी'An Introduction to the study of Indian History 'या ग्रंथात मूलभूत प्रमेये मांडली आहेत. त्याचप्रमाणे काँग्रेड डांगे यांचे 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टू सेवरी'हे पुस्तक मार्क्सवादी इतिहास लेखनाचे उदाहरण आहे.

मार्क्सवादी इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये-

१) यात प्रामुख्याने वर्ग संघर्षावर भर देण्यात आला हा विचार मार्क्सवादी तत्त्वावर अवलंबून होता.

२) आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती, उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी जीवनाचा विचार केला गेला.

३) प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण केले गेले.

४) जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास यात केला गेला.

निष्कर्ष -

१) सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याची काम मार्क्सवादी इतिहास लेखनातून झाले.

२) मार्क्सवादी इतिहास लेखनाचा जातिव्यवस्थेवर होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला गेला.

३) स्वातंत्र्योत्तर काळात होत गेलेल्या बदलांचा अभ्यास मार्क्सवादामध्ये केला गेला.

४) शास्त्रशुद्ध इतिहास लेखन व मानव निर्मित इतिहास लेखनावर मार्क्सवाद्यांनी भर दिला.

५) मार्क्सवादी इतिहास लेखनामुळे आधुनिक इतिहास लेखनाचा पाया घातला गेला.

मूल्यमापन-

भारतामध्ये मार्क्सवादी विचारातील संशोधनाचे कार्य प्रामुख्याने राजकीय, आर्थिक आणि तत्त्वज्ञानात्मक इतिहास यावर अवलंबून आहे. मार्क्सवादी इतिहास लेखन हे सांस्कृतिक दृष्टिकोनातून इतिहासाच्या अभ्यासावर भर देते. मार्क्सवाद्यांच्या मते वर्ग संघर्षाच्या मुळाशी आर्थिक व्यवहार असतात मार्क्सवादाने समाजामध्ये कामगार वर्गाचे अस्तित्व प्रबळ केले त्यांच्या मते मानवी विकासाच्या प्रक्रियेत गुलामगिरी, सरंजामशाही ,भांडवलशाही अशा तीन प्रमुख अवस्था आहेत. मार्क्सच्या आर्थिक ऐतिहासिक विश्लेषणामध्ये इतिहास लेखन राजकीय व धार्मिक साच्यातून बाहेर पडून इतिहासाच्या कक्षा रुदावल्या गेलेल्या दिसतात.

संदर्भ

1. दामोदर धर्मानंद कोसंबी'भारताच्या शास्त्रोक्त इतिहासकाराचे जनक' डी. एन. झा.
2. पानसे सुधीर २००७ उत्तुंग आणि एकाकी संशोधक'कोसंबी
3. इयत्ता दहावी क्रमिक पुस्तक'इतिहास व राज्यशास्त्र
4. एम ए भाग दोन'भारतीय राष्ट्रीय चळवळीमध्ये इतिहास लेखन शास्त्र'
5. बीए भाग ३ पेपर १ 'इतिहास पद्धती आणि उपयोजन'
6. रमेश चंद्रदत्त'इकॉनोमिक हिस्टरी ऑफ इंडिया'

मानवी विकासासाठी इतिहास लेखनामध्ये नवतंत्रज्ञान व विचारप्रवाह.

श्रीकांत अनिल संकपाळ
संशोधन विद्यार्थी (बी.एड्-एम्.एड् एकात्मिक)
शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ई-मेल : shrisankpal20@gmail.com

सारांश :

मानवी विकास आणि शाश्वत विकास हे महत्त्वपूर्ण घटक आहेत . इतिहास लेखनात नवतंत्रज्ञान आणि नवीन विचार प्रवाह जोडणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इतिहासातून भविष्याकडे जाण्याचा मार्ग तयार होतो . म्हणून इतिहासातील यशाचे धडे भूतकाळातील अनुभव ,चुका यांची माहिती मिळते . नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने इतिहासाचे लेखन विविध पद्धतीने केले जाऊ शकते. सर्व माहिती अधिक अचूक व विविध पद्धतीनेही मांडता येते .

इतिहासामध्ये फक्त घडलेल्या घटना नसून एक उज्वल भविष्य आहे .

प्रस्थावना :

मानवी विकास किंवा शाश्वत विकास हा खूप सखोल विषय आहे. विविध घटना , व्यक्ती होऊन गेल्या. त्याबद्दलची कमी माहिती आजच्या जगाला . विविध विचारवंत इतिहास अभ्यासक विविध मते मांडतात. इतिहासाच्या अपुऱ्या साधनांच्या अभावाने विविध तर्क-वितर्क लावतात. संशोधक काही प्रमाणात जसेच्या तसे त्यांचे विचार घेतात व त्या विचारांचा प्रभाव त्यांच्या संशोधनावर काही प्रमाणात हा पडतच असतो. जसा जसा काळ बदलत आहे त्यानुसार इतिहासाच्या व्याख्या नवीन तयार होत आहेत.

इतिहासात फक्त कागदपत्रांचा अभ्यास करून त्यावर मत मांडले जायचे. पण आत्ता नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध शोध घेता येतात .इतिहास लिहिताना तंत्रज्ञानाचा वापर करून घेतलेल्या शोधातून नवीन विचार प्रवाह निर्माण होत आहेत . तंत्रज्ञानाच्या मदतीने काळाची गणना केली जाऊ शकते . इतिहासामध्ये ठिकाण, कागदपत्रे, वास्तु अशा विविध गोष्टींना इतिहास अभ्यासताना महत्व दिले जाते . पण त्या खऱ्या की खोट्या व कोणत्या काळातील असतील याचा अंदाज मांडावा लागत किंवा त्या कागदपत्रावरील लेखणीत काळाचा उल्लेख असतो तोच खरा मानला जाई. पण आता नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने (कार्बन डेटींग) च्या मदतीने काळाचा काही अंशी अचूक अंदाज मांडता येतो . तंत्रज्ञानाच्या मदतीने इतिहास लेखन केले गेल्यास , ते अधिक अचूक बनेल. जर एखाद्या वास्तु विषयी माहिती हवी असेल किंवा तिचा इतिहास लिहायचा असल्यास त्यावरील नक्षी काम पाहून किंवा तिचा मौखिक इतिहास वर भर देऊन इतिहास लिहिला जातो. पण नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने मातीचा पाया कोणत्या काळात घातला असेल त्याचे उत्तर मिळते . मग इतिहास समजणे व लिहिण्यास सोयीचे होते.

याच पद्धतीने सर्व योग्य इतिहास समोर संशोधकांनी मांडल्या विकासाचे नवीन मार्ग इतिहासातून मिळतील. इतिहासामध्ये लावली गेलेले, अनेक शोध हे आजच्या नवीन शोधनिर्मितीसाठी एक प्रेरणा निर्माण करतील. त्याचबरोबर सामाजिक विकास ही इतिहासामुळे असणारे विविध वाद नाहीसे होऊन नवीन इतिहास रचण्याची तयारी सुरू होईल .

व्याख्या :-

१) "गतकालीन पृथ्वीवरील नव्या व जुन्या काळातील सामाजिक आणि आर्थिक उत्क्रांतीचा वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध अभ्यास म्हणजे इतिहास " - वि.द.घाटे

२) "इतिहास म्हणजे समाजातील उत्पादन साधनात कालक्रमानुसार झालेल्या बदलाचा इतिहास आणि या बदलामुळे घडून आलेल्या सामाजिक उत्पादन संबंधाचा व सामाजिक संबंधाचा आणि याच कालक्रमानुसार झालेल्या विकासाचा इतिहास " - डी.डी.कोसंबी

३)"मानवाला शहाणी बनवणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास" -फ्रान्सिस बेकन

मूळ शब्द : इतिहास ,तंत्रज्ञान, विचार विकास, लेखन, प्रवाह.

उद्दिष्टे :

१) इतिहास लेखनाच्या माध्यमातून मानवी विकास आणि शाश्वत विकासाबाबत जागरूकता वाढवणे.

२) इतिहास संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धती व साधने विकसित करणे.

३) विकासासाठी आवश्यक साधने उपलब्ध करणे .

४) नवतंत्रज्ञानाची माहिती करून घेणे .

नवतंत्रज्ञान व विचारप्रवाह :

१) विविध साधनांच्या माध्यमातून इतिहासाची सत्य किंवा अचूक माहिती एकत्र करणे.

२) तंत्रज्ञान : इतिहासातील विविध साधने ,दस्ताऐवज डिजिटल करून संग्रहित करता येतात व ते मोठ्या प्रमाणात वापरताही येतात . विद्यार्थी संशोधक गरजेनुसार आवश्यकतेनुसार दस्तऐवज किंवा सर्व माहिती मिळवू शकतात.

३) विविध साधनांचा वापर :

चलचित्र ,फोटो यांचा वापर करून माहिती एकत्रित केली जाऊ शकते. तसेच माहिती लेखनात चलचित्र व फोटोंचा वापर करून माहिती अधिक प्रभावीपणे मांडता येते .

४) उत्खनन :

इतिहासाचे संशोधन ,लेखन करताना वास्तूंची माहिती द्यावी किंवा घ्यावी लागते. या विविध ठिकाणी उत्खनन करून माहिती मिळवावी लागते ,तसेच तंत्रज्ञानाच्या साह्याने हे काही प्रमाणात सहज शक्य होते . त्याची माहिती एकत्रित करून लेखन करता येते .कार्बन डेटिंग, रेडिओमेट्रिक डेटिंग पद्धती.

५) तंत्रज्ञानाचा आदानप्रदान:

जागतिकीकरणामुळे विविध देशांमध्ये तंत्रज्ञानाचा जलद आदानप्रदान झाला आहे. त्यामुळे स्थानिक नवतंत्रज्ञानाला जागतिक स्तरावर पोचण्याची संधी मिळाली आहे.

६) सांस्कृतिक समृद्धी:

विविध विचार प्रवाह आणि संस्कृतींचा संयोग होऊन नवकल्पना निर्माण झाल्या आहेत. हे नवतंत्रज्ञान सामाजिक विकासाला गती देण्यास मदत करते.

७) आर्थिक विकास:

जागतिक बाजारपेठेत नवतंत्रज्ञानाच्या वापरामुळे आर्थिक विकास साधता येतो. यामुळे उत्पादन पद्धतींमध्ये सुधारणा व कार्यक्षमता वाढते.

८) पर्यावरणीय आव्हाने:

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्यांवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उपाय शोधले जात आहेत. उदाहरणार्थ, नवी ऊर्जा स्रोत आणि टिकाऊ तंत्रज्ञान विकसित करणे.

९) ग्लोबल विचार प्रवाह:

जागतिक पातळीवर विचारांच्या आदानप्रदानामुळे नवतंत्रज्ञानाच्या दृष्टीकोनात परिवर्तन झाले आहे. यामुळे विविध मुद्द्यांवर जागरूकता वाढते.

१०) नीतिमत्ता व समावेश:

जागतिकीकरणामुळे नवतंत्रज्ञानाच्या विकासात नीतिमत्तेचे महत्त्व अधिक वाढले आहे. टिकाऊ विकासाच्या दृष्टीने समावेशी धोरणांचा अवलंब आवश्यक आहे.

इतिहास या विषयाची काही महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये :

१. आधारभूत माहिती:

इतिहास विविध सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घटनांची सुसंगत माहिती प्रदान करतो, ज्यामुळे मानवतेच्या प्रवासाचा मागोवा घेता येतो.

२. तथ्यात्मकता:

इतिहासात दिलेल्या माहितीत तथ्ये, पुरावे आणि संदर्भांचा वापर महत्त्वाचा असतो, ज्यामुळे त्याची विश्वसनीयता वाढते.

३. आंतरसंबंध:

विविध काळातील घटना, व्यक्ती आणि समाज यांच्यातील संबंधांचे विश्लेषण करण्याची क्षमता इतिहासात आहे.

४. सांस्कृतिक विविधता:

इतिहास विविध संस्कृतींचा अभ्यास करतो, ज्यामुळे मानवजातीच्या बहुआयामिकतेचा समज येतो.

५. समाजशास्त्रीय दृष्टिकोन:

इतिहास सामाजिक संरचना, बदल आणि संघर्षांचे विश्लेषण करतो, ज्यामुळे मानवी अनुभवाची गहराई लक्षात येते.

६. गुणात्मक बदल:

इतिहासातील घटनांचा विचार करताना गुणात्मक बदलांचा अभ्यास केला जातो, जे आजच्या समाजाला उपयुक्त ठरतो.

७. पुनरावलोकनाची क्षमता:

ऐतिहासिक घटनांचे पुनरावलोकन करून, भूतकाळातील चुकांवर शिकता येते आणि भविष्यातील निर्णयांवर प्रभाव टाकता येतो.

८. शिक्षण व जागरूकता:

इतिहास अभ्यासल्याने समाजातील विविध मुद्द्यांविषयी जागरूकता वाढते आणि शिक्षणाची गती मिळते.

निष्कर्ष :

इतिहास लेखनात नवतंत्रज्ञान आणि विचार प्रवाहांचा समावेश करून मानव विकास आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक नवा मार्ग निर्माण होतो. प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्याला ऐतिहासिक माहिती अधिक प्रभावीपणे समजून घेता येते. यामुळे इतिहास लेखन हे एक गतिशील साधन होऊ शकते . भूतकाळातील ज्ञान भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

संदर्भ :-

१) प्रा.गायकवाड पी.जी - भारतीय इतिहास लेखनाची वाटचाल - एक अभ्यास .
२) प्रा.डॉ. शहाजहान शेख - इतिहास लेखनातील नवीन प्रवाह: सामान्यांचा इतिहास.
३) निळे सुधाकर विष्णू - इतिहास लेखन प्रक्रियेच्या मुळाशी उपयुक्ततावादी विचारसरणी
४) दूर शिक्षण केंद्र - इतिहासाचे सिद्धांत , इतिहासाच्या पद्धती आणि उपाययोजन .
५) दूर शिक्षण केंद्र - इतिहास लेखन परंपरा
६) दूर शिक्षण केंद्र - इतिहास लेखनातील नवे प्रवाह.

नवीन शैक्षणिक धोरण 2020 आणि भाषाविषयक तरतुदी: संधी, आव्हाने आणि नकारात्मक बाजू

प्रा.सतीश यशवंत चौगुले
सहाय्यक प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालय,वाळवा

गोषवारा :

नवीन शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविणारे धोरण आहे. या धोरणाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देऊन त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे आणि शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे. यामध्ये पारंपरिक शिक्षण पद्धतींचा आधुनिकीकरणासोबत समन्वय साधण्यात आला आहे. धोरणात विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण देण्यावर विशेष भर दिला आहे, कारण संशोधनानुसार मुलांच्या बौद्धिक विकासासाठी प्रारंभिक शिक्षण मातृभाषेतून असणे उपयुक्त ठरते.

भाषाविषयक तरतुदींमध्ये 'तीन भाषांचे सूत्र' महत्त्वाचे ठरते, ज्याद्वारे विद्यार्थी एक प्रादेशिक भाषा, हिंदी, आणि इंग्रजी शिकू शकतात. यामुळे विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक ओळखी जपण्याची आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता मिळते. धोरणात उच्च शिक्षणही स्थानिक भाषेत उपलब्ध करून देण्याची योजना आहे, जेणेकरून शिक्षण अधिक सुलभ होईल. तांत्रिक शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षणासाठीसुद्धा स्थानिक भाषांचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.

तथापि, या धोरणाची अंमलबजावणी करताना काही आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. भारतातील भाषिक विविधता मोठी असल्याने सर्व राज्यांमध्ये एकसमान अंमलबजावणी करणे कठीण आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे, ज्यामुळे धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आव्हानात्मक ठरते. याशिवाय, प्रादेशिक भाषांमध्ये शैक्षणिक साहित्याच्या अभावामुळे उच्च शिक्षणात अडचणी येऊ शकतात.

NEP 2020 मधील मातृभाषेतील शिक्षण विद्यार्थ्यांना ज्ञान अधिक प्रभावीपणे समजण्यास मदत करते. तसेच, तीन भाषांचे शिक्षण त्यांना बहुभाषिकतेचा लाभ देऊन जागतिक संधींना सामोरे जाण्यास तयार करते. धोरणात स्थानिक भाषांमध्ये उच्च शिक्षण मिळवणे सुलभ करून सांस्कृतिक ओळख जपण्यावर जोर दिला आहे.

तथापि, धोरणातील काही नकारात्मक बाजूही आहेत. सर्वात मोठी समस्या म्हणजे प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता. मातृभाषेतून शिकवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण आवश्यक आहे, परंतु या बाबतीत अद्याप मर्यादा आहेत. भारतातील विविध भाषिक प्रांतांमुळे एकसमान अंमलबजावणी करणे कठीण ठरते. विशेषत:, तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्रजीचे महत्त्व कायम असल्याने, मातृभाषेतून शिक्षण देणे शक्य नाही. त्यामुळे, इंग्रजीवर आधारित जागतिक स्पर्धेत विद्यार्थी मागे पडू शकतात.

धोरणाची आणखी एक अडचण म्हणजे प्रादेशिक भाषांमध्ये शैक्षणिक साहित्याची उपलब्धता कमी आहे, विशेषत: उच्च शिक्षणासाठी. स्थानिक भाषांमध्ये पुरेसे साहित्य नसल्यामुळे धोरणाची अंमलबजावणी करताना अडचणी येऊ शकतात.

एकूणच, NEP 2020 हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेत भाषिक विविधतेवर आधारित सकारात्मक बदल घडविण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. याचे फायदे आणि आव्हाने दोन्ही असून, धोरणाची यशस्वी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सखोल विचारमंथन आणि कृती आवश्यक आहे.

प्रस्तावना :

भारताचे नवीन शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे देशातील शैक्षणिक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविणारे एक महत्त्वाचे धोरण मानले जाते. या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शिक्षणात गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये प्राप्त करून देणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणे. हे धोरण संपूर्ण शैक्षणिक प्रणालीच्या पुनर्रचनेसाठी मार्गदर्शक ठरले आहे, जिथे पारंपरिक शिक्षणाच्या पद्धतींसह आधुनिक विचारसरणीचा समावेश आहे.

या धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर विशेष भर दिला आहे. कारण प्रारंभिक शिक्षण मातृभाषेत दिल्यास मुलांच्या बौद्धिक आणि सृजनशील विकासाला चालना मिळते, असे संशोधन दाखवते. 'तीन भाषांचे सूत्र' हे धोरणातील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी एक प्रादेशिक भाषा, हिंदी, आणि इंग्रजी या तीन भाषा शिकण्याचा समावेश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध भाषांशी जोडलेले राहण्याची संधी मिळते आणि त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचे संवर्धन होते.

तथापि, भाषाविषयक तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी काही आव्हानेही आहेत. भारतातील भाषिक विविधता, शिक्षणाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरील भाषिक संरचना, आणि प्रशिक्षित शिक्षकांची गरज ही प्रमुख समस्या ठरू शकतात. विशेषत:, ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता, शिक्षण साहित्याची उपलब्धता, आणि शहरी-ग्रामीण शिक्षणातील तफावत यामुळे धोरणाची अंमलबजावणी करताना अडचणी येऊ शकतात.

या शोधनिबंधात, नवीन शैक्षणिक धोरणातील भाषाविषयक तरतुदींचा सखोल अभ्यास केला आहे. धोरणाचे फायदे आणि त्याची अंमलबजावणी करताना येणाऱ्या आव्हानांची चर्चा करून, या धोरणाच्या यशस्वितेचे महत्त्व समजावले जाईल. नवीन धोरणाच्या माध्यमातून भारतातील शिक्षणव्यवस्थेतील भाषिक समन्वय साधण्याचे धोरणकर्त्यांचे प्रयत्न आणि त्याची व्यापक परिणामकारकता ह्या निबंधाचे मुख्य लक्ष असेल.

1. नवीन शैक्षणिक धोरणाचे उद्देश:

नवीन शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे भारतीय शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्यासाठी बनवण्यात आले आहे. या धोरणाचा प्रमुख उद्देश शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करणे, सर्व विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे, आणि त्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी सुसज्ज करणे हा आहे. हे धोरण शैक्षणिक व्यवस्थेत लवचिकता आणि समावेशकता वाढवते. शिक्षण हे समाजाच्या सर्व घटकांसाठी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जातो, ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कुवतीनुसार शिक्षण मिळू शकते (Joshi: 25).

या धोरणाचा एक प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण देणे. यामध्ये विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे समग्र शिक्षण दिले जाईल, ज्यामुळे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढेल आणि ते रोजगारक्षम बनतील. धोरणात युनिव्हर्सिटी स्तरावर संशोधनाला प्रोत्साहन देऊन संशोधन क्षेत्रात देशाची प्रगती वाढवण्यावर भर दिला आहे. या धोरणाचा आणखी एक उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणे आणि त्यांना विविध जागतिक स्तरावरच्या आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी देणे (Government of India, NEP 2020).

2. भाषाविषयक धोरणे:

NEP 2020 मध्ये भाषाविषयक तरतुदी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. भाषिक विविधतेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक सुसंगत शिक्षण देण्याचा प्रयत्न या धोरणात करण्यात आला आहे. या धोरणात विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतून किंवा स्थानिक भाषेतून शिक्षण देण्यावर जोर दिला आहे. भाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांची संस्कृती, इतिहास आणि सामाजिक मूल्यांशी जोडले जावे, असा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे (Kumar: 48).

मातृभाषेतील शिक्षण: धोरणानुसार, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे, कारण यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संकल्पना चांगल्या प्रकारे समजतात. मातृभाषेतून शिक्षण दिल्यामुळे विद्यार्थी आपले विचार आणि ज्ञान अधिक सुलभतेने आत्मसात करू शकतात. यामुळे त्यांच्या मानसिक विकासावर सकारात्मक परिणाम होतो. प्रारंभिक शिक्षणाच्या काळात मातृभाषेतून शिकविल्याने शालेय शिक्षणातील गोंधळ कमी होतो, आणि विद्यार्थी आपली सांस्कृतिक ओळख जपत शिक्षण घेऊ शकतात (Kumar: 48).

तीन भाषांचे सूत्र: धोरणात तीन भाषांचे सूत्र अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेबरोबर हिंदी आणि इंग्रजी देखील शिकवली जाईल. या तीन भाषांच्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना बहुभाषिकता प्राप्त होईल, जे त्यांना जागतिक स्तरावरच्या संधींना सामोरे जाण्याची तयारी देईल. इंग्रजी हे जागतिक भाषेचे महत्त्व कायम राहील, परंतु मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक परंपरांचे पालन करताना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता मिळेल (Sharma: 102).

उच्च शिक्षणातील भाषाविषयक धोरण: धोरणात उच्च शिक्षणात देखील भाषिक सुधारणांना स्थान दिले गेले आहे. उच्च शिक्षणातील पाठ्यपुस्तके आणि साहित्य स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याचे धोरणाचे लक्ष्य आहे. हे धोरण भारतातील विविध भाषांचा विकास करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. तांत्रिक शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षणासाठी देखील मातृभाषेचा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामुळे उच्च शिक्षण अधिक सुलभ होईल आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल (Government of India, NEP 2020).

3. भाषाविषयक धोरणाचे फायदे:

NEP 2020 मध्ये भाषिक विविधतेच्या आधारावर शिक्षण देण्याचे अनेक फायदे स्पष्टपणे दिसून येतात. शिक्षण मातृभाषेतून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण समजण्यास सोपे होते, आणि त्यांच्या मानसिक विकासावर सकारात्मक परिणाम होतो. मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना विषय समजणे अधिक सुलभ होते, कारण ते आपल्या परिचित भाषेतून ज्ञान प्राप्त करतात. मातृभाषेतील शिक्षण हे विद्यार्थ्यांना त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांशी जोडण्यास मदत करते. यामुळे त्यांच्या ओळखीत आणि स्वत्वात सकारात्मक वाढ होते (Mishra: 67).

मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान समृद्ध होते आणि त्यांच्या बौद्धिक क्षमतेत लक्षणीय सुधारणा होते. त्यांच्या विचारांची स्पष्टता वाढते, आणि शैक्षणिक क्षेत्रातील गोंधळ कमी होतो. तीन भाषांचे सूत्र अवलंबल्यामुळे विद्यार्थ्यांना बहुभाषिकतेचा लाभ मिळतो, ज्यामुळे ते जागतिक स्तरावर अधिक सक्षम होतात. जागतिक स्तरावरच्या संधी मिळवण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असले तरी, मातृभाषेतून शिक्षण घेण्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी मानसिक बळ मिळते (Roy: 89).

4. भाषाविषयक आव्हाने:

NEP 2020 मध्ये भाषाविषयक तरतुदींची अंमलबजावणी करताना काही महत्त्वाच्या आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. भारताच्या विविध प्रांतांमध्ये भाषिक विविधता प्रचंड असल्यामुळे या धोरणाची एकसमान अंमलबजावणी करणे कठीण ठरू शकते. प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या बोली भाषांचा वापर होतो, तर साहित्य प्रमाण भाषेत तयार होते. ज्यामुळे भाषेतील शिक्षणाचा अभाव काही प्रांतांमध्ये निर्माण होऊ शकतो (Patel :115).

धोरणातील दुसरे मोठे आव्हान म्हणजे योग्य प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता. मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आवश्यक प्रमाणात प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्याशिवाय शिक्षकांची संख्या देखील मर्यादित आहे, ज्यामुळे धोरणाची प्रभावी अंमलबजावणी कठीण होऊ शकते. तांत्रिक शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षणात इंग्रजीचे महत्त्व अजूनही टिकून आहे. त्यामुळे या विषयांमध्ये मातृभाषेचा वापर करणे काही प्रमाणात कठीण होऊ शकते. तांत्रिक शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमात शिकवणे आवश्यक आहे, ज्यामुळे विद्यार्थी जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक होतील (Nair: 135).

धोरणात आणखी एक आव्हान म्हणजे प्रादेशिक भाषांमध्ये शैक्षणिक सामग्रीची उपलब्धता. उच्च शिक्षणासाठी किंवा तांत्रिक शिक्षणासाठी स्थानिक भाषांमध्ये पुरेसे भाषांतरित साहित्य उपलब्ध नाही. या भाषिक सामग्रीची कमतरता धोरणाच्या अंमलबजावणीत अडथळा ठरू शकते. विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण देण्यासाठी या समस्येचे निराकरण करणे अत्यावश्यक आहे.

नकारात्मक बाजू:

नवीन शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मधील भाषाविषयक तरतुदींमध्ये काही नकारात्मक बाजू देखील आहेत, ज्यावर विचार करणे आवश्यक आहे. या तरतुदींची अंमलबजावणी करताना अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे.

1. **प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता**: मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आवश्यक प्रमाणात प्रशिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. परंतु, भारतात अद्याप मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी योग्य प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे. अनेक राज्यांमध्ये योग्य शिक्षकांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणाची गुणवत्ता कमी होऊ शकते (Patel: 120).
2. **सर्व प्रांतांमध्ये भाषिक विविधता**: भारताच्या विविध प्रांतांमध्ये अनेक भाषा बोलल्या जातात. त्यामुळे सर्व राज्यांमध्ये मातृभाषेतून शिक्षण देणे कठीण ठरते. यामुळे धोरणाची एकसमान अंमलबजावणी करणे अवघड आहे. उदाहरणार्थ, उत्तर भारतात हिंदी ही प्रमुख भाषा आहे, परंतु दक्षिण भारतीय राज्यांमध्ये मातृभाषा वेगळी आहे. अशा परिस्थितीत धोरणाचे पालन करणे आव्हानात्मक ठरते (Kumar: 53).
3. **उच्च शिक्षणातील इंग्रजीचे महत्त्व:** इंग्रजी ही जागतिक भाषा आहे आणि तांत्रिक तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी इंग्रजीचा वापर आवश्यक आहे. या धोरणानुसार उच्च शिक्षण मातृभाषेतून दिले जावे, अशी तरतूद आहे. मात्र, तांत्रिक शिक्षणात मातृभाषेतून शिक्षण देण्याची संकल्पना लागू करणे कठीण आहे. जागतिक स्तरावर इंग्रजी भाषेच्या वर्चस्वामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत मागे पडण्याची शक्यता आहे (Nair :137).

4. **प्रादेशिक साहित्याची उपलब्धता**: धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रादेशिक भाषांमध्ये शैक्षणिक साहित्याची उपलब्धता आवश्यक आहे. परंतु, सध्या अनेक विषयांची पाठ्यपुस्तके आणि शिक्षणसाहित्य केवळ इंग्रजीत उपलब्ध आहेत. प्रादेशिक भाषांमध्ये या साहित्याची उपलब्धता कमी आहे, ज्यामुळे विद्यार्थी उच्च शिक्षणात अडचणींना सामोरे जातील (Sharma 108).
5. **विभागीय असमानता:** धोरणाची अंमलबजावणी करताना विभागीय असमानता मोठे आव्हान ठरू शकते. आर्थिकदृष्ट्या मागासलेले प्रांत किंवा ग्रामीण भागात भाषिक तरतुदी प्रभावीपणे लागू करणे अवघड ठरते. अशा परिस्थितीत, शहरी आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक गुणवत्ता आणि भाषिक धोरणामध्ये तफावत निर्माण होऊ शकते (Mishra: 72).

निष्कर्ष :

नवीन शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) हे भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये व्यापक बदल घडवून आणण्यासाठी तयार केलेले आहे. या धोरणाने विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण देण्याचा विचार केला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना विषय अधिक चांगल्या पद्धतीने समजतील आणि ते त्यांच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परंपरांशी जोडले जातील. भाषिक विविधता आणि मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या या धोरणामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास अधिक सक्षम होईल.

मात्र, या धोरणाची अंमलबजावणी करताना काही प्रमुख आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता, प्रादेशिक भाषांमधील साहित्याची उपलब्धता, आणि विविध प्रांतांमधील भाषिक विविधता या आव्हानांमुळे धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीत अडथळे निर्माण होऊ शकतात. विशेषतः उच्च शिक्षणासाठी इंग्रजीच्या जागतिक महत्त्वामुळे मातृभाषेतून शिक्षण देणे कठीण ठरू शकते.

नकारात्मक बाजूंवर देखील विचार करणे आवश्यक आहे, विशेषत: उच्च शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणातील इंग्रजीचे महत्त्व कमी झाल्यास विद्यार्थ्यांच्या जागतिक स्तरावरील स्पर्धात्मक क्षमतांवर परिणाम होऊ शकतो. तरीसुद्धा, योग्य उपाययोजना आणि सुसंगत धोरणात्मक बदलांमुळे, नवीन शैक्षणिक धोरण 2020 हे भारतीय शिक्षण प्रणालीत महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणण्याची क्षमता ठेवते.

संदर्भ:

१. Government of India, Ministry of Education. *National Education Policy 2020.*
२. Joshi, R. "Reforming Indian Education System through NEP 2020." *Education Review Journal*, vol. 3, no. 2, 2021, pp. 25-28.
३. Kumar, S. "Language Policies and Educational Reforms under NEP 2020." *Journal of Educational Development*, vol. 4, no. 1, 2021, pp. 48-54.
४. Mishra, A. "Impact of Language on Learning: A Study of NEP 2020." *International Journal of Language Studies*, vol. 6, no. 3, 2022, pp. 67-72.
५. Nair, R. "Challenges in Implementing NEP 2020: A Focus on Higher Education." *Higher Education Quarterly*, vol. 5, no. 4, 2021, pp. 135-139.
६. Patel, V. "NEP 2020 and Language Diversity in India." *Indian Education Journal*, vol. 9, no. 2, 2021, pp. 115-120.
७. Roy, T. "Multilingualism and Education in India: NEP 2020's Vision." *Linguistic Research Quarterly*, vol. 2, no. 1, 2022, pp. 89-92.
८. Sharma, P. "The Three-Language Formula: Opportunities and Challenges." *Education Policy Journal*, vol. 7, no. 3, 2021, pp. 102-108.

भाषिक कौशल्ये आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. मतिवडे अनिता वसंत
कर्मवीर हिरे महाविद्यालय,गारगोटी
ता.भुदरग,जि.कोल्हापूर 416209
ई-मेल- matiwadeav@gmail.com

प्रा. काटकर मृदुला विठ्ठल
कर्मवीर हिरे महाविद्यालय,गारगोटी
ता.भुदरगड,जि.कोल्हापूर 416209
ई-मेल - gaytripatil161@gmail.com

सारांश:

शाश्वत विकासाची 2030 च्या कृती कार्यक्रमाची उद्दिष्टे 4(SDG4) भारताने 2015 मध्ये स्वीकारली. यामध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम'समाविष्ट असून, हे उद्दिष्ट 2030 पर्यंत सर्वांसाठी समावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिचित करणे आणि सर्वांसाठी निरंतर अध्ययनाच्या शिक्षणाच्या संधींना प्रोत्साहन देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे या उत्तुंग उद्दीष्टपूर्ती करता अध्ययनाला पाठिंबा देण्यासाठी व संपूर्ण शिक्षण प्रणालीची नव्याने रचना करणे आवश्यक आहे. म्हणजेच शाश्वत विकास कृती कार्यक्रम 2030 ची सर्वात महत्त्वाची लक्षणे आणि उद्दिष्टे साध्य होतील.तसेच व्यक्ती,समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनाचा पुरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सार्वभौम शिक्षण हा भविष्यासाठी सर्वात उत्तम मार्ग ठरेल. या पुढच्या दशकात जगातील सर्वात मोठी सर्वांगीण कौशल्य संपन्न युवकांची लोकसंख्या भारतामध्ये असेल आणि त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या आपल्या क्षमतेवर देशाचे भवितव्य ठरेल.

संशोधन संज्ञा : *भाषिक, कौशल्ये, श्रवण,लेखन, वाचन,भाषण,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण*

प्रस्तावना :

शिक्षण हे राष्ट्राचे सामर्थ्य असून ती एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे व्यक्तीचे शरीर, मन, चारित्र्य बनते आणि मजबूत होते.मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी न्याय,समता, समाज विकसित करण्यासाठी व राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हाच एकमेव उपाय आहे. या माध्यमातून मनुष्य आपल्यातील विविध कौशल्य विकसित करतो. शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय. आज विद्यार्थ्यांमध्ये भाषेच्या अभ्यासाविषयी रुची निर्माण व्हावी. व्यवसाय कौशल्ये विकसित होण्यासाठी व आवश्यक गुणांच्या विकासासाठी अशा अभ्यासक्रमाची गरज आहे. किमान विद्यार्थ्यांकडे भाषिक कौशल्यांची पात्रता असणे गरजेचे आहे. आजचे युग भाषिक कौशल्याचे आहेत हे मानने गरजेचे आहे. कारण काळाची पावलं चाणाक्षपणे ओळखून आपण वाटचाल केली तरच आपला टिकाव लागेल. ज्याच्याकडे कौशल्ये त्याला संधी हा नव्या जगाचा मंत्र आहे. तो स्वागतशील वृत्तीने स्वीकारणे आवश्यक आहे. जागतिकीकरणाच्या काळात ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला असून विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या अनेक संधीचे अवकाश खुले झाले आहे. यासाठी तसेच जगाच्या बाजारपेठेत स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी भाषिक कौशल्ये सहाय्यभूत ठरणार आहेत. कौशल्ये म्हणजे एखादी गोष्ट सहजतेने परिपूर्णपणे प्रभावीपणे करणे. यासाठीच शैक्षणिक सत्र 2022-2023 पासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. या नवीन धोरणानुसार शालेय व उच्च शिक्षणाच्या रचनेत अमुलाग्र बदल करण्यात आलेला आहे.21 व्या शतकासाठी आवश्यक असलेली कौशल्ये (भाषिक व व्यवसायिक) प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे.वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी देशभर वाचनालयांचा विचार केलेला आहे. डिजिटल वाचनालयांची स्थापना केली जाणार असून उच्च शिक्षणात बदल करून संशोधनाला चालना देण्यासाठी 'नॅशनल रिसर्च फौंऊडेशन' ची स्थापना केलेली आहे.

उद्दिष्टे.

1.भाषा शिकणाऱ्यांची वाचन आणि लेखन करण्याची क्षमता विकसित करणे.

2 प्रभावी संवाद साधने आणि वेगवेगळ्या परिस्थितीत सहजपणे भाषेचा वापर करणे शक्य करणे.

3.उत्कृष्ट संभाषण/भाषण कौशल्ये समजून घेणे.

4.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 समजून घेणे.

5.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा समजून घेणे.

6. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू समजून घेणे.

संशोधन पद्धती-

संशोधन विषयाच्या अनुषंगाने जमा केलेली माहिती ही दुय्यम सामग्रीवर अवलंबून असून त्यासाठी विषयाला अनुसरून विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट अहवाल या स्वरूपातील साधनांचाही वापर करण्यात आला आहे.

भाषिक कौशल्ये

व्यक्तीचा संपूर्ण विकास होण्यासाठी भाषिक कौशल्य संपादन करणे अत्यंत आवश्यक आहे भाषिक कौशल्य म्हणजे लिपीशी संबंधित शब्दनिष्ठ अर्थपूर्ण भाषिक कृती करण्याचे सामर्थ्य होय. श्रवण,वाचन,लेखन,भाषण(संभाषण) ही प्रमुख भाषिक कौशल्ये मानली जात असून ही चार कौशल्ये एकमेकांवर अवलंबून असतात. व्यवहारातील समज वृध्दींगत करण्यासाठी भाषिक कौशल्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. भाषिक कौशल्ये जन्मजात आपल्याला प्राप्त नसतात तर ती जन्मानंतर अनेक प्रयत्नाने, शिक्षणाने, परिश्रमाने,प्रशिक्षणाने, चिकाटीने आत्मसात करता येतात व वाढवताही येतात. भाषिक कौशल्ये प्रयत्नसाध्य कौशल्ये आहेत श्रवण व वाचन कौशल्ये ही आकलनाशी संबंधित आहेत तर भाषण व लेखन कौशल्ये अभिव्यक्तीशी संबंधित आहेत.

1.श्रवण कौशल्य

भाषिक कौशल्यातील श्रवण कौशल्य हे पायाभूत कौशल्य आहे. श्रवण म्हणजे ऐकणे हे केवळ ऐकणे म्हणजे श्रवण कौशल्य नाही तर ऐकण्याच्या क्षमते बरोबरच आकलन संगती अर्थबोध साधने. श्रवण कौशल्यामुळेच परस्पर संवादाची क्रिया सुरळीतपणे पार पडते व माहितीचे ग्रहण चांगल्या रीतीने त्वरित होते. रवींद्रनाथ टागोरांच्या मते, 'थोडे वाचन पण अधिक विचार करणे, थोडे बोलणे आणि अधिक ऐकणे हाच बुद्धिमान बनण्याचा उपाय आहे'. श्रवणासाठी मनाची एकाग्रता व अवधान फार महत्त्वाचे असते. कारण मन हे चंचल असून ते एका जागी स्थिर नसते त्याला स्थिर ठेवणे हे प्रयत्नसाध्य आहे. म्हणून संत ज्ञानेश्वर म्हणतात की,'वक्तृत्वात अवधानाचा होय चारा'.भाषा ही ज्या पद्धतीने बोलणे व लिहिणे या क्रिया मधून व्यक्त होते. तितक्याच प्रभावीपणे ती ऐकणे या क्रिया मधून व्यक्त होते. वाचनाइतकेच उत्तम श्रवण करणे व त्यांचे आकलन करून घेणे हे संवादाच्या दृष्टीने आवश्यक असते. परमतखंडन करण्यासाठी लक्षपूर्वक समोरच्याचे मत श्रवण करणे आवश्यक असते तेव्हाच स्वमत प्रभावी मांडता येते.

2.वाचन कौशल्य

वाचन हे सहजपणे घडणारी क्रिया असली तरी वाचन हे एक प्रकारचे कौशल्य आहे.वाचनाची क्षमता व कौशल्ये जशी विकसित होत जातात तसतसे वाचनानंद द्विगुणीत होत जातो. वाचन हे निर्भेळ आनंद देणारी क्रिया आहे. मुळात वाचता येणे हेच एक चांगल्या बौद्धिक क्षमतेचे उदाहरण आहे. वाचनानेच माणूस प्रगल्भ होतो. आनंद व मनोरंजन लोकरंजनातून लोकशिक्षण घडवण्या साठी, मानवी जीवनाचे मनाचे कप्पे समजून घेण्यासाठी, अध्ययनासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी वाचन होय.असे अनेक हेतू आपणास सांगता येतात. वाचन म्हणजे योग्य क्रमाने अक्षरे, शब्द, वाक्य वाचन, अर्थनिर्णय आणि अचूक अर्थबोध ही प्रक्रिया वाचन होय. सततच्या सरावानेच वाचन कौशल्याचा विकास होत असतो. वाचन हे व्यक्तिमत्व विकासात आणि ज्ञानवृद्धीस अत्यंत आवश्यक असते. वाचन म्हणजे लिहिणाऱ्याच्या हेतूनुसार वाचणाऱ्याच्या तयारी प्रमाणे होणारे अर्थाचे आकलन होय.वाचनाचे प्रकटवाचन, मुकवाचन, फावल्या वेळेचे वाचन,अध्ययन प्रवण वाचन असे वाचनाचे प्रकार पडतात. भाषिक कौशल्याच्या माध्यमातूनच आपण आपले व्यक्तिमत्व प्रगल्भ बनवू शकतो. मुद्रित प्रसार माध्यमापासून ते इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमांमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व लोकांना भाषिक कौशल्ये आत्मसात करावी लागतात.

3.भाषण (संभाषण) कौशल्य

समाजाशी संपर्क साधण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणात कौशल्यांचा वापर करतो भाषण म्हणजे एका व्यक्तीने अनेकांच्या पुढे विशिष्ट विषयाला अनुसरून मुद्देसूद बोलणे होय. भाषण हे विशिष्ट विचार व हेतूपूर्वक असते. मनातील विचार वाणी द्वारे

मांडण्याची सहज क्रिया म्हणजेच भाषण होय. प्रभावी बोलणे या कृतीला सर्वत्र मोठे महत्त्व असते. मानवी नातेसंबंधातून उद्योग व्यवसायापर्यंत सर्वत्र प्रभावी बोलणाऱ्या व्यक्ती यशस्वी होताना दिसतात.भाषण कौशल्यामध्ये भाषणाची मांडणी ही सूत्रबद्ध असावी कारण भाषणामध्ये सूत्र व हेतू हा सुद्धा असतो. 'बोलणाऱ्याच्या एरंड्या खपतात न बोलणाऱ्याचे गहू खपत नाहीत' अशी म्हण प्रचलित आहे.प्रभावी बोलणारा माणूस अचानक निर्माण होत नाही त्याला भाषण कौशल्याच्या विकासाचे टप्पे क्रमाक्रमाने पार करून पुढे जावे लागते. सातत्याने केलेल्या प्रयत्नातून भाषण कौशल्य प्राप्त होते

4.लेखन कौशल्य

भाषिक कौशल्यामध्ये लेखन कौशल्यांना फार महत्त्व दिले जाते कारण लेखन कौशल्यापूर्वी श्रवण,भाषण,वाचन या भाषेच्या कौशल्याचा विकास होणे आवश्यक आहे. लेखन म्हणजे विचारांची जी अभिव्यक्ती आहे ती अभिव्यक्ती बंदिस्त करणारे कौशल्य होय.लेखन परिणामकारक होण्यासाठी लेखनात मुद्देसूतपणा असला पाहिजे. भाषा लेखन प्रकारनुसार बदलते. प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वानुसार भाषाशैली बदलत असते. वाक्यरचना, पदांचा क्रम, वाक्यप्रचार, म्हणी,विरामचिन्हे शुद्धलेखन या बाबीनाही लेखन कौशल्यात महत्त्वाचे स्थान आहे.

लेखन कौशल्यात सुलेखन, जलदलेखन, मुद्देसुद व प्रभावी लेखन आणि शैलीदार लेखन यांचा समावेश होतो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये शालेय आणि उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात परिवर्तनात्मक बदलांना वाव दिलेला आहे.21 व्या शतकातले पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण असून ते 1986 नंतर पहिल्यांदाच तब्बल 34 वर्षानंतर जाहीर केले या धोरणाचा मसुदा इस्रोचे माजी प्रमुख के.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले.सर्वांना सहज शिक्षण, नि:पक्षपात, दर्जा/गुणवत्ता, परवडणारे आणि उत्तरदायित्व या पाच स्तंभावर ह्या धोरणाची उभारणी करण्यात आली आहे. 2030 च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी यांची सांगड घालण्यात आली आहे.भारताचा चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा व प्रत्येक विद्यार्थ्यामधील आगळ्यावेगळ्या क्षमता पुढे आणण्याचा प्रयास आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या 29 जुलै 2020 रोजी च्या बैठकीमध्ये या धोरणाला मंजुरी देण्यात आली. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा बदल आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या पूर्वी 1968,1986 व 1990 मध्ये शैक्षणिक धोरण यंत्रणेत सुधारणा केलेली होती.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020:आराखडा

शिक्षण अभ्यासक्रमांना वेगवेगळ्या शाखांच्या चौकटीतून बाहेर काढून आंतरविद्याशाखीय करण्यात आले.21व्या शतकासाठी नवीन शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जाणार असून आवश्यक कौशल्ये प्रदान करण्याला महत्त्व देण्यात आले आहे. तसेच या तरतुदीनुसार 3 ते 14 वर्षे वयोगटातील मुले ही शिक्षण हक्क कायद्याच्या कक्षेत आली आहेत.यापूर्वी 6 ते 14 वयोगट समाविष्ट होता. या धोरणानुसार बालकांचे वय वर्ष 3 नर्सरीपासून शिक्षणाला सुरुवात होईल.व वय वर्ष 7 मध्ये बालक पहिलीच्या वर्गात शिक्षण घेईल. शालेय शिक्षणाच्या सध्याच्या 10+2 या संरचनेत बदल करून 3 ते 18 वयोगटासाठी 5+3+3+4 अशी नवीन अध्यापनशास्त्राची आणि अभ्यासक्रमाची रचना तयार केलेली आहे.

5 वर्ष मूलभूत

i) नर्सरी 4 वर्षे ii) जुनियर केजी 5 वर्षे iii) सीनियर केजी 6 वर्षे iv) इयत्ता पहिली 7 वर्षे v) इयत्ता दुसरी 8 वर्षे

3 वर्षाची प्रारंभिक शाळा

i) इयत्ता 3 री 9 वर्षे ii) इयत्ता 4 थी 10 वर्षे iii) इयत्ता 5 वी 11 वर्षे

3 वर्षाची माध्यमिक शाळा

i) इयत्ता 6 वी 12 वर्षे ii) इयत्ता 7 वी 13 वर्षे iii)इयत्ता 8 वी 14 वर्षे

चार वर्षे माध्यमिक शाळा

i) इयत्ता 9 वी 15 वर्षे ii) इयत्ता 10 वी 16 वर्षे iii) इयत्ता 11 वी 17 वर्षे iv) इयत्ता 12 वी 18 वर्षे

शिक्षणाच्या नवीन धोरणानुसार वयोगट 3 ते 18 मधील शिक्षण हे मूलभूत शिक्षण समजले जाणार आहे. त्यासाठी बालसुलभ शिक्षण आणि अभ्यासक्रम विकसित केला आहे. वयाच्या 6 व्या वर्षापर्यंत लहान मुलांच्या मेंदूचा विकास हा 85% हून अधिक होत असतो. त्यामुळे लहान मुलांसाठी प्रामुख्याने लवचिक, बहुस्तरीय खेळावर आधारित कृती व जिज्ञासेवर आधारित शिक्षण दिले जाईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सकारात्मक व नकारात्मक बाजू

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे एक सर्वसमावेशक धोरण असून ते भारतातील शिक्षणाच्या भविष्यासाठीच्या विशिष्ट दृष्टिकोनाची रूपरेषा देते.धोरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू आहेत त्यांची खाली मांडणी केलेली आहे.

सकारात्मक बाजू

1.सर्वांगीण विकास

हे धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते.ज्यामध्ये संज्ञानात्मक, सामाजिक, भावनिक आणि शारीरिक विकासाचा समावेश होतो.

2.लवचिक अभ्यासक्रम

हे धोरण विद्यार्थ्यांना लवचिक अभ्यासक्रम प्रदान करते.जे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि अभिरुचीनुसार विषय निवडण्याची परवानगी देते.

3. तंत्रज्ञानावर भर

या धोरणने शिक्षणातील तंत्रज्ञानाचे महत्त्व ओळखले आहे.अध्यापन आणि अध्ययनात तंत्रज्ञानाच्या वापराचे समर्थन केले आहे.

4.शिक्षणाचे सार्वत्रिकरण

प्री-स्कूल ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे सार्वत्रिक प्रवेश सुनिश्चित करणे हे धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

5. बहुविद्याशासकीय शिक्षण

हे धोरण बहु विषय शिक्षणास प्रोत्साहन देते. याचा अर्थ विद्यार्थी विविध विषय आणि क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. उदा. अभियांत्रिकीचे शिक्षण घेत संगीत विषय शिकू शकतात.कला शाखेत शिकत विद्यार्थी मॅनेजमेंट शिकू शकतात.

नकारात्मक बाजू

1.भाषेच्या समस्या

NEP 2020 च्या धोरणात किमान इयत्ता पाचवी पर्यंत शिक्षणाचे माध्यम म्हणून मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.पण जे या भाषेशी परिचित नाहीत त्या विद्यार्थ्यांसाठी हे आवाहन निर्माण होऊ शकते.

2.अंमलबजावणीची आव्हाने

या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वपूर्ण संसाधने आणि राजकीय इच्छाशक्ती आवश्यक आहे.

3.मानकीकरण

या धोरणाचे उद्दिष्ट देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण करणे आहे. ज्यामुळे संस्कृती आणि विविधतेचे एकसंधीकरण होऊ शकते.

4.निधी

ह्या धोरणासाठी पायाभूत सुविधा शिक्षक प्रशिक्षण आणि संशोधनांमध्ये महत्त्वपूर्ण गुंतवणूक आवश्यक आहे. जे सरकारसाठी आव्हान असू शकते विशेषतः आर्थिक अनिश्चिततेच्या काळात.

5.शिक्षणातील असमानता

या धोरणाचे उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करणे आहे परंतु संसाधने आणि पायाभूत सुविधांमधील असमानता लक्षात घेता या ध्येयाची अंमलबजावणी करणे आव्हानात्मक असू शकते.

निष्कर्ष

1. भाषिक कौशल्य ही पायाभूत कौशल्य आहेत.
2. भाषिक कौशल्य शिक्षणाने, प्रयत्नाने, परिश्रमाने आत्मसात करावी लागतात.
3. शिक्षण हे निरंतर व गतिमान प्रक्रिया आहे.
4. देश समृद्ध व जागतिक ज्ञान महासत्ता बनण्यासाठी NEP 2020 हे धोरण आवश्यक आहे.
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळेच संशोधन तंत्रज्ञानाचा वापर, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन, नवोपक्रमाला चालना इत्यादी गोष्टी निर्माण झाल्या आहेत.
6. या धोरणात फ्रेमवर्क विकसित करणे आवश्यक आहे.
7. या धोरणामुळे भारतीय शिक्षणामध्ये परिवर्तन घडवून आले आहे.

संदर्भ

1.कसबे (डॉ.) रावसाहेब,'मराठी भाषेच्या उज्वल भविष्यासाठी', सुगावा प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती, 2003
2.पाटील (डॉ.) आनंद, 'सुजनात्मक लेखन',पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2005.
3.नसीराबादकर (डॉ.) ल.रा., 'व्यवहारिक मराठी', फडके प्रकाशन,कोल्हापूर
4.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार (मराठी)
5. दैनिक लोकमत (पुणे आवृत्ती) दि.8 एप्रिल, 2021.
6. तरुण भारत (जळगाव आवृत्ती) दि. 29 नोव्हेंबर, 2021.
7.https//www.education.gov.in

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

शिक्षक शिक्षणातील संशोधनात नवीन विचार प्रवाह: एक समीक्षात्मक अभ्यास

प्रा. विनोद मच्छिंद्रनाथ बर्डे
सहाय्यक प्राध्यापक,
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी.

सारांश :-

या अध्ययनात शिक्षक शिक्षणात नवीन विचार प्रवाहांचे विश्लेषण करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान, विविधता, आणि समावेशकता यामध्ये होत असलेल्या बदलांमुळे शिक्षकांच्या प्रशिक्षण पद्धतींमध्ये मोठे परिवर्तन झाले आहे. पारंपरिक विचारधारा बदलून, क्रियाशील शिक्षण, तंत्रज्ञानाच्या वापरासह, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतींना अधिक महत्त्व दिले जात आहे.

या अध्ययनात विविध शैक्षणिक सिद्धांत, तंत्रज्ञानाच्या प्रभावीतेचा अभ्यास, आणि समावेशकतेच्या दृष्टीकोनातून शिक्षक प्रशिक्षणाची पुनर्रचना यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या संशोधनात आढळलेल्या महत्त्वाच्या मुद्द्यांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ऑनलाइन शिक्षण, आणि गेमिफिकेशन यांचा समावेश आहे, जे शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

संशोधनामुळे हे स्पष्ट झाले आहे की, नवीन विचार प्रवाह शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत, परंतु याबरोबरच काही आव्हाने, जसे की संसाधनांची उपलब्धता आणि मानसिकता याबाबत असलेल्या अडचणींचा सामना करणे आवश्यक आहे. यामुळे शैक्षणिक सुधारणा आणि शिक्षण प्रक्रियेतील गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी नवे संशोधन आणि अभ्यास गरजेचे आहेत.

प्रस्तावना :-

शिक्षक शिक्षण क्षेत्रातील संशोधन हा शिक्षण प्रक्रियेत गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा घटक आहे. शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी संशोधनाचा महत्त्वाचा वापर होतो, आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठीही संशोधन आवश्यक असते. शिक्षणातील नव्या विचारधारा, नवे तंत्र, आणि शिक्षणात होणारे तंत्रज्ञानाचे प्रगतीशील वापर हे आजच्या शिक्षकांसाठी नवे संशोधन विषय झाले आहेत. या संशोधन पत्रात शिक्षक शिक्षणातील नव्या विचार प्रवाहांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

१. शिक्षक शिक्षणातील पारंपरिक विचारप्रवाह

पारंपरिक शिक्षक शिक्षणाचे स्वरूप प्रामुख्याने पाठ्यपुस्तक, व्याख्यान आणि परीक्षांवर आधारित होते. अध्यापनाची पद्धती एकतर्फी, शिक्षककेंद्रित असायची. शिक्षक हे माहितीचे एकमेव स्रोत मानले जात. अशा पद्धतीत विद्यार्थ्यांचे सहभाग कमी होता, आणि ज्ञान प्राप्तीची प्रक्रिया मर्यादित स्वरूपाची असायची. शिक्षक प्रशिक्षणाचे मुख्य लक्ष्य होते तात्विक ज्ञान मिळवणे, परंतु अध्यापनाच्या व्यावहारिक बाबींकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते.

शिक्षक शिक्षणातील पारंपरिक विचारप्रवाह हा शिक्षण प्रक्रियेचा एक जुना आणि प्रस्थापित मार्ग आहे, ज्यावर अनेक दशकांपासून अवलंबून राहिले आहे. पारंपरिक शिक्षणामध्ये शिक्षण प्रक्रिया मुख्यत्वेकरून शिक्षककेंद्रित होती, ज्यात शिक्षकाला ज्ञानाचा मुख्य स्रोत मानले जात असे. या पद्धतीमध्ये शिक्षकांचे काम प्रामुख्याने विद्यार्थ्यांना माहिती पुरवणे, व्याख्याने देणे आणि पारंपरिक पाठ्यक्रमानुसार अध्ययन करवणे असे होते.

पारंपरिक विचारप्रवाहात अध्यापनाच्या तात्विक भागावर अधिक जोर दिला जात असे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकावर आधारित माहिती शिकवली जाई, आणि त्यांचे ज्ञान परीक्षांच्या माध्यमातून मोजले जात असे. या पद्धतीत विद्यार्थ्यांचा सहभाग मर्यादित होता आणि त्यांचा विचार स्वातंत्र्याला प्रोत्साहन मिळत नव्हते. शिक्षकांना व्यावहारिक शिक्षण पद्धतींपेक्षा शैक्षणिक सिद्धांतांवर अधिक भर दिला जायचा.

यामध्ये विविध पद्धतींनी शिकवण्याची संधी कमी असायची आणि शिकण्याच्या प्रक्रियेत नवीनता, तंत्रज्ञानाचा वापर, आणि कौशल्यावर आधारित शिक्षण यांचा अभाव होता. विद्यार्थ्यांचे स्वतंत्र विचार आणि समस्या सोडवण्याच्या क्षमतांकडे फारसे लक्ष दिले जात नव्हते.

पारंपरिक विचार प्रवाहात विद्यार्थ्यांपेक्षा शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वाची होती, त्यामुळे शिकणाऱ्या मुलांची स्वायत्तता आणि जिज्ञासा यांवर मर्यादा येत असे. परिणामी, शिक्षणाचे स्वरूप रुजलेले असले तरी नवीन शिक्षण तंत्र आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाच्या आजच्या गरजांमध्ये त्याची मर्यादा जाणवते.

२. नव्या विचार प्रवाहांची ओळख

आजच्या आधुनिक शिक्षण व्यवस्थेत, शिक्षक शिक्षणात नव्या विचारधारांचा प्रभाव वाढला आहे. शिक्षण हे केवळ माहिती देणे नव्हे तर विद्यार्थ्यांना विचार करायला, समस्यांचे निराकरण करायला आणि नवकल्पना शोधायला प्रवृत्त करणे या गोष्टींवर लक्ष केंद्रित झाले आहे. या नव्या विचारप्रवाहांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो:

(अ) क्रियाशील शिक्षण (Active Learning)

क्रियाशील शिक्षणामध्ये विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा सक्रिय घटक बनतो. विद्यार्थ्यांना विचार करणे, प्रश्न विचारणे, चर्चेत भाग घेणे आणि स्वत:च्या अभ्यासक्रमाची योजना तयार करणे शिकवले जाते. शिक्षकांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवणे आणि विविध शिक्षण साधनांचा वापर करून त्यांना आत्मसात होण्यास मदत करणे हा आहे.

(ब) तंत्रज्ञानाचा वापर

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षक शिक्षणातही मोठे बदल झाले आहेत. ऑनलाइन शिक्षण, व्हर्च्युअल क्लासरूम्स, डिजिटल साधनांचा वापर, आणि विविध ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्सचा उपयोग शिक्षकांना अध्यापनात नवकल्पना साकारण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. यामुळे शिक्षकांना विविध पद्धतीने आणि साधनांद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधता येतो.

(क) सहकार्य आणि समन्वय आधारित शिक्षण (Collaborative and Cooperative Learning)

सहकार्याने शिकण्याची पद्धत सध्या मोठ्या प्रमाणात शिक्षक प्रशिक्षणात वापरली जाते. या पद्धतीत शिक्षक एकमेकांशी सहकार्याने कार्य करतात, संसाधनांचा शेअरिंग करतात आणि एकत्रित शिक्षण उपक्रमांमध्ये भाग घेतात. यामुळे शिक्षकांचे व्यावसायिक कौशल्य विकसित होण्यास मदत होते.

(ड) विद्यार्थीकेंद्रित शिक्षण (Student-Centered Learning)

या विचार प्रवाहात विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार अध्यापन पद्धती तयार केल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासात असलेल्या वैयक्तिक गरजांचा विचार करून शिक्षणाचे नियोजन केले जाते. यात विविधता आणि समावेशकता यांना महत्त्व दिले जाते.

3. नव्या विचार प्रवाहांची ओळख: २०२४ मध्ये शिक्षण क्षेत्रातील प्रगतीशील बदल

सन २०२४ मध्ये शिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत, ज्यामुळे शिक्षक शिक्षणात नवीन विचार प्रवाहांचा मोठा प्रभाव पडत आहे. शिक्षण पद्धती आणि अध्यापनात आधुनिकता आणण्याच्या उद्देशाने, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विविधता आणि समावेशकता यावर अधिक भर दिला जात आहे. यामुळे शिक्षकांचे पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन एक नवीन शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक ठरले आहे.

(अ) कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) आणि शिक्षण

सन २०२४ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) शिक्षणाच्या मुख्य केंद्रस्थानी आहे. AI आधारित साधने, जसे की Chatbots, Personalized Learning Systems, आणि शिक्षण सॉफ्टवेअर, विद्यार्थ्यांच्या वेगानुसार अध्यापन सुलभ करतात. या तंत्रामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याचे व्यक्तिगत लक्ष देणे शक्य होते, ज्यामुळे विद्यार्थी केंद्रित शिक्षणाचा विकास होतो.

(ब) हायब्रिड आणि ऑनलाइन शिक्षणाचे वाढते महत्त्व

कोविड-१९ नंतर, हायब्रिड आणि ऑनलाइन शिक्षणाला असामान्य महत्त्व प्राप्त झाले आहे. सन २०२४ मध्ये डिजिटल साधनांचा अधिकाधिक वापर होत आहे. शिक्षकांना विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवरून शिक्षण देण्याची क्षमता विकसित करावी लागत आहे, तसेच विविध प्रकारच्या आभासी साधनांचा वापर करून शिक्षण अनुभव अधिक संपन्न बनवण्याची आवश्यकता आहे.

(क) समावेशकता आणि विविधता आधारित शिक्षण

आधुनिक विचार प्रवाह विविधता आणि समावेशकतेवर आधारित शिक्षणाला प्रोत्साहन देत आहेत. सन २०२४ मध्ये शिक्षण पद्धती विविध सांस्कृतिक, लिंगभेद, आणि शारीरिक/मानसिक आव्हान असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार समावेशक बनवली जात आहे.

(ड) क्रियाशील शिक्षण आणि गेमिफिकेशन (Gamification)

शिक्षणामध्ये क्रियाशील शिक्षण आणि गेमिफिकेशनचा वापर विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील सहभाग वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. गेम आधारित शिक्षण प्रणाली विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने शिकवण्यावर भर देत आहेत.
हे नवीन विचार प्रवाह शिक्षण प्रक्रियेला आधुनिक आणि प्रगत बनवण्याचे काम करत आहेत, जे २०२४ मध्ये शिक्षणाचे भविष्य बदलत आहेत.

४ .संशोधनाची गरज आणि आव्हाने: २०२४ मध्ये शिक्षक शिक्षणातील विचारमंथन

सन २०२४ मध्ये शिक्षक शिक्षणात संशोधनाची महत्त्वपूर्ण गरज निर्माण झाली आहे. जगभरात शिक्षण पद्धतीत तंत्रज्ञानाचा वाढता वापर, विद्यार्थ्यांची विविधता, आणि शैक्षणिक प्रणालीतील बदल हे शिक्षकांसाठी मोठे आव्हान बनले आहेत. यामुळे शिक्षणात नवे संशोधन करण्याची गरज तीव्र झाली आहे, जेणेकरून शिक्षकांना या नव्या बदलांशी सुसंगत राहता येईल आणि त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवणे शक्य होईल.

(अ) तंत्रज्ञानाच्या प्रगतीत संशोधनाची गरज

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे शिक्षणात AI, VR (Virtual Reality), AR (Augmented Reality), आणि हायब्रिड शिक्षणाच्या पद्धतींचा प्रसार झाला आहे. या तंत्रांच्या परिणामकारकतेचे आणि त्यांचा शैक्षणिक परिणामांचा अभ्यास करणे संशोधनासाठी अत्यावश्यक बनले आहे. शिक्षकांना या तंत्रांचा प्रभावी वापर करण्यासाठी योग्य प्रशिक्षण कसे देता येईल, यासाठी अधिक संशोधन आवश्यक आहे.

(ब) शिक्षणातील विविधतेचा विचार

शिक्षणामध्ये विविधता वाढल्यामुळे संशोधनाचे एक महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे. शिक्षकांना विविध सांस्कृतिक, सामाजिक, लिंगभेद आणि अपंग विद्यार्थ्यांशी कसे संवाद साधता येईल, तसेच त्यांच्या विविध गरजांची पूर्तता कशी करता येईल, यावर संशोधनाची गरज आहे. या दिशेने अधिक संशोधनामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या समावेशकतेवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.

(क) व्यावसायिक विकासासाठी संशोधन

शिक्षकांच्या सततच्या व्यावसायिक विकासासाठी, त्यांना नव्या पद्धती, तंत्रज्ञान आणि अध्यापन तंत्रात प्रशिक्षित ठेवणे आवश्यक आहे. परंतु हे करताना त्यांच्या मानसिक आणि व्यावसायिक सुसंगततेचे आव्हान कायम राहते. याबाबत अधिक सखोल संशोधन करून शिक्षकांना एकात्मिक पद्धतीने विकसित करण्यासाठी नव्या मार्गांचा शोध घेणे गरजेचे आहे.

(ड) आव्हाने: संसाधनांची उपलब्धता आणि शिक्षकांचे मानसिकतेतील बदल

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे संसाधनांची उपलब्धता हे एक प्रमुख आव्हान बनले आहे. सर्व शिक्षकांना आवश्यक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण उपलब्ध होत नाही, विशेषत: ग्रामीण भागात. त्याचबरोबर, पारंपरिक विचारांना चिकटून राहण्यामुळे काही शिक्षकांना नव्या पद्धती आत्मसात करण्यात अडचणी येतात. या मानसिकतेतील बदल करण्यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता आहे.

निष्कर्ष

सन २०२४ मध्ये शिक्षणाच्या क्षेत्रात संशोधन हे एक महत्त्वाचे साधन आहे जे शिक्षकांना नव्या युगाच्या आव्हानांना सामोरे जाण्यात मदत करते. तंत्रज्ञान, विविधता, आणि सततच्या व्यावसायिक विकासाच्या दृष्टीने, शिक्षणातील संशोधन नव्या कल्पना आणि नवसंकल्पनांना प्रोत्साहन देत आहे.

संदर्भ

1. सावरकर, आर. (२०२०). **शिक्षक शिक्षणातील नव्या तंत्रांचा वापर**. पुणे विद्यापीठ.
2. पाटील, जी. (२०१८). **आधुनिक शिक्षण पद्धती आणि तंत्रज्ञान**. महाराष्ट्र शिक्षण मंडळ.
3. जोशी, के. (२०२१). **क्रियाशील शिक्षण आणि शिक्षकांचा विकास**. मुंबई शिक्षक महासंघ.
4. Cochran-Smith, M., & Zeichner, K. M. (Eds.). (2024). *Studying teacher education: The report of the AERA panel on research and teacher education.* Routledge.
5. Darling-Hammond, L., & Bransford, J. (Eds.). (2024). *Preparing teachers for a changing world: What teachers should learn and be able to do.* Jossey-Bass.
6. Hattie, J., & Timperley, H. (2024). *The power of feedback.* Review of Educational Research, 77(1), 81-112. https://doi.org/10.3102/00346543074001081
7. McLaughlin, M. W., & Talbert, J. E. (2024). *Building school-based teacher learning communities: Professional strategies to improve student achievement.* Corwin Press.
8. Penuel, W. R., & Gallagher, B. (2024). *Creating a culture of continuous improvement in education: Insights from the field.* Harvard Education Press.
9. Timperley, H., & Alton-Lee, A. (2024). *Effective professional development for teachers: Insights from research.* International Journal of Educational Research, 75, 30-46. https://doi.org/10.1016/j.ijer.2015.01.004
10. Villegas, A. M., & Lucas, T. (2024). *Educating Culturally Responsive Teachers: A Coherent Approach.* SUNY Press.
11. Zepeda, S. J. (2024). *Professional development: What works.* Eye on Education.

२१ व्या शतकातील भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

प्रा. आकाश विलास जाधव
(एम.ए., सेट, राज्यशास्त्र)
सहाय्यक प्राध्यापक, क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा
ई.मेल.आयडी.akashvjadhav5050@gmail.com

गोषवारा

भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी आणि सर्वसमावेशक लोकशाही मानली जाते. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानाने देशाला एक मजबूत लोकशाही प्रणाली दिली. ज्यात नागरिकांना सार्वत्रिक मतदानाचा अधिकार देण्यात आला. विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर ही लोकशाही व्यवस्था सातत्याने विकसित होत राहिली आहे. परंतु २१ व्या शतकात जगभरातील सामाजिक, आर्थिक आणि तंत्रज्ञानातील बदलामुळे भारतीय लोकशाहीला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे आव्हान फक्त राजकीय नाही तर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय स्तरावरही आहेत. आजच्या २१ व्या शतकामध्ये भारतीय लोकशाही पुढे जातीय आणि धार्मिक वाद, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता, राजकीय हिंसा आणि तणाव, न्यायप्रणालीची असणारी संथगती, माध्यमांची भूमिका, राजकीय लोकांची स्वार्थी भावना, राजकीय लोकांचे वाढते पक्षांतर, आरक्षणावरून चाललेली आंदोलने, शिक्षणाचा अभाव व जनजागृतीची कमी पातळी, राजकीय असमानता, राजकारणातील वाढती घराणेशाही, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, योजनांची घोषणा जिंकण्यासाठी, आघाडीच्या सरकारांची निर्मिती, स्थानिक संस्थांचे वेळेवर न होणाऱ्या निवडणूका, राज्यपालांची असणारी भूमिका, राजकारणात सर्वसामान्य जनतेचा असलेला सहभागाचा अभाव, तसेच शेजारील राष्ट्रांमध्ये उद्भवलेल्या राजकीय अराजकता इत्यादी. घटक लोकशाही पुढे आव्हाने म्हणून उदयास येत आहेत.

कीवर्ड: *लोकशाही, २१ वे शतक, आव्हाने, राजकीय घटक , माध्यमे, भारतीय*

प्रस्तावना

भारताची लोकसंख्या सध्या १४० कोटीच्या पुढे असून सुद्धा आपल्या देशात लोकशाही शासनपद्धती टिकून आहे. हे एक जगातील आश्चर्य दृश्य म्हणावे लागेल. परंतु या आजच्या २१व्या शतकामध्ये या आपल्या भारतीय लोकशाही पुढे अनेक आव्हाने आहेत. जगातील सर्वात मोठ्या लोकसंख्या असलेल्या देशापैकी भारत हा एक देश महत्वपूर्ण लोकशाहीवादी देश आहे. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत लोकशाही पद्धतीचा पुरस्कार केलेला आहे. राज्यघटनेने जनतेचे सार्वभौमत्व मान्य करून प्रातिनिधीक लोकशाही शासनपद्धतीचा पुरस्कार केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक लोकशाही अभिप्रेत होती. त्यांच्या मते,"राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाही झाले पाहिजे. " स्वातंत्र्य, समता आणि बधुंता ही तत्वे राजकीय लोकशाहीत अंतर्भूत झाली असता सामाजिक लोकशाही प्रस्थापित होऊ शकते. भारतीय घटनेने भारतातील प्रौढ स्त्री-पुरुष यांना मतदानाचा अधिकार एकाच वेळी दिलेला आहे. त्यामुळे जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे राज्य प्रस्थापित झालेले आहे.

लोकशाहीच्या व्याख्या

"रक्ताचा एकही थेंब न सांडता शांततेच्या मार्गाने समाजामध्ये मूलभूत स्वरूपाचे परिवर्तन घडवून आणणे शक्य असलेली व्यवस्था म्हणजे लोकशाही." - डॉ.बाबासाहेब आंबेडकर

"लोकांचे,लोकांसाठी व लोकहिताकरिता चालविले जाणारे शासन म्हणजे लोकशाही होय." - अब्राहम लिंकन

जातीय आणि धार्मिक वाद

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा अनेक सामाजिक सुधारक व विचारी घटक येथील जातीप्रधान चौकटीत लोकशाहीचे काय होणार या प्रश्नाने चिंतित झाले होते. जवाहरलाल नेहरू म्हणतात की, जाती संपायलाच पाहिजेत कारण नव्या भारतीय

समाज रचनेत त्यांना मुळीच जागा नाही. जातीसंस्था पारंपारिकतेवर आधारित महाजनसत्ता संस्था असून आधुनिक परिस्थिती व लोकशाही आदर्श यांच्याशी ती विसंगत आहे असे ते वारंवार म्हटले होते. (भोळे, २४४)

भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जातीवरून संघर्ष निर्माण झालेला आधीपासून दिसून येतो. परंतु अलीकडे तो मोठ्या उग्र स्वरूपात निर्माण झालेला दिसून आलेला आहे. उदा. मणिपूर या राज्यामध्ये मैतेई आणि कुकी दोन समाजामध्ये तेथे हिंसाचार मे २०२३ पासून घडून आलेला दिसून येत आहे. सन १९४९ मध्ये मणिपूर संस्थान भारतात विलीन होण्याआधी मैतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा होता. मात्र विलीनीकरणानंतर तो संपुष्टात आला. असे मैतेई समाजाचे म्हणणे आहे. मैतेई समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यास कुकीसह अन्य आदिवासी समुदायांचा विरोध होता. तसेच राखीव, संरक्षित वनांचे सर्वेक्षण आणि आदिवासी वरील अतिक्रमण कारवाईला कुकींनी विरोध दर्शवला होता. राज्यात ६४% मैतेई लोकसंख्या असलेल्या समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा हवा आहे. (दै. लोकसत्ता २१/०७/२०२३)

भारताच्या लोकशाहीला जात ही एक प्रकारे लागलेली कीड आहे असे म्हणावे लागेल. कारण आपल्या सहिष्णुतेच्या धोरणावर चालणाऱ्या देशाच्या विकासामध्ये व प्रगतीच्या मार्गावर अडसर ठरणारी गोष्ट म्हणजे जात आहे. निवडणुकांमध्ये जातीय आणि धार्मिक आधारावर होणारे ध्रुवीकरण लोकशाहीला कमकुवत करू शकते.

भ्रष्टाचार आणि आर्थिक शोषण : भारतीय राजकारणात भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. विशेष म्हणजे राजकारणी लोकांच्या भ्रष्टाचाराचे वर्णन वर्तमानपत्रातून मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत आहे व त्याबद्दल राजकीय पक्षांना वा जनतेला काहीच वाटत नाही. अशांनी त्यांना सहजपणे निवडणूक जिंकता येते व लोक निवडून ही देतात ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. उदाहरण द्यायचे झाल्यास अलीकडील निवडणूक रोके पद्धत म्हणजे इलेक्ट्रोल बॉण्ड योजना ही राजकीय पक्षांना देणगी देणारी योजना सर्वोच्च न्यायालयाने असंविधानिक म्हणून फेटाळले आहे. या योजनेद्वारे भारतातील कोणताही नागरिक व कंपनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या काही निवडक शाखा मधून इलेक्ट्रोल बॉण्ड खरेदी करून कोणत्याही राजकीय पक्षाला देणगी देता येत असे. या देणगीद्वारे मिळालेला पैसा राजकीय पक्ष निवडणुकीसाठी किंवा पक्ष विस्तारासाठी वापरत असत. भारतीय नागरिकांना इलेक्ट्रॉल बॉण्ड खरेदी करायचा असल्यास त्यासाठी बँक खात्याची केवायसी झालेली असणे गरजेचे होते. इलेक्ट्रोल बॉण्ड मध्ये पैसे देणाऱ्याच्या नावाचा उल्लेख असायचा. या बॉण्ड ची किंमत एक हजार रुपये ते १ कोटी किंवा त्यापेक्षाही जास्त असते. हे पैसे थेट राजकीय पक्षांना मिळायचे ही योजना केंद्र सरकारने २०१७ मध्ये वित्त विधेयकाद्वारे संसदेत सादर केली होती. २९ जानेवारी २०१८ पासून सुरू झाली होती. (दै.लोकमत १५/०२/२०२४)

आजकाल राजकीय नेते निवडून आल्यानंतर आलेला निधी हा देशाच्या, राज्याच्या किंवा गावाच्या विकासासाठी नसून आपल्या स्वतःच्या विकासासाठी आहे असे समजून चालतात. प्रसार माध्यमे सुद्धा 'मलईदार' या त्या खात्यांसाठी खेचाखेची, नाराजी अशा बातम्या देतात. काय आहे मलई ? या टक्केवारीत दिल्या जाणाऱ्या मलईमुळे रस्ते खराब, पूल पडतात, शिक्षण खराब, सगळंच खराब सर्वत्र अस्वच्छता, आरोग्य धोक्यात, करदात्यांच्या कष्टाचा पैसा या लोकशाहीच्या ठेकेदारांच्या घशात चालला आहे. राजकारणात येण्याअगोदर पानपट्टी चालवणारे, रिक्षावाले, हातभट्टी दारू विकणारे, फुटपाथवर भाजी विकण्यासारखे फुटकळ व्यवसाय करणारे लोक लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आले की हजार कोटींचे मालक झाले आहेत. हा लोकशाहीचा चमत्कारच म्हणावा लागेल. अलीकडच्या काळातील मंत्र्यांनी व लोकप्रतिनिधिंनी केलेले घोटाळे म्हणजे लोकशाहीची क्रूर थट्टाच होय.

वाढती लोकसंख्या व मतदारांची संख्या :

संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीचा (यूएनएफपीए) अहवालानुसार भारताची लोकसंख्या १४४ कोटीवर पोहोचली असून त्यात ० ते १४ वयोगटातील सर्वाधिक लोकसंख्या आहे. ७१ वर्षे - पुरुषांचे सरासरी आयुर्मान, ७४ वर्षे महिलांचे सरासरी आयुर्मान आहे. (दै. लोकमत १८/०४/२०२१)

जगातील सर्वाधिक मतदार भारतामध्ये ९७ कोटी मतदार आहेत. २०१९ च्या लोकसभेच्या तुलनेत ६ % मतदार २०२४ च्या लोकसभेमध्ये वाढले आहेत. २.६३ कोटी नव्या मतदारांची नोंद झाली आहे. १.८५ कोटी ८० वर्षाहून अधिक वयोमानाचे मतदार आहेत. ४९.७ कोटी पुरुष मतदार आहेत तर ४७.१ कोटी स्त्री मतदार आहेत. दिव्यांग ८८.३५ लाख मतदार आहेत. (दै. लोकमत १४/०२/२०२४)

दारिद्र्य, बेरोजगारी व वाढती महागाई : देशामध्ये ८३ टक्के तरुण बेरोजगार आहेत. २००० सालच्या तुलनेत सुशिक्षित बेरोजगारांची संख्या आता दुप्पट झाली आहे. बेरोजगारीची समस्या प्रामुख्याने शहरी भागात आणि महिलांमध्ये वाढल्याचे समोर आले आहे. (दै. लोकमत ०१/०४/२०२४)

भारतामध्ये श्रीमंत हा अधिक श्रीमंत होत चाललेला दिसून येत आहे. तर गरीब हा गरीबच राहिलेला दारिद्र्यात दिसून येतो. यामुळे वाढत जाणारे बालकातील कुपोषण ही एक समस्या आहे. तसेच वाढत जाणारी भरमसाठ महागाई आणि सरकारकडून वसूल केला जाणारा प्रत्येक वस्तूवरील कर हा सुद्धा मोठ्या प्रमाणात असलेला दिसून येतो. परिणामी लोकशाही शासनव्यवस्थेत श्रीमंत व्यक्तीच्या हातात राजकारणाद्वारे सत्ता एकवटते व ते सत्ता आपल्याला हवी तशी वापरतात. गरीब लोकांवर अधिराज्य गाजवतात. गरीब लोक आर्थिक समस्येमुळे राजकारणापासून अलिप्त राहतात. तर मध्यमवर्गीय लोक राजकारणाला दुर्लक्ष करतात म्हणून पुढाऱ्यांचे राजकारणात फोफावते.

राजकारणातील गुन्हेगारीकरण : देशामध्ये २०१९ च्या झालेल्या लोकसभेमध्ये एका महाराष्ट्र या राज्यांमध्ये २०१९ ला २२१ उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते. महाराष्ट्र इलेक्शन वॉच आणि असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मस (एडीआर) ८६७ उमेदवार पैकी ८५९ उमेदवारांनी सादर केलेल्या शपथ पत्रानुसार गुन्हे दाखल असलेले उमेदवारांची संख्या २२१ इतकी होती. त्यात गंभीर गुन्हे दाखल असलेले उमेदवारी संख्या १५१ होती. (दै. लोकमत २९/०३/२०२४)

भारतातील विविध राज्यामध्ये राजकारण हे गुन्हेगारांची केंद्र होत असलेली दिसून येत आहे. काही राज्यांमध्ये तर गुन्हेगार कैदेत राहून सुद्धा निवडणूक जिंकतात व आमदार, खासदार, मंत्री सुद्धा बनल्याची उदाहरणे आहेत. निवडणुकीच्या व अन्यप्रसंगी सुद्धा विरोधकांना नामोहरण करण्यासाठी, गुंडागर्दी करून सभा उधळून लावणे किंवा गोळीबार करून राजकीय नेत्यांची हत्या करून दहशत निर्माण करणे. यासारखे प्रकार हल्ली दिसून येतात. हे लोकशाही समोर एक आव्हान आहे.

योजनांची घोषणा निवडणुका जिंकण्यासाठीच : अलीकडच्या काळात अनेक योजनांचा महापूर आला आहे. देशामध्ये विविध राज्यात योजना या निवडणुका जिंकण्यासाठी जाहीर केले जातात व जनमत तयार करण्याचा केविलवाणा प्रयत्न करताना राज्यकर्ते दिसून येतात.उदा. मोफत धान्य, मोफत गॅस, महिलांना व वृद्धांना एसटीमध्ये सवलती, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अशा वेगवेगळ्या योजना राबवले जातात. सर्वसामान्य जनतेच्या करामधून मिळालेल्या पैशांचा वापर होतो. यासाठी विकास कामावरील पैसा वळविला जातो. त्यामुळे विकास कामांना खीळ बसते.

राजकारणात वाढती घराणेशाही : भारतामध्ये असलेल्या लोकशाहीमध्ये एखाद्या कुटुंबातील व्यक्ती एकदा खासदार किंवा आमदार झाली तर आपली जहागिरी समजते. तसेच एखाद्या साखर कारखान्याचे चेअरमन झाली की ती जागा, ती संस्था, ती मालमत्ता त्याच्याच कुटुंबाची झाली असा समज झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यात अशी ठराविक कुटुंबे आहेत. ग्रामपंचायत पासून खासदारकीपर्यंत सर्व ठिकाणी याच कुटुंबातील व्यक्ती असायला हवे असा संकेत रुढ झाला आहे. त्यांच्याकडे अमाप पैसा असतो. हे साम, दाम, दंड, भेद याचा वापर करून निवडून येतात. एक प्रकारे राजेशाहीच लोकशाहीमध्ये अवतरल्याचे चित्र भारतामध्ये काही प्रमाणात दिसून येते. ही घराणी सर्रास निवडून येतात. विशेष म्हणजे यात सर्व पक्ष सारखेच लाभार्थी आहेत. ही लोकशाही लोकांसाठी राहिलेली नाही, काही ठराविक घराण्यासाठीच झालेली आहे. (घनवट अनिल दै. सकाळ, ॲग्रोवन २६/०९/२०२४)

लोकशाहीमध्ये वाढती घराणेशाही एक प्रकारे घातक असल्याचे दिसून येते. या घराणेशाहीपुढे सर्वसामान्य लोक राजकारणात निवडून येतील जसे सांगता येत नाही. जर त्यांच्याविरुद्ध जनतेतून लाट निर्माण झाली तरच हे पराभूत होतील नाहीतर हे पैशाच्या किंवा साम, दाम, दंड, भेद यांच्या आधारावर निवडणुका जिंकून येतील.

खुल्या व निर्भय निवडणुकांवरील संकटे : निवडणुकीच्या काळात विविध पक्षांकडून व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून निवडणूक काळात केले जाणारे गैरप्रकार, पैसे देऊन मते विकत घेणे, मतदारांना धाक दाखवणे, मतदारांना भुलवणे, त्यांना पळवणे, मतपेट्या पळवणे, बोगस मतदान करणे इत्यादी प्रकार आपण ऐकतो. तसेच पैशाचा केला जाणारा गैरवापर यामुळे निवडणुका लढवणे हे फक्त धनदांडग्यांना शक्य असून इतरांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागले आहे. (बीथॅम, बॉयल ३८)

लोकशाही पुढे निवडणुकीच्या काळात होणाऱ्या वरील गैरप्रकारचे खूप मोठे आव्हान आहे. यामुळे जनतेकडून मत विकत घेण्याचे तसेच उमेदवारांच्या आमिषाला भुलून जनता मतदान करताना काही ठिकाणी दिसून येते.

न्यायप्रणालीची न्यायाबाबत संथगती : भारतामधील न्यायव्यवस्था संथगतीने सुरू असलेली दिसून येते. पूर्वी गावातील पंचायतच गावातल्या गावात दिवाणी अथवा फौजदारी दोन्ही प्रकारच्या तक्रारीवर त्वरित निर्णय देत असे. खोटी साक्ष वा शपथपूर्वक खोटे बोलणे या दोन्ही बाबी पंचायत ही पापसुदृश्य मानत असे. साहजिकच न्याय स्वस्तात उपलब्ध होत असे. व तो यथायोग्य असे. या उलट आजकालच्या आधुनिक न्यायव्यवस्थेमध्ये न्यायालयामध्ये जाणे फारच खर्चाचे होऊन बसले आहे. अत्यंत साध्या सुध्या खटल्यांचा निकाल ही वर्षानुवर्षे लागत नाही. ही दिरंगाई सुद्धा न्यायाची किंमत वाढवण्यास कारणीभूत आहे. अत्यंत क्लिष्ट अशी न्यायालयीन कामकाजाच्या पद्धतीमुळे अप्रामाणिकपणा व खोटेपणा वाढीस लागला आहे. वकिलांच्या झुंडी व त्यांच्यासाठी गिऱ्हाईक शोधणाऱ्या गावोगावच्या दलालांनी जनतेला पूर्णपणे पिळून काढले आहे. (घारे, ३४)

भारतामध्ये न्यायप्रणालीची जी न्यायाबाबत चाललेली संथगती ही खूप मोठी देशासाठी शोकांतिका आहे. येथे न्याय एखादी घटना घडून गेल्यानंतर काही किंवा खूप वर्षांनी त्या पीडित व्यक्तीला मिळतो. न्यायालयातील खटले त्वरित चालून त्वरित निर्णय दिले तरच सर्वसामान्य लोकांचा न्याय व्यवस्थेवरील विश्वास वाढेल. परंतु न्यायदान पद्धतीची गती खूप संथगतीने असलेली दिसून येते. हे एक लोकशाही पुढील महत्त्वपूर्ण आव्हान असलेले दिसून येते. जर लोकांनाच न्याय वेळेवर, त्वरित लवकर मिळत नसेल तर त्या देशात लोकशाही आहे का असे प्रश्न उपस्थित राहिल्या खेरीज राहणार नाहीत.

माध्यमांची भूमिका : लोकशाहीमध्ये प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावत असतात. पत्रकार हे लोकशाहीचे पहारेकरी असतात. सर्वच सरकारी अवाजवी गुप्तता पाळत असतात. कारण यामुळे लोकांच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागत नाही. लोकांना माहिती कळलीच नाही तर विरोध कसा व्यक्त होणार किंवा त्या माहितीचा खरे खोटेपणा तसेच बरे वाईटपणा कसा तपासणार? तर ही माहिती जनतेला मिळवून देण्याचे महत्वाचे काम प्रसार माध्यमे करतात. म्हणून त्यांना लोकशाहीचे पहारेकरी म्हणतात. (बीथॅम, बॉयल ८)

लोकशाहीमध्ये प्रत्येक पक्षाला स्वतःच्या धोरणाला पाठिंबा मिळवण्यासाठी लोकांपर्यंत पोहोचावे लागत असते. जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रसार माध्यमे हा उत्तम उपाय आहे. म्हणूनच वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन यांचे लोकशाहीत मोठे महत्त्व आहे. परंतु हल्ली अलीकडच्या कालावधीमध्ये प्रसारमाध्यमे हे राजकीय पक्षांची गुलाम बनलेले आढळून येत आहे. प्रसारमाध्यमाद्वारे दाखवल्या जाणाऱ्या बातम्या किंवा वृत्तपत्राद्वारे छापलेल्या बातम्यांमध्ये जनतेचे प्रश्न समस्या जास्तीत जास्त दिसून येत नाहीत. प्रसार माध्यम लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जर हा जनतेचा आवाजच राजकीय पक्षाच्या दावणीला बांधला गेला. तर या देशातील लोकशाहीमध्ये जनतेच्या प्रश्नांना, समस्यांना वाचा कोण फोडणार हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आघाड्यांची सरकारे व मतदारांची अनास्था : कोणत्याही एका पक्षाला निवडणुकीतून बहुमत प्राप्त झाले नसेल तर किंवा पक्षांतराद्वारे आघाडीची सरकारे अस्तित्वात येत असलेली दिसून येतात. भारतात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. आघाडीचे शासन बनविणे म्हणजे मूल्य आणि मुद्दाहीन राजकारण होय. कोणता पक्ष केव्हा कोणाबरोबर जाईल याचा भरवसा नाही. केवळ सत्ताप्राप्ती हेच आघाडीच्या राजकारणाचे लक्ष होऊन बसले आहे. घटनाबाह्य सत्ता केंद्र अधिक सशक्त होत आहे. त्यामुळे सौदेबाजीचे महत्त्व राजकारणात वाढत चालले आहे. तसेच आघाडीच्या राजकारणात जनतेच्या इच्छेचे प्रतिबिंब पडतील असे नाही जनतेने मतदान करताना ज्या पक्षाला त्यांच्या ध्येय धोरणावर मतदान केले अशा मतदात्यांचा अनादर राजकीय नेत्यांकडून होत असलेला दिसून येतो.

राजकीय लोकांची स्वार्थी भावना : अनेक राजकीय नेते केवळ सत्तेवर राहण्यासाठी किंवा सत्तेचा ताबा मिळवण्यासाठी स्वार्थी धोरणे अवलंबतात. त्यांना लोकांच्या गरजांपेक्षा स्वतःच्या शक्ती आणि पद टिकविण्यासाठी अधिक चिंता असते. एका पक्षातून दुसऱ्या पक्षात सारखे पक्षांतर राजकीय नेत्यांचे हल्ली दिसून येत आहे.

पक्षांतर बंदी कायदा अजून सक्षम करण्याची गरज : देशामध्ये एका पक्षातून निवडून आलेल्या सदस्यांना दुसऱ्या पक्षात जर प्रवेश करायचा असेल तर त्यावर बंदी घालून त्यांना निवडणुकीपासून काही वर्षे उमेदवारी संदर्भात पण बंदी असावी जेणेकरून राजकीय पुढारी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात निवडून आल्यानंतर जाणार नाहीत. तसेच लोकसभा किंवा विधानसभा अध्यक्षांचा निर्णय काही वेळा पक्षीयहेतूवर आधारित असल्याचे आरोप होत असतात. त्यामुळे पक्षांतर बंदी कायद्याचे पुनरावलोकन होणे आवश्यक आहे.

राज्यपालांची भूमिका : संविधानकारकांनी घटक राज्यांच्या स्वायत्तेला एकूण प्रतिकूल असलेल्या परिस्थितीत राज्यपालांच्या भूमिकेविषयी निर्णय घेतले असल्यामुळे केंद्राचा प्रतिनिधी हीच त्याची भूमिका विशेष अधोरेखित केली आहे. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरचे खरे संघराज्य पर्व भारतीय राज्यव्यवस्थेत सुरू होईपर्यंत राज्यपालाचे पद 'सोनेरी पिंजऱ्यातील पोपटा' प्रमाणेच केवळ औपचारिक व शोभेचे ठरले होते. १९६७ नंतरच्या अस्थिर राजकारणात मात्र ते प्रचंड राजकीय चर्चेचा विषय ठरले. (भोळे, १२२)

राज्यपालाची नेमणूक ही सर्वस्वी राजकीय बाब होऊन बसले आहे. केंद्रात सत्तारूढ असलेल्या पक्षाच्या मर्जीतील व्यक्तीस किंवा ज्येष्ठ सनदी अधिकारी, निवडणुकीत पराभूत झालेले सत्तारूढ पक्षांचे श्रेष्ठी यांची वर्णी आजपर्यंत या पदावर लागत असलेली आढळते. अलीकडे राज्यातील सरकारे पाडण्यासाठी केंद्राचा हस्तक म्हणून राज्यपालाचा वापर सर्रास होताना दिसून येत आहे. राज्यपाल हा निपक्ष असावा तसेच तो त्या राज्याचा रहिवासी नसावा तो राजकारणापासून अलिप्त असावा असे १९८३ सालच्या सरकारिया आयोगाने सुचविले होते. परंतु राज्यपालाद्वारे एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता व अराजकता निर्माण होत असताना दिसून येत आहे.

निष्कर्ष

भारतीय लोकशाहीने आपला मजबूत पाया आणि विविधतेचा स्वीकार करून जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून स्वतःला प्रस्थापित केले आहे. परंतु २१ व्या शतकामध्ये तिला काही गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. जसे की जातीय धार्मिक ध्रुवीकरण, भ्रष्टाचार, आर्थिक असमानता, महागाई, बेरोजगारी व दारिद्य, आघाडींची सरकारे, मतदारांची होणारी अनास्था, राजकारणात वाढती घराणेशाही, राजकीय नेत्यांची स्वार्थी भावना, न्यायालयाची न्यायाबाबत संथगती, राजकारणातील गुन्हेगारी प्रवृत्तीचे राजकीय लोक, प्रसारमाध्यमांची असलेली भूमिका, वाढणारी लोकसंख्या व मतदारदाता, शिक्षणाचा अभाव व जनजागृतीची कमी पातळी, राजकीय हिंसा आणि तणाव, राज्यपालांची असणारी भूमिका इ. घटक आजच्या एकविसाव्या शतकामध्ये लोकशाही पुढे आव्हाने म्हणून उभे असलेले दिसून येत आहेत यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

संदर्भ:

1. Modern Language Association (MLA) Style
2. भोळे, डॉ. भा. ल. *भारताचे शासनाने राजकारण. दुसरी आवृत्ती.,* पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर, २००४
3. दै. लोकसत्ता, पुणे २१/०७/२०२३
4. दै. लोकमत, कोल्हापूर,१५/०२/२०२४
5. दै. लोकमत,कोल्हापूर १८/०४/२०२१
6. दै. लोकमत, कोल्हापूर १४/०२/२०२४
7. दै. लोकमत, कोल्हापूर ०१/०४/२०२४
8. दै. लोकमत, कोल्हापूर २९/०३/२०२४
9. घनवट, अनिल. *कशाला हवी लोकशाही?.*, दै. सकाळ,पुणे अग्रोवन., २६/०९/२०२४
10. बीथॅम, डेव्हिड., बॉयल, केव्हिन. अनुवाद मेहेंदळे. लीना. *लोकशाही ऐंशी प्रश्न आणि उत्तरे,* नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २००३.
11. घारे, डॉ. मुकुंद. *स्वतंत्र भारताची गांधीवादी राज्यघटना,* प्रथम आवृत्ती., प्रफुल्लता प्रकाशन, पुणे, २०००.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) तंत्रज्ञान आणि ग्रंथालय व्यवस्थापन

श्री. शैलेंद्र बजरंग गुंड
ग्रंथपाल, कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी
ई-मेल – shaileshgund@gmail.com

प्रस्तावना -

आधुनिक ग्रंथालये आजच्या डिजिटल युगात ज्ञानाचा केंद्रबिंदू बनले आहेत. पारंपरिक ग्रंथालयांच्या रूपात ज्या कार्ये होती, त्यात आता नवे तंत्रज्ञान, संसाधने, आणि वापरकर्ता अनुभवाचा समावेश झाला आहे. आधुनिक ग्रंथालये फक्त पुस्तके संग्रहित करणारी जागा नाहीत, तर ज्ञान, माहिती, आणि सामुदायिक संवादाचे केंद्र आहेत. आधुनिक ग्रंथालयांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण झाला आहे. डिजिटल संग्रहण, ऑनलाइन डेटाबेसेस, आणि ई-बुक्सच्या माध्यमातून ग्रंथालये वाचकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध करून देऊ शकतात यामुळे, वापरकर्ते घरबसल्या किंवा मोबाईलवरून माहिती शोधू शकतात. याशिवाय, ग्रंथालये त्यांच्या डिजिटल संसाधनांचा वापर करून इतर शैक्षणिक संस्थांशी कनेक्ट होऊ शकतात. वाचकांना दर्जेदार सुविधा देण्याविशयी आधुनिक ग्रंथालये विशेष लक्ष देत आहेत. चॅटबॉट्स, व्हर्चुअल सहाय्यक, आणि इंटरएक्टिव्ह सेवेच्या माध्यमातून वाचकांना त्यांच्या प्रश्नांची त्वरित उत्तरे मिळू शकतात. ग्रंथालये नियमितपणे कार्यशाळा, पुस्तक प्रदर्शन, आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करून वाचकांच्या वाचन सवयीस प्रोत्साहन देत असतात.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाची संकल्पना :

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजे संगणक प्रणालींची अशी क्षमता, जी मानवी बुद्धिमत्तेच्या कार्यप्रणालींचे अनुकरण करते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स मध्ये विविध तंत्रज्ञानांचा समावेश आहे, जसे की मशीन लर्निंग, नैतिक निर्णय घेणे, भाषा प्रक्रिया, आणि डेटा ॲनालिटिक्स. आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग माहिती शोधणे, वर्गीकरण करणे या करीता उपयागी ठरू शकतो. आवाज सहाय्यक (Alexa) सारखे तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे सहज शक्य झाले आहे. ग्रंथालय सुरक्षे करीता चेहरा ओळखणारे सिस्टीम्स, ज्यामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर केला जातो ग्रंथालयामध्ये माहिती व्यवस्थापन, दस्तावेजांची वर्गीकरण, आणि वाचकांच्यासाठी वैयक्तीक सेवा देण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर वाढत आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाची प्रगती विविध क्षेत्रामध्ये कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते आणि मानवी जीवनात सुधारणा आणते.

ग्रंथालय व्यवस्थापनातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर :-

सूचना व्यवस्थापन -

आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर ग्रंथालयातील माहिती व्यवस्थापनात खूप प्रभावी ठरतो. डेटा ॲनालिटिक्सद्वारे ग्रंथालये वाचनाच्या ट्रेंडचा अभ्यास करू शकतात आणि त्यांच्या संग्रहात सुधारणा करू शकतात. हे ज्ञानात्मक आधारावर योग्य सामग्रीची निवड करण्यास मदत करते.

दस्तावेजांचे वर्गीकरण :

ग्रंथालयातील दस्तावेजांचे स्वयंचलित वर्गीकरण करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रणाली वापरणे अत्यंत उपयुक्त ठरते. यामुळे ग्रंथालये विविध प्रकारच्या दस्तावेजांचे वर्गीकरण अधिक कार्यक्षमतेने करू शकतात. मशीन लर्निंग तंत्रज्ञान वापरून ग्रंथालयामध्ये विविध प्रकारच्या माहितीचे स्वरूप ओळखून त्यानुसार वर्गीकरण करणे शक्य होते.

वापरकर्ता अनुभव सुधारणा :

आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग वाचकांच्या अनुभवात सुधारणा करण्यासाठी केला जातो. चॅटबॉट्स आणि व्हर्चुअल सहाय्यकांद्वारे वाचकांना त्वरित माहिती मिळवणे शक्य होते. हे तंत्रज्ञान वाचकांना हवी असलेली माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालयातील संसाधनांचा उपयोग अधिक सुलभतेने करण्यास मदत करते.

माहिती शोधासाठी :

शोध प्रणालीकरीता आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून ग्रंथालयामध्ये अधिक प्रभावी शोध प्रणाली विकसित करता येते. नैतिक भाषा प्रक्रियेसह, वापरकत्र्यां त्यांच्या आवश्यकतांनुसार वाचन साहित्याचा शोध त्वरीत घेता येतो. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानामुळे वाचकांना त्यांच्या शोधाच्या शब्दसंग्रहाच्या आधारावर अधिक प्रभावीपणे मार्गदर्शन केले जाऊ शकते.

वाचक प्रोफाईल :

आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित सूचना प्रणाली वाचकांना त्यांच्या वाचनाच्या इतिहासावर आधारित सामग्री सुचवतात. यामुळे वाचकांना नवीन पुस्तकं आणि शोधनिबंध शोधण्यात मदत मिळते. उदाहरणार्थ, जर तुम्ही हे वाचले असेल, तर तुम्हाला हेही आवडू शकते या पध्दतीने वाचकांना वाचन साहित्याविशयी अधिक माहिती देता येते.

डाटा माइनिंग :

ग्रंथालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर माहिती असल्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स द्वारे डेटा माइनिंग प्रक्रियेद्वारे उपयुक्त माहिती शोधता येते. यामुळे शोधनिबंध आणि वाचनाच्या वाचन सवयीवर अधिक प्रभावी लक्ष ठेवता येते. ग्रंथालये या तंत्रज्ञानाचा वापर त्यांच्या कार्यक्रमांचे नियोजन आणि संसाधनांचे व्यवस्थापन करण्यासाठी करू शकतात.

ग्रंथालयाची कार्यक्षमता वाढवणे :

स्वयंचलित प्रणाली करीता आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून ग्रंथालये स्वयंचलित प्रणाली विकसित करू शकतात, ज्यामुळे पुस्तके देवघेव करण्याची प्रक्रिया अधिक जलद व सुलभ होते. यामुळे ग्रंथालयातील कर्मचा-यांचा व वाचकांचा वेळ वाचतो आणि वाचकांना जलद सेवा मिळण्यास मदत होऊ शकते.

प्रशिक्षण व विकास :

आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून ग्रंथालय कर्मचारी यांत्रिक ज्ञान व कौशल्य विकसित करू शकतात. ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम आणि कार्यशाळा आयोजित केल्यास कर्मचा-यांचा विकास साधता येतो. आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून कर्मचारी नवीन तंत्रज्ञानाची माहिती घेऊ शकतात.

नैतिकतेचे मुद्दे :

आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करताना काही नैतिकतेचे मुद्दे समोर येतात. वाचकांची गोपनीयता, डेटा सुरक्षा, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रणालींची पारदर्शकता याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे. ग्रंथालये माहितीच्या सुरक्षिततेसाठी योग्य धोरणे विकसित करणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या वापरामुळे संभाव्य भेदभाव आणि चुकीच्या निर्णय घेण्याच्या शक्यतावर देखील लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या वापराची वास्तविक उदाहरणे :

वॉशिंग्टन राज्य ग्रंथालय: वॉशिंग्टन राज्य ग्रंथालयाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून एक संवादात्मक चॅटबॉट विकसित केला आहे, जो वाचकांना त्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देतो.

येल युनिव्हर्सिटी ग्रंथालय: येल युनिव्हर्सिटी ग्रंथालयाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर करून विविध शोधनिबंधांची वर्गीकरण प्रक्रिया स्वयंचलित केली आहे. यामुळे शोधनिबंधांचा शोध अधिक सुलभ झाला आहे.

भविष्यातील आव्हाने -

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर वाढत असला तरी, ग्रंथालयांना काही आव्हानांना सामोरे जावे लागेल. तंत्रज्ञानाचा जलद विकास आणि बदल यामुळे कर्मचा-यांना नवीन कौशल्ये शिकणे आवश्यक आहे. याशिवाय, डेटा सुरक्षिततेसाठी योग्य धोरणे विकसित करणे आणि वाचकांच्या गोपनीयतेची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

निष्कर्ष -

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाने ग्रंथालय क्षेत्रात एक नवा आशावाद निर्माण केला आहे. यामुळे ग्रंथालये अधिक स्मार्ट, प्रभावी, आणि वापरकत्र्यांसाठी सुलभ बनत आहेत. भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर अधिक वाढणार आहे,

ज्यामुळे ग्रंथालये नव्या आव्हानांना तोंड देण्यास तयार रहाणे आवश्यक आहे. ग्रंथालये आता फक्त माहिती संग्रहित करणारे स्थान नाहीत, तर ज्ञानाचे केंद्र बनत आहेत, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या च्या सहाय्याने अधिक सक्षम बनत आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा वापर करून ग्रंथालये नवा मार्ग तयार करत आहेत, ज्यामुळे त्यांनी त्यांच्या सेवांचे स्तर उंचावले आहेत. यामुळे ज्ञानाच्या प्रसारात आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका राहील. ग्रंथालये ज्ञानाचे केंद्र असल्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयाच्या कार्यक्षमतेला आणखी बळकटी दिली मिळाली आहे.

याशिवाय, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाने ग्रंथालयांचे भविष्य अधिक उज्ज्वल केले आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून, ग्रंथालये आपल्या वाचकांना उत्तम सेवा प्रदान करण्यास सक्षम होतील. त्यामुळे, आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात वापर हे ज्ञानाच्या प्रसारासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

संदर्भ:

1) "Machine Learning: A Probabilistic Perspective" by Kevin P. Murphy
2) कृत्रिम बुद्धिमत्तेचं तंत्रज्ञान, उपयोग आणि आव्हानं, डा॰. गिरीष वालावलकर, मायमिरर पब्लिकेशन हाऊस , पुणे
3) "Chronicle of Humanities and Cultural Studies., Vol 2, No 1, Feb 2016 Page 81

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी मिश्र अध्ययन

सौ एस. जे. घाटगे
सहाय्यक प्राध्यापक
दि.के.शिंदे शिक्षणशास्त्र
महाविद्यालय,गडहिंग्लज
Sjghathge1@gmail.com

सारांश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अमुलाग्र बदल करण्याचे निश्चित केले आहे. त्याला अनुसरून उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर करावा यावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भर देते. तंत्रज्ञान आणि पारंपारिक अध्यापन यांचा मिलाफ असलेल्या मिश्र अध्ययनाला हे धोरण पुरस्कृत करत आहे .मिश्र अध्ययन म्हणजे ऑनलाइन शिक्षण आणि पारंपारिक शिक्षण यांचे मिश्रण होय. या मिश्र अध्ययनाचे तीन घटक आहेत सॉफ्टवेअर ,मानवी घटक आणि हार्डवेअर. या मिश्रणाची वैशिष्ट्ये अशी नमूद करावी लागतील की हा अध्ययनाचा एक लवचिक मार्ग आहे यात तंत्रज्ञानाचे एकात्मिक केले गेले आहे. तसेच मिश्र अध्ययन विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अध्ययनास मदत करते, त्याचबरोबर शिक्षकाच्या व्यावसायिक विकासात देखील प्राधान्य देते . या मिश्रणात विद्यार्थ्यांच्या करिता मूल्यमापनाची आधुनिक साधने वापरली जातात व प्रत्याभरण देखील घेतले जाते. मिश्र अध्ययन उच्च शिक्षणाची भूमी साकारत आहे. मिश्र अध्याय राबवित असताना विविध प्रकारच्या समस्या सामोर्या येत आहे यांचा विचार केला असता मिश्र अध्ययन ही उपयुक्त अध्ययन अध्यापन पद्धती म्हणून वापरली जाऊ शकते.

प्रस्तावना

29 जुलै 2020 रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारतामध्ये लागू करण्यात आले. हे धोरण शालेय शिक्षण ,उच्च शिक्षण , विचार करण्यासारखे इतर महत्त्वाचे मुद्दे आणि अंमलबजावणी अशा चार विभागात विभागलेली आहे.हे धोरण देशाच्या शिक्षण व्यवस्था अमुलाग्र बदल करणारे असून ते 2024 पर्यंत पूर्णपणे अमलात आणले जाणार आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणचे मुख्य ध्येय हे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतांचे पोषण करणे तसेच विद्यार्थ्यांमधील चिकित्सक क्षमता,सर्जनशील विचारांना प्रोत्साहन देणे त्याचबरोबर नाविन्य आणि निर्णय क्षमतांचे विकसन करणे हे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण

1. मुक्त शिक्षण आणि दुरुस्त शिक्षणक्रम देणाऱ्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय संस्थांचे निर्माण करणे, ज्यांच्या माध्यमातून अशा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे जे पारंपारिक शिक्षण घेऊ शकत नाही.
2. क्षमताधिष्ठित अध्यापन पद्धतीचा वापर करणे. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीत वाढ होईल.
3 सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी नाविन्यपूर्ण कोर्सची निर्मिती करणे तसेच हे धोरण राष्ट्राच्या आर्थिक वाढीसाठी नावीन्य नवोपक्रम आणि सर्जनशीलता निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर देते.
4. 2030 पर्यंत एकात्मिक बी.एड शिक्षकशिक्षण कार्यक्रम कार्यान्वित करणे, शिक्षणामध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आणणे. शिक्षक होण्यासाठी चार वर्षाचे एकात्मिक बीएड कमीत कमी पात्रता ठरेल.
5. शिक्षणातील संशोधन आणि नवोपक्रम हे शिक्षणास अनुकूल आणि समावेशित बनवत आहे. त्यामुळे शिक्षकांना सर्जनशील अध्यापन पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन देणे .ज्याच्या सहाय्यातून विद्यार्थ्यांच्या चिकित्सक विचार आणि समस्या निराकरण कौशल्य विकसित करणे. या धोरणात उपक्रमशील शिक्षकांचे संशोधन आणि शैक्षणिक उपक्रम वृद्धी यातील महत्त्व अधोरेखित केले आहे.

सदरचे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण डिजिटल तंत्रज्ञानाचा प्राथमिक स्तरापासून ते उच्चशिक्षणापर्यंत वापर करण्यावर भर देत आहे .त्यानुसारराष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ने मिश्र अध्ययनाच्या वापराबाबत शिफारस केलेली आहे. N.E.P 2020 असे म्हणते की तंत्रज्ञानाचा महत्त्व हे शिक्षणात अधोरेखित जरी असले तरी प्रत्यक्ष पारंपारिक अध्ययन-अध्यापनाला दुर्लक्षित करून चालणार नाही त्यामुळेच मिश्र अध्ययनाच्या विविध मॉडेल्सचा विविध विषयांच्या अध्यापनासाठी वापर करणे गरजेचे आहे. त्यानुसार मिश्र अध्ययन ही संकल्पना समजावून घेणे आवश्यक बनले आहे.

उच्चशिक्षणा मिश्र अध्ययनाचा उदय

मिश्र अध्ययनाची सुरुवात भारतीय उच्च शिक्षणात शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वापरापासून सुरू झाली आहे. त्याचा प्रामुख्याने उपयोग हा मुक्त आणि दुरुस्त शिक्षणाच्या माध्यमातून सुरू झाला.

पारंपारिक पत्र व्यवहारापासून सुरुवात होऊन समकालीन ऑनलाईन आणि मिश्र अध्ययना पर्यंतचा शिक्षणाचा हा प्रवास शैक्षणिक उत्क्रांतीकडे घेऊन जाणारा आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 यांनी मिश्र शिक्षण अध्ययनाकडे सर्वांचे लक्ष वेधले. ही पद्धती कोरोना 19 महामारी मध्ये वापरली आणि अंगीकारली केली. या लॉकडाऊन मध्ये शैक्षणिक संस्था बंद असताना ऑनलाईन शिक्षण हे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील माध्यम बनली. महामारी पूर्वी समोरासमोरील संवाद प्राबलल्याने होत असे मात्र कोरोना 19 च्या महामारी तो संवाद ऑनलाईन झाला.

ऑनलाईन आणि समोरासमोरील संवाद यांचे एकत्रिकरण होऊन मिश्र अध्ययन ही संकल्पना उदयास आली.ऑनलाइन माध्यमाचा अध्यापनासाठी प्रभावी आपण होऊ शकतो हा धागा पकडून मिश्र अध्ययन ही संकल्पना सामोरी आली. या मिश्र अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांना वैयक्तिक अनुदेशना बरोबरच डिजिटल संसाधनाचा वापर करून शिकवणे जे एकविसाव्या शतकात अपेक्षित आहे.

मिश्र अध्ययन व्याख्या

मिश्र अध्ययन हे अध्यापन शास्त्रीय दृष्टिकोन आहे ज्यामध्ये पारंपारिक समोरासमोरील वर्ग अध्यापन आणि ऑनलाइन शिक्षण यांचे मिश्रण आहे.मिश्र अध्ययन हे अनुदेशन प्रणाली अनुदेशन आराखडा आणि मीडिया वितरण यांचे एकत्रीकरण आहे.

Blended learning is a practice of using both online and in person learning experience when teaching student

Blended learning, also known as hybrid learning, is an approach to education that combines online educational materials and opportunities for interaction online with traditional place-based classroom methods.

BL is not a mere mix of online and face-to-face mode, but it refers to a well-planned combination of meaningful activities in both the modes.

मिश्र अध्ययन (Blended Learning) म्हणजे ऑनलाइन शिक्षण आणि पारंपरिक शाळेतील शिकवण यांचे मिश्रण. याला हायब्रिड लर्निंग (Hybrid Learning) असेही म्हणतात.

अध्ययनामध्ये विद्यार्थी पाठ्यक्रमाचा एक भाग कक्षाेत पूर्ण करतो आणि दुसरा भाग डिजिटल आणि ऑनलाइन संसाधनांचा वापर करून पूर्ण करतो. यामध्ये विद्यार्थ्यांना वेळ, जागा, पद्धत आणि गती यांचे नियंत्रण असते. मध्ये शिक्षक विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक असतो. यामध्ये विद्यार्थ्यांना विविध टप्प्यांवर पदविका किंवा इतर प्रमाणपत्रे दिली जातात. अध्ययनाची अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांना अधिक नियंत्रण मिळते, त्यामुळे ते अधिक सक्रिय आणि प्रवृत्त राहतात.

मिश्र अध्ययनाचे घटक

हार्डवेअर यामध्ये लॅपटॉप, संगणक, स्मार्टफोन, टॅब,प्रोजेक्टर ,स्मार्ट बोर्ड,मायक्रोफोन इत्यादीचा समावेश होतो.


सॉफ्टवेअर : सॉफ्टवेअर वातावरण निर्मितीसाठी मदत करते. समकालीन शिक्षणाला मदत करणारे सॉफ्टवेअर किंवा सॉफ्टवेअर एप्लीकेशनची मिश्र अध्ययनासाठी गरजेची असतात जसे की झूम, गुगल मीट,स्कायपी, वेबएक्स ,गो मीटिंग आणि इतर एप्लीकेशन. समकालीन शिक्षण हे प्रत्यक्ष समोरासमोर होत असते तसेच ते आभासी पद्धतीने कोठेही आणि कधीही होऊ

शकते, ज्यामुळे विद्यार्थी त्याचे आशय ज्ञान संरचित करू शकतो. मुद्रित केलेले व्हिडिओ, इ आशय ही करते हे विद्यार्थ्यांना त्याच्या गरजेनुसार वेळेनुसार अध्ययन करण्यासाठी मदत करते.

गुगल मॅप गुगल क्लासरूम कॅनव्हास यासारख्या अध्ययन व्यवस्था प्रणाली अतिशय महत्त्वाची भूमिका अध्ययन बजावतात.

मानवी घटक : मिश्र अध्ययनासाठी शिक्षकाच्या क्षमता महत्त्वाची भूमिका बजावतात. या क्षमतांमध्ये उत्कृष्ट विषय ज्ञान, ई आशय निर्माण करण्याची क्षमता, परिणामकारक आशय प्रधान कार्यनीती,भाषिक आणि अभाषिक सादरीकरण कौशल्य, संघभावना विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि अभिरुची निर्माण करण्याची क्षमता इत्यादींचा समावेश होतो.

मिश्र अध्ययनाची वैशिष्ट्ये व फायदे



लवचिक अध्ययन मार्ग

अध्ययनामध्ये ऑनलाईन घटकाच्या समावेशामुळे विद्यार्थ्यास त्याच्या गतीनुसार आणि सोयीनुसार अध्ययन करण्यासाठीची लवचिकता प्राप्त होते. तसेच विद्यार्थी कोठूनही आणि कसेही अध्ययन साहित्य हाताळू शकतात .त्यातल्या त्यात जे विद्यार्थी अध्ययनाबरोबर नोकरी किंवा व्यवसाय करतात त्यांच्यासाठी उपयुक्त अध्ययन अध्यापन पद्धती आहे.

तंत्रज्ञानाचे एकात्मिकरण

अध्ययन व्यवस्थापन प्रणाली मॉड्युल आणि फळा तसेच गुगल वर्ग यांच्यातील बदल हा आता सार्वत्रिक होत आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कोर्सचे व्यवस्थापन कोर्स प्रदान करणे मूल्यमापन संप्रेषण की ज्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षक यांच्यामध्ये कोर्स विषयात सुलभता प्रधान करते त्याचबरोबर शैक्षणिक ॲप मल्टीमीडिया आंतरक्रियात्मक अभिरुपता अध्ययन अनुभव वाढविते.

वैयक्तिक अध्ययनास सहाय्य

मिश्र अध्ययन विद्यार्थ्यांच्या अध्ययन बाबत विश्लेषण करून त्याच्या प्रगतीची माहिती तसेच प्रगतीतील उनिवा यांची माहिती विद्यार्थी तसेच शिक्षकास देते त्यामुळे विद्यार्थ्यास स्वतःच्या अध्ययन कार्यमान सुधारण्यास प्रत्याभरण मिळते.

सहयोगी अध्ययनाची संधी

मिश्र अध्ययन चर्चा मंच ,गट प्रकल्प, समूह अंतर्क्रिया यासारख्या सहयोगी अध्ययनाच्या उपक्रमातून अध्ययन करण्यात प्रोत्साहन देते आभासी वर्ग ऑनलाईन सहयोगात्मक साधने वेगवेगळ्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना अध्ययनात गुंतवते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या समूहा बरोबर काम करणे ,गटकार्य आणि संप्रेषण कौशल्य वाढते.

शिक्षकाचा व्यवसायिक विकास

मिश्र अध्ययनाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता शिक्षकांच्या व्यवसायिक विकास कार्यक्रम आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. विविध संस्थांमध्ये शिक्षकांना याकरिताची कौशल्य आत्म साद व्हावी तसेच कोर्स प्रधान चांगल्या पद्धतीने करता यावा तसेच मूल्यमापन योग्य पद्धतीने व्हावी याकरिता सेमिनार कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

संकरित कोर्सची निर्मिती

अनेक विद्यापीठे आणि महाविद्यालय अशा संकरित कोर्सची निर्मिती करत आहे ज्यामध्ये प्रत्यक्ष समोरासमोरील आंतरक्रिये बरोबरच ऑनलाइन आंतरक्रिया सुद्धा उपयोगात आणल्या जाऊ शकतात . मिश्र अध्ययनात पारंपारिक अध्यापन आणि ऑनलाइन अध्ययन कृती यांचे एकत्रिकरण समतोल पद्धतीने केले जाते .याचा हेतू एकच की विद्यार्थ्याला अध्ययन अनुभवात गुंतवून ठेवणे आणि त्यासाठी अधिकाधिक स्त्रोतांचा वापर करणे.

मूल्यमापन आणि प्रत्याभरण

मिश्र अध्ययन पद्धतीत नाविन्यपूर्ण मूल्यांकनाची साधने तसेच प्रत्याभनाचा वापर केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे मूल्यमापन करण्यासाठी साकारिक मूल्यमापन ऑनलाइन प्रश्न, कोडे ,समूह आढावा, स्वयमूल्यांकन साधनांचा देखील वापर केला जातो त्याचबरोबर रचनात्मक प्रत्याभरण वेळच्यावेळी विद्यार्थ्यांना दिले जाते.

उपलब्धता आणि सर्वसमावेशकता

विविध अंगी विद्यार्थ्यांच्या गरजा आणि प्राधान्य यांना सामावून घेऊन मिश्र अध्ययन हे उपयुक्तता आणि सर्वसामावेशकता यांचा पुरस्कार करते .आज संस्था उपलब्ध डिजिटल आशय निर्मितीवर सहाय्यभूत ठरणाऱ्या तंत्रज्ञान पुरविणे यावर भर देत आहेत, तसेच जे विद्यार्थी या औपचारिक शिक्षण प्रवाहात सामील होऊ शकत नाही अशा दिव्यांग अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांना सामावून घेणे यावरती भर देत आहेत.

मिश्र अध्ययन हे लवचिकता वैयक्तिकरण आणि सहयोगात्मक अध्ययन वातावरणाची निर्मिती करून उच्च शिक्षणाची भूमी नव्याने साकारत आहे. यासाठी त्यास नव्याने उत्क्रांत होत असलेल्या तंत्रज्ञानाची मदत होत आहे आणि शिक्षकांनी नाविन्यात्मक अध्यापन शास्त्रीय दृष्टिकोनाचा स्वीकार केला आहे त्यामुळे मिश्र अध्ययनाचा मार्ग सुकर झाला आहे. मिश्र अध्ययनाचे एकात्मिकरण आणि अंगीकार हे शैक्षणिक निष्पत्तीच्या सकारात्मक वाढीची अपेक्षा करत आहे आणि त्यामुळेच एकूणच उच्च शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता वधारणार आहे.

मिश्र अध्ययना समोरील आव्हान

मिश्र अध्ययनाचा भारतात वापर करीत असताना विविध आव्हानांचा सामना करावा लागतो ती आव्हाने खालील प्रमाणे

भौतिक सुविधां विषयक समस्या

भारत हा भौगोलिक दृष्ट्या आर्थिक सामाजिक परिस्थिती भाषा व भूभाग यांच्यामध्ये वैविध्यता असणारा देश आहे .भारतातील दुर्गम भागात नेटवर्क, इंटरनेट सुविधा, सायबर कॅफे आणि मूलभूत सुविधा ज्या मिश्र अध्य अध्ययनासाठी आवश्यक आहेत त्या कमी प्रमाणात उपलब्ध आहेत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना या सुविधा उपलब्ध होतीलच असे नाही त्यामुळे अध्ययनाचा प्रभावी वापर होईलच असे सांगता येत नाही.

गुणवत्ता हमी आणि प्रमाणीकरण

मिश्र अध्ययनाची गुणवत्ता आणि प्रमाणीकरण हे खूपच आव्हानात्मक आहे याकरिता मजबूत यंत्राला आवश्यक आहे की जी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अचूक मापन करेल शैक्षणिक कठोरता कायम ठेवेल जेणेकरून अध्ययन निष्पत्ती प्राप्त होऊ शकेल ,जर योग्य गुणवत्ता हमी मापन प्रणाली नसेल तर गुणवत्तेबाबत तडजोड करणेचा धोका अनुभवतो.

शिक्षकांच्या तंत्रज्ञानाबाबतच्या क्षमता आणि अध्यापन शास्त्र कौशल्य

बरेच शिक्षक प्रत्यक्ष किंवा समोरासमोरील अध्यापनाला सक्षम आहेत मात्र अनेक शिक्षक तंत्रज्ञानाबाबत तंत्रस्नेही नाही त्यामुळे ही शैक्षणिक आहे तयार करण्याचा ताण शिक्षकांवर येतो तसेच या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत त्यांच्यात चिंता किंवा अस्वस्थता निर्माण होते.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा अभाव

मिश्र अध्ययन हे तेव्हा यशस्वी होईल जेव्हा शिक्षकांना ऑनलाइन अध्यापन शास्त्राच अनुदेशन रचनेचे आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा याचं प्रशिक्षण दिलं तर हे शक्य आहे मात्र अजूनही शिक्षकांना प्रशिक्षित करणारी व्यावसायिक प्रशिक्षणे उपलब्ध नाहीत की ज्यामुळे या मिश्र अध्यानाचा वापर शिक्षक करू शकतील.

नैतिक समस्या

मिश्र अध्ययनाच्या माध्यमातून शिस्त वर्तन नियंत्रण गुरु शिष्य संबंध सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये यांची निर्मिती विद्यार्थ्यांमध्ये होईल हे सांगता येत नाही.

विद्यार्थ्यांमधील प्रेरणा आणि अभिरुची टिकवून ठेवणे

मिश्र अध्ययनात विद्यार्थ्यांची प्रेरणा, अभिरुची टिकवून कठीण आहे. कारण यातील विद्यार्थी हा अनेक जबाबदारी पेलणारा तसेच बाहेरील वातावरणाकडे आकर्षित होणारा असतो .त्यामुळे त्याला अध्ययनात गुंतवण्यासाठी परिणामकारक कार्यनीती आणि आंतरक्रियात्मक अध्ययन साहित्याची गरज असते.

आर्थिक धन्वयार्थ

मिश्र अध्ययनाच्या वापरासाठी आणि ते कार्यरत ठेवण्यासाठी भौतिक सुविधा या अधिक महागड्या आहेत. ज्यामध्ये तंत्रज्ञानासाठीची गुंतवणूक, सॉफ्टवेअर लायसन्स शिक्षकांचे प्रशिक्षण तसेच सहाय्यभूत सेवांचा समावेश आहे मात्र कमी आर्थिक तरतुदीत हे राबविणे कठीण आहे.

समारोप

मिश्र अध्ययन राबवित असताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून त्यावर उपाय योजले असता सद्यस्थितीला विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार व अभिरुचीनुसार शिक्षण देणारी ही उपयुक्त पद्धती म्हणता येऊ शकते त्यामुळे याचा उच्च शिक्षणामध्ये वाढता वापरच याची उपयुक्तता अधोरेखित करत आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1. Prasanjeet Das ,Pranab Barman. (2024, June). Blended learning : The futur Of INdian Higher Education through the lens of National Education Po 2020licy. *University news*, 12-17. Retrieved September 2024
2. Roy, Prasenjit. (2022, Octomber 31, Novemver 06). Higher Education 4.0 Digital Revolution for Blended learning In India. *University news, 60*, 18-21. Retrieved September 2024
3. डॉ. संतोष खिराडे हितेश ब्रिजवासी. (2020). *डिजिटल शिक्षणाकडे शिक्षणाचे बदलते प्रवाह.* नागपुर: प्रशांत पब्लिकेशन.
4. विभूते, ड. भ. (2022). *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चिकित्सा.* कोल्हापूर: मेहता पब्लिकेशन हाऊस.
5. https://www.ugc.gov.in/pdfnews/6100340_Concept-Note-Blended-Mode-of-Teaching-and-Learning.pdf
6. https://www.google.com/search?q=blended+learning+in+marathi&rlz=1C1YTUH_enIN991IN991&oq=blended+learning&gs_lcrp=EgZjaHJvbWU
7. https://stylemixthemes.com/wp/benefits-of-blended-learning/?gad_source=1)

वर्तमानावर भाष्य करणारी आणि भविष्याचा वेध घेणारी विज्ञान कादंबरी

प्रविणसिंह बहादूरसिंह शिलेदार
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
देवचंद कॉलेज, अर्जुननगर.

प्रास्ताविक

१९६० नंतर मराठी साहित्यात जे नवीन वाङ् मयीन प्रवाह उदयाला आले त्यातील एक प्रवाह म्हणजे विज्ञान साहित्य होय. सुरूवातीला बाल्यस्वरूपात असणा-या या प्रवाहाने १९८० नंतर जोर धरला. नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, साहित्यिक या वाङ् मय प्रकारात लेखन करू लागले. विज्ञान कथा, कादंबरी, ललित इत्यादी प्रकारात जोरदार लेखन होऊ लागले. अनेक विद्यापीठात या विषयावर चर्चासत्रे भरू लागली आणि मराठीतील समीक्षकांचेही लक्ष या साहित्यप्रकाराकडे वळले. असे होणे ही एक अपरिहार्य घटना होती कारण मानवी जीवनात विज्ञान-तंत्रज्ञानाने अमुलाग्र बदल घडवून आणला होता. या बदलाचा वेग इतका होता की, मानवाचे जीवन जे पिढयांन पिढया बदलत नव्हते ते वर्ष दोन वर्षांत बदलू लागले. मानव विज्ञानाशिवाय जगूच शकत नाही अशी अवस्था निर्माण झाली. संवेदनशील साहित्यिकांनी याची नोद घ्यायला सुरूवात केली. यातूनच विज्ञान कथा, कादंब-यांचा जन्म झाला. विज्ञानसाहित्य हा नवा महत्त्वाचा वाङ् मयीन प्रवाह आहे. आज विज्ञानाशिवाय माणूस जगूच शकत नाही. विज्ञानाने सर्व मानवी जीवन व्यापले आहे. सारे जगच विज्ञानमय झाले आहे. मानवी जीवनाचे सर्व घटक त्यात अंतर्भुत असताना सद्यस्थितितील विज्ञानाच्या भूमीवर पाय घट्ट रोवून विज्ञानकथा उभी आहे. आणि आपल्या कल्पनेच्या दृष्टीने उंच अवकाशात भरा-या घेत आहे. या अर्थाने आपण या विज्ञान साहित्याकडे पाहिले पाहिजे. विज्ञान साहित्याची व्याख्या करत असताना 'आजच्या आणि उद्याच्या विज्ञानाच्या पर्यावरणात घेतलेल्या मानवी नातेसंबंधांचा आणि अस्तित्वाचा सर्जनात्मक वेध म्हणजे विज्ञान साहित्य होय.' असे आपणाला म्हणता येईल

मराठी विज्ञान साहित्याची सुरूवात विसाव्या शतकापासून झाली. इ.स. १९१५ मध्ये श्रीधर बाळकृष्ण रानडे यांनी 'तारेचे रहस्य' ही पहिली विज्ञान कथा वाचकांना सादर केली. ती मासिक मनोरंजनात प्रसिध्द झाली. १९१६ साली 'परमाणूंचे कार्यमाहात्म्य' ही गोविंदाग्रजांची कविताही मासिक मनोरंजनात प्रसिध्द झाली होती. बालकवी, केशवसूत यांच्याही काही विज्ञानविषयक कविता प्रसिध्द झालेल्या आहेत. १९५५ च्या आगेमागे अमेरिकेत विज्ञान साहित्याचे सुवर्ण युग येऊन गेले होते. अमेरिकेतील या विज्ञान युगाचा प्रभाव जगातील सर्व देशांवर पडला होता. मराठीत १९५६ पासून अनंत अंतरकर हे 'नवल' मधून सतत विज्ञानकथा प्रसिध्द करत होते. 'हंस' या मासिकातूनही विज्ञानकथा प्रसिध्द होत होती. यात द. चिं. सोमन, द. पां. खांबेटे, ग. रा. टिकेकर, दि. बा. मोकाशी, बाळ फोंडके, गजानन क्षीरसागर, धनंजय जोशी, श्रीनिवास शारंगपाणी, प. गं. सुर्वे, शं. ह. देशपांडे, यशवंत रांजणकर, शुभदा गोगटे इत्यादी अनेक लेखकांनी विज्ञान कथा लिहिल्या.

उद्दिष्टे

1. विज्ञान साहित्य म्हणजे काय हे समजावून घेणे.
2. मराठी विज्ञान कादंबरीचे स्वरूप समजावून मानवीजीवन आणि विज्ञान यांचा परस्पर संबंध तपासणे.
3. आज प्रत्यक्षात अनुभवसृष्टीत अस्तित्वात नसते किंवा विज्ञानाच्या ज्ञानसृष्टीत सिध्द झालेले नसते असे कल्पित तपासणे.
4. विज्ञान कादंबरीतील विज्ञान तंत्रज्ञानाचा मानवावर होणारा परिणाम तपासणे.

संशोधनाच्या पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्तमानावर भाष्य आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या विज्ञान कादंबरीचा मागोवा घेत असताना वैज्ञानिक संशोधन पध्दती, समाजशास्त्रीय संशोधन पध्दती व मानसशास्त्रीय संशोधन पध्दती यांचा आधार घेतला आहे. तसेच

कादंबरीमध्ये मांडलेल्या वैज्ञानिक कल्पिताचा व वास्तवाचा विचार करण्यासाठी तौलनिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

मराठी विज्ञान कादंबरी

'कळसूत्री' ही निरंजन घाटे यांची कादंबरी गुप्तहेरांचे कारणामे या विषयाशी निगडीत आहे. एखादा देश आपल्या गुप्तहेरामार्फत दुस-या देशावर कशा प्रकारे दबाव आणतो व त्या दबावाच्या जोरावर त्या देशाला चुकीचे निर्नय घ्यायला भाग पाडतो हे ही कादंबरी सांगते. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणचा विषयही ही कांदबरी मांडते. ही कादंबरी अत्यंत छोटी केवळ ७६ पृष्ठांची आहे. या कादंबरीत काही वैज्ञानिक सत्यही सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीत जे काही तंत्रज्ञान वापरले आहे ते आज अस्तित्वात आहे. उदा. 'स्क्रॅबलर' ही संकल्पना सांगितली आहे आणि त्याचे व्यवस्थित विश्लेषनही केलेले आहे. 'इलेक्ट्रॉनिक भाषेत या यंत्राला 'स्क्रॅबलर' असं म्हणतात. थोडक्यात म्हणजे तुम्ही जे शब्द बोलता त्या शब्दांच्या लहरीचे असंख्य बारीक तुकड्यात रूपांतर करायचे आणि मग ते तारेतून वाहून न्यायचे आणि दुस-या फोनच्या स्क्रॅबलरमधे पुन्हा त्या ध्वनिलहरींनी पुन्हा मूळ स्वरूप प्राप्त करून द्यायचं.' (पृ.४२)

'सक्षात्कार' निरंजन घाटे यांनी या कादंबरीत अवकाशाच्या अनंत पोकळीत भरकटणा-या यानाची कल्पना मांडली आहे. अनेक पिढ्या त्या यानातच जन्म घेतल्यामुळे यानालाच ते भ्रमांड मानत होते; पण हा भ्रम आहे. यानाच्या बाहेर अवकाशाचे अनंत भ्रमांड आहे याचे वास्तव या कादंबरीत मांडले आहे. तसेच विज्ञानदृष्टी व अंधश्रध्दा यांचा संघर्ष दाखवला आहे. इ. स. २११९ मध्ये 'जॉर्डन फाऊंडेशन' चे यान आपली सूर्यमाला ओलांडून 'प्रॉक्झिमा सेंटॉरी' ह्या सूर्यमालेत प्रवेश करून वसाहत योग्य ग्रह शोधत होते. या यानावर आपल्या सूर्यमालेच्या विविध ग्रहावरील वसाहतींमधील असंख्य कुटुंबानी सहभाग घेतला होता. हा प्रवास जवळपास साठ वर्ष चालणार होता. आपण पृथ्वीवर राहतो. आपल्याभोवती वातावरण असते. वातावरण ढालीसारखे आपल्या उपयोगास येते. ते असंख्य प्रकारची उत्सर्जने वैश्विक किरणे अडवत असतात. त्यामुळे आपल्याला त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होत नाही. किंवा त्यापासून उपद्रवही पोहचत नाही. पण कादंबरीत अवकाश पोकळीतून येणा-या अशा प्रकारच्या किरणांना किंवा उत्सर्जनांना अडवायला यानाच्या भिंती असमर्थ होत्या. साहजिकच त्या किणांमुळे मानवी गुणधारक सूत्रात बदल झाला आणि यानातील मानवात शारीरिक बदल घडू लागले. विकृती निर्माण झाल्या." हे ही कादंबरी मांडते.

'कालयात्रा' निरंजन घाटे यांनी या कादंबरीत 'आत्मकेंद्रीत विश्व' या संकल्पनेवर आधारीत कालयात्राची निर्मिती, त्यावरील प्रयोग, त्यातून येणारे अनुभव मांडले आहेत. त्यासोबतच मानवी स्वभावाचे चित्रणही केले आहे. या यंत्राची निर्मिती करणारे डॉ. चाफळकर यांनी बेलामी या जगातील एका धनाढ्या व्यक्तीसमोर कालयंत्राची संकल्पना मांडली. आणि आपल्याकडच्या यंत्राच्या सहाय्याने उंदराला भविष्यकाळात आणि भूतकाळात पाठवून दाखवले. बेलामी एका अपघातामध्ये आपले दोन्ही पाय गमावले होते. त्यांना आपले दोन्ही पाय हवे होते. पैसा असून अपगंत्वामुळे त्यांना त्यांच्या जीवनात दुःख सहन करावे लागत होते. लेखकाने मानवी जीवनात दुःख कोणत्याही वाटेने येऊ शकते याचे वास्तव बेलामीच्या रूपाने या कादंबरीत मांडले आहे.

'प्रेषित' जयंत नारळीकरांची ही पहिली कादंबरी आहे. या कादंबरीत सायक्लॉप्स दुर्बिणीची कल्पना मांडलेली आहे. त्यासोबतच अमेरिकेनं ही दुर्बिण बांधण्याचे कारण मानवाची नजर अवकाशात रोखलेली आहे. तो भ्रमांडात घडणा-या अनेक घटनांचे शोध करतो आहे. या अवकाशाच्या पोकळीत हजारो तारे आहेत. त्या ता-यांच्या भोवती अनेक ग्रह फिरत आहेत. या अनेक ग्रहातील कोणत्यातरी एखाद्या ग्रहावरती जीवश्रृष्टी असेल काय ? "आपल्याभोवती अथांग पसरलेल्या अंतराळात आपण पृथ्वीवासी मानवच केवळ 'हुशार,' 'विचारवंत,' 'प्रगत' जीव आहोत काय ? आणि आपण एकटे नसलो तर आपले शेजारी आहेत तरी कुठे ? त्यांच्याशी संपर्क कसा साधायचा ?" (पृ.०२) असे अनेक प्रश्न मानवाला पडलेले आहेत. लेखकाने मांडलेले हे प्रश्न सामान्य माणसापासून मोठ मोठ्या शास्त्रज्ञांच्या पर्यंत सर्वांचेच कुतूहल जागृत करणारे आहेत. त्याचे उत्तर शोधण्यासाठीच सायक्लॉप्सची निर्मिती हा विषय घेतला आहे.

'अंतराळातील स्फोट' या जयंत नारळीकर यांच्या कादंबरीत तारकास्फोटाचे, तारकास्फोटाच्या उपाययोजनांचे व तारकास्फोटाच्या परिनामाचे चित्रण या कादंबरीत केलेले आहे. यासोबतच सामाजातील अधंश्रध्दा,परंपरा यांचे चित्रणही या

कांदबरीत कथानकाच्या अनुषंगाने येताना दिसते. आचार्य सारिपुत्त आपल्या विद्याथ्र्यांना खगोलशास्त्रातले ज्ञान देतात. व त्यांच्या मनातील गैरसमज, अंदश्रध्दा नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. ग्रहणाबद्दल समाजातील गैरसमजाला आपले विद्यार्थी बळी पडू नयेत यासाठी ते सूर्य ग्रहण म्हणजे काय ? याची माहिती देतात. धूमकेतू दाखवतात. या धूमकेतूद्दलही समाजात बरेच गैरसमज होते. धूमकेतू अशुभ असतो, तो आला की जगात रोगाची साथ येते.... मोठी प्रसिद्ध माणसे अचानक मरतात. या प्रश्नांची उत्तरे या कादंबरीत मिळतात.

'वामन परत न आला' या कादंबरीत जयंत नारळीकर यांनी आधुनिक विज्ञानाच्या आधारावर मानवी जीवनातील घडामोडी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नारळीकर स्वतः अव्वल दर्जाचे शास्त्रज्ञ असल्यामुळे भविष्यात विज्ञान कोणत्या थराला जावू शकते याचे सद्याच्या विज्ञान प्रगतीच्या आधारावर अंदाज बांधू शकतात. या कादंबरीतही भविष्यातील विज्ञान प्रगतीची कथा मांडली आहे. त्यात संगणकाची ताकद, स्वतःविचार करणारा व स्वतःची प्रतिकृती तयार करणारा यंत्रमानव इत्यादी प्रगतीच्या घटना घडू शकतात. या घटनांच्या अनुषंगाने कथानकात वास्तव मानवी भावजीवन व्यक्त झाले आहे. ही कादंबरी तीन भागात मांडलेली आहे.

'व्हायरस' या कादंबरीत जयंत नारळीकर यांनी जगातील संगणकावर आलेले संकट मांडलेले आहे. पृथ्वीवरील संगणक बंद पडले तर मानवाला जिंकणे आवघड नाही. या कल्पनेतून आलेले वास्तव या कादंबरीत मांडले आहे. तसेच मानवी भावभावना, अंतरराष्ट्रीय राजकारण याचे दर्शन ही कांदबरी करवताना दिसते. कादंबरीत लेखकाने देशाच्या टॉप सिक्रेट बैठकीचे स्वरूप कसे असते याचे वर्णन केले आहे. नारळीकारांनी व्हायरस कशा प्रकारे काम करतो व त्याचे परिणाम कोणकोणत्या देशात कशा प्रकारे होत आहेत याचे वास्तव या कादंबरीत मांडले आहे. ज्याप्रमाणं प्राण्याच्या शरीरातील जैविक प्रक्रियांत ढवळाढवळ करून त्याला आजारी पाडणारे रोगजंतू असतात, तसेच संगणकांच्या तर्कशुद्ध प्रक्रियेत 'खो' घालणारे जंतू पण असतात. मात्र ते रोगजंतूंप्रमाणे 'सजीव' नसून लहानमोठे-बहुतेक लहानच-कंप्यूटर प्रोग्रॅम असतात. ते संगणकाच्या मुख्य प्रोग्रॅममध्ये घुसून त्याची दिशाभूल करतात. रोगजंतूंप्रमाणं त्यांना पण 'व्हायरस' म्हणतात." (पृष्ठ१९)

अरुण हेबळेकर यांच्या **'रूद्रमुख'** या कादंबरीत मानवी स्वभाव आणि त्यातून घडलेल्या वर्तणूकीचे वास्तव समोर येते. 'रूद्रमुख' या वीज निर्मिती केंद्राला काही राजकीय, आर्थिक आणि वयक्तिक कारणांमुळे खाजगी कंपनीचं पालकत्व स्विकाराव लागलं होतं. लेखकाने क्रॉनिक पल्मोनरी एम्फिसेमामुळे हा रोग कोणाला होऊ शकतो व त्या रोगाचे कारण काय असू शकते याबद्दल वास्तव माहिती कथानकाच्या अनुषंगाने दिली आहे. डॉक्टरांच्या मतानुसार पन्नाशीवर कोणालाही एम्फिसेमा होऊ शकतो. पण जेव्हा पन्नाशी ओलांडलेले लोक एम्फिसेमाने मरू लागतात तेव्हा त्याचं मुख्यतः एक कारण असू शकतं 'प्रदुषण' वातावरणाचं प्रदुषण किंवा त्याचा एक संकलित प्रभाव. थोडक्यात प्रदुषण 'रूद्रमुख' या वीज निर्मिती केंद्रामुळे कसे होत होते याची कथा येते.

अरुण हेबळेकरांची **'जोनास आर्क'** ही कादंबरी म्हणजे मंगळ मोहिमेची, मंगळावरील कृत्रिम जीवश्रृष्टी निर्मितीची, अंतराळवीरांच्या मोहिमेच्या तयारीची आणि अंतराळ प्रवासातील अनुभवांची कहानी आहे. अमेरिकेने मंगळ मोहीम आखली होती. या मोहीमेत रशिया आणि भारतीय अंतराळवीरांचा समावेश केला होता. भारत हा गुलामीतून वर आलेला विकसनशील देश होता. भारतासारख्या लोकशाही प्रधान राष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर राहण्यात सहाय्य करण्यासाठी भारताचा समावेश या मोहिमेसाठी केलेला आहे असे अमेरिकेने जाहीर केले होते. अमेरिकेतील काही लोक याला विरोध करत होते. कारण अमेरिकन मानसिकता अजूनही भारताला गुलाम आणि बुरसटलेला देश समजत होती. याचे वास्तव चित्रण लेखक करतो. 'जोनास आर्क' या अरूण हेबळेकरांच्या कादंबरीत मंगळावरच्या मोहिमेचे वर्णन आहे; पण तिचा उद्देश मंगळावरच्या मोहिमेमागचे विज्ञान सांगणे आहे, मंगळावरचं वातावरण, गुरूत्वाकर्षण वगैरेंबद्दल माहिती देणे हा आहे, असे कोणी म्हणणार नाही. तर अजूनही वर्णभेद माणसाच्या मनात कसा टिकून आहे. अंतराळप्रवासासाठी निवडल्या जाणा-या व्यक्तींच्या निवडीमागे काय राजकारण चालते, कुटुंबकबिल्यापासून दहा - बारा वर्षे दूर राहाण्यातून कोणते ताणतणाव उद्भवतात, या सगळ्याचे दर्शन घडवणे, एक वेगळा अनुभव वाचकाला देणे हा आहे. शेवटी भारतीय अंतराळवीर परेश शिरालीमुळेचमंगळ मोहिम यशस्वी होते. याची कहाणी या कादंबरीत येते.

अरुण हेबळेकरांची **'आदित्य'** ही एका फ्युजन रियॅक्टर प्रकल्पाच्या बिघाडाची आणि तिच्या दुरूस्तीची कथा आहे. यासोबतच मानवी स्वभाव, त्याच्या वृत्ती, प्रवृत्ती यांचेही दर्शन 'आदित्य' या कादंबरीत होते. लेखकाने 'आदित्य' हा अणुउर्जाप्रकल्प नियंत्रणा बाहेर जाण्याचे जी कारणे मांडली आहेत ती वास्तव कारणे आहेत. डेमियन या 'आदित्य' च्या डायरेक्टरने 'आदित्य' वर प्रयोग करण्याच्या अनुषंगाने ऑर्फनचं प्रमान थोडसं वाढवले. त्यामुळे अनर्थ घडला होता. कादंबरीचा नायक भरत बसरूर हा 'आदित्य'चा मूळ संकल्पक, रचनाकरता होता. त्याच्या नियंत्रनाखालीच 'आदित्य' बांधला गेला. त्याने गोपनियतेचा भंग करून 'आदित्य' च्या बाधंकामाची, रचनेची माहिती अमेरिकेला दिली होती,या कारणास्तव त्याला अटक झाली. अरूण हेबळेकर म्हणतात, "विज्ञानातील संशोधन हे फार काळ गुपित राहत नाही. त्याचा प्रसार वा प्रचार लगेच होतो. तरीही एखाद्या समयी, थोडा काळ तरी असले शोध गुपित राहू शकतात परंतु ते गुपित फार वेळेआधी फोडले तर तो देशद्रोह होऊ शकतो. हाच प्रश्न मी 'आदित्य' मध्ये हाताळला." लेखकाने एखाद्या शोधावर समाजाचा अधिकार असतो. तो शोध केवळ वयक्तिक स्वार्थासाठी वापरला जाऊ नये. संपूर्ण मानवजातीचे हीत त्यात असले पाहिजे हे सुचवले आहे.

'गिनिपिग' या कादंबरीत लक्ष्मण लोंढे यांनी मेंदूविज्ञानातील प्रगतीच्या कल्पिताची रचना केली असली तरी त्या अनुषंगाने मानवी स्वभाव, शरीरशास्त्र, अध्यात्म यांचे दर्शन ही कादंबरी करवते. इलेक्ट्रॉनिक्स आणि मेंदू यांच्या संबंधीच्या ज्ञानाचा गुन्हेगारवृत्तीच्या माणसांनी दुरूपयोग केल्यावर काय होईल याचे दर्शन घडते.

'देवासिं जिवें मारिले' या कादंबरीत लक्ष्मण लोंढे यांनी परग्रहावरील माणवासी पहिल्यांदा आलेला संबंध झिडकारून पृथ्वीवरील मानवाने त्यांना कसे नष्ट केले याची रोमहर्षक कथा येते. हे कथानक मांडत असताना मानवी स्वभाव, अंतरराष्ट्रीय राजकारण आणि खगोलशास्त्रातील प्रगतीचे वास्तव दर्शन होते. अरून हेबळेकरांनी आपल्या 'आदित्य' या कादंबरीत संशोधकाला कोणत्याही देशाच्या सीमा बांधू शकत नाहीत. हे मांडले आहे. तसेच लक्ष्मण लोंढे यांनीही संशोधकाच्या संशोधनाबद्दल या कादंबरीत कथानकाच्या तोंडून आपले मत मांडले आहे. प्रा. डॉयश हे चांद्रयान प्रकल्पाचे प्रमुख होते. त्यांच्या संशोधनाला कोणत्याही देश, जात, धर्माचे कुंपन नव्हते. त्याबद्दल ते म्हणत, "अंतराळ संशोधनाच्या बाबतीत आपण राष्ट्रभेद विसरू शकलो नाही तर - तर मग आपण अंतराळ संशोधन विसरणं बर." (पृष्ठ१९) एवढेच नव्हे तर मानवी ज्ञानाच्या कक्षा रूंदावणारा कोणताही प्रकल्प हा अखेरीस सा-या मानवजातीचा एक सांघिक प्रयत्न आहे, त्यात सर्वांना कामाची संधी मिळाली पाहिजे. त्याचे फायदेसुद्धा सर्व मानवजातीला मिळाले पाहिजेत असा त्यांचा दृढ विश्वास होता. शास्त्रीय ज्ञान मिळवणे ही कोणा एका राष्ट्राची जबाबदारी नाही, तसेच मिरासदारीही नाही ही त्यांची भूमिका ते वारंवार ठासून मांडत असत. लेखक संशोधकाला संपूर्ण स्वातंत्र्य देवू ईच्छितो. लेखकाने अत्यत परखड वास्तव या ठिकाणी मांडलेले आहे. ही कादंबरी सतत मानवाला भेडसावणा-या परग्रहावरती सजीवांचे अस्तित्व आहे का ? या प्रश्नावर आधारित आहे. जर असेल आणि त्यातही ते जर प्रगत असेल तर त्यांच्या बद्दल पृथ्वीवरील मानवाचे काय मत असेल ? ते त्यांना स्विकारतील की नाही ? अशा अनेक प्रश्नांच्या उत्तराची आणि मानवाच्या परग्रहवासियांच्या बद्दलच्या मानसिकतेची ही कादंबरी आहे.

'गुंता' या कांदबरीत या कादंबरीत लक्ष्मण लोंढे यांनी क्लोनिंगची कल्पना मांडलेली आहे. क्लोनिंग ही पध्दत जेंव्हा माणूस आपली झेरॉक्स कॉपी तयार करण्यासाठी वापरू लागतो त्या वेळी समाजात कोणत्या समस्या उद्भवू शकतात हे ही कादंबरी सांगते. मकरंदच्या तोंडून विधिलिखित बाबत वास्तव बाहेर पडते. तो म्हणतो, "तर मी सहा महिने रोज आलं पाहिजे. ही आपल्या रक्ताची मागणी आहे, ही शिकवण जणू आपल्या प्रत्येक पेशीच्या डीएन्एमध्ये घातलेली आहे ! माणसाच्या डीएनएमध्ये जे लिहिलेलं असतं, ते माणसाचं विधिलिखित असतं. विधिलिखित माणसाच्या कपाळावर लिहिलेलं असतं असं माणूस पूर्वापार मानत आला असला तरी ते चुकीचं होतं. विधिलिखित डीएनएमध्ये असतं आणि या विधिलिखिताच्या विरूद्ध त्याला जाता येत नाही हेच खरं. (पृष्ठ२३) लक्ष्मण लोंढे यांनी विधिलिखित कपाळावर लिहिलं आहे हा जो पूर्वापार चालत आलेला समज आहे. हा समज खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. कारण तो समज अंधश्रध्देवर अवलंबून आहे. पण खरे पाहता विधिलिखित हे कपाळावर लिहिलेले आहे याला कोणताही शास्त्रीय आधार नाही. लेखकाने वरील विचारातून विधिलिखितचा संबंध डीएनएशी जोडून वैज्ञानिक दृष्टीकोणातून ते खरे कसे आहे हे दाखवून दिले आहे. आणि समाजाला डोळस बनवले आहे. कृत्रिम गर्भधारणा म्हणजे काय ? याचे विवेचन लेखक कथानकाच्या अनुषंगाने करतो. मानव कसा निर्माण झाला ? या संदर्भात वैज्ञानिक विवेचन

करताना लेखक थोडक्यात मानवाचा इतिहास सांगतो. स्त्रीची मासिक पाळी आणि त्यानंतर गर्भ धारणेची क्रिया या संदर्भात लेखकाने विवेचन केले आहे.

माधुरी शानभाग यांच्या 'ब्रेनवेव्ह्ज' ब्रनवेव्ह्ज या कादंबरीत दुस-याच्या मनातील विचार समजून त्याच्या मनात आपणाला हवे ते विचार पेरता येईल काय ? हा विषय मांडला आहे. तसेच मानवी भाव भावना, विज्ञानाचा दुरूपयोग याविषयाचे विवेचनही ही कांदबरी करते. लेखिकेने वास्तव जगातील काही उदाहरणे देऊन माणवी मनावर कसा ताबा मिळवता येतो याचे वर्णन कथानकाच्या अनुषंगाने केले आहे. ब्रेनवेव्ह्जचा दुरूपयोग केल्यावर त्याचा समाजावर कोणता परिणाम होतो याचे वर्णन लेखिकेने या कादंबरीत केले आहे.

निश्कर्ष

१) मराठी विज्ञान कादंबरीत मांडलेले 'कल्पित' त्या त्या काळातील वैज्ञानिक वास्तवावर अवलंबून असते.

२) हे 'वास्तव' भक्कम किंवा पुसटशा स्वरूपाचे असू शकते. असे जर नसेल तर ती विज्ञान कादंबरी न होता केवळ 'फॅन्टसी' होते.

३) विज्ञान कादंबरीत विविध विषयातील सिध्दांत, सूत्रे, गणित, इत्यादींचा वापर वैज्ञानिक गुंता सोडवण्यासाठी 'वास्तव' म्हणून केला जातो.

४) मराठी विज्ञान कादंबरीत आजच्या समाजात प्रकर्षाने जाणवणारी रूढी, परंपरा, वर्णद्वेश, लिंगभेद यातील विदारकतेचे दर्शन घडते.
उदा.: 'अंतराळातील स्फोट', 'जोनास आर्क' इत्यादी.

५) प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, कर्तव्य तत्परता, वैज्ञानिक दृष्टीची जपणूक, मानवतावाद, इत्यादी शाश्वत मूल्यांची जपणूक विज्ञान कादंबरी करताना दिसते.

६) विज्ञान कादंबरीला कोणताही विषय वज्र्य नसला तरी आतापर्यंत भौतिकशास्त्र, जीवशास्त्र,रसायनशास्त्र, गणित, भूगोल, समाजशास्त्र इत्यादी शास्त्रविषयांचा जास्त उपयोग होतो.

समारोप

मराठी विज्ञान कादंबरीतील वास्तववाचा शोध घेत असताना असे जाणवते की, विज्ञान कादंबरीतून चित्रित झालेला मानव आपल्या अस्तित्वासाठी आपल्या झगडताना दिसतो. जयंत नारळीकरांनी ज्या कादंब-या लिहिल्या त्यातील 'प्रेषित', 'व्हायरस', 'अंतराळातील स्फोट' या कादंब-यामध्ये जो विषय चर्चिला गेला आहे ते पाहता पृथ्वीला आणि पृथ्वीवासियांना आपल्या अस्तित्वाचा चिंता लागलेली आहे हेच जाणवते.

'प्रेषित' कादंबरीत परग्रहावरील मानव आपला मात्रूग्रह नष्ट होतो आहे हे समजल्यावर तेथील मानवी अस्तित्वासाठी दुसरीकडे सुरक्षित जागा शोधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांना अवकाशाच्या या प्रचंड पोकळीत केवळ पृथ्वीच सुरक्षित वाटते आणि त्यांचा रोख पृथ्वीकडे वळतो. 'व्हायरस' कादंबरीत व्हायरस हा पृथ्वीजवळच्या एका उपग्रहावरील मानवांकडून सोडला जात होता. व त्या व्हायरसच्या अनुषंगाने पृथ्वीवर आक्रमण करून पृथ्वीला आपल्या कब्जात घेण्याचा प्रयत्न केला जात होता. या 'व्हायरस' मुळे पृथ्वीवरील मानव कोण कोणत्या संकटांना समोरे जाऊ शकतो याचे वास्तव दर्शन या कादंबरीत केले आहे. तसेच व्यवस्थि असणारी समाजव्यस्था कशी बिघडते हे ही समजते. 'अंतराळातील स्फोट' या कादंबरीत अवकाशातील अनंत पोकळीत घडत असणा-या घटीताचे वास्तव या कादंबरीत येते. तसेच प्रचीन व अर्वाचीन कालखंडातील विज्ञान प्रगतीचे दर्शनही घडते.

निरंजन घाटे यांच्या 'साक्षात्कार' या कादंबरीत पुराण ग्रंथातील वास्तव दाखवून देण्यात आले आहे. पुराण ग्रंथांकडे केवळ पुरावा मागून नाकारण्यात येते. पण त्यातून सूचक अर्थ घेतला जात नाही याचे वास्तव समोर येते. 'कालयात्रा' ही कादंबरी वाचताना सामाजिक मानसिकता व उच्चभ्रू लोकांची स्वाथी अपेक्षा लक्षात येते.

लक्ष्मण लोंढेंनी लिहिलेल्या 'गिनिपिग', 'देवांसि जिवें मारिले' व 'गुंता' या कांदब-यांमधून वेगवेगळया विषयांना लेखकाने हात घातला आहे. त्यातील 'देवांसि जिवें मारिले' या कादंबरीत आंतरराष्ट्रील राजकारणातील वास्तव समोर येते. तर 'गुंता' ही कादंबरी क्लोनिंगवर आधारीत आहे.

अरूण हेबळेकरांनी विज्ञान कादंब-या विपूल प्रमाणात लिहिल्या आहेत. त्यांच्या प्रत्येक कांदबरीत वेगवेगळे विषय चर्चिले गेले आहेत. त्यांच्याकडे उत्कृष्ट लेखन शैली असल्यामुळे त्या वाचनिय झाल्या आहेत. त्यांच्या 'रूद्रमुख', 'आदित्य', आणि 'जोनास आर्क' या कादंब-यांचे नायकांच्यात एक समान धागा आहे. तो म्हणजे. हे सर्व नायक अत्यंत हुशार, कष्टाळू व नीतीवान आहेत. या गुणांमुळे त्यांना कोणत्या संकटांना सामोरे जावे लागले याचे वास्तव या कांदब-यात येते.

माधुरी शानभाग यांच्या 'ब्रेनव्हेवज' व निरंजन घाटे यांच्या 'गिनिपिग' या दोन्ही कांदब-यांचे विषय समान आहेत. तसेच कथानकही ही समान पातळीवर जाताना दिसते. कांदबरीत एखादा महत्त्वाचा शोध जर एखाद्या गुन्हेगारच्या हातात सापडला तर त्याचा दुरूपयोग कसा होता याचे वास्तव या दोन कादंबरीत येते.

संदर्भग्रंथ सूची

१) भांडारकर, पु. ल. : 'सामाजिक संशोधन पध्दती', 'विद्या बुक्स', औरंगाबाद १९७८.
२) मंचरकर, रत्नाकर : १० जुलै २०११, मराठी विज्ञान कादंबरी, 'अक्षरगाथा', वर्ष दुसरे, अंक पहिला-दुसरा (कादंबरी विशेषांक)
३) सपकाळ, (डॉ.) अनिल : ३० ऑगस्ट २००४, 'जयंत नारळीकर यांचे विज्ञान साहित्य (कथा आणि कादंबरी)',
४) तडकोडकर, (डॉ.) सु. म. : ३० ऑगस्ट २००४, 'आधुनिक मराठीतील विज्ञान साहित्य: समीक्षा विषयक काही प्रश्न', मराठी विज्ञानसाहित्य
५) मंचरकर, रत्नाकर : १० जुलै २०११, मराठी विज्ञान कादंबरी, 'अक्षरगाथा', वर्ष दुसरे, अंक पहिला- दुसरा (कादंबरी विशेषांक)

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

अर्थव्यवस्था आणि समाज

सौ. रतिपौर्णिमा सागर खतकर
(सहाय्यक प्राध्यापिका)
समाजशात्र विभाग
कर्मवीर हिरे महाविद्यालय,गारगोटी.
Email Id. ratikhatkar60@gmail.com

सारांश -

भारताच्या अर्थव्यवस्थेचा जगात तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती, हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो. भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन तृतियांश लोकांचा उदरनिर्वाह अजूनही शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे आणि अलिकडे सेवांवर आधारित व्यवसायही अर्थव्यवस्थेत अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अलिकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञा आणि माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे तसेच उच्चशिक्षित आणि इंग्रजी बोलू शकणाऱ्या वाढत्या तरूण पिढीमुळे भारत हळूहळू सर्व जगाला बाह्य-स्रोताच्या (outsourcing) सेवा पुरवणारा देश म्हणून भूमिका बजावायला लागला आहे. भारत हा अतिकुशल तंत्रज्ञ पुरवणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्मतंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्माण, विमाननिर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या बऱ्याचशा काळात भारतामध्ये समाजवादी अर्थव्यवस्थेचा मार्ग अवलंबण्यात आला. भारतात सुरुवातीस खाजगी क्षेत्राच्या अर्थ व्यवस्थेतील सहभागावर, परदेशांशी व्यापारावर, आणि इतर देशांकडून भारतात होणाऱ्या थेट गुंतवणुकीवर कडक बंधने होती. मात्र, १९९० च्या दशकाच्या सुरुवा-तीपासून भारताने हळूहळू परकीय गुंतवणुकीवरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून, आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधारांद्वारे खुली करायला सुरुवात केली आहे. मात्र, राजकारणातील मतभेद आणि भिन्न विचारधारांमुळे, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण आणि विशिष्ट क्षेत्रांमधील खाजगी आणि परकीय सहभागाला मार्ग खुला करणे अशा आर्थिक सुधारां मधील काही महत्त्वाच्या गोष्टी मंद गतीने पुढे सरकत आहेत.

अतिशय वेगात वाढणारी लोकसंख्या आणि वाढती आर्थिक आणि सामाजिक विषमता हे भारता पुढील महत्त्वाचे प्रश्न आहेत. गरीबी हाही गंभीर प्रश्न आहे, मात्र स्वातंत्र प्राप्तीनंतर गरीबीचे प्रमाण बरेच घटत असल्याचे दिसते.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शेती बरोबरच अनेक कुटीर उद्योग, लघु उद्योग, गृह उद्योग यामुळे समाजातील अनेक लोकांचे आर्थिक जीवनमान उंचावले बचत गटांच्या माध्यमांतुन आपल्या देशातील महिलांचाही भारतीय अर्थव्यवस्थेत खारीचा वाटा आहे. केंद्र शासनाच्या NSRLM आणि त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाच्या MSRLM च्या माध्यमातुन आज ग्रामीण भागातील महिला अनेक प्रकारचे गृहउद्योग, लघु उद्योग करून भारतीय अर्थव्यवस्था बळकट करण्यामध्ये खारीचा वाटा उचलत आहेत.

प्रस्तावना — (Introduction)

मानवाचे अस्तित्व त्यांच्या मुलभुत गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा यांच्या पूर्ततेत आहे. या तीन मुलभुत गरजा व्यतिरिक्त आरोग्य आणि शिक्षण या सर्व गरजा माणुस विशिष्ट आर्थिक क्रियांच्या सहाय्याने पूर्ण करत असतो.

जीवनावश्यक गरजा पुर्ण करण्यासाठी व्यक्तीला समाजातील इतर व्यक्तींची मदत घ्यावी लागते. त्याचप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीतुन गरजा भागवाव्या लागतात.

अप्रगत अव्यवस्थेपासून ते आजच्या प्रगत युगापर्यंत मानव आर्थिक क्रिया करत आला आहे. काळानुसार त्या आर्थिक क्रियांचे स्वरुप बदलले आहे. जसे आदिवाशी समाज ग्रामीण समाज हा निसर्गावर अवलंबुन होते व्यवसाय इत्यादी आर्थिक क्रिया करतात.

उद्दिष्ट्ये –

- **समाजातील आर्थिक जीवनच्या अवस्थांचा अभ्यास**
- **संशोधन पध्दती -**

दुय्यम स्त्रोतावर आधारित -

हा संशोधन दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. हे दुय्यम स्त्रोत प्रकाशित माध्यमातून घेतले आहेत. वेगवेगळी पुस्तके, अहवाल, वेबसाईट यामाध्यमातुन ही माहिती जमा केली आहे.

आर्थिक जीवनाच्या अवस्था व टप्पे -

- **अन्न संचय व शिकार -**

मनुष्य रानटी अवस्थेत असताना पशुपक्षांची शिकार करणे, कंदमुळे उपजीविका करत असे या अवस्थेत वैयक्तीक संपत्ती हि कल्पनाच नव्हती कारण त्यांचा जिवनक्रम हा निसर्गावर अवलंबुन होता. शिकार करण्यासाठी मानवाने सुरवातीच्या काळात हत्यार, दगड व हाडांपासून तयार केली श्रम विभाजनात अशा जोखमीचे शिकारीचे काम पुरुष करीत त्याचबरोबर स्त्रिया कंदमुळे शोधुन आणत असत.

- **पशुपालन अवस्था -**

अशुपालन अवस्था हि मानवाच्या आर्थिक विकासाची दुसरी अवस्था होय मानव शिकारी बरोबरच पशुपालन करू लागला यामध्ये तो गाई, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या पाळून दुधदुप्त्यांच्या व त्यातील एखादे जनावर मारून आपली उपजीविका करत असत पशुपालनाच्या काळातही भटकी अवस्था संपली नाही कारण पशुंना शोधताना कुरण शोधायला लागायचे.

- **कृषी अवस्था -**

पशुपालनानंतरची हि अवस्था प्रामुख्याने मालकी हि संकल्पना याच अवस्थेस अस्तित्वात आली वस्तुविनियम होऊ लागला शेती हि दोन प्रकारची केली जाऊ लागली.

- **स्थलांतरीत शेती :**
- **स्थिर शेती :**

या अवस्थेत मानव घरे बांधुन रहायला लागले त्यामुळे त्यांची स्थिर आयुष्याला सुरवात झाली यासाठी मानव समूहाने राहू लागले आणि यामधुनच खेड्याची निर्मिती झाली. कृषी शोधानंतर मानवी जिवनात क्रांती झाली कारण कृषीतुनच सुतार, लोहार, कुंभार, तेली, धोबी, सोनार असे वेगवेगळे व्यवसाईक गट तयार झाले कृषी अवस्थेत उत्पादन वितरण विनिमय, उपभोग या आर्थिक क्रिया होऊ लागल्या यातुनच जमीनमालक उत्पादनाच्या साधनावर मालकी असणारा एक वर्ग निर्माण झाला.

- **उद्योग पुर्व अवस्था -**

हि अवस्था कृषि अवस्थेच्या बरोबरीची आहे कारण मानवाच्या गरजा फक्त अन्न धान्यपुरत्याच मर्यादित राहिल्या नव्हत्या. याकाळात अनेक प्रकारचे व्यवसाय, कुटीउद्योग लघुउद्योग. गृह उद्योग उदयास येऊ लागले या काळात उत्पादन करणारा कारागीरच उत्पादनाच्या साधनांचा मालक होता.

औधोगिक अवस्था -

औधोगिक क्रांती १८ व्या शतकात झाली अनेक नवीन शोध लागले वस्तु उत्पादनाचे प्रमाण वाढले अधिक नफा अधिक उत्पादक नवे तंत्रज्ञान नवी यंत्रे सामग्री, नवे शोध याला चालना मिळाली दळणवळणाच्या साधनांचा विकास झाला.

उत्पादन प्रक्रियेचे चार घटक आहे -

- **भुमी किंवा जमीन** - उत्पादनप्रक्रियेत भुमी हा घटक महत्वाचा आहे भुमी हि संकल्पना फारच व्यापक आहे यामध्ये प्रामुख्याने जमिन , जमिनीवरील आणि जमिनीखालील सर्व साधनांचा समावेश होतो.
- **भांडवली** - या घटकात पैसा येत नाही तर उत्पादन प्रक्रियेत वापरण्यात येणारी उत्पादनाची साधने यंत्रसामुग्री, कच्चा माल यांचा समावेश होतो.
- **श्रम** - श्रमीक व श्रम हा उत्पादनाचा घटक आहे. श्रमामुळे उत्पादन घडून येते उत्पादन क्षमतेत वाढ झाली आहे यामध्ये बौद्धिक श्रम व शारीरिक श्रम येतात.
- **संघटक** — संघटक हा उत्पादनाचा चौथा घटक आहे गृह उद्योग पद्धतीत कारागीर उत्पादनाचे केंद्र होता. कारखाना पद्धतीत मात्र हे बदलेले उत्पादनाचे प्रमाण जास्त असल्याने सर्व घटकांचा मेळ घालणे उत्पादन प्रक्रियेतील सर्व बाजुने देखरेख करणे, उत्पादन किती कसे , कशा पद्धतीने कुठे करायचे हे ठरवतो मालाचा दर्जा , मालाची विक्री यांची व्यवस्था पाहणे या सर्व गोष्टी प्रामुख्याने संघटक मध्ये येतात.

अर्थ व्यवस्थेची वैशिष्टेय -

- **संपत्ती किंवा मालमत्ता** - प्रगत अप्रगत अदिवाशी समाजात हि संस्था अस्तित्वात आहे, दुर्मिळ आणि मौल्यवान वस्तुवरील हक्काचे आणि अधिकाराचे निर्देशन करणारे घटक म्हणजे मालमत्ता. मालमत्ते स्थावर व जंगम असे दोन प्रकार आहेत त्याच प्रमाणे मालमत्ता ही मुर्त व अमुर्त स्वरुपाची असते अमुर्त मालमत्ते विविध शोध सदिच्छा एखाद्या उत्पा -दनाचे पेंटेट इत्यादी वस्तु केलेल्या किमतीला वस्तु विकणे दुकानदारावर बंधनकारक असते.
- **श्रम विभाजन** - श्रम विभाजनाचा संबध थेट उत्पादनाशी असतो. उत्पादनाचे स्वरूप हे समाजातील लोकांच्या गरजांवर अवलंबुन असते. आदिवाशी समाजात व्यक्तींच्या गरजा मर्यादित होत्या त्यामुळे मुलभुत गरजा पुर्ण करण्याकडे या समाजाचा कल होता. असे असले तरी श्रम विभाजन मात्र सर्वच समाजात आढळून येते शारीरिक क्षमता बुद्धी या गोष्टी प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे आढळून येतात यात स्त्री व पुरुष यांची शारीरिक क्षमता भिन्न प्रकारची मानली जात असल्याने श्रम विभाजन दिसुन येते. आधुनिक काळात विशेषीकरण हा श्रमविभाजनाचा आधार आहे.

विशेषीकरण -

आधुनिक काळात विविध घटकांना महत्व प्राप्त होऊन त्यांच्या आधारावर श्रम विभागणी केली जाते. कुशल, अर्धकुशल, कामगार असे साधारणपणे तीन वर्ग आढळतात. अकुशल कामगारांना सामाजिक प्रतिष्ठा ही कमी स्वरूपाची असते.

- आधुनिक औध्योगिक समाजात व्यक्तीचा व्यवसाय स्वतःच्या गुणांवर, कौशल्यावर ठरतो. व्यवसाय स्वसं-पादित , दर्जा स्वसंपादित असतो.
- विशेषीकरण हे आधुनिक व्यवसायाचे वैशिष्ट्ये आहे.
- आधुनिक समाजामात प्रत्येक ग्राहकाचे व व्यवसायाचे संबध करारात्मक स्वरूपाचे असतात. ग्राहकसेवा ही सर्वात महत्वाची असते. यासेवेचा मोबदला पैशाच्या स्वरुपात मिळत असतो.
- पुर्वी श्रमिक घरातच उद्योग करत असत. आधुनिक काळात कारखाना ही उद्योग व्यवसायाची जागी बनली आहे.
- आधुनिक औद्योगिक समाजात मोठ्या प्रमाणात स्पर्धा दिसुन येते. एकाच प्रकारचा व्यवसाय किंवा उत्पादन अनेकजण करत असलेने ही स्पर्धा मोठ्या प्रमाणात वाढली आहे.
- आधुनिक समाजात श्रम साधनावर श्रमिकांची मालकी नसते. व्यवसायाच्या मालकाकडून ही साधने पुरविली जातात.

विनिमय –

विविध व्यवसायिकांकडून उत्पादित केल्या जाणार्या वस्तु व पुरविल्या जाणार्या सेवा यांचा विनिमय होणे आवश्यक असते. हा विनिमय दोन प्रकारे होतो. ज्यावेळेस प्रत्यक्ष स्वरुपात विनिमय होतो तो प्रत्यक्ष विनिमय याचा उद्देश गरजा भागविणे हा असतो तर अप्रत्यक्ष विनिमयाच्या मागे परतफेड करणे भावना असते.

प्रत्यक्ष विनिमयाचे प्रकार :

- **वस्तु सेवा विनिमय :** सेवेच्या बदल्यात सेवा व वस्तूच्या बदल्यात वस्तू दिली जाते व घेतली जाते. आदिवाशी समाजात अशाच प्रकारे विनिमय होत असतो. ही सेवा गुंतागुतीची असते परंतु आदिवाशी समाजात पैशाचा अभाव असलेने हा विनिमय प्रकार दैनंदिन जिवनात मोठ्याप्रमाणत वापरात येतो.
- **नियंत्रित व्यापार** – या विनिमय प्रकारात वस्तूंच्या किमती शासनाद्वारे किंवा सर्वोच्च सत्तेकडून निश्चित केल्या जातात. त्यामुळे ठरवून दिलेल्या किमतीला च ह्या वस्तू विकाव्या लागतात. कृषी उत्पन्न बाजार समितीकडून ठरवून दिलेले दर किंवा शिधावाटप दुकानात निश्चित केलेल्या किमतीला वस्तु विकणे दुकानदारांवर बंधनकारक असते.

- **मागणी पुरवठ्यानुसार -**

वस्तुच्या किमती अधिक निश्चित न करता मागणी व पुरवठ्यानुसार ठरविणे हे मुल्य पैशाच्या स्वरुपात असते, यात वस्तुच्या किमती ठरवताना ग्राहकांचा सहभागही असतो.

उदा.कृषी उत्पन्न बाजार समिती

- **धन विनिमय** - वस्तुची किंमत किंवा मुल्य पैशात ठरविले जाते वस्तुची खरीदी पैसे देऊन होत असते, भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे हे महत्वाचे वैशिष्टे आहे भांडवलदार लोकांच्या गरजा ओळखून वस्तूचे उत्पादन केले जाते त्यामुळे ग्राहक उत्तम प्रतीच्या वस्तुसाठी पाहिजेतेवढी किंमत द्यायला तयार असतात.

अप्रत्यक्ष विनिमयाचे प्रकार –

- **भेट विनिमय** - वस्तु व सेवा यांचे मुल्य सारखेच राहील हे पहिले जाते हि प्रथा आदिवाशी, ग्रामीण व नागरी या तिन्ही समाजात दिसुन येते, आदिवाशी समाजात भेट देनेची प्रथा जास्त आढळते, त्याच बरोबर या पद्धतीमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा हि भोजनावर अवलंबुन असते. भोजनावर जितका जास्त खर्च तितकीत्या व्यक्तीची प्रतिष्ठा मोठी असते त्यामुळे समाजात सामाजिक प्रतिष्ठा वाढविणेसाठी भोजन ही प्रथा मोठ्या प्रमाणत दिसून येते.
- **पुनर्वितरण** - बलुतेदारीशी पुनर्वितरण हा प्रकार निगडीत आहे, शेतकऱ्याला पिक येण्यापुर्वी देतात व हि मालमत्ताच आहे. ज्या वस्तुवर व्यक्तीची मालकी असते त्यावर तिजा ताबा असतो म्हणजे त्यावस्तूवर तिजा अधिकार असतो व हा अधिकारी लोकमान्य असतो, वस्तुची मालकी एकाचीच असते आणि त्याचा वापर करण्याचा अधिकार दुसर्या व्यक्तीकडे किंवा गटाकडे असतो.

  उदा. शेती.
- **करार** - दोन व्यक्तींमध्ये किंवा दोन गटांमध्ये कराराच्या स्वरूपानेही विनिमय होतो. परंतु बदलत्या काळात कराराचे स्वरूपही बदलले आहे. याचा मुख्य उद्देश कोणत्याही पक्षाची फसवणूक होऊ नये, कोणावरही दबाव येऊ नये, दोन्ही पक्षावर बंधन असाव. करारातील अटी पाळल्या जाव्यात यासाठी मालक व नोकर यांच्या मध्ये असे करार होतात.

निष्कर्ष -

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर शेती बरोबरच अनेक कुटीर उद्योग, लघु उद्योग, गृह उद्योग यामुळे समाजातील अनेक लोकांचे आर्थिक जीवनमान उंचावले बचत गटांच्या माध्यमांतुन आपल्या देशातील महिलांचाही भारतीय अर्थव्यवस्थेत खारीचा

वाटा आहे. केंद्र शासनाच्या NSRLM आणि त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाच्या MSRLM च्या माध्यमातुन आज ग्रामीण भागातील महिला अनेक प्रकारचे गृहउद्योग,लघु उद्योग करून भारतीय अर्थव्यवस्था बळकट करण्यामध्ये खारीचा वाटा उचलत आहेत. मालमत्ता विषयक अधिकारात स्थितीनुसार फरक पडत गेला आहे. मालमत्तेची खाजगीकरण झालेले आहे. सहकारी कारखाने सार्जनिक मालमत्तेचे असतात परंतु शेती ही खाजगी मालमत्तेची आहे खाजगी मालमत्ता ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा आधार असते तर सार्जनिक संपत्ती ही समाजाच्या विकासाचा पाया असते.

भारताच्या अर्थव्यवस्थेत खूपच वैविध्य दिसून येते. शेती हस्तव्यवसाय, कापडगिरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक गोष्टींचा समावेश त्यात होतो तृतीयांश लोकांचा उदर-निर्वाह अजूनही भारतात काम करणाऱ्या लोकांपैकी दोन शेती अथवा शेतीशी संबंधित उद्योगांवर चालतो, परंतु अर्थव्यवस्थेत विविध प्रकारच्या सेवांचाही वाढता वाटा आहे. आणि अलीकडील सेवांवर आधारित व्यवसायही अर्थ व्यवस्थेत अतिशय महत्वाची भुमिका बजावतात आहेत. अलीकडील काही वर्षात भारतातील संगणक तंत्रज्ञान आणि माहितीतंत्रज्ञान प्रगतीमुळे तासेच उच्चशिक्षित आणि इग्रजी बोलू शकणार्या वाढत्या तरुण पिढीवर भारत हळूहळू सर्व जगाला बाह्यस्त्रोताच्या सेवा पुरविणारा जगातील सर्वात मोठा भारत हा अति निर्णायक आहे. याचबरोबर उत्पादन, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसुक्षतंत्रज्ञान, दूरसंचार जहाजनिर्माण, विमाननिर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमधील भारताची क्षमताही वेगाने वाढताना दिसत आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ.साळुंखे सर्जेराव (१९९८) :समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना.नरेंद्र प्रकाशन पुणे.
2. सांगवी विलास (१९७२) : समाजशास्त्र पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
3. डॉ.काचोळे दा.धो :भारतीय समाज.
4. प्रा.कुलकर्णी एम.जी. भारतीय समाजव्यवस्था.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

१९६८, १९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषेविषयक तरतुदीच्या बदलांचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास

गुट्टे किशोर अनंतराव
संशोधक विद्यार्थी (बी.एड-एम.एड. एकात्मिक)
शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ईमेल:- kishorgutte७७७@email.com

सारांश :-

प्राचीन काळापासून ते आजच्या काळापर्यंत शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. त्यातील काही बदल हे प्रमुख बदल मानले जातात, कारण त्या बदलांचा थेट परिणाम हा मानव जातीवर होत असतो. त्या बदलतील प्रमुख बदल म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील भाषा धोरणात झालेले बदल होय. भाषा शिक्षण हे शिक्षणाचा मुलभूत गाभा आहे. कारण भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे. यामध्ये भाषा धोरण बदलांच्या तरतुदींचा अभ्यास करत असताना. यामध्ये १९६८,१९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषा धोरणात झालेल्या बदलांचा गुणात्मक संशोधन पद्धतीने तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास केला आहे. हा अभ्यास करत असताना १९६८, १९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या साहित्याचा आधार घेतला गेला व त्याचबरोबर चिकित्सक अभ्यास करण्यासाठी swoc analysis चा वापर करून प्रश्नावलीच्या साह्याने शैक्षणिक क्षेत्रातील काही शिक्षकांच्या मुलाखतीच्या साह्याने या भाषा बदलांच्या तरतुदींचा अभ्यास करण्यात आला.

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या मते शैक्षणिक धोरणात असलेला भाषा हा घटक शिक्षण प्रणालीचा एक अविभाज्य भाग आहे. भाषेमुळेच शिक्षण प्रणालीला स्वरूप प्राप्त होत असते. भाषा या महत्वपूर्ण असलेल्या घटकाचा प्रभाव हा केवळ शिक्षक क्षेत्रातच महत्वाचा आहे असे नाही, सामजिक, राजकीय, आर्थिक हे महत्व्वाचे घटक आहेत व यावर सुद्धा प्रभाव टाकण्याचे काम हि भाषा करत असते. भाषा या घटकाचा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर होत असतो, यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी व शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासाठी भाषा हा घटक अत्यंत महत्वाचा मानला जातो. समाजात भाषेमुळे मानवाचे स्थान हे अनन्यसाधारण आहे, मानव हा आपल्या मनातील भावना, विचार किंवा मत भाषेच्या स्वरूपातून मांडत असतो, व मानव जातीचा विकास हा भाषा या घटकामुळेच झाला आहे. यामुळे भाषा या घटकाचे दर्जा/स्थान हे उच्च असले पाहिजे, त्याचबरोबर समाजातील प्रत्येक भाषेचा दर्जा हा उच्चच असणे आवश्यक आहे. भारत देश हा बहुभाषीय देश आहे यामुळे या ठिकाणी अनेक धर्माचे, संस्कृतीचे, वंशाचे, भाषेचे लोक निवास करतात व या सर्वांमध्ये समतेची, समानतेची, राष्ट्रएकात्मतेची, बंधुतेची, भावना जोपासण्याचे महत्वाचे काम हे शिक्षण क्षेत्र करत असते. यामुळे शिक्षण क्षेत्रातील धोरणात झालेले बदल सुद्धा यावर परिणाम करत असतात. १९६८, १९८६ आणि २०२० या शैक्षणिक धोरणात वेळोवेळी बदल झालेले आहेत, व याचा परिणाम वेळोवेळी दिसून आला आहे. परंतु २१व्या शतकात आलेल्या २०२० या शैक्षणिक धोरणात भाषा या घटकाचे स्थान हे उच्च ठेवलेले आढळून येते, या धोरणात मातृभाषा शिक्षणाला महत्त्व देण्यात आले असून, इतर भाषेचाही दर्जा व स्थान हे महत्वाचे मानले आहे, इतर भाषा शिकःण्यासाठी विद्यार्थ्यांना पर्याय सुद्धा यामध्ये दिला आहे, इतर भाषेत असलेले पाठ्यपुस्तकांचे मातृभाषेत भाषांतर करण्याचीसुद्धा या धोरणात तरतूद केली आहे, २०२० या धोरणाने देशाची बहुभाषिक संस्कृती जोपासण्याचे काम केले आहे असे दिसून येते. अश्याप्रकारचे मत हे प्रश्नावलीच्या स्वरूपातून प्राप्त झाले म्हणजेच यातून असे दिसून आले की २०२० या शैक्षणिक धोरणाविषयी सर्व शिक्षकांचा प्रतिसाद हा चांगला होता.

प्रमुख शब्द:- राष्ट्रीय, शैक्षणिक, धोरण, भाषा, तरतूद, बदल, तुलना, चिकित्सा, अभ्यास.

प्रस्तावना :-

भाषेविषयीचे कुतूहल प्राचीन काळापासून माणसाला वाटत आले आहे. अगदी पूर्वीपासूनच लोकपरंपरेत भाषेच्या उगमाबद्दल, शक्तीबद्दल विविध आख्यायिका, कहाण्या प्रचलित होत्या, तो त्या कुतूहलाच्या पूर्तीचा प्रयत्न होय. भाषा हे आपल्या

अंतरंगातील मनोगत, भावना, विचार इत्यादी प्रगट करण्याचे साधन आहे, हि जाणीव तर पूर्वीपासून होतीच. पण या साधनाचे स्वरूप नेमके कसे आहे, हे सपष्ट करण्याचे प्रयत्न आधुनिक कालखंडात विशेषत्वाने होऊ लागले. त्यातूनच भाषाविज्ञान हि ज्ञानशाखाही विकसित होत गेली. बदलत्या काळानुसार भाषेत बदल होत गेल्याचे आपणास दिसून येते. वेगवेगळ्या जाती धर्माची भाषा वेगवेगळी असू शकते. मानवाचा विकास, भाषा, चक्र, अग्नी यांच्या शोधामुळे झाला. त्यामुळे भाषा हि मानवाला मिळालेली श्रेष्ठ देणगी आहे. समाज आणि भाषा परस्परावलंबी असतात. त्यामुळे भाषाप्रगती आणि समाजप्रगती या दोन गोष्टी एकरेषीय ठरू शकतात. भाषा हे विचार भाषण यांच्या विनिमयाचे साधन आहे. हजारो मैल दूर असणाऱ्या देशबांधवांशी भाषेद्वारेच संपर्क साधू शकतो. आपल्या प्रत्येक नियोजित कृतीमागे विचाररूपाने भाषा उभी असते. भाषा नसती तर मनुष्याची अवस्था केवळ काही ध्वनींचा उच्चार करणाऱ्या प्राण्यांसारखी झाली असती. त्यामुळे मानवाच्या प्रगतीमध्ये भाषेचा मोठा वाटा आहे. भाषा हि मानवी समाज आणि संस्कृतीला व्यापून राहिलेली पायाभूत गोष्ट आहे. मात्र हे दुधारी शस्त्र आहे. आपण जितके सभ्य बोलू शकतो तितकेच असभ्य बोलू शकतो, खोट्या साक्षी देऊ शकतो. मानवाच्या विधायक तसेच विघातक अशा दोन्ही बाबतीत भाषा साक्षीदार असते. भाषा हे मानवाच्या दैनदिन व्यवहाराचे मुलभूत साधन आहे. भाषा शिक्षण हे शिक्षणाचा मुलभूत गाभा आहे, कारण भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे. मातृभाषेतून मुलांना प्राथमिक शिक्षण देणे हे सर्व जगभर मान्य केलेले तत्व आहे. लहान मुल कोणतेही ज्ञान त्यातील सैद्धांतिक भाग योग्य आकलनासह परक्या भाषेपेक्षा आपल्या मातृभाषेत अधिक सहजतेने व प्रभावीपणे आत्मसात करू शकते, हे आता जगभरातील अनेक अभ्यासामध्ये सिद्ध झाले आहे.

पण बहुभाषिक व बहुसांस्कृतिक भारत देशात, जेथे संविधानासंमत (आठव्या शेड्यूलप्रमाणे) २२ अधिकृत राष्ट्रीय भाषा आहेत. यामुळे संपूर्ण भारत देशासाठी एकच अधिकृत भाषा शक्य नव्हते. त्याचप्रमाणे दीडशे वर्षे ब्रिटीश सत्तेमुळे देशभर पसरलेली इंग्रजी भाषा व त्याद्वारे आधुनिक युगात ज्ञान विज्ञानात झालेली प्रगती याकडेही दुर्लक्ष करून चालणार नव्हते. म्हणून देशासाठी इंग्रजी हि संपर्क भाषा हिंदी भाषेसोबत असावी, हे संविधानकर्त्यांनी दूरदर्शीप्रमाणे ठरवून भाषेच्या प्रश्नावर समाधानकारक निर्णय घेतला, तो म्हणजे राष्ट्रातील एकता-एकात्मता, संस्कृती, बंधुता, कायमस्वरूपी टिकून ठेवण्यासाठी. पण शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले जाने हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी, ज्ञानग्रहणासाठी महत्वाचे असल्यामुळे तशी तरतूद साविधांनाच्या कलम ३५०अ व शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राच्या माध्यमातून करण्यात आली.

भाषेची व्याख्या:- भाषेच्या अभ्यासकांनी भाषा म्हणजे काय? हे आपल्या आपल्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

१. **वा.गो. आपटे** यांनी मराठी शब्दरत्नाकर या ग्रंथात भाषेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.
वा. गो. आपटे — मनातील कल्पना शब्दांच्याद्वारे बाहेर पडण्याचे साधन म्हणजे भाषा होय.

२. **भालचंद्र नेमाडे** — "खास मानवी असी संदेशवनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय".

३. **एडवर्ड सपीर** — 'कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वताच्या इच्छेवर अवलंबून असणारे मानवी साधन म्हणजे भाषा होय'.

४. **श्री.न. गजेंद्रगडकर यांनी** 'भाषा आणि भाषाशास्त्रात' या ग्रंथामध्ये मांडलेली व्याख्या.
श्री.न. गजेंद्रगडकर — यादृच्छिक ध्वनीसंकेतावर आधारलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा होय.

५. **फेर्दीना द सोस्युर** — "ध्वनी व अर्थ या सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय.

१९६८, १९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषा धोरणाची पार्श्वभूमी:-

१९६८, १९८६, आणि २०२० च्या शैक्षणिक धोरणामध्ये भाषा धोरण महत्वपूर्ण ठरले आहे. प्रत्येक धोरणाच्या मागील कालखंडातील राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक पार्श्वभूमीचा विचा केल्यास, यातील भाषा धोरणाचे विवेचन वेगवेगळ्या दृष्टीकोनातून करता येते.

१९६८ मध्ये पहिल्यांदा भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणले गेले. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दोन दशकांत भारताचे शिक्षण क्षेत्र सुधारण्याची गरज लक्षात घेतली गेली. शिक्षण सुधारणा करण्यासाठी कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार हे धोरण तयार करण्यात आले. १९६८ च्या शैक्षणिक धोरणात त्रिभाषा सूत्राचा स्वीकार केला गेला. यात मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा, हिंदी आणि इंग्रजी शिकवण्याची शिफारस केली गेली. विद्यार्थ्यांनी आपल्या राज्यातील प्रादेशिक भाषा शिकावी यावर जोर देण्यात आला. या माध्यमातून मातृभाषेतील शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले. त्याचप्रमाणे हिंदी भाषेला अधिक व्यापकता मिळवून देण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र काही राज्यामध्ये या धोरणाला विरोध झाला, विशेषतः दक्षिण राज्यांमध्ये हिंदी विरोधी आंदोलन झाली.

१९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी यांच्यानंतर राजीव गांधी सरकारने आणले. या धोरणात तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावासोबत देशातील शिक्षण प्रणाली आधिक समकालीन बनवण्यावर भर होता. १९८६ च्या धोरणातही त्रिभाषा सूत्र ठेवण्यात आले. यातून भाषिक विविधता जपण्यास मदत झाली. जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी इंग्रजीचे मूल्य आधिक वाढवले गेले. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण क्षेत्रातील इंग्रजीच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित केले गेले. देशाच्या एकात्मतेसाठी विविध प्रादेशिक भाषांमध्ये संवाद साधण्याचे महत्व अधोरीखीत करण्यात आले. हिंदीसह इतर भारतीय भाषानाही महत्व दिले गेले.

२०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच किंवा प्रादेशिक भाषेतूनच मिळावे यावर आधिक भर दिला आहे. यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढेल, असे गृहीत धरले आहे. त्याचप्रमाणे या धोरणामध्येही त्रिभाषा सूत्र कायम ठेवण्यात आले, मात्र कोणत्याही विशिष्ट भाषेचा बंधनकारक उल्लेख केलेला नाही. राज्ये व शाळांना योग्य त्या भाषिक निवडीचे स्वतंत्र्य देण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या भाषांचे ज्ञान मिळवण्याची संधी देऊन बहुभाषिक शिक्षणावर भर दिला गेला आहे. या धोरणात भारतीय भाषाबरोबरच आंतरराष्ट्रीय भाषाही शिकवण्याचा समावेश आहे. संस्कृतसह इतर शास्त्रीय भाषांचा अभ्यास प्रोत्साहित केला गेला आहे.

१९६८, १९८६ आणि २०२० या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषा धोरणाची तुलनात्मक सारणी.

अ.क्र.	विषय	१९६८ चे शैक्षणिक धोरण	१९८६ चे शैक्षणिक धोरण	२०२० चे शैक्षणिक धोरण
१.	भाषा धोरण	त्रिभाषा सूत्र, हिंदी,इंग्रजी आणि स्थानिक भाषा.	त्रिभाषा सूत्राचे मजबूत पालन, हिंदीला प्राधान्य.	त्रिभाषा सूत्राचा लवचिक वापर, मातृभाषेवर भर.
२.	माध्यम भाषा	प्राथमिक शिक्षण स्थानिक ठिकाण, पुढील शिक्षण इंग्रजी किंवा हिंदी भाषेत.	प्राथमिक शिक्षण स्थानिक ठिकाण, माध्यमिक शिक्षण इंग्रजी किंवा हिंदी भाषेत.	प्राथमिक शिक्षण मातृभाषेत किंवा प्रादेशिक स्तरावर.
३.	त्रिभाषा सूत्र	त्रिभाषा सूत्र लागू केले, काही राज्यांमध्ये विरोध.	त्रिभाषा सूत्र लागू केले, काही राज्यांमध्ये विरोध.	त्रिभाषा सूत्राचा नवीन दृष्टीकोन अधिक लवचिकता.
४.	इंग्रजीचे स्थान	उच्च शिक्षणासाठी इंग्रजी भाषा आवश्यक.	उच्च शिक्षणात इंग्रजीचे मूल्य वाढवले.	इंग्रजी भाषा महत्वाची पण पर्याय म्हणून अनिवार्य नाही.
५.	हिंदीचे स्थान	हिंदीला राष्ट्रीय भाषा म्हणून स्थान.	हिंदीला अधिक प्राधान्य, काही राज्यात विरोध.	हिंदी भाषेचे महत्व, स्थान कायम.
६.	बहुभाषिकता	भाषिक विविधता जपण्याचा प्रयत्न.	विविध भाषांचा समन्वय.	विविध भाषांचा समतोल, बहुभाषिकता प्रोत्साहन.

१९६८,१९८६ आणि २०२० च्या शैक्षणिक धोरणातील भाषा धोरणाचा तुलनात्मक आणि चिकित्सक अभ्यास.

भारताच्या शैक्षणिक धोरणामध्ये वेळोवेळी महत्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. १९६८,१९८६ आणि २०२० मधील शैक्षणिक धोरणामध्ये भाषेच्या धोरणातील बदलांचा तुलनात्मक आणि चिकित्सक अभ्यास करताना त्यातील मुख्य गोष्टींचा आढावा घेतला आहे.

तुलनात्मक अभ्यास:-

१) त्रिभाषा सूत्र:- त्रिभाषा सूत्रात तीन भाषेचा समावेश आहे. हिंदी, इंग्रजी व राज्यभाषा/ मातृभाषा. परंतु १९६८ आणि १९८६ मध्ये प्रादेशिक आणि हिंदी भाषावर अधिक भर होता, तर २०२० मध्ये मातृभाषेत शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

२) इंग्रजीचे महत्व:- १९८६ मध्ये इंग्रजीच्या वाढत्या भूमिकेला आधिक महत्व दिले गेले, तर २०२० मध्ये इंग्रजीला प्रोत्साहन दिले गेले असले तरी मातृभाषेतून शिक्षणावर अधिक भर देण्यात आला.

३) संस्कृत आणि प्रादेशिक भाषा:- १९६८ आणि १९८६ मध्ये प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन होते, परंतु २०२० मध्ये संस्कृतला विशेष महत्व देण्यात आले आहे, तसेच प्रादेशिक भाषांचा वापर वाढण्यावर व शिकण्यावर भर दिला गेला आहे.

१९६८ नुसार:-

१) त्रिभाषा सूत्र:- विद्यार्थ्यांनी मातृभाषा/ प्रादेशिक भाषा, हिंदी आणि इंग्रजी शिकणे.

२) मातृभाषेचा वापर:- प्रारंभिक शिक्षणासाठी प्रादेशिक भाषांचा वापर करण्याला प्रोत्साहन.

१९८६ नुसार:-

१) त्रिभाषा पुनरुउच्चार:- मातृभाषा, हिंदी आणि इंग्रजी शिक्षणाचा भर.

२) प्राथमिक शिक्षणात प्रादेशिक भाषा:- प्राथमिक शिक्षणात शक्य तितक्या मातृभाषेचा वापर करण्याचा आग्रह.

३) इंग्रजीचे महत्व:- जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी इंग्रजीच्या शिक्षणावर भर.

२०२० नुसार:-

१) मुलभूत मातृभाषा/ प्रादेशिक भाषा:- प्राथमिक स्तरापर्यंत इयत्ता ५ किंवा शक्यतो ८ पर्यंत मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेतून शिक्षण देण्यावर भर.

२) त्रिभाषा सूत्र लवचिकता:- तीन भाषा शिकःण्याचे तत्व कायम ठेवले; परंतु राज्ये आणि विद्यार्थी कोणत्या भाषांचा अभ्यास करतील हे त्यांच्या सोयीने ठरवण्याची स्वायत्त.

३) हिंदी आणि इंग्रजीवर भर कमी:- हिंदी किंवा इंग्रजी भाषा अनिवार्य नसून सर्व भाषांना समान महत्व.

४) बहुभाषिकता:- भाषिक विविधता जपण्याचा प्रयत्न विविध भाषांचा समन्वय, विविध भाषांचा समतोल राखणे व बहुभाषिकता प्रोत्साहन व प्रादेशिक भाषांचा अभ्यास करण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देण्याचे उदिष्ट.

चिकित्सक अभ्यास:-

१. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८:- १९६८ मध्ये आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मुख्य उदेश भारतीय भाषांचे संरक्षण आणि प्रोत्साहन करणे होते. या धोरणात भाषांच्या क्षेत्रात खालील मुद्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

- त्रिभाषा सूत्र:- १९६८ मध्ये लागू केलेल्या धोरणानुसार विद्यार्थ्यांनी तीन भाषा शिकणे अनिवार्य करण्यात आले. यात मातृभाषा, हिंदी आणि इंग्रजी भाषा यांचा समावेश होता. हे धोरण प्रादेशिक विविधता जपून राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी राबवण्यात आले.
- प्रादेशिक भाषांना महत्त्व:- प्राथमिक शिक्षण मातृभाषेत देण्यावर जोर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रादेशिक भाषेतील शिक्षणाचा लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न करण्यात आले.

२. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६:- १९८६ मध्ये येणाऱ्या धोरणात शिक्षणाच्या एकूणच स्वरुपात बदल कण्यात आले. त्यात भाषिक धोरणाचाही महत्वाचा भाग होता.

- त्रिभाषा सूत्राचा पुनरुच्चार:- १९६८ च्या त्रिभाषा सूत्रावर आधारित १९८६ च्या धोरणातही तीन भाषा शिकवण्याच्या सूत्राची अंमलबजावणी करण्यात आली. हिंदी भाषिक राज्यांमध्ये हिंदीबरोबरच इंग्रजी व अन्य एक प्रादेशिक भाषा शिकवण्याचे सुचविण्यात आले.
- इंग्रजी भाषेला महत्व:- तंत्रज्ञान, विज्ञान आणि जागतिक व्यवहारात इंग्रजीची वाढती महत्वाची भूमिका ओळखली गेली, ज्यामुळे शिक्षणाला महत्व दिले गेले.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०:- २०२० मध्ये आलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भाषा धोरणानामध्ये मोठे बदल घडून आणले.

- मातृभाषा शिक्षणावर भर:- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने पहिली ते पाचवीपर्यंत किंवा शक्य असल्यास आठवीपर्यंत शिक्षण मातृभाषेत किंवा प्रादेशिक भाषेत दिले जावे असे सुचवले. यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासावर सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता वर्तवली गेली.
- त्रिभाषा सूत्राचा पुनरुच्चार:- त्रिभाषा सूत्र कायम ठेवले गेले, परंतु कोणती भाषा शिकावयाची हे राज्ये आणि शाळांना ठरवण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. इंग्रजीचे महत्व ओळखले गेले, परंतु मातृभाषेच्या वापरला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला गेला.
- संस्कृत भाषेला विशेष प्रोत्साहन:- संस्कृतला एक पर्यायी आणि महत्वाची भाषा म्हणून मान्यता दिली गेली. विद्यार्थ्यांना संस्कृत भाषा शिकण्याचा पर्याय देण्यात आला.
- बहुभाषिकता:- धोरणाने विद्यार्थ्यामध्ये बहुभाषिकता आणि सांस्कृतिक समृद्धीला प्रोत्साहन देण्याचे उदिष्ट ठेवले. प्रत्येक विद्यार्थ्याला दोन भाषांवर प्रभुत्व मिळवण्यास प्रोत्साहित केले.

समारोप:-

१९६८,१९८६ आणि २०२० या तीनही शैक्षणिक धोरणांमध्ये भाषा धोरण हे एक महत्वाचे अंग होते. १९६८ मध्ये प्रादेशिक भाषांचा सन्मान आणि हिंदीचा प्रसार, १९८६ मध्ये इंग्रजीचे महत्व आणि २०२० मध्ये मातृभाषेतील शिक्षण यावर विशेष भर दिला गेला. प्रत्येक धोरणातील भाषिक दृष्टीकोन त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय घटकांशी संबधित होता.

संदर्भ:-

१. १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.
२. १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.
३. २०२० चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.
४. शैक्षणिक संस्थांच्या प्रतिक्रिया.
५. शैक्षणिक क्षेत्रातील शिक्षकांच्या प्रतिक्रिया.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com